म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र.

म. ग्रं. सं. ठाणे.

विषय	लेखक	सन
इतिहास	संपा. - कानिटकर व. वेलणकर	
संग्रहालय क्रमांक	पुस्तकाचें नांव	
२१३	प्रतिभा कुलकर्णी प्रदीप	

293

सुबोध ग्रंथमालेचें पुष्प सहावें

क्षत्रियकुलवंश प्रदीप.

हा ग्रंथ

संपादक, मुद्रक व प्रकाशक.

श्री. काशीराव बापूजी देशमुख

अमरावती.

क्षत्रियांचा वदाक्त श्रावणी, क्षत्रियकुलवंश प्रदीप, क्षत्रियांचा ब्राम्हणाशीं सामना, सबोध सत्यनारायण, कीर्तनरत्नमाला व्याख्यान रत्नमाला,

इत्यादि ग्रंथाच्च तर्फे.

यांनीं

सुबोध छापखान्यांत छापला.

इ. सन १९२७

सर्व हक्क मालकानें स्वाधीन ठेवले आहेत.

किंमत २ रुपये

गुप्ते, ग.

1(C(e)5
सदर
31-3-62

सुबोधग्रंथ माले चीं

सुंदर पुस्तकें.

(८९२५)
1382

१ क्षत्रियांचीं वेदोक्त श्रावणी व श्रवणीपुराण-आत्मोद्धार करणारा ग्रंथ १

२ क्षत्रियांचा ब्राह्मणांशीं सामना--भटांचा घमेंड चांगली जिरविणें. ... ॥।

३ आर्य क्षत्रियांचा सांग्र इतिहास--सर्व जातींचीं नेर्वाजुनी सप्रमाण माहिती ३

४ क्षत्रियकुलवंशप्रदीप--सर्व जातींचे कुलवंश, गोत्र, उत्पत्ति, कुलाचार वगैर २

५ क्षत्रिय महात्म्य पुराण--गीतेसारखा पवित्र ग्रंथ नित्य पठण करावा. ९॥

६ क्षत्रियगाठोचें ऊर्फ विष्णुगांठीचें जानवें मुद्दाम तयार करविलेले शेकडा ३=

७ व्याख्यानरत्नमाला--झणझणित सुंदर ५० व्याख्यानें, वक्तृत्वशक्ति वाढतें १॥

८ कीर्तनरत्नमाला-क्रांतिकारक सुंदर १० कीर्तनें, खऱ्या धर्माचें मर्म कळतें १॥

९ सत्यसुबोध नाटक:--यावरून जलसेही करतां यतात अंधश्रद्धा उडेल १

१० ग्रामकटकलीला नाटक--जोशी, मारवाडी, पटवारी, गांवें सुंदर फार्स १

११ स्वराज्यसाधन नाटक-अक्कलहुषारीचे व डावपेचाचे मूर्तिमंत चित्र १

१२ भिक्षुकशाहीचे बंड--भिक्षुकांच्या राक्षसी लीलांचें भयंकर वर्णन. २

१३ स्वयंपुरोहित--लग्नमौंज, क्रियाकर्म, धर्मविधि, मंत्रतंत्र, सर्व पूजासंग्रह ॥।

१४ मराठ्यांचा पूर्वपीठिका--प्राचीन माहितीचा ऐतिहासिक सुंदर ग्रंथ १

१५ कोदंडाचा टणत्कार-भिक्षुकशाहीचा धुव्वा उडविणारे क्षत्रियांचे जोरदार बाण १॥

१६ सुधर्म विजय नाटक--ब्राह्मण ब्राह्मणेतर झगड्याचे सुंदर चित्र ... ... ॥।

१७ आर्यधर्माचा सुंदर संदेश--वेदोक्त आर्यधर्माचा पवित्र तत्व यांत दिलीं आहेत १।

१८ स्वामी दयानंदाचा बोधपर व्याख्यानें--मोक्षदास जाण्याचा धार्मिक गुरु किल्ला ॥।

स्वामी दयानंदाचा परिचय-हिंदुधर्म म्हणजे वैदिकधर्म याचा खुबीदार तुलना ॥

वेद ईश्वरप्रणित आहेत काय ?--वेदांची धार्मिक मार्मिक, संक्षिप्त माहिती ।=

२१ विवाह संस्कार--क्षतजगत्गुरुनीं केलेला वेदोक्त लग्नविधीचा उत्तम ग्रंथ ॥।

२२ सुबोध सत्यनारायण--सत्यनारायणाचा साक्षात चमत्कार. ... ... ।

२३ हिंदुजनांचा ऱ्हास व अधःपात-हृदयाला चटकालाऊन सोडणारे सुंदर पुस्तक १

पत्ता:—के. वी. देशमुख.

संपादक, सुबोधग्रंथमाला, अमरावती-बऱ्हाड.



श्री. काशीराव बापुजी देशमुख.

संपादकः – **सुबोधग्रंथमाला**–अमरावती वऱ्हाड.

जन्मः–मिति चैत्र शु. १, संवत १९१६, इ. स. १८६०.

मनोरंजन प्रेस, मुंबई.

५ ब्रह्म उर्फ यदु उर्फ हरिवंश. ६ अग्नि वंश. ७ वंश व पिढ्यांची कालगणना व दिल्लीची परंपरा. ८ गोत्रें आणि प्रवरें. ९ गोत्र व प्रवर म्हणजे काय ? १० गोत्रप्रवराचे महत्व ११ शीलाशिलांचे दाखले. १२ क्षत्रियांची गोत्रें स्वतंत्र आहेत. १३ एकाच वेदांत व एकाच गोत्रांत शरीर संबंध होऊं शकतात काय ; १४ गोत्र प्रवरांचा विसर केव्हां व कां पडला १५ ज्या राजांची नावें नवग्रहांस देण्यांत आली त्यांचीं नांवें. १६ ऋषींचे पांच प्रकार. १७ मुख्य सप्तऋषींचीं नांवें. १८ गोत्राबद्दल कुळांचा उपयोग. १९ ब्राह्मणांची गोत्रें क्षत्रियापासून झालीं. २० ब्राह्मणांचा पिंड. २१ ब्राह्मणांच्या गोत्रासंबंधानें मनुस्मृतीतील वचन. २२ मनुस्मृतीच्या आधारें गोत्राचे पद.

परिशिष्टे

१ परिशिष्ट नं, १ विषयीं खुलासा पृ. १५६

१ परिशिष्ट नं. १ हिंदुस्थानांतील क्षत्रिय संस्थानिकांची संक्षिप्त माहिती पृ. १५७-१६२

२ परिशिष्ट नं. २ सूर्यवंशाचीं गोत्रें व प्रवरें पृ. १६३

३ परिशिष्ट नं. ३ चंद्र वंशाचीं गोत्रें व प्रवरें पृ. १६४

मराठा क्षत्रियांचे कुळगोत्र उघडण्याची किल्ली पृ. १६६

पंचकुळी व सप्त कुळींची उत्पत्ति पृ. १६८

४ परिशिष्ट नं. ४ अ. मराठा क्षत्रियांचीं शहाण्णव कुळें पृ. १७०

४ परिशिष्ट नं. ४ ब. शहाण्णव कुळांची वर्णानुक्रमवार यादी पृ. १७१

५ परिशिष्ट नं. ५ सुमारे ९६ कुळें पोटकुळें वंश गोत्र वगैरेचा तक्ता पृ. १७२

परिशिष्ट नं. ६ उपडण्याची किल्ली पृ २२३

६ परिशिष्ट नं. ६ उपनावांचा वर्णानुक्रमवार तक्ता पृ २२५

७ परिशिष्ट नं. ७ हिंदुस्थानचा वसूल, रेलवे, लोकसंख्या वगैरे पृ. २६०

६ या सभेंत मंजूर झालेले ठराव. ७ इ. स. १९०५ सालची धार्मिक चळवळ. ८ इ. स. १९०६ सालचे उदेपूरच्या राणाजीचें दुसरें पत्र. ९ श्रीशिवाजी-क्षत्रिय-वैदिक-विद्यालय. १० श्री शाहू क्षत्रिय—वैदिक-विद्यालय. ११ क्षात्रजगद्गुरुची नवीन योजना १२ छत्रपति राजाराम महाराजांचा राज्याभिषेक व विवाह.

प्रकरण ८ वे.

क्षत्रियांस चळविण्यास कित्ता. पृ. १०६-११०

१ खऱ्या क्षत्रियांचा खून. २ श्रीराम व परशुरामाचें युद्ध ३ परशुरामास काळ्या पाण्याची शिक्षा. ४ रामाचा कित्ता गिरवा. ५ कोल्हा व कोंकरूं यांची मैत्री.

प्रकरण ९ वें

ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाचें रहस्य पृ. ११२—११९

१ जातवार पुरोहित कां असावें. २ ब्राह्मणेतर चळवळ निर्माण होण्याचीं कारणें. ३ पोटाच्या खळगीसाठी देशावर घालिति घाला. ४ थोर थोर देशभक्त पृढाऱ्यांचें उद्गार. ५ पहिली ब्राह्मणेतर कॉंग्रेस. ६ उपसंहार.

प्रकरण १० वें.

शरीर संबंध उर्फ बेटीव्यवहार पृ. ११८—१३१

१ पौराणिक काळचे शरीर संबंध. २ बऱ्हाडांतील देशमुख पाटलांचे मराठ्यांशीं शरीर संबंध ३ भोसले व जाधव यांचे इतरांशी शरीर संबंध. ४ बडोद्याचे गायकवाडांचे शरीर संबंध ५ शिंद्यांचे शरीर संबंध ६ कोल्हापूरचे संभाजीच्या राण्या. ७ करवीरकरांचे शरीर संबंध. ८ उत्तर हिंदुस्थानचे शरीर संबंध. ९ पृथ्वीराजाचे शरीर संबंध.

प्रकरण ११ वें.

वंश गोत्र विचार पृ. १३२—१५५

१ क्षत्रियांचे वंश. २ सूर्यवंश, ३ चंद्र वंश. ४ नाग उर्फ शेषवंश

क्षात्रिय कुळ-वंश प्रदीप

विषयानुक्रमणिका.

प्रकरण १ लें.

खुलासा व शद्ध मीमांसा. पृ. १-५३

१ खुलासा. २ शद्धमीमांसा. ३ कूळंबी व कूर्मी शद्धाची मीमांसा ४ तिळोले उर्फ तिरोले कुणबी. ५ कुरम. ६ कुलपति. ७ कुळंब्याच्या पोट जाती. ८ कुळंबीशद्धाची व्याप्ति. ९ कुळंबी व मराठा हे एकच आहेत. १० लेवा उर्फ रेवा, कडवे व पातीदार कुळंबी. ११ मराठ्यांचा महाराष्ट्र १२ शाहूछत्रपतीचें भाषण. १३ क्षत्रिय शद्ध विचार. १४ देशमुख १५ पाटील, पट्टा कील, पट्टी, पट्टा, पट्टाबीश १६ पाटलांचे गिवाज १७ माधानचं गोंदा ढांची सनद. १८ पळसो व काकडां येथील देशमुख पाटलकीय सनदा. १९ मराठ्यांचा लग्नविधी व मौंज २० बांडींचें साल. २१ वतनें व जमेदारी, २२ पाटील पासोडी. २३ जहागिरी व इनामे. २४ पालंपट. २५ इजारा २६ जमींदार. २७ मगठा. २८ स्वामी. २९ असामी. ३० भाट. ३१ ब्राह्मण. ३२ भट्ट. ३३ भिक्षुक. ३४ जोशी. ३५ यजमान ३६ रुद्र ३७ उपाध्याय. ३८ सत्पात्रींदान. ३९ गोब्रह्मप्रतिपालक. ४० गोब्राह्मण प्रतिपालक. ४१ भगवा झेंडा. ४२ शिवाजीचे गुरु कोण ? ४३ रामराम, ४४ वर्मा. ४५ शर्मा.

प्रकरण २ रें.

मराठ्यांचें प्राचीनत्व. पृ ५४—६४

१ मराठ्यांची पूर्व पीठिका. २ मराठा क्षत्रियांत मोडणाऱ्या जाती ३ मराठा शद्धाची व्युत्पत्ति. ४ मराठा शद्धाचें प्राचिनत्व ५ वर्ण दर्शक उपपदें. ६ मराठे व जाट एकच आहेत. ७ नकली मराठे. ८ मराठे क्षत्रिय व्यातील थोरपुरुषांचे शिक्के.

प्रकरण ३ रें.

चार वर्णांत क्षत्रियांचें श्रेष्ठत्व. पृ. ६५—७१

१ चार वर्णांत पहिला वर्ण क्षत्रियांचा आहे. २ ब्राह्मण वर्ण क्षत्रिय तून निर्माण झाला. ३ चार वर्णांची उत्पत्ति. ४ मूळचे आर्य क्षत्रिय होते.

प्रकरण ४ थें

राक्षस आणि वानर. पृ. ७१—७५

१ राक्षस—यक्ष, २ सुर—असुर, ३ देव-दानव दैत्य. ४ रोडिले व बलुची लोक. ५ वानरतुल्य हल्लींचे लोक.

प्रकरण ५ वें.

वर्णव्यवस्था पृ. ७६—९२

१ आर्यावर्तांत आर्यांचा प्रवेश, २ आर्य लोकांत वर्णभेद नव्हता ३ श्रीरामचंद्राचे काळीं वर्णभेद नव्हता. ४ श्रीकृष्णाचे काळीं जन्मावरून वर्ण भेद नव्हता. ५ बुद्धकाळीं वर्णभेद नव्हता. ६ अशोकाचे काळीं जन्मावरून वर्णभेद नव्हता. ७ हल्लींच्या वर्ण व्यवस्थेचा प्रारंभ. ८ हल्लींच्या भिक्षुकी हिंदुधर्माचा जन्म. ९ शूद्र शब्दाची व्युत्पत्ति. १० चारवर्णांत रोटी बेटी व्यवहार चालू होता. ११ व्रात्य म्हणजे काय ? १२ मौंज न करणाऱ्या ब्राह्मणांच्या जाती.

प्रकरण ६ वें

जाती भेद. पृ. ९३—९९

१ जाती भेद आणि वर्ण भेद केव्हां जन्मास आले ? २ जातिबंधनाचा गळफास व भिक्षुकी जुलूम.

प्रकरण १५ वें

क्षत्रियांचे धार्मिक व सामाजिक अधिकार पृ. १००—१०५

१ सातारच्या छत्रपतीस पेशव्यांनीं कैद केलें. २ इ. स. १८३२ सालची महाराज्यांची जाहीर सभा. ३ जाहीर सभेंत मान्य झालेले मुख्य ठराव. ४ उदेपूरच्या राणाजाचें मान्यतापत्र. ५ इ. सं. १८३५ सालची धार्मिक सभा-

८ परिशिष्ट नं. ८ हिंदुस्थानांतील हिंदुंची वर्णवार लोकसंख्या १९११ सालचे खानेसुमारी प्रमाणें पृ. २६०
९ परिशिष्ट नं. ९ अस्पृश्य मानलेल्या लोकांची प्रांतवार लोकसंख्या पृ. २६२
१० परिशिष्ट नं. १० ब्रिटिश साम्राज्याशी हिंदुस्थानची तुलना पृ. २६३
११ परिशिष्ट नं ११ हिंदुस्थानची धर्मवार लोक सख्या १९११ सालचे खानेसुमारी प्रमाणें. पृ. २६३
१२ परिशिष्ट नं. १२ हिंदुस्थानची भाषावार लोकसंख्या १९११ सालचे खानेसुमारी प्रमाणें पृ २६४
१३ परिशिष्ट नं. १३ हिंदुस्थानची प्रांतवार लोकसंख्या १९११ सालचे खानेसुमारी प्रमाणें. पृ. २६४
१४ परिशिष्ट नं. १४ सर्व पृथ्वीची खंडवार व धर्मवार लोकसंख्या १९११ सालचे खानेसुमारी प्रमाणें. पृ. २६५
१५ परिशिष्ट नं. १५ सर्व पृथ्वीचें खंडवार क्षेत्रफळ इ स. १९११ सालचें खानसुमारी प्रमाणें पृ. २६६
१६ परिशिष्ट नं. १६ हिंदुस्थानची घर संख्या व लोकसख्या १९२१ सालचे खानेसुमारी प्रमाणें. पृ २६६
१७ परिशिष्ट नं. १७ हिंदुस्थानची धर्मवार लोकसंख्या १ २१ सालचे खानेसुमारी प्रमाणें पृ. २६७
१८ परिशिष्ट नं. १८ जातवार शिक्षणाची माहिती व लोकसंख्या पृ २६९-२७०

भाग २

जातवार क्षत्रियांची वंशकुळ गोत्रांची माहिती

१ राजपुतांचीं वंश कुलगोत्रांची माहिती पृ. २८१—२९३
२ चांदसेनीय कायस्तप्रभूंची वंश-कुळ गोत्रांची माहिती. पृ. २९४ ३११
३ बाहुसार क्षत्रियांची वंश-कुल गोत्रांची माहिती. पृ ३१२ ३१४
४ वंजारी क्षत्रियांची वंश-कुलगोत्रांची माहिती. पृ. ३१५-३२३

याशिवाय:- १ चित्रगुप्त कायस्त क्षत्रिय, २ नंदगोळी क्षत्रिय, ३ सोमवंशी आर्य क्षत्रिय म्हणजे ४ लोहार ५ सुतार, ६ सोनार, ७ तांबट-कार, ८ चितारी क्षत्रिय, ९ चव्हाण क्षत्रिय, १० भाट उर्फ ठाकुर क्षत्रिय, ११ माळी क्षत्रिय, १२ भंडारी क्षत्रिय, आणि १३ ब्रह्मक्षत्रिय यांची वंश कुळ गोत्रांची व इतर माहिती **क्षत्रियांचा इतिहास** यानांवाच्या आमच्या मोठ्या इतिहासांत दिलेली आहे ती पहा.



श्रीमत्क्षात्र जगद्गुरु सं. पाटगांव.

क्षत्रिय कुल-वंश प्रदीप.

क्षात्रिय कुळ-वंश प्रदीप

प्रकरण १ ले

खुलासा व शब्द मिमांसा

खुलासा:—ज्या जातीच्या लोकांनीं फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानच्या निरनिराळ्या बहुतेक भागांत आपल्या बौद्धिक आणि शारिरिक बलाच्या जोसवर आपलीं राज्यें स्थापन करून प्रजेचें पुत्रवत् पालन केलें, ज्या जातीचा प्राचीन व अर्वाचिन इतिहास दिव्य क्षात्र तेजानें ओतप्रोत भरलेला आहे, ज्या जातींत जग प्रसिद्ध शककर्ते होऊन गेले, ज्या जातींत श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण आणि श्रीशिवछत्रपतिसारख्या गोब्रह्म प्रतिपालक अवतारी विभूति निर्माण होऊन, रसातळास गेलेला हिंदु धर्म ज्यांनीं पुनः प्रस्थापित केला आणि नामशेष झालेल्या हिंदुंच्या हिंदुत्वाचा जिर्णोद्धार करून दुष्टांचा संहार केला; ज्यांच्या अंगच्या धैर्य, शौर्य, विर्य, औदार्य, इत्यादि अद्वितिय गुण समुच्चयाच्या जोरावर हिंदुस्थानच्या एका विविक्षित भागास " मराठ्यांचा महाराष्ट्र " हें त्या जातीचें गुणकर्म दर्शक नांव पडलें, ज्या जातीचे लोक हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत अद्यापि राज्य करीत आहेत, ज्या जातीचे लोक सरदार, जहागीरदार, इनामदार, देशमुख, सरदेशमुख, देसाई, सरदेसाई, पाटील, मालगुजार इत्यादि स्वामित्व ऊर्फ आधिकारदर्शक वतनदारीच्या पदव्या प्रामुख्यें करून धारण करणारे आहेत, जे लोक वंशपरंपरेच्या हक्कानें एक अगर अनेक गांवच्या पाटीलकीचे व परगण्याच्या देशमुखीचें अम्मल बजावणींचें काम करून ग्रामाधिकारांच्या महत्वाच्या हुकमतीच्या जाग्यावर प्रमुखत्वानें अद्यापि विराजमान आहेत, ज्यांनीं सुतार, लोहार, कुंभार चांभार सोनार, महार, माली, धोबी, शिंपी, गारगारी, भट्ट आणि भाट या बारा बलुतेदार आणि तेली, कोळी, जंगम, गोसावी, गोंधळी, गुरव, मांग मांत्रिक [मदारी,] कलावंतीण मुल्ला इ० बारा अलुतेदार ऊर्फ कारू—नारू कुळांना आपल्या गांवांत वसवून व पोसून त्या कुळांचे पति अर्थात कुलपति हें यथार्थ नांव मिळविलें व महाराष्ट्रांतच काय पण सर्व हिंदुस्थानांत ज्या

जातीचा यश सौरभ सर्वत्र दरवळून राहिला आहे, त्या आमच्या प्रभावशाली कुलंबी ऊर्फ मराठा जातीचा खरा वर्ण आणि धार्मिक दृष्टया खरा दर्जा काणता ? या संबंधानें अलीकडे वराच गैरसमज आढळून यावा ! यापेक्षां त्या जातीचा खेदजनक दैव दुर्विपाक तो कोणता ? फक्त एका शिक्षणाच्या अभावी आम्ही आपल्या पूर्वापार तेजस्वी इतिहासास पारखे झालों, दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहून आपली दिनचर्या चालविण्याची परावलंबी, आत्मघातकी दुष्ट संवय आमच्या हाडीं मासीं खिळून गेली आणि त्यामुळें बालपणापासून धनगरांच्या मेंढ्यांच्या कळपांत वाढलेल्या जातिवंत सिंहाच्या छाव्याची स्वत:च्या जातिवंतपणाची जाणीव ज्या प्रमाणें नष्ट व्हावी तद्वत आज आमची हीन दीन स्थिति झाली आहे !

आमच्या पैकीं कांहीं लोक आपली जात ' क्षत्रिय ' सांगतात; कोणी आपल्याला ' देशमुख ' म्हणवितात; कोणी ' पाटील ' म्हणून बाजतात; तर कोणी आपल्याला ' मराठा ' म्हणविण्यांत भूषण मानतात; आणि वऱ्हाड व नागपूर प्रातांतील जुन्या पिढीची वडील मंडळी तर अद्यापि स्वत:ला 'कुळंबी' म्हणवून घेण्यांतच धन्य समजतात. वरील निरनिराळीं नामाभिधानें धारण करणाऱ्या आमच्या जातीच्या लोकांत या शिवाय आणखी बरेच पोट भेद आहेत त्यांचें वर्णन विषयानुरोधानें पुढें येणारच आहे. ज्याअर्थी वरील निरनिराळीं नांवें धारण करणाऱ्या सर्व लोकामध्यें ' रोटी व्यवहार ' राजरोष-पणें अबाधित चालूं आहे; आणि अज्ञान मूलक गैर समजुतीला व निराधार अंध रूढीला केवळ दुराग्रहानें किंवा कांहीं अग्राह्य व ग्राम्य चाली रीतीच्या भीतीनें वळी पडलेल्या कांहीं व्यक्ति खेरीज करून परंपरेनें चालत आलेला ' बेटी व्यवहार ' देखील अतां बहुतांशीं बिन हरकत रूढ होत चालला आहे, आणि त्या आचार विचार, कुळकुळाचार, उपनांवें, गोत्रें आणि वंशशाखा वगैरे सर्व कांहीं एकमेकाशीं मिळतीच आहेत त्या अर्थी वरील निर निराळीं नांवें धारण करणारे सर्व लोक एकाच जातीचे आहेत यांत संशय नाहीं. पण ज्यांचे वाडवडील आणि सोयरे धायरे मोठ्या अभिमानानें 'कुळंबी' हीच आपली जात पिढ्यानुपिढ्या सांगत आले आहेत त्यांचेच वंशज स्वत:स

कुळंबी ' म्हणवून घेण्यांत अलीकडे संकोच मानू लागले आहेत ! यांचें मुख्य कारण ' कुळंबी ' या शब्दाची खरी व्युत्पत्ति केवळ अशिक्षितपणामुळें ज्यांची त्यांनाच माहिती नाहीं आणि स्वतः कलम बहादर म्हणविणाऱ्या वर्गानें अनेक स्वार्थी हेतूंनीं ' मराठा ' या शब्दांची अलिकडे जशी लांडगेतोड चालविली आहे तशीच किंवहुना त्याहिपेक्षां जास्त शिताफीनें ' कुळंबी ' या उच्चार्थी शब्दाची देखील धुळधाण उडविण्याचा त्यांनीं विडाच उचलला आहे ! त्यामुळें विद्येंत मागसलेल्या ' कुळंबी ' लोकांची फारच चमत्कारिक स्थिति झाली आहे !

इ. सन १९०९ सालच्या दिसेंबर महिन्यांत वऱ्हाडांत उमरावती येथें " मराठा शिक्षण परिषदेचें " तिसरें अधिवेशन झालें. त्यावेळीं वऱ्हाडांतील परिषदेच्या स्वागत मंडळीच्या जबाबदार पुढारी गृहस्थांच्या सह्यांनीं स्वजातिं बांधवांना उद्देशून जे जाहिर विनंती पत्र छापून प्रसिद्ध करण्यांत आलें होतें त्याच्या माथाळ्यावर " **देशमुख, पाटील, कुळंबी, मराठा बांधवांस विनंती:—** "

असे ठळक शब्द मुद्दाम छापण्यांत आले होते. त्याचा मुख्य हेतु असा होता कीं त्यापैकीं जें पद ज्यांना योग्य वाटेल तें त्यांनीं आपापल्या आवडी प्रमाणें स्वतः करितां घेऊन आपलेपणाच्या नात्यानें आमच्या प्रत्येक ज्ञातिबांधवानें भेदभाव रहित परिषदेला येऊन साह्य करावें व एकजीव व्हावें आणि

" ही आमच्या जातीचीच परिषद आहे "

अशी प्रेमळ भावना प्रांतपरत्वें निरनिराळ्या नांवांनीं संबोधिल्या जाणाऱ्या आमच्या सर्व ज्ञाति बांधवांच्या मनांत आदर पूर्वक ठसावी. केवळ नामाभिधानामुळें उत्पन्न होणारा मतभेद टाळण्या करितां हें मुत्सद्दीपणाचें धोरण स्विकारण्यांत आलें होतें. तरी देखिल मध्यंतरी कुळंबी व मराठा या नांवा संबंधानें उभय नामाभिमानी लोकांत जो खटका उडावयाचा तो थोडाबहुत अंशानें उडालाच ! वऱ्हाड व नागपूर प्रांतांतील लोक कुळंबी म्हणावण्यात अभिमान बाळगतात. सबब ते म्हणाले कीं मरठ्यापेक्षां आम्ही श्रेष्ठ आहोत व म्हणून मराठ्यांच्या परिषदेला आम्ही येणार नाहीं व त्यांच्या बरोबर पंक्तीत

जेवणास बसणार नाहीं. याच्या उलट पुणें, मुंबई, सातारा वगैरे दक्षिणचे मराठा म्हणविणारे लोक म्हणूं लागले कीं आम्ही श्रेष्ट. सबब आम्ही कुळंब्याशीं मिसळणार नाहीं. अखेरीस दोन्ही पक्षांच्या पुढारी मंडळीची एक सभा मुंबईस झाली. आपण दोघेही बरोबरीचे एकाच ज्ञातीचे बांधव आहोत असें ठरून या निराधार वादाच्या प्रश्नासंबंधानें उभयपक्षांची समजूत लवकरच पटली. वऱ्हाड नागपूर प्रांत व इतर प्रांतांतील 'कुळंबी' आणि मुंबई इलाखा व देशी संस्थानें आदिकरून इतर भागांतील 'मराठा' जातीचे सर्व लोक एकाच हाडामांसाचे असून ते अस्सल जातिवंत क्षत्रिय आहेत, अशी सर्वांची समज पटून, पूर्वी दळणवळणाच्या अभावीं या जातींत केवळ गैरसमजुतीमुळें 'रोटी व्यवहारा' संबंधानें क्वचित स्थळीं जी साशंक वृत्ति दिसून येत होती ती या परिषदेमुळें एकदम साफ नाहींशी झाली; इतकेंच नाहीं तर त्यांच्यांत परस्पर **'बेटी व्यवहार'** सुद्धां राजरोषपणें होऊं लागले. प्रांतपरत्वें निरनिराळीं नांवें धारण करणाऱ्या पण एकाच जातीच्या या लोकांच्या मनांतील ही निराधार तेढ उर्फ विचक अशा प्रकारें नाहींशी होऊन ते एकजीव बनल्यामुळें समाजाचें बरेंच मोठें महत्वाचें कार्य झालें.

वैदिक, पौराणिक व शास्त्रीय ग्रंथाधारें शोध-मीमांसा.

ज्या अर्थी वऱ्हाडप्रांत, नागपूरप्रांत, आणि महाराष्ट्र वगैरे दख्खनच्या बहुतेक भागांत आणि उत्तर हिंदुस्थानांत देखील कुळंबी जातीचे बहुसंख्यांक लोक आहेत, व त्या जातींत बरेच राजे महाराजे होऊन गेले असून शेंकडोंच काय पण हजारो प्रतापशाली नररत्नें चमकून त्यांनीं भारतवर्षाच्या निरनिराळ्या भागांत आणिबाणीच्या प्रसंगीं आपलें अद्वितीय क्षात्रतेज प्रगट करून जगास थक्क करून सोडल्याबद्दल इतिहास साक्ष देत आहे; आणि ज्या जातीचे बहु संख्यांक लोक प्रस्तुतकाळीं देखील राज्यकर्ते असून लहान मोठ्या अम्मल बजावणीच्या हुकमतीच्या जागांवर वंशपरंपरेच्या वतनदारीच्या हक्काचा उपभोग घेत आहेत त्या अर्थी हजारो वर्षांपासून चालत आलेल्या त्या जातीच्या

'कुळंबी' या बहुमानार्थी नांवाची योग्य मीमांसा न करितां त्या संबंधानें जर मुग्धता धारण केली तर, कुणबी उर्फ कुळंबी या उच्च जातीला खालीं ओढण्याचा द्वेषमूलक प्रयत्न करणाऱ्या लोकांच्या निराधार टीकांना जास्तीच ऊत येऊन, या बहुमानार्थी नांवाची हद्दीं जी विनाकारण धुळधाण उडूं लागली आहे तिची परमावधी होण्याचा संभव आहे. सबब प्रथमारंभीं कुणबी उर्फ कुळंबी या शब्दाचीच किंचित मीमांसा करणें बरें असें आम्हांस वाटतें.

हिंदुधर्मशास्त्रांत पवित्र मानलेली पारिपात्रिनीची नर्मदा नदी ही दक्षिण आणि उत्तर हिंदुस्थानची मर्यादा मानली जाते. तिच्या खालच्या भागास दक्षिण हिंदुस्थान उर्फ दख्खण आणि वरच्या भागास हिंदुस्थान किंवा उत्तर हिंदुस्थान अशा संज्ञा आहेत. ज्या जातीला दक्षिणेंत कुन्बी उर्फ कुणबी किंवा कुळंबी लगतात, त्याच जातीला उत्तर हिंदुस्थानांत संस्कृत भाषेंत कूर्मी उर्फ कूर्मीन् ही संज्ञा आहे. कूर्मीन् या संस्कृत रूपाचें मराठींत कुणबी असें सदृश रूपांतर होणें ही गोष्ट अगदीं साहजिक आहे. उत्तर हिंदुस्थानांतील कूर्मीन उर्फ कूर्मी आणि दक्षिणेंतील कुणबी उर्फ कुळंबी यांचीं उपनामें, गोत्रें वंश कुळाचार वगैरे बहुतेक गोष्टींचा मेळ पटतो. या वरून उत्तरेचा कुर्मी उर्फ कूर्मीन् आणि दख्खनचा कुळंबी हे लोक देशकालानुसार आज जरी भिन्न दिसतात तरी ते मुळचे एकच असून असल जातीवंत क्षत्रिय आहेत असें पुढें दिलेल्या अनेक वैदिक पौराणिक आणि ऐतिहासिक पुराव्यावरून दिसून येतें.

कुळंबी:—या शब्दाचा खरा अर्थ काय व त्याची युत्पत्ति कशी लागते, याचा विचार केला असतां आपणास असें दिसून येतें कीं:—

कुलबीजं—या संस्कृत शब्दापासून कुळंबी हा शब्द बनला आहे. कुलं आणि बीजं हीं दोहीं प्रथमेचीं एकवचनें आहेत. या दोहोंचा संधी केला म्हणजे कुलबीजं हा शुद्ध संयुक्त शब्द तयार होतो. कुलांचे जें बीजं तें कुलबीजं; हा षष्ठी तत्पुरुषसमास होतो. कुलबीजं म्हणजे सर्व कुळांचें मूलबीज; कुलबीजं म्हणजे मूळचे आर्य; याच एका मुख्य बीजापासून म्हणजे आर्यापासून एकंदर सर्व त्रिभुवनें व त्यांच्या हजारो शाखा म्हणजे चार वर्ण उर्फ आर्यांच्या

पहिल्या चार मुख्य जाती आणि इतर हजारो जाती व पोट जातींचा वंश विस्तार होऊन हजारो शाखा पल्लवांचा विस्तृत आर्य वंशवृक्ष बनला आहे. अर्थात आर्य उर्फ हिंदु म्हणविणाऱ्या सर्व जातींचें मूळबीज आर्य लोकच आहेत.

वटवृक्षाचें बीज खसखसीपेक्षां देखील बारीक असतें ; पण त्या पासून मोठा अफाट विस्तृत वृक्ष तयार होतो. पुढें त्या वृक्षाच्या शाखा लांबवर पसरून त्या शाखांना पारंब्या [मुळ्या] फुटून त्या पारंब्या जमीनीला टेकतात व त्यामुळें निराळ्या खोडाचा नवीन वृक्ष तयार होतो. पण ज्या शाखेच्या पारंब्या जमीनीला टेकतात ती शाखा मूळच्या खोडाला धरून राहते. या प्रमाणें अनेक शाखांच्या अनेक पारंब्यांचे अनेक नवीन वृक्ष तयार होतात व अशा प्रकारें एकाच खोडाला धरून अनेक वटवृक्षांचें जाळें पसरलें जातें. पण मूळचें खोड एकच असतें. ज्या मोठ्या शाखेच्या मुळ्या जमीनीला टेकून त्याचें नवीन खोड व नवीन झाड बनतें, त्या मुख्य शाखेचा जोड मूळच्या खोडाशीं असतो तो जोड तोडून टाकला म्हणजे नवीन पारंब्याचा निराळा स्वतंत्र वृक्ष मानला जातो. पण त्या शाखेचा संबंध जर न तोडला तर शेंकडो पारंब्यांमुळें बनलेल्या शेंकडो खोडांच्या विस्तृत वटवृक्षांचें मूळबीज एकच आहे अशी खात्री होते. तोच न्याय येथेंही बरोबर लागूं पडतो.

कुलबीजं हा संस्कृत शब्द आहे. तेव्हां अर्थातच तो संस्कृत भाषा वापरणाऱ्या आर्यांना म्हणजे हिंदुनांच लागूं पडतो. हिंदुस्थानांत अगदी प्रारंभीं उत्तरेकडून आलेले आर्य लोक हे मूळचे सुधारलेले शूर वीर क्षत्रिय लोक होत, या संबंधानें मतभेद नाहीं. त्यांनीं आपल्या क्षात्र तेजानेंच हिंदुस्थान पादाक्रांत केला व त्याच मूळच्या आर्य क्षत्रियांपासून पुढें आर्यांची म्हणजे हिंदूंचीं निरनिराळीं कुळें उपन्न झालीं. अर्थात हल्लींच्या चातुर्वर्ण्य--प्रधान हिंदुच्या असंख्य कुळांचें मूळबीज म्हटलें म्हणजे मूळचे आर्य क्षत्रिय हेच होत. या वरून कुलबीजं अर्थात सर्व कुळांचें मूळबीज म्हणजे मूळचे आर्य

क्षत्रिय असा त्याचा सरळ अर्थ होतो. **कुळवीजं** या शब्दापैकीं शेवटल्या जं या अक्षराचा लोप झाला किंवा चतुर्थ अक्षरा वरील अनुस्वार द्वितीय अक्षरावर ठेवला तर **कुळंबी** हा प्राकृत उर्फ मराठी शब्द अगदी बरोबर बाकी राहतो. वी आणि वीज हे दोन्ही शब्द अगदी एकाच अर्थी मराठींत वापरतात. अर्थात कुळवीजं या संस्कृत शब्दापासून कुळंबी हा मराठी शब्द सरळ व शुद्ध रीतीनें तयार झाला. कुळंबी म्हणजे सर्व कुळांचें बी अर्थात मूळचे आर्य-क्षत्रिय, असा त्याचा सरळ व स्पष्ट अर्थ होतो. यांत व्याकरणाच्या नियमाची किंवा शब्दाच्या अर्थाची ओढाताण मुळींच केलेली नाहीं. कुळवीजं हा मूळचा शुद्ध शब्द आणि त्याचा अगदी खरा व स्पष्ट आणि सरळ अर्थ यांचेंच सरळ स्पष्टीकरण वर केलें आहे.

संस्कृत भाषेंतील **ल** या अक्षराच्या जागीं मराठींत **ळ** हें अक्षर होत असतें. उदाहरणार्थ त्रिकाल-- त्रिकाळ; फल--फळ. याच नियमानें कुलंबी याचें कुळंबी आणि कुलवी याचें कुळवी--कुणबी अशी मराठींत रूपें बनलीं आहेत असें स्पष्ट दिसतें.

कुळंबी या शब्दाची ही व्युत्पत्ति किती शेर आणि उच्चार्थी आहे हें जास्त विस्तारानें सांगण्याची गरज नाहीं. हे कुळंबी अनुकूल परिस्थितींत वाढले तर त्यांचा स्वराज्यरूपी मोठा वृक्ष तयार होतो आणि [उन्हाळ्या-सारख्या] विपत्काळीं जीवनाच्या अभावीं सुकले तर वटवृक्षाच्या वारीक बिजाप्रमाणें संकोच पावून अणुरेणुतुल्य अगदी क्षुल्लक [शेतकरी, मजूर वगैरे] अशा बीज रूपानें गुप्त राहतात. पण पुनः वर्षाऋतूमध्यें जीवनाची अनुकूल परिस्थिति प्राप्त होतांच ते **बी** पुनः एकदम अंकुर रूपानें प्रगट होऊन त्याचा पूर्ववत राज्यरूपी थोर वृक्ष तयार होतो. कुळंबी हे मूळचे सूर्य-वंशी व चंद्रवंशी आर्यक्षात्रिय आहेत. म्हणूनच जणु काय सूर्यचंद्राप्रमाणें अस्तोदय आणि वृद्धिक्षय हीं त्यांच्या कुल संस्काराची पूर्व परंपराच वर दर्शविल्या प्रमाणें त्यांना चिकटूनच राहिलीं आहे.

अत्यंत तीव्र व अत्यंत खरतड आणि अगदीच विपरित अशा मुसलमानशाहींत लुप्तप्राय झालेल्या कुळंब्याच्या उर्फ मराठ्यांच्या हिंदुपदपाद-

शाहीला श्रीशिवरायाच्या काळची अनुकूल परिस्थिति प्राप्त होतांच स्वराज्य सूर्याचा उदय होऊन तो स्वराज्य सूर्य आपल्या प्रखरतर तेजानें हिंदुस्थानभर तळपूं लागला आणि पेशवाईरूपी राहूकतूंचें ग्रहण त्याला लागल्यामुळें त्या विपरीत परिस्थितिमुळें तो अस्तंगत होऊन बीजरूपानें पुनः पूर्व पदावर जावून वसला. कुळव्याच्या उदयास्ताचें हें ताजें चित्र आपल्या डोळ्यासमोर मूर्तिमंत जिवंत आहे.

कुळंबी या शुद्र शद्वाचीं निरनिराळीं रूपांतरें होऊन प्रांतपरत्वें कुळंवी, कुळवी, कुणवी, कणवी, इत्यादि शद्व वहिवाटींत असल्याचें दिसून येतें पण ते सर्व मूळचे खरे कळंवी या शद्वाचेच पर्याय आहेत.

आजचे कुळंबी--कुणवी शांततेच्या काळीं शेतीचा मुख्य धंदा करतात. पण क्षात्रतेज दर्शविण्याची वेळ आली म्हणजे लागलीच हातांतील नांगर सोडून तरवार धारण करतात आणि राष्ट्रकार्यासाठीं मरूं किंवा मारूं या घनघोर प्रतिज्ञेनें रणांगणावर प्राणाची आहुती देण्यास व घेण्यास सज्ज होतात. मूळचे आर्य देखील लढाईच्या प्रसंगीं शस्त्रधर व शांततेच्याकाळीं हलधर बनून मोठमोठीं अरण्यें तोडून स्वतः शेती करीत असत. श्रीकृष्ण स्वतः चक्रधर असून त्याचा वंडील बंधु बलराम दादा हे हलधर या नांवानें सुप्रसिद्ध होते. जनकाच्या नांगरास लागून सीता जमीनींत सांपडली. कुरुक्षेत्र नांवाचें सुप्रसिद्ध रणांगण हें मुळचें कुरुचें शेत होतें म्हणून त्याचें नांव कुरुक्षेत्र पडलें. या वरून हजारो वर्षां पूर्वीचे आपले पूर्वज जे आर्य त्या आर्यांचा धर्म आणि त्यांची संस्कृति आजच्या कुळंब्यांनीं बरोबर पाळून आपण त्या श्रेष्ठ आर्यांचेच खरे वंशज आहोत ही खूण त्यांनीं बरोबर कायम ठेविली आहे.

कुर्मी शद्वाची मीमांसा:- कुलबीजं या शुद्र संस्कृत शद्वा पासून झालेला जाती संबंधी व फार श्रेष्ठ अर्थ दर्शक असा कुळंबी शद्व दक्षिणेंतील आर्य क्षात्रिय जाताचा दर्शक असून कुळंवी म्हणजे आर्य क्षात्रिय या अर्थी तो शद्व दक्षिणेंत वापरतात. पण उत्तर हिंदुस्थनांत कुळंबी या शद्वाच्या ऐवजी कूर्मी हां शब्द वापरतात. कूर्मी म्हणजे आर्य क्षात्रिय असाच त्याचाही अर्थ आहे.

सबब वेद, पुराणें व धर्मशास्त्र यांच्या आधारानें आपण कूर्मी या शद्वाची मीमांसा करूं.

पुल्लिंगी कूर्मी शद्व इंद्र, भूपति, पृथ्वीपति ब्रह्मा, विष्णु, विर्यवान तेजास्वि इत्यादि अर्थाचा वाचक असून क्षात्रियांचा दर्शक आहे:—

" रसो गंध रसे स्वादे तिक्तादौ विषरागयोः ॥
शृंगारादौ द्रवेवीर्यं देह धात्वंबुपारदे " ॥ १ ॥
इति विश्वः ॥ " वीर्यं तेजः प्रभोवयोः ॥
शुक्रं शक्तौचेति हैमः " । " वीर्यं प्रभावे शुक्रेच
तेजः सामर्थ्ययोरपि " ॥१॥ इति मेदिनी ॥
" शुक्रं तेजोरेतसीच बीज वीर्येंद्रियाणिच "
" वीर्यंबले प्रभावेच " इति अमरः ॥

अर्थः—रस=वीर्य; वीर्य=शुक्र, तेज, बल, प्रभाव, शक्ति, सामर्थ्य याप्रमाणें अमरकोशांत अर्थ सांगितला आहे. तसेंच तेज=वीर्य; वल=सामर्थ्य. या अर्थानें वरील शब्दांचा उपयोग वरील काव्यांत केलेला आहे. आणि प्रोफेसर व्ही. एम्.आपटे यांच्या संस्कृत इंग्लिश कोशांतः—

१ रसः २ वीर्यं ३ तेजस् ४ बलम् या शब्दांचा

Semen virile असाच अर्थ दिला आहे.

स यःस कूर्मोऽमौस आदित्यः ॥ ६ ॥

शतपथ ब्रा० कां० ७ अ० ५ ब्रा० १ ॥

यांत आदित्य ह्मणजे सूर्याला कूर्म असें ह्मटलें आहे. " **स यत्कूर्मोनाम एतद्वैरूपं कृत्वा प्रजापतिः प्रजा असृजत यदसृजता करोत्तद्यदव करोत्तस्मात्कूर्मः काश्यपो वै कूर्मतस्मादाहुः सर्वाः प्रजाः काश्यप्य इति ॥ १ ॥**

शतपथ ब्रा० का० ७ अ० ५ ब्रा० १॥

यांत कूर्म--प्रजापति, ब्रह्मदेव, कश्यप असा अर्थ कूर्म शब्दाचा केला आहे. ब्रह्मदेव अथवा कश्यप यांनीं सृष्टी उत्पन्न केली असा शास्त्रार्थ आहे

ह्मणून ज्याला आपलें गोत्र माहीत नसेल त्यानें ' कश्यप , गोत्र सांगावे अशी सध्यां वहिवाट आहे.

यावरून कूर्म ह्मणजे तेज, वल. प्राण, रस, वीर्य शुक्र, प्रभाव, शक्ति, क्षत्रिय, पृथ्वी, विष्णुचा दुसरा अवतार ह्मणजे कूर्मावतार, दिवस, स्वर्ग, ब्रह्मदेव आणि कश्यप इतकें ' कूर्म ' या शब्दाचे अर्थ होतात हें वरील विवेचनावरून स्पष्ट झालें. " **संज्ञायां मन्माभ्याम् ५–२–१३७** " या पाणिनीच्या सूत्राप्रमाणें **इन्** हा स्वामित्व उर्फ आधिपत्यदर्शक प्रत्यय कूर्म या शब्दाला लाविला ह्मणजे कूर्म याचा ' कूर्मीन् ' असा प्रातिपदिक शब्द तयार होतो.

यानंतर " **हल्ङ्याब्भ्यो दीर्घात्सुतिस्य पृक्तं हलम्** " **६–१–६८** आणि " **न लोपः प्रातिपदिकान्तस्य ८–२–७** " या सूत्रांच्या आधारानें ' कूर्मीन् या पुल्लिंगी शब्दाचें प्रथमेचें एक वचन ' **कूर्मी** , (दीर्घ ईकारान्त) असें रूप तयार होतें. उदाहरणार्थः **कूर्मः= पृथिवी, भूः (अस्त्यहेयति ह्मणजे यानें जो युक्त अथवा याचा जो स्वामि तो) कूर्मी=पृथिवीपतीः, भूपतेः कूर्मः=दिवः** (अस्त्यस्येति) कूर्मी=सूर्यः " **वरिष्ठे अस्य दक्षिणाश्रियतीन्द्रो मघानां तुविकूर्मितमः । ययावज्रिवः परियास्यं हो मघाच धृष्णोदयसे विसूरीन् ॥१॥** ,,

ऋग्वेद मंडल २, सूक्त ३७, अष्टक ३, अध्याय ७, वर्ग ९ ॥

वरील दोन्ही ऋग्वेद सूक्तांत इंद्राला ' कूर्मी , असें ह्मटलें आहे; त्याच प्रमाणें त्यांत ' तुवि ' या शब्दाचा प्रयोग ' महा, मोठा, श्रेष्ठ ' या अर्थानें केलेला आहे.

' तुवि कूर्मी ' =श्रेष्ठ कूर्मी, इंद्र, देवांचा राजा; देवांचा राजा इंद्र याला वेदांत क्षत्रिय मानिलें आहे. " तुवि कूर्मिन्--Indra R. V. S. 37, 2 Indra , " तुवि=महा, मोठा, श्रेष्ठ. या तुवि शब्दावरूनच तुवर, तोमर हे शब्द वनले असावेत. क्षत्रिय मराठा जातींत ' तुवर ' तोंवर, तोमर या उपनांवाचा श्रेष्ठ वंश आहे. वऱ्हाड आणि नागपूर प्रांत व खानदेशांत ' तिरोले '

किंवा ' तिळोले ' या शाखेचे कुणबी सर्वांत श्रेष्ठ मानले जातात. ' तिरोले ' हा तुवर शब्दाचाच अपभ्रंश असून त्याचा अर्थ वर सांगितल्याप्रमाणें मोठा, श्रेष्ठ असा आहे.

तिळोले उर्फ तिरोले कुळंबी:—उत्तर हिंदुस्थनांत राजपुताऱ्यांत ' **तिरोला** ' या नांवाचे तेथील राजवंशानें मंडित केलेलें एक पवित्र स्थळ आहे. तिराले उर्फ तिळोले या श्रेष्ठतर शाखेचे ' कुळंबी ' मूळचे त्या ' तिरोला ' नामक पवित्रस्थानचे रहिवाशी असून तेथून सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी ते दक्षिणेंत आले ह्मणून त्यांना ' तिरोळे ' हें नांव पडलें असें गॅझेटिअरमध्यें लिहिलें असून कांहीं विद्वान् पंडितांचेहि तसें मत आहे व तें संभवनीयही आहे. ' कूर्मीन् ' या संस्कृत शब्दाचे ' कुन्वी ' कुणबी ' हे अपभ्रंश होऊं शकतात व त्याच प्रमाणें ' तुवर ' ' तोमर ' ' तिरोले ' ' तिळोले ' हीं ' तुवि या शब्दाची अपभ्रष्ट रूपें होऊं शकतात; पण अशी रूपें होऊं शकत नाहींत, अशी कदाचित् कोणाला शंका आल्यास त्यांनीं महाभाष्यकारांचें खालील सूत्र लक्षांत ठेवावें.

एकैकस्य शब्दस्य बह्वोऽपभ्रंशाः तद्यथा गोरित्यस्य शब्दस्य गावी, गोणी, गोता, गोपोतलिकादि अपभ्रंशाः ॥

महा भाष्यकार ह्मणतात कीं संस्कृत शब्दांवरून प्राकृत शब्द बनविताना किंवा कोणत्याही शब्दाचे अपभ्रंश करतांना एकाच शब्दाची अनेक अपभ्रष्ट रूपें होऊं शकतात. त्याच नियमास अनुसरून **' गो ' ह्मणजे गाय या शब्दाचे ' गावी, गोणी, गोता व गोपोतलिका'** इत्यादि हीं अपभ्रष्ट रूपें ह्मणजे अपभ्रंश आहेत. हे अपभ्रंश दिसण्यांत जरी विलक्षण दिसतात तरी ते अगदीं खरे असून यथार्थ आहेत.

मिश्रण सूर्यमल्ल यानें आपल्या वंशभास्कर नामक ग्रंथांत (भाग २ पृष्ट १०१३---१०१४] कूर्मवंश सूर्यवंशांतर्गत मानला असून त्याची उत्पत्ति अयोध्येचा सुमित्र राजाचा पुत्र कूर्म या पासून सुरू झाली असें लिहिलें आहे.

" सुमित्रवंशे रट्टोर कुर्म वंशोत्पत्ति

तृतीय राशि सप्त पंचांश मयूख-"

दोहा.

इत सुमित्र साकेतनृप, तज्योयोगबल देह ।
विश्वराज कूरम प्रमुख, हुवे बहु सुत तस गेह ॥ १ ॥
विश्वराजकोही विदित, अपर विश्ववर नाम ।
जाके सुतके पुत्रसों , कुल रट्ठोर ललाम ॥२॥
कूर्म विश्ववरको अनुज, जासो कूरम वंश ।
बजी है सुही कच्छवाह बली, याके सुतके अंश ॥३॥
राष्ट्रेश्वर शिव तुष्ट किये, मलयराज तपासेद्ध ।
तिनके वर ताकै तनय, राष्ट्रकूट हुव इद्ध ॥४॥
तासों कुल रट्ठोड यह, जानहु संभर राम ।
सुरसासहित महिधर हूं, उतजस किय उद्दाम ॥५॥

भावार्थः—अयोध्येच्या सूर्यवंशी सुमित्र नामक राजानें योग बलानें शरीराचा त्याग केला. त्याला विश्वराज व कूरम वैगेरे पुष्कळ पुत्र होते. विश्वराजाला विश्ववरही ह्मणत होते. विश्वराजाचा भाऊ कूरम यापासून कूरम उर्फ कूर्मवंश सुरूं झाला. या कूर्म वंशालाच कच्छवाह ह्मणतात. विश्वराजाच्या राष्ट्रश्येन नांवाच्या नातवापासून राठोडांचें सुंदर कूळ उत्पन्न झालें.

कूर्मिन् उर्फ कूर्मी ह्मणजे 'श्रेष्टतम दर्जाचें अस्सल क्षत्रिय' असा अर्थ वरील विवेचनावरून स्पष्ट झाला आहे. 'कूर्मी' या शद्वाचे ऐवजीं कोठें कोठें 'कुरम' या शद्वाचा प्रयोग केलेला आढळून येतो. तो यथायोग्य असून त्याचाहि अर्थ 'क्षत्रिय' 'भूपति' असाच आहे:—

संस्कृतांत '**कु**' ह्मणजे पृथिवी आणि '**रम**' ह्मणजे वल्लभ उर्फ पति किंवा रमणारा असा शद्वार्थ आहे. यावरून 'कुरम' ह्मणजे पृथिवीपति, भूवल्लभ, भूपति असा सरळ अर्थ होतो.

कुलपतिः—'कुलंवीन्' याचा अर्थ सर्व कुळांचें मूळबीज ह्मणजे कुलपति असा होतो हें वर सांगितलेंच आहे. प्रत्येक गांवांतील १२ बलुतेदार आणि बारा अलुतेदार ह्मणजे मांगामहारापासून तों थेट गांवच्या भट्ट-भिक्षुक

जोशापर्यंत गांवांतील एकंदर २४ कारकून कुळांचा जो पति, अर्थात ग्रामाधिपति लगेज सत्ताधारी स्वामि तोच कुलपति होय. त्याच्याशिवाय गांवांतील इतर कोणत्याही कुळाला कुलपति किंवा स्वामि हें नांव शोभत नाहीं तें इतरांनीं धारण करणें पूर्वीच्या समजेस बहादरीच्या कांहीं शक्यही नव्हतें. म्हणूनच गांवचा मुख्य सत्ताधारी, वतनदार, देशमुख अगर पाटील यास कुलपति म्हणण्याची परंपरा चालत आली आहे. 'कुलपति' याचाच समानार्थबोधक 'कुलंबी हा शब्द असून मूळचा शब्द कुलभोजं उर्फ कुळंबी व नंतर त्या कुळंब्यापासून वारा कुळांचा पती असा जो ग्रामाधिकारी जमेदार तो कुलंबती असा शब्द रूढींत आला असावा. वऱ्हाडप्रांत, नागपूरप्रांत, व महाराष्ट्राच्या बहुतेक भागांतील बहुतेक गांवचीं देशमुखी व पाटीलकीचीं लगेज मुख्य ग्रामाधिकाऱ्यांचीं वतनें कुळंबी लगेज क्षत्रिय जातींच्याच घराण्यांत परंपरेनें बहुतांशीं चालत आलीं असून तीं अद्यापि तशींच कायम आहेत. यावरून अकलेच्या व मनगटाच्या जोरावर सत्ता चालविण्याचा क्षात्रियत्वाचा अगत्य हक्क ते अद्यापि बजावीत आहेत यांत शंका नाहीं. वतनदार ग्रामाधिकाऱ्यांच्या यादींत 'पाटील पांडे' आणि 'देशमुख देशपांडे' अशीं जोडनांवें दिसून येतात खरीं; पण पांडे आणि देशपांडे हे मुख्य ग्रामाधिकारी नाहींत. पांड्या हा गांवच्या पाटलाचा मदतगार लेखक कारकून असून देशपांड्या हा परगण्याच्या देशमुखाचा मदतगार [परगणा कारकून-लेखक] आहे. पेशवे हे ज्याप्रमाणें छत्रपतीच्या राज्याचे मुख्य प्रधान म्हणजे मुख्य दफ्तरदार होते; ते स्वतंत्र राजे कधींहि मुळींच नव्हते. त्याप्रमाणें पांडे आणि देशपांडे हे अनुक्रमें पाटील आणि देशमुख यांचे मुख्य दफ्तरदार आहेत. ते मुख्य ग्रामाधिकारी मुळींच नाहींत. ही गोष्ट वतनदारीच्या जुन्या सनदापत्रावरून व सरकारी कागदावरून निर्विवाद सिद्ध होते "सांगा पाटील काय लिहूं?" अशी म्हण आहे. तिचा अर्थ पाटलानें सांगावें आणि पांड्यानें लिहावें, म्हणजे पाटलाच्या आज्ञेप्रमाणें पांड्यानें वागावें. अर्थात तो पाटलाचा कारकून. ग्रामाधिकाऱ्याचा म्हणजे कुलपतिचा मुख्य मान पाटील व देशमुख यांचाच आहे आणि या मुख्य संज्ञेच्या जागांवर कुळंबी उर्फ क्षत्रिय जातीचेच बहुसंख्य लोक विशेषत:

अद्यापि आहेत. यावरून पाहतां वऱ्हाडप्रांत, नागपूरप्रांत व महाराष्ट्राच्या सर्व भागांतील सत्ताधारी 'कुळंबी' लोक 'अस्सल जातिवंत क्षत्रिय' अहित आणि 'कुळंबी' या शब्दाचाच खरा अर्थ 'क्षत्रिय' असा आहे. ह्या गोष्टी ऋग्वेद, अथर्ववेद, शतपथ ब्राह्मणें, अमरकोश, संस्कृत व इंग्रजी भाषेचे कोश, भाषाशास्त्र आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिति इत्यादि आधारावरून सप्रमाण सिद्ध झाल्या आहेत. असें आपणास वरील विवेचनावरून दिसून येईल.

कुळंब्यांच्या पोटजाती:—१ तिरोले उर्फ तुवर २ धनोजे, ३ जाधव, ४ खैरे, ५ दखने, ६ बावने, ७ झाडे, ८ लंबे उर्फ रेवे, ९ कडवे, १० पातीदार, ११ अंजन, १२ मितये, इत्यादि कुळंब्यांच्या अनेक पोटजाती आहेत. हा वर्ग अज्ञानांधःकारांत घोरत पडल्यामुळें आणि इंग्रजी अमलापूर्वी दळणवळणांचीं सुलभ साधनें उपलब्ध नसल्यामुळें साधारणपणें बारा कोसांच्या अंतरापलीकडील लोकांचा संबंध परस्परांशीं होणें कठीण जात असे आणि देशकाल व परिस्थितीनुरूप परस्पर समाजांतील रूढी भिन्न भिन्न होत गेल्या. मुळें वरील पोटभेदाचे लोक परस्परापासून वरेच विलग दिसतात. त्यांच्यापैकीं कित्येकांत रोटी वेटी व्यवहारही सध्या होत नाहींत पण खरोखर ते सर्व मूळचे एकाच जातीचे व एकाच शाखेचे आहेत यात संशय नाहीं. दळणवळणांचीं साधनें झणजे आगगाड्या वैगरे झाल्यापासून ते परस्परांत मिसळूं लागले आहेत, व त्यांच्यांत रोटी व्यवहार सर्रास सुरूं झाले आहेत. आतां क्वचित वेटी व्यवहारही होतात.

कुळंबी शब्दाची व्याप्ति

कुळंबी या थोर संज्ञेनें पूर्वी कोण कोण संबोधिले गेलें ?

कुळंबी या उच्चार्थी व बहुमानार्थी संज्ञेनें कोणकोणते महाभाग क्षत्रिय राजे आणि थोर पुरुष पूर्वी संबोधिले गेले याबद्दल प्राचीन व अर्वाचीन इतिहासांचे आधार या भागांत देऊन नंतर 'कुळंबी' व 'मराठा' हे एकाच जातीचे लोक आहेत या मुद्या संबंधानें विवेचन करूं

ऋग्वेदांत इंद्राला व सूर्याला 'कूर्नीज्' असें म्हटलें आहे त्याचा स्पष्ट खुलासा ऋग्वेद मंडळ ८ सूक्त ५१ अष्टक ६ अध्याय ४ वर्ग ५० यांत वर केलाच आहे. सत्य प्रतिज्ञ राजा हरिश्चंद्र, दीलीप, रघु, अज दशरथ रामचंद्र, कुश प्रभृति सूर्यवंशांत अवतीर्ण होऊन गेलेल्या महाभाग थोर थोर विभूतींना कूर्मिन् या उच्चार्थी नांवानें पुराणांत संबोधिलें आहे. कुळंबी उर्फ मराठा म्हणविणाऱ्या क्षत्रियांत 'सूर्यवंशी' क्षत्रियांची शेंकडो घराणीं अद्यापि उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ साळुंके उर्फ सुलंकि, रावत उर्फ राऊत, राणा उर्फ राणे, मलिक उर्फ मुलिक चौधरी, दळवी, सुरवे, भोसले, कदम, सिसोदे-जगताप, चव्हाण, इत्यादि.

पद्माकर कविकृत 'जगद्विनोद' नामक ग्रंथांत जयपूरचे राजे श्री. सवाई जगत्सिंह महाराज कछवाह (कूर्मवंशी) यांना सूर्यवंशी म्हटलें असून पुनः प्रत्येक अध्यायाचे समाप्ति सूचक ओवीमध्यें 'कूर्मवंशावतंस' असें म्हटलें आहे:—

जयजय शक्ति शिलामयी, जयजय गढ आजमेर ॥
जयजय जयपूर सुरपुर सदृश, जो जाहीर चहूं फेर।१।
जयजय जाहीर जगतति जगत्सिंह नरनाह ।
श्री प्रतापनंदन बली, रविवंशी कछवाह ॥२॥

'इति श्री कूर्म वंशावतंस श्रीमन्महाराजाधिराज राजराजेंद्र श्री सवाई महाराज जगत्सिंहाज्ञया मथुरा स्थाने मोहनलाल भट्टात्मज कवि पद्माकर विरचित जगद्विनोद नामकाव्ये शृंगाररसावलंबन विभाव प्रकरणम् ।१।

ईश्वरभक्त नाभादास यानें आपल्या 'भक्तमाल' नामक ग्रंथांत राजा पृथ्वीराज चव्हाण याला 'कूर्म' म्हटले आहे:—

आंबेर अछित कूर्मको द्वारकानाथ दर्शन दियो।
पृथ्वीराज पर्चो प्रकट तन शंख चक्र मंडित कियो ॥१॥

भूषण कवीनें 'शिवाबावनी' नांवाच्या आपल्या ग्रंथांत कूर्मिन् उर्फ कूरन कुलाला 'शासनकर्ते कुल'—श्रेष्ठ कुल असें म्हटलें आहे. ही कविता

दिल्ली दरबारांत औरंगजेब बादशहासमोर भूषण कवीनें म्हटली होती.

कूरमकमल कलाद्विज हैं। कलिंदवर मुगल गुलाब।
राना केतकी समाज है। तोंवर कनेर जाहिजुही पुनि।
चंद्रावल पाडरी पवार गौरे केवरे दराज हैं॥
भूषण भनत मुचुकुन्द बडे गूजर हैं बघेले वसंत।
सदा सुखद निवाज हैं। लेई रस एननको बैठी॥
न सकत अहै अली नवरंगजेब चंपा शिवराज हैं॥१॥

भावार्थः—राणा–हें केतकी पुष्प, तोंवर–कणेराचें फूल, चंद्रावल हीं जाईजुईचीं फुलें, पंवार हें पाडरीचें फुल आहे, गौरे हा केवडा, गुजर मुचकुंद, बघेले वसंत; या फूलाप्रमाणें हीं क्षात्रिय घराणीं आहेत. या प्रतापवंत शासनकर्त्या क्षत्रिय कुलाप्रमाणें कुरम म्हणजे कूर्मी उर्फ कुळंबी हेंही कमलाच्या फुलाप्रमाणें श्रेष्ठ क्षत्रिय कूल आहे. या सुगंधयुक्त पुष्प वाटिकेचा रसस्वाद घेण्याकरितां औरंगजेबरूपीं भ्रमर या पुष्पावरच बसून गुंजारव घालीत असतो पण शिवराज तर सर्वश्रेष्ठ चंपा आहे. त्या चंप्याच्या पुष्पावर बसण्याची औरंगजेबरूपी भ्रमराची काय मगदूर आहे!!!

मि. हंटर साहेबांनीं केलेलें स्टॅटिस्टिकल आकौंट ऑफ बेंगाल भाग ११ यांत म्हटलें आहे कीं:—

महाराष्ट्र साम्राज्य संस्थापक छत्रपति श्री शिवाजी महाराज हे कुळंबी म्हणजे श्रेष्ठतम क्षत्रिय होते. त्यांची वंशावळ उदेपूरच्या शिसोदिया राजघराण्याशीं बरोबर मिळाली असून ती खरी असल्याबद्दल त्यावर राणी सरकारचा शिक्का मोर्तब झालेला आहे. त्याचप्रमाणें ग्वाल्हेर व सातारा येथील राजे हे देखील कुळंबी--उत्तम क्षत्रियच आहेत.

Shivaji was a Kunbi and the Rajas of Gwalior and Satara are said to be of the same race."

Hunter's Statistical Account of Bengal Vol XI.

मि. कॉर्नेजी यांनीं रचलेलें रेसिस् ट्राइब्स ऍन्ड कास्ट्स् ऑफ औंध-या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं:—

१ ग्वाल्हेरचे शिंदे सरकार, सातारचे भूत पूर्व राजे भोसले सरकार

च नागपुरचे राजे भोसले हे कुळंवी झणजे अस्सल क्षत्रिय अतएव त्या जातीचे संबंधित होते. मि. कॅंबेलनें असें सिद्ध केलें आहे कीं, महाराट्ट--महारथ--म्हारथी--मराठा यांची सत्ता ज्यांनीं स्थापन केली ते कुळंवी, [अस्सल क्षत्रिय] होते आणि श्री शिवाजी महाराज व त्यांचे वरेचसे सरदार कुळंवीच झणजे क्षात्रियच होते.

(1) Sindhia of Gwalior, the Ex--Raja of Satara and the Ex--Raja Bhonsale of Nagpur were Kunbies (Kshatrias) or of the classes akin to them Mr. Campbell has pointed out that the kunbi element was the foundation of the Maratha power, and that Shivaji and many of his Chiefs were Kunbies " (Kshatrias)

Carnegij's Races Tribes and castes of Oundh.

कुळंवी या जाती संबंधानें खालील उद्दीपक झणी " प्रिंसिपल नेशन्स ऑफ इंडिया" नांवाच्या ग्रंथांत लिहिल्या आहेत.

[१] स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीं। कुळंग्याची ती छाती मोठी.
(२) ऐकोन कुळंग्याची गर्जना। जमींदारी लागे चरणा
(३) कोटिचे कुळंबीके पीछे। कुळंबी नही काहूके पिछे।
(1) The kunbi is fond of asserting his Independence.
(2) Where it thunders there the kunbi is a land-lord.
(3) Crores follow the kunbi but the kunbi follows no man.

कुळंवी ही क्षत्रियत्व बोधक थोर संज्ञा कोणकोणत्या राजा महाराजांना व महाभाग थोर थोर पुरुषांना पूर्वी बहुमानानें लावण्यांत आली हें आतां पर्यंत सांगितलें. आतां कुळंबी व मराठा हे लोक एकाच जातीचे आहेत काय ? हें आपण पाहूं.

कुळंबी आणि मराठा हे एकच आहेत.:—

" Marathas are found all over the District. The 1881 Census includes them under Kubies from whom they do not form a separate caste "

Bombay Gazetteer, Satara vol XIX page 75.

मुंबई ग्याझेटिअर, सातारा, भाग १९ पृष्ट ७५ यांत लिहिलें आहे कीं, बहुतेक सातारा जिल्ह्यांत मराठा जातीचे लोक आढळून येतात.. कुळंवी व मराठा ही एकच जात आहे ह्मणून सन १८८१ सालच्या खाने-सुमारींत त्यांना कुळंवी या सदरांतच दाखल केलें आहे.

"The Marathas are returned as numbering 1193000 and are found all over the District. They wear the sacred thread and are careful to perform the regular Hindu observances. Cultivating Marathas are called Kunbies. There is no objection to a son of Maratha marrying Kunbi daughter and occasionally daughters of poor Marathas are given in marriage to a rich kunbi. The Marathas are hardworking, strong, hardy and hospitable but hot tempered. As soldiers they are brave and loyal they are land holders, husbandmen, pleaders, traders, labourers, soldiers. writers, messengers and servants"

Bombay gazetteer, Belgaon vol XXI page 126.

भावार्थः—या जिल्ह्यांतील मराठा जातीची लोक संख्या ११९३००० असून हे या जिल्ह्यांत सर्वत्र आढळून येतात. ते पवित्र जानवें घालतात आणि हिंदु धर्माप्रमाणें पवित्र आचार विचार पाळतात. शेतकी करणाऱ्या मराठ्यांना कुळंवी ह्मणतात; व त्यांच्या पैकीं जे शिपाईगिरीच्या धंद्यांत राहिले त्यांना मराठा ह्मणतात. मराठा जातीच्या वराशीं कुळंव्याच्या मुलीचें लग्न होण्यास हरकत येत नाहीं. तसेंच गरीब मराठ्यांची मुलगी श्रीमंत कुळंव्याच्या मुलाला देतात. मराठा जातीचे लोक फार मेहनती, मजबूत, चिवट हाडाचे आणि संभावित असतात. पण त्यांचा स्वभाव गरम असतो. ते शूर व राजनिष्ट शिपाई आहेत. ते जमींदार, शेतकरी, वकील, व्यापारी, शिपाई, मजूर, कारकून पट्टेवाले आणि साधे नौकर या धंद्यांत आहेत.

मुंबई गॅझेटियर बेळगांव भाग २१ पृष्ट १२६.

लेवा उर्फ देवा, कडवे, पाटीदार, कुळंबी:-

कर्नल टॉड साहेबानें लिहिलेल्या राजस्थान नामक ग्रंथांत ह्मटलें

आहे कीं श्री रामचंद्राचे पुत्र कुश आणि लव [लहू] यांना देखील कूर्मवंशीय ह्मणत असत.

कुश वंश हा सूर्यवंशांतर्गत आहे यांत संशय नाहीं. कुशाला कुशावतीचें राज्य आणि लवाला अवंतिकाचें राज्य श्री रामचंद्रानें वाटून दिलें होतें.

दोहा

कुशका दई कुशावती, नगरी कोसल देश ।
लवको दई अवंतिका उत्तर उत्तम वेश ॥ २५ ॥

रामचंद्रीका प्रकाश ॥ ३९ ॥

या नंतर कुश आणि लव यांच्या निरनिराळ्या शाखा निर्माण झाल्या. कुश शाखेला कुशवंश आणि लव शाखेला लववंश अशीं नांवें पडलीं.

कुश वंशांतील अश्वपती नांवाच्या राजाला पुत्रसंतान नव्हतें ह्मणून त्यानें पुत्रेष्टी यज्ञ केला, तेव्हां त्याला १२ पुत्र झाले. त्यांचीं नांवें:—

१ अनुज २ देवक ३ पृथु ४ ऋतुवर्ण ५ जय ६ सुशिम्र ७ सौदाम ८ सुमंतु, ९ कौंडिन, १० मंडूक, ११ कुशिक, १२ मार्तंड.

या प्रत्येक पुत्रापासून निरनिराळी वंशशाखा चालून त्यांचे १२ वंश झाले. त्यांचें वर्णन स्कंदपुराण सह्याद्रि खंडांत आहे. कुशवंशाचे कुळंबी, कच्छवे उर्फ कडवे आणि लव वंशाचे लेवे, रेवे गुजराथ वगैरे प्रांतांत पुष्कळ आहेत.

Bombay Gazetteer vol 9 part 1 of 1889 Ramachandra had two sons–one Lawa and other Kusha. From Lawa cameLawas and from Kusha the Kadvas.

मुंबई गॅझेटिअर व्हाल्युम ९, भाग १-१८८९, यांत लिहिलें आहे कीं:—

रामचंद्राला लव आणि कुश असे दोन पुत्र होते. लवापासून लेवे वंशाचे लोक आणि कुशापासून कडवे उर्फ कच्छवे कुळंबी झाले आहेत.

लववंश हा सूर्य वंशाची शाखा आहे ही गोष्ट वरील विवेचना वरून समजून चुकलीच आहे. नेपाळचा राजवंश हा याच लववंशाचा वंशज आहे.

लवको दई अवंतिका उत्तर उत्तम वेश ॥

हा रामचंद्रिका प्रकाशातील दोहा वर दिलाच आहे. यांतील **उत्तर उत्तम वेश**

या शब्दावरून उत्तर वेशीच्या नेपाळच्या राजघराण्याचा संबंध य, लववंशाशीं कसा जुळतो हें पाहूं. 'नेपाळ क्षिनिपाळ वंशावळी' नांवाच्या ग्रंथांत त्याचा स्पष्ट उल्लेख आहे या वंशाचे क्षत्रिय कूर्मी उर्फ कुळंबी गुजराथ, खानदेश, आणि वऱ्हाड प्रांतांतील बुलडाणा जिल्हा या प्रदेशांत पुष्कळ आहेत. ते आपणास लववंशी किंवा लेवावंशी-कुळंबी म्हणवितात. लेवावंशी कुळंबी हे लववंशी सूर्यवंशी क्षत्रिय आहेत ही जाणीव त्यांना आहे खानदेशांत सीताराम नाना चौधरी [पूर्वखानदेशांतील जळगांवच्या आत्मोद्धार साप्ताहिकाचे संपादक] या नांवाच्या लेवा कुळंबी क्षात्रियानें लेवा संजीवन नांवाचें मासिक पुस्तक इ. स. १९१७ सालीं चालविलें होतें. त्यांच्या लेखावरून त्यांना या गोष्टीची जाणीव होती असें दिसून आलें. लेवावंशीय क्षत्रिय कुळंब्यांत त्यांच्या उत्पत्ति संबंधानें वंशपरंपरेनें चालत आलेली एक दंतकथा अद्यापि प्रचलित आहे ती अशी:—

जेव्हां अंतर्वेदामध्यें राजपुतांचा अंमल बसला तेव्हां लववंशियांचे पूर्वजांना फार त्रास झाला म्हणून ते आपल्या परिवारासह लाहोर, गुजराथ, आणि खानदेश या,प्रातांत येऊन राहिले. हरिद्वार पासून प्रयाग पर्यंतच्या प्रदेशास अंतर्वेदी म्हणतात. या नवीन प्रदेशांत येऊन राहिल्यानंतर अंतरवेदीच्या रजपुतांनीं गुजराथच्या राजाशीं संधान बांधलें. त्या वरून गुजराथच्या तत्कालीन राजाने त्यांच्याशीं शरीर संबंध करण्याचा घाट घातला. पण वंशाच्या उच्च कीर्तीमुळें यांनीं ती गोष्ट मान्य केली नाहीं; म्हणून त्यांची व राजाची लढाइ झाली. त्यांत राजाचा पराभव झाला. त्यामुळें राजाचा पक्ष नरम पडून त्या भांडणाचा शेवट झाला. अर्थातच तेव्हां पासून लववंशी क्षत्रिय कुळंबी गुजराथ प्रांतात कायमची वस्ती करून राहिले. त्यांच्या जातीचे लोक पुढें हळूंहळूं आसपासच्या प्रदेशांत म्हणजे खानदेश दक्षिण प्रांत आणि वऱ्हाड प्रांतांत पसरले. त्यांना गुजराथेंत येण्यास अंदाजा दोन हजार वर्षें झालीं असा मेळ मिळतो.

Kunbies including the four divisions of Anjana Kadva, Lawa and Matiya with a strength of 1410422

form 14.26 per cent of the Hindus of Gujrath. They olaim to be of Kshatriya stock. Their arrival in Gujarath is supposed to have taken place about 2000 years ago.

BombayGazetteer Vol 9 part 1.

बॉंबे गॅझेटिअर व्हाल्युम ९ भाग १ यांत लटलें आहे कीं:—

गुजराथ प्रांतांत कुळंब्यांची लोकसंख्या १४१०४२२ म्हणजे शेंकडा १४-२६ आहे. त्यांचे ४ पोटभेद आहेत. त्यांस आंजन, कडवा, लेवा आणि मर्तीया म्हणतात- ते मोठ्या अभिमानानें स्वतःस क्षत्रिय म्हणवितात.

There is no real difference of caste between Kunbies and Patidars, though patidars may not now intermarry with ordinary Kunbies. The latter are divided into three Classes-Lewas, Kadvas and Anjans. Next in position to the Kunbies are the Rajputs.

Imperial Gazetteer of India new adition Vol V. page 97 and 98. Ahamadabad District.

इंपीरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया [नवी आवृत्ति] भाग ५ पृष्ट ९७–९८ जिल्हा अहमदाबाद यांत लटलें आहे कीं:— कुळंबी आणि पाटीदार यांच्यांत खरोखर मुळींच कांहीं जातिभेद नाहीं. मात्र ओपंत पाटीदार साधारण कुळंब्यांशीं अद्यीकडे बेटी व्यवहार कधीं कधीं करितो व कधीं कधीं करीत नाहीं. कुळंब्यांचे तीन वर्ग आहेत. लेवे कुळंबी, कडवे कुळंबी व अंजन कुळंबी. रजपुतांचा दर्जा कुळंब्यांच्या खालचा आहे.

" The term Kunbi includes two main classes, Kunbies and Marathas, between whom, it is difficult to draw a line. Marathas and Kunbies eat together and intermarry and do not differ in appearance, religion or custom. "

Bombay Gazetteer, Poona Vol XVIII part 1.

बॉंबे गॅझेटिअर, पुणें भाग १८ पोट भाग १ यांत लटलें आहे कीं:-

कुळंबी या शब्दांत मराठा व कुळंबी या दोन मुख्य वर्गांचा समावेश होतो. त्यांच्यांत भेद दर्शविणें ही फार कठीण गोष्ट आहे. मराठा व कुळंबी

ग्रांत्यांत परस्पर रोटी बेटी व्यवहार आहे. त्यांचे रंगरूप धर्मकर्म आणि रितीरिवाज यांत कांहीं फरक नाहीं

Amraoti District Gazetteer 1911.

Para 151-The Rajput family which holds the Patalki of Talegaon Thakur and surrounding villages in Chandur Taluq of the Amraoti District is very well to do. They aro Deshmukh and have good relationship with the other renouned Deshmukh families in Berar.

Para 134:-The Pajne Kunbies are found in about 80 villages near Khandesh, and roughly number 2000 Another Local names for them are Revasor Lewas who form the largest subcaste of Kunbies of Gujarath. The word पाजणें is terned from Pawakhand पावाखंड which formerly formed a part of Gujarath and Reva is said to be derived from the river Reva रेवा in Gujarath. The Lewa Kunbies of Gajarath are really or Gujar origin. They aro extensively money lenders or cultivators. They abstain from the use of alcohol and both socially & mentally they rank as Rajputs. Some of them are Watandar Patels.

अमरावती जिल्हा गॅझेटिअर १९११

पारा १५१:—अमरावती जिल्ह्यांत तळेगांव ठाकूर येथील वतनदार पाटील हे रजपूत आहेत व चांगले नामांकित आहेत. ते देशमुख असून वऱ्हाडांतील नामांकित देशमुख घराण्यांशीं त्यांचा सोयरे संबंध आहे.

पारा १३४:— वऱ्हाडांत खानदेशच्या जवळ सुमारे ८० गांवांत पाजणें कुळंबी आहेत. त्यांची लोक संख्या २००० आहे त्यांना रेवा किंवा लेवा असेंही म्हणतात. ते गुजराथेंतील कुंळबी लोकापैकीं आहेत. पाजणे हा शब्द गुजराथेंत पूर्वी असलेल्या पावलंखड या नांवावरून बनलेला आहे आणि रेवा हा शब्द गुजराथेतील रेवा नदीचे नांवावरून झालेला आहे. गुजराथेंतील

केला कुळंबी हे मुळचे गुजर कुळाचे आहेत. त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक व्यापार व शेतकरी आहेत. ते दाखला शिवत नाहींत आणि सामाजिक व मानसिकदृष्टया ते रजपुतांच्या बरोबरीचे आहेत. त्यांच्यापैकीं कांहीं लोक वतनदार पाटील आहेत.

अशा अनेक पुराव्यावरून आणि प्राचीन व अर्वाचीन ऐतिहासिक आधारावरून कूर्मी, कुळंबी आणि महाराष्ट्रे—मराठे हे एकाच जातीचे असल्ल क्षत्रिय आहेत. इतकेंच नाहीं तर चातुर्वर्ण व्यवस्थेंत त्यांचें अग्रस्थान आहे. सध्या जे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र हा मनुस्मृतींतला आधुनिक वर्णानुक्रम त्या ऐवजी नसून १ क्षत्रिय, २ ब्राह्मण, ३ वैश्य, ४ शूद्र असा वर्णानुक्रम सृष्टी नियमानुसार आहे. याचें विस्तृत वर्णन '**क्षत्रियांची उत्पत्ति व त्यांचें श्रेष्ठत्व**' या प्रकरणांत दिलें आहे.

Berar Cnsus ropart 1881

Rane Rajputs numbering 3632 are undoutedly of the Maratha origin.

सन १८८१ सालचा बऱ्हाडचा खाने सुमारीचा रिपोर्ट यांत झटलें आहे कीं:—

राणे रजपुतांची लोकसंख्या बऱ्हाडांत ३६३२ असून ते निःसंशय मूळचे मराठे आहेत.

टीप:—जुन्या सनदा वरून असें स्पष्ट सिद्ध होतें कीं मराठा, कुळंबी, कुणबी, रजपूत आणि क्षत्रिय हे ४००—५०० वर्षां पूर्वीं अगदी एकाच जातीचे असून त्यांच्यांत रोटी व बेटी व्यवहार होत होते. उदाहरणार्थ साष्टीचे मोहोडाची व काकड्याचे देशमुखांची सनद **पाटील** या सदरा खालीं छापली आहे ती पहा. तसेंच इ. सन १७२० सालीं दमाजी गायकवाड यांनीं काठेवाडांतील गोहलोद राजपूत राजकन्येशीं लग्न केलें होतें. असे पुरावे दाखले सोयरिकीच्या परिशिष्टांत शेवटी दिले आहेत ते पहा.

Maharastra is the country of the Marathas who form 30 per sent of its population. The term Maratha is observed for the descendants of the old fighting stock,

a hardy and vigorous class once the terror of India, now merged very largely in the cultivating class known as Kunbi.

Imperial Gazetteer af India New Edition Vol XVI.

इंपीरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया (नवी आवृती) भाग १६

मराठ्यांचा महाराष्ट्रः--

महाराष्ट्र या देशांत मराठ्यांची लोक संख्या शेंकडा ३० आहे. मराठा जातीचे लोक वज्रदेही, वीर्यवान आणि लढवय्ये असून एके काळीं सर्व हिंदुस्थानावर त्यांचा दरारा बसला होता. त्या लढवय्या जातीच्या वंशजांनाच हल्लीं मराठा असें म्हणतात. हल्लीं त्या जातीचे बहुतेक लोक शेतीच्या धंद्यांत घुसले असल्यामुळें त्यांना कुळंबी म्हणतात. (कुणबी उर्फ कुळंबी म्हणजे शेतकरी असा अर्थ हल्लीं रूढ झाला आहे, कारण हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांत कुळंबी उर्फ मराठा या जातीचेच लोक शेंकडा ७५ आहेत त्यामुळें हा अर्थ रूढ झाला आहे.)

श्री शाहूछत्रपतींचें भाषणः--

" -- मातृभूमि आणि मातृधर्म यांच्या उद्धारार्थ हातावर शिर वेऊन व आपले पंचप्राण अर्पण करण्यास सिद्ध होऊन हिंदुपद पादशाहीची सर्वांग सुंदर प्राण प्रतिष्ठा करणारे आणि म्हणूनच **' गो ब्रह्म प्रतिपालक '** म्हणजे **' हिंदमाता व हिंदुधर्म यांचे पालन करणारे '** या बहु मानार्थी यथार्थ पदास पात्र होऊन अखिल भरत खंडास ललामभुत झालेले साक्षात **श्री रामचंद्राचा अवतार** असे जे पुण्यश्लोक **श्री शाहू-छत्रपति महाराज** यांच्या पुण्यशाली गादीवर हल्लीं विराजमान असलेले त्यांचेच वंशज श्रीमन्महाराज शाहूछत्रपति संस्थान कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखालीं खामगांव [वऱ्हाड] येथें अकराव्या ' अखिल भारत वर्षीय मराठा शिक्षण परिषदेचें अधिवेशन ' सन १९१७ च्या दिसेंबर महिन्यांत झालें. त्यावेळीं ता. २७-१२-१७ रोजीं परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना श्री शाहुछत्रपति महाराज म्हणालेः—

" माझे प्रिय बांधवहो ! आज मी येथें महाराजा या नात्यानें आलों

नव्हून एक सामान्य मराठा या नात्यानें आलों आहे. या माझ्या बांधवांपैकीं जे शिवाईभाण्याचे असतील ते मला शिवाई मानतील; व जे शेतकरी असतील ते मला प्रेमानें पाटील किंवा शेतकरी म्हणतील. आपण आपल्या खानदेश प्रमाणें मला वाटेल त्या नांवानें संबोधा पण मी आपणांपैकींच एक आपला ज्ञाति बंधु आहे. माझ्या वाडवडिलांनीं दक्षिणेंत येऊन अगदीं प्रथमारंभी कमावलेलें माझे पाटीलकीचें वतनाचें गांव 'विरूळ' येथें अगदीं जवळच आहे. त्याचा मला अद्यापि मोठा अभिमान वाटतो. आणि त्यामुळेंच मी आपल्या खऱ्या खऱ्या आप्तेष्टांमध्यें आज येऊन दाखल झालों म्हणून मला आनंद होत आहे." महाराजांचें हे प्रेमोद्गार प्रत्येकानें आपल्या हृत्पटलावर सुवर्णाक्षरांनीं कोरून ठेवण्या सारखे आहेत.

खामगांवच्या मराठा शिक्षण परिषदेंतच ता. २९-१२-१७ रोजीं श्री शिवरायाचें स्मारक पुण्यास करण्या विषयींचा प्रश्न विचाराकरितां पुढें आला असतां 'मराठा' म्हणजे कोण ? याचा निकाल अगोदर लावावा, अशी उपसूचना पुढें मांडण्यांत आल्यावरून ठरविण्यांत आलें कीं:—

"'मराठा" ही एक राजकार्य धुरंधर विशेष लढवय्या पेशाची जात असून या जातीचे लोक अस्सल जातिवंत क्षत्रिय आहेत, मराठा ज्ञातींतील लोकांना प्रांत परत्वें 'कुळंबी' अशी संज्ञा आहे. पण तेही 'मराठाच' आहेत."

वऱ्हाडप्रांत व नागपूर प्रांतांतिल कुळंबी आणि हिंदुस्थानच्या इतर भागांतिल कुळंबी उर्फ मराठा यांचे सन १९०९ साला पर्यंत फारसें दळणवळण नव्हतें, त्यामुळें परस्परांची खरी ओळख परस्परांस पटावी तितकी पटली नव्हती. पण सन १९०९ सालच्या दिसेंबर महिन्यांत वऱ्हाडांत उमरावती येथें तिसरी मराठा शिक्षण परिषद भरविण्यांत आली. त्यावेळीं हिंदुस्थानच्या बहुतेक भागांतील ज्ञातिबांधव एकत्र जमण्याची पर्वणी जुळून आल्यामुळें, शेकडो कोसांच्या अंतरावर राहणाऱ्या ज्ञाति बांधवांच्या प्रेमाच्या भेटी व कुशलतेच्या गोष्टी होऊन परस्परांची खरी ओळख परस्परांस खात्रीलायक पटली. इतकेंच नाहीं तर सर्वांना एकाच प्रेमरज्जूमध्यें ग्रथित करणारे रोटी व बेटी व्यवहार त्यांच्यांत राजरोषपणें सुरू आहेत.

क्षात्रिय शब्द विचारः—

ब्राह्मण जातींत देशकालानुरूप ज्याप्रमाणें कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे. वऱ्हाडे, पांचाळ, गौळक, चरक, रंडक, मुंडक, अभीर, सारस्वत, शेणवी इत्यादि शेंकडो भेद असून त्या प्रत्येकांत पुनः हजारों पोटभेद आहेत, पण त्या सर्वांचा समावेश ब्राह्मण या एकाच जातींत केला जातो आणि ब्राह्मण हा चातुर्वर्ण्यापैकीं दुसऱ्या नंबरचा वर्ण आहे, तरी ब्राह्मण हाच वर्ण व तीच जात मानण्याची रूढि पडली आहे त्याच प्रमाणेः—

मराठा या इतिहास प्रसिद्ध क्षत्रिय जातींत देखील देशकालानुरूप व कारणपरत्वें देशमुख, पाटील, कुळंबी, मराठा आणि क्षात्रिय या उपपदांनीं संबोधिलें जाणारे पांच वर्ग आहेत, पण ते सर्व जातीनें आणि वर्णानें एकच्-क्षणजे क्षात्रियच आहेत. ज्या प्रमाणें ब्राह्मण हा एकच शब्द **ब्राह्मण जात** आणि **ब्राह्मण वर्ण** या दोन्हींचा दर्शक आहे; त्याच प्रमाणें क्षत्रिय हा शब्द देखील **क्षत्रिय जात** आणि **क्षात्रिय वर्ण** यांचा दर्शक आहे. वरील पांच उपपदांपैकीं प्रत्येक उपपद कांहीं विशेष कारणामुळें या जातीपैकीं विशेष करणीच्या किंवा विशेष आचार विचारांच्या लोकांना लावण्याची परंपरेनें वहिवाट पडली आहे. या प्रत्येक उपपदांत क्षात्रियत्व बोधक अर्थ भरलेला आहे. पण अलीकडच्या शांततेच्या काळांत सर्वच बाबतींत व सर्वच जातींत नांवाची व करणीची बहुतांशीं फारकतच झाल्यामुळें नांवाला यथार्थपणें शोभणाऱ्या करणीचा फारसा विचार न करतां यापैकीं जे उपपद ज्याला आवडेल तें आपल्या आवडी प्रमाणें स्वतःच्या नांवापुढें लावून घेण्याची कोणासच बंदी राहिली नाहीं. याच कारणामुळें या शब्दांतील मूळच्या उच्चार्थाचें मातेरे अलीकडे होऊं लागलें आहे. शंभर वर्षांपूर्वी भारत वर्षांत शांतताप्रिय इंग्रज प्रभूचा एकछत्री अमल सुरू झाल्यापासून क्षात्रियत्वाची रक्तांत चमक मारण्याची संधी क्षात्रियांना फारशी उरली नाहीं; हजारों वर्षें क्षत्रिय मराठ्यांच्या हातांत लीलेनें खेळून आपल्या अद्वितीय सत्कीर्तीचा परिमळ सर्व जगांत पसरविणाऱ्या व मी, मी, म्हणणाऱ्या रणधुरंधरांना खालीं पाहण्यास लावणाऱ्या क्षत्रिय मराठ्यांच्या हातांतील विद्युत्प्राय समशेरीला विश्रांति मिळून

आंग्लशाहींत तरवारीची जागा लेखणीनें बळकाविली आहे; आणि म्हणूनच खऱ्या क्षत्रियत्वाची खरी कदर व खरें क्षात्रतेज प्रगट करण्याची खरी संधी ह्या गोष्टी बहुतेक लुप्तप्राय होत आल्या आहेत. तरी जातींत क्षात्रिय मराठ्यांच्या रोमरोमांत परंपरेनें मुरलेलें दिव्य क्षात्रतेज प्रगट करण्याची संधी मिळतांच ते आपल्या जाती धर्मानुरूप लागलीच चमक मारूं लागतात. इ स. १९१४ पासून सुरू झालेल्या युरोप खंडांतील घनघोर महायुद्धानें या गोष्टीची सप्रमाण सत्यता जगाच्या अनुभवास आणून दिली आहे " न भूतो न भविष्यति " अशा या जगव्यापि महायुद्धाच्या भडकलेल्या वणव्याचे प्रसंगीं आपल्या अंगचें क्षात्रतेज प्रगट करण्याची योग्य संधी मिळाल्याबरोबर, साम्राज्यनिष्ठ क्षत्रिय—मराठा जातीच्या लाखो विरांनीं पुढें होऊन व आपल्या अंगचें खरें क्षात्रतेज प्रगट करून आपल्या अद्वितिय पराक्रमानें जगाला थक्क करून सोडलें ! आपल्या कर्तबगारीच्या जोरावर हजारो मराठा जातीच्या रणधुरंधरांनीं मोठमोठ्या हुद्देदारीच्या जागा हक्कानें पटकाविल्या ! ! इतकेंच नाहीं तर शेंकडो मराठा रणगाजींनीं " व्हिक्टोरिया क्रास " सारख्या सर्वांत श्रेष्ठ दर्जाच्या व अत्यंत बहुमानाच्या पदव्या हक्कानें पटकावून आपल्या इतिहास प्रसिद्ध मराठा जातीचा क्षात्रवृत्तीचा अग्रेसरत्वाचा हजारो वर्षांपासून परंपरेनें चालत आलेला मान कायम राखिला ! ! आणि " कलियुगांत खरे क्षत्रियच राहिले नाहींत " असें निर्गलपणें बरळणाऱ्या अहंमन्य लोकांच्या तोंडाला आपल्या प्रत्यक्ष करणीनें कायमची खीळ घातली ! ! ! ही चिरस्मरणीय गोष्ट हिंदुस्थानच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नमुद करून ठेविली जाईल. असु.

देशमुख, पाटील, कुळंबी, मराठा व क्षात्रिय या पंच पदापैकीं प्रत्येक पदांत क्षत्रियत्व बोधक अर्थ भरलेला आहे असें वर म्हटलें आहे. त्यांतील सत्यासत्याचा विचार आतां आंपण करूं.

क्षतात्त्रायते सःक्षत्रिय: म्हणजे दुःखा पासून अर्थात संकटापासून, आपल्या सामर्थ्याच्या बळावर जो दुसऱ्याला तारतो तो क्षत्रिय. विराट पुरुषाचें रक्षण बाहुबलानें केलें जावें म्हणून विराट पुरुषाच्या बाहूंना

क्षत्रियाची उपमा हिंदुधर्मशास्त्रांत दिलेली आहे. अर्थात क्षत्रिय म्हणजे रक्षण करणारा असा त्याचा सरळ अर्थ आहे.

क्षेत्रांत रमते सः क्षत्रियः—क्षेत्रांत म्हणजे रणक्षेत्रांत किंवा क्षेत्रांत म्हणजे शेतांत रममाण होऊन, अर्थात शांततेच्या काळीं शेतांत खपून आणि बहुजन समाजाच्या रक्षणार्थ व जीवनार्थ धान्यादि उदर निर्वाहाचे स्वकष्टार्जित पदार्थ जनतेस पुरवून त्याना सुखी करण्याकरितां स्वतःचा देह झिजविणारा तो क्षत्रिय, असाही क्षत्रिय शब्दाचा अर्थ करतात.

आर्यांनीं, आर्यावर्तांत प्रथम प्रवेश केला तेव्हां शस्त्र आणि शेती याच मुख्य दोन साधनांच्या द्वारें त्यांनीं आपलें आर्यत्व-श्रेष्टत्व प्रस्थापित केलें. असी इतिहास साक्ष देत आहे व तोंव आपला मूळचा धर्म आर्यक्षत्रिय आजही पाळत आहेत. श्रीकृष्णानें गोपालन व कृशिकला केली. बलरामदादाचें तर मुख्य आयुध हल-नांगर असल्यामुळें त्याना हलधर हेंच नांव होतें. जनकाच्या नांगराच्या फाळास लागून सीता सांपडली व कौरवांचा पूर्वज कुरु यांचें शेतालाच कुरुक्षेत्र हें नांव पडलें. आर्यांच्या कृषिकर्मप्रधान व्यवसायांच्या ह्या गोष्टी पुरणांत प्रसिद्ध आहेत. या वरून शेती करणें हा आर्य क्षत्रियांचा परंपरेचा धंदाच आहे ही गोष्ट सप्रमाण सिद्ध होते.

देशमुखः—प्रत्येक देशाचे अनेक पोट भाग असून त्या पोट भागाला देश अगर परगणा म्हणण्याची वहिवाट असे. जसें:—अंग, वंग, कालिंग, विदर्भ पांचाळ, मद्र इत्यादि; यापैकीं एक किंवा अनेक देशांच्या राजसूत्र धारकाला राजा ही संज्ञा असे. तसेंच त्यापैकीं लहान लहान देशाच्या म्हणजे परगण्याच्या अधिकाऱ्यांना देशमुख म्हणत असत. देशमुख म्हणजे देशाचें मुख—ज्या मुखानें त्या परगण्यांतील (देशांतील) लोक सरकारशीं बोलत असत ते अधिकारी; अर्थात् त्या देशाचे मुख्य सत्ताधारी-त्या देशांतील रयतेची दाद सरकारांत लावून त्यांना योग्य न्याय देणारे मुख्य अधिकारी असा त्याचा मूळ अर्थ आहे.

प्रत्येक परगण्यांत अंदाजा २५ पासून ५०० गांव पांचा [खेड्यांचा]

समावेश होत असे. अशा प्रत्येक परगण्यांच्या जमाबंदीचे ठराव सरकारी नायब म्हणजे मुलकी अधिकारी देशमुखांच्या सल्ल्यें व मदतीनें करीत असत. जमाबंदीच्या ठरावावर परगण्याच्या देसुखाची सही झाल्याखेरीज तो ठराव कायम होत नसे. परगण्याच्या देशमुखानें प्रत्येक गांवच्या पाटलामार्फत गांवांतील प्रत्येक कुळाच्या शेतीपोतीची आणि वार्षिक उत्पन्नाची शहानिशा करून त्याप्रमाणें त्यांच्याकडून सरकारी सारा व इतर वसूल करण्याबद्दल ठराव करावा. या ठरावाच्या कागदास ' ठरावबंद ' म्हणत असत. या ठरावबंदावर देशमुखाची दस्तखत (सही) झाल्याखेरीज त्याची अमलबजावणी तत्कालीन सरकारास करतां येत नसे. इतर महत्त्वाच्या बाबतींत देखील देशमुखांखेरीज पान हालत नसे. या महत्त्वाच्या कामगिरीबद्दल देशमुख लोकांना भरपूर इनाम जमीनी असत, परंतु अलीकडे इंग्रज सरकारनें ही इनाम जमीनीची पद्धत रद्द करून त्याचे मोबदला देशमुखांना नगदी वेतन पेन्शन अशाप्रमाणें देण्याची वहिवाट सुरू केली आहे. या वेतनास हल्लीं ' **लवाजमा** ' असें म्हणतात. लवाजमा हा शब्द सैन्यबोधक आहे. यावरून चक्रवर्ती राजा अथवा बादशहा यांचें सैन्य, स्वार व शीबंदी ठेवून, देशमुख लोक करीत असत, व त्याबद्दल जो खर्च मिळे त्यास लवाजमा म्हणत. लवाजमा = सैन्य. परगण्याच्या बंदोबस्ताकरितां देशमुखांचे ताब्यांत कांहीं स्वार शीबंदी वगैरे हीं रहात असत आणि परचक्राच्या प्रतिकारार्थ प्रत्येक गांवीं किल्लेवजा गढ उर्फ गढी असे. ह्या गढ्या हल्लीं जीर्ण होऊन नामशेष झाल्या आहेत व देशमुखीचें खरें प्राचीन वैभवही त्या बरोबरच लुप्तप्राय झालें आहे. गढांच्या उर्फ गढ्यांच्या जीर्ण दशेबरोबरच गढकरी उर्फ गढपती देशमुखांना जीर्ण दशा प्राप्त होणें अपरिहार्य आहे! अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर हैदराबाद यांचें बुक सरक्युलर नंबर २१ सन १८७३ यांत इंग्रजी अमलांतील देशमुख लोकाचा हक्क, अधिकार, दर्जा आणि रुसूम या संबंधानें खुलासा केला आहे. यांत देशमुख लोकांना ' एक्स परगना ऑफिसर्स ' Ex-Paragana Officers असें म्हटलें असून सरकारी अधिकाऱ्यांनीं दौऱ्यावर असतांना परगण्यांतील रयतेची

करीं सुरक्षितपें सांभाळून घेण्याचें कामीं देशमुख लोकांची मदत घ्यावी असें स्पष्ट नमूद केलें आहे. पण अलिकडे ह्या कागदांतील गोष्टी कागदांतच जीर्ण झाल्या आहेत.

देशमुखीच्या वतनदारीच्या सनदा पत्रावरून दिसून येतें कीं देशमुखीचीं वतनें सुमारें दोन हजार वर्षांपासून चालत आलीं आहेत. क्वचित स्थळीं अपवादा दाखल देशमुखींचीं वतनें ब्राह्मण, कोळी, मुसलमान वगैरे मराठेतर जातींत चालू असल्याचें दिसून येतें पण सर्व साधारणपणें शेंकडा ९० देशमुख घराणीं फक्त मराठा जातींचींच आहेत व ही वतनदारी त्यांनीं मनगटाच्या जोरावर स्वतःच्या कर्तृत्वानें मिळविली आहे, असें जुन्या सनदा पत्रावरून दिसून येतें. **देशमुख ही स्वतंत्र जात मुळींच नाहीं** ही वतनदारीच्या हुद्याची पदवी आहे. सरकारमान्य आणि लोकमान्य असा हा एक सत्ताधारी प्रतिष्ठित वर्ग असल्यामुळें बहुजन समाजांत या वर्गाला अर्थातच इतरांपेक्षां ज्यास्त मान मिळत आला आहे. **हाट, पाट, घाट आणि रहाट** ह्या टकारान्त चार गोष्टी देशमुख लोकांत हलक्या, अर्थात त्याज्य मानल्या जातात.

पाटील:—म्हणजे ग्रामाधिपती, गांवचा मुख्य अधिकारी. पति म्हणजे स्वामी, मालक. कुलपति म्हणजे भट्ट जोशापासून तों थेट गांवच्या पांडेवार महारापर्यंत वारा वलुतेदार आणि वारा अलुतेदार मिळून चोवीस कारुनारु कुळांचा पति, अर्थात त्यांचा स्वामी—मालक म्हणजे गांवचा पाटील.पतिकुलं म्हणजे स्वामींचें कुल—मालकाचें कुल. ग्रामाधिपतिचें कुळ, अर्थात पाटिलाचें कुळ.

पति किंवा पतिकुळ या शब्दापासूनच पाटील हा शब्द झालेला आहे असें पुष्कळ विद्वानांचें मत आहे व तें संभवनीय असून यथार्थ दिसतें.

जुन्या उज्जनी नगरांत कांहीं जुनें ताम्रपट २००० वर्षांपुर्वीचे सांपडले आहेत. ते रॉयल एशीआटिक सोसायटीचे संग्रहास आहेत. त्या ताम्रपटांत पट्टा आणि पाटील याचें अर्थ पुढें लिहिल्या प्रमाणें दिले आहेत.

उज्जनीच्या वरील ताम्रपटांत लिहिले आहे कीं:—

"**पट्टाकील**" या शब्दा पासून '**पाटील**' हा शब्द झालेला आहे. पट्टा ह्मणजे लेख–सनद–ताम्रपट, आणि कील ह्मणजे खिळा; अर्थात खिळ्यानें खोदून किंवा खिळ्यानें ठोकून जी सनद किंवा पट्टा पक्का-मजबूत-अभंग केलेला आहे तो पट्टाकील· अशी ताम्रपटाची सनद उर्फ पट्टा वंशपरंपरेच्या वतनदारी बद्दल ज्यांना सरकारनें करून दिला असेल असा जो पट्टाकील ह्मणजे पाटीलकीचा पट्टा उर्फ ताम्रपट मिळविणारा तोच पाटील. हा ताम्रपटाचा आधार सप्रमाण आहे.

पट्टी ह्मणजे पाटीलकीच्या हक्काची वाव–पाटीलकीचा कर.

पट्टा ह्मणजे पाटीलकीचा हक्क ज्या कागदांत नमूद केला आहे तो कागद-पाटीलकीच्या हक्काचा कागद उर्फ पाटीलकीची सनद.

पट्टाधीश ह्मणजे गादीवर बसलेला राजा अर्थात राज्याचा मालक.

पाटलांचे रीतिरिवाज:—

क्षत्रिय मराठा जातींच्या पाटलांत दोन पोटभेद आहेत.

(१) एक गंधर्व उर्फ पुनर्विवाह न करणारा वर्ग आणि

(२) दुसरा गंधर्व उर्फ पुनर्विवाह करणारा वर्ग.

स्त्रियांचा प्रथम विवाह सर्वत्रच मान्य आहे. परंतु वैधव्या सारखी नर्कतुल्य दुर्धर आपत्ति आल्यावर त्या पासून होणारे अनिष्ट परिणाम टाळण्या करितां विधवाविवाह-गंधर्व पूर्ण विचाराअंती अमलांत आले. रजपुतांत व उत्तरेच्या क्षात्रियांत ते हल्लीं चालूं आहेत. त्यामुळें बालहत्या आणि अनाचार यांना आळा पडला. ज्यांच्यांत गंधर्व नाहीं त्यांच्यांत होत असलेला अत्याचार, अनाचार, बालहत्या पाहिल्या ह्मणजे गंधर्वाचें महत्व ध्यानीं येईल. ह्मणून पुनर्विवाह ज्यांत नाहीं त्यांचे श्रेष्ठत्व (त्यांच्यांतील अनाचाराकडे डोळेझाक करून) प्रतिपादणें निंद्य होय. याचा अर्थ ज्याच्या हातीं शिकार तो पारधी, हाच होय. गंधर्वाच्याच मुद्यावर देशमुख पाटलांचे ऋण माजतें, तरी या ठिकाणीं मतभेद, मन न दुखविता टाळणेंच वरें देशमुख पोकळ अभिमानास बळी न पडतील तर बरें.

देशमुख म्हणविणाऱ्या लोकांत स्त्रियांचे गंधर्व उर्फ पुनर्विवाह करण्याची रूढि नाहीं; म्हणून देशमुखांचीं व गंधर्व न करणाऱ्या (पाट, घाट, हट रहाट हे चार टकार वर्ज मानणाऱ्या) पाटलांचीं सोयरीक (शरीर संबंध) राजरोषपणे होते; पण गंधर्व करणाऱ्या पाटलाचा शरीर संबंध देशमुख लोक करीत नाहींत. कारण ते गंधर्व करण्याची रूढी हलकी मानतात. तरी पण गंधर्व न करणारे पाटील आणि गंधर्व करणारे पाटील यांच्यांत परस्पर शरीर संबंध होतो. त्यावरुन जातींत कांहीं फारसा प्रत्यवाय येत नाहीं. हल्लींच्या ज्या पाटील लोकांस वतनदारीच्या गांवाचें ठावठिकाण लागत नाहीं व ज्यांच्यांत गंधर्वाची रीत राजरोषपणें चालूं आहे अशा लोकांस कुळंबी म्हणण्याची वहिवाट आहे; पण कुळंबी, गंधर्व करणारे पाटील, गंधर्व न करणारे पाटील, व देशमुख, देसाई, सरदेशमुख, इनामदार, जहागिरदार, सरदार, व राजेरजवाडे या पदव्यांनीं संबोधिल्या जाणाऱ्या क्षात्रिय मराठा जातीच्या सर्व लोकांत, दर्जा दर्जानें कां होईना, पण खरोखर रोटी व्यवहार व बेटी व्यवहार राजरोषपणें होतात व त्यावरुन जातींत कोणी कोणास बाध ठेवूं शकत नाहीं. तर मग गंधर्व करणारास नांवें ठेवणें हें मूर्खपणाचें लक्षण नव्हे काय? चोरून अनाचार करण्यापेक्षां गंधर्व उर्फ पुनर्विवाह करणें वरें.कारण आपसांत राजरोषपणें रोटी व बेटी व्यवहार करणारे वरील उपपदांचे सर्व लोक हे एकाच क्षत्रिय मराठा जातीचे आहेत, ही गोष्ट जर निर्विवाद खरी आहे तर मग एकानें दुसऱ्यास नांवें कां ठेवावींत? बेटी व्यवहार परजातीशीं होऊं शकतच नाहीं. यावरून हेंही स्पष्टपणें दिसून येतें कीं, पाटील, देशमुख इत्यादि शब्द जातीदर्शक नसून वंशपरंपरेच्या वतनदारींचीं उर्फ पराक्रमानें मिळविलेल्या थोर दर्जाच्या मिळकतींचीं दर्जे दर्शक हीं नांवें आहेत. आजचा पाटील उद्या स्वपराक्रमानें शिवाजी राजाप्रमाणें राजा होऊं शकतो आणि राजाचा रंक किंवा पाटील होऊं शकतो. हें स्थित्यंतर होय.

प्रत्येक गांवच्या पाटलाची राहण्याची गढी उर्फ गड (किल्ला) असून, प्राचीन काळच्या धामधुमीच्या काळांत नेहमीं येणाऱ्या परचक्रापासून गांवाचें

संरक्षण करण्याकरितां पाटलाचे ताब्यांत कांहीं घोडेस्वार व हत्यारबंद शिबंदी रहात असत. शिरजोरपणानें कोणी डोकें वर केलें कीं, आपले स्वार व शीबंदी घेऊन बारुद गोळीसह पाटील लोक त्याचा बंदोबस्त करण्यास तत्पर असत. पण इंग्रज प्रभूंचा शांततेचा अमल सुरूं झाल्यापासून गेल्या १०० वर्षांत बंदोबस्ताचीं सर्व सुत्रें सरकारनें आपल्या हातीं घेतल्यामुळें पाटील लोकांचें वरील क्षात्रियत्वबोधक वैभव आतां नामशेष झालें आहे; आणि पाटीलकीचें वतन आतां नामधारी होऊन फक्त तावेदारीच्या पेशाची ती हलक्या दर्जाची नौकरी वनली आहे. हल्लींच्या ज्ञानयुगांत पाटीलकीकरितां भांडणें व त्याकरितां पैसे खर्च करणें किंवा शिकलेल्या हुशार माणसानें स्वत पाटीलकी करणें ह्या गोष्टी अगदी हलक्या दर्जाच्या मानल्या जातात. अशिक्षित, अज्ञानी लोक मात्र अद्यापि त्याला वतन समजून त्याकरितां हजारो रुपये खर्च करतात, वर्षांगणती भांडतात आणि अखेरीस भिकारी होऊन, दैवाला दोष ठेऊन व कपाळावर हात देऊन रडतात.

माधानचे मोहोडांचे सनद:—इंग्रजी अमलांत जुन्या सनदा सरकारनें परत घेतल्यामुळें आतां जुन्या सनदा वहुत करून सांपडत नाहींत. तरी महत्प्रयासानें खालील सनद मौजा मांगरूळीपेठ तां. मोरशी जि. अमरावती येथील कानगो रा .रा. लक्ष्मणराव यांचे जुन्या दप्तरांत मिळाली. मौजे माधान ता. इलिचपूर जि.अमरावती येथें मोहोड उपनांवाचे पाटील हल्लीं आहेत. या मोहोड घराण्यांत अत्यंत दिव्य विभूति असे श्री.गुलाबरावमहाराज नांवाचे एक आंधळे साधु होऊन गेले. त्यांच्या घराण्याची ही सनद आहे. त्यांतील मोडी लिपीचे शब्द वऱ्याच ठिकाणीं दुर्बोध असल्यामुळें ते वाचकांचे सोयीसाठीं वालबोध लिपींत येथें देतों. या मूळ लेखाचें छायाचित्र वैकुंठवासी श्री. गुलाबराव महाराज यांच्या चरित्रांत हुबेहुब फोटो घेऊन प्रसिद्ध केलेलें आहे. त्याची अक्षरशः नकल येणें प्रमाणें:—

" गोत्र वचिष्ठ कुलदेवी दुर्गा निशान लाल दर्यावी सूरवंसी. कैफीयत

वनशावळी मोहले मकाम गुनेरगड मुबे लखनर (लखनऊ) सरहद हिंदुस्थान तख्त दिल्ली सन ८०५ फसली. मूळ पुरस वनाम उदेसिंग राने रजपूत याचा पुत्र नामे देवसिंगजी याचा पुत्रनामे मनसिंग याचा पुत्र नामे लालसिंग याचे घोडे मुकरा ३०० हमरा वंदे बादशाह गाजी महमदशाह पादशाह हुकूम मुजरा तनखा १३९४१० टके मुकरा देहात मौजे मधान प्रगणे सिरजगांव सरकार गाविल मुबे वराड पायांघाट सन ९१२ फसली मुकदम तुपगवळी वहुद मानगवळी सरकार तनखा आदा न करदय सवव वतन फरोक्त मय काळी व पांढरी वगैरे मामुल खरीद करदय. वनाम दुरगाजी मोहोड (लालसिंगचा पुत्र) याचा पुत्र इरमानजी याचा चंद्राजी याचा अभिमानजी याचा दावजी याचा पुत्र आवजी याचे पुत्र वयाजी व हुरजी"

वयाजीचा दत्ताजी हुरजीचा नगजी
दत्ताजीचा मानाजी नगाजीचे पुत्र शिवाजी व सुभाजी
हुरजी पासून सहावे पुरुष सरणाजी, सरणाजीचे गणोजी, राणोजीला पुत्र ४ रवुजी, वकारानजी, नरसाभाऊ, व गोंदुजी. आणि गोंदुजीचे पुत्र गुलाबराव महाराज साधु.

वरील लेखावरून असे दिसतें कीं पांचशें वर्षांपूर्वी इ. स. १३१५ च्या सुमारास लखनौच्या सुभ्यांत गुनेरगड येथें उदेसिंग नावांचे सूर्यवंशी वशिष्ट गोत्री राणेरजपूत जातीचे एक गृहस्थ रहात होते. त्यांच्या पासून चवथ्या पिढीला लालसिंग नांवाचे पुरुष झाले. हे लालसिंग दाक्षिणेंत महमदशहा बाह्मणी [१४६३ ते १४८२] याच्या लष्करांत ३०० घोडे स्वारांचे नायक होते. औरंगाबाद हे त्या वेळीं त्यांच्या छावणीचे मुख्य ठिकाण होतें. पुढें इ. स. १५०२ च्या सुमारास माधान येथील मुकदम नामे तुपगवळी हा सरकारी मुकरर १ सारा देईनासा झाल्यामुळें माधानचें वतन फरोक्त झालें. तें लाल-सिंगाच्या पुत्र नामें दुर्गाजी मांहोड यांनीं खरीद केलें. ते दुर्गाजी पाटील माधान येथील मोहोड घराण्याचे मूळ पुरुष होत.

मोहोड (राजे रजपुत) घराण्यांच्या चाली रीती.

मोहोड घराण्यांतील स्त्रियांचा जुना पेहेराव लहंगे, कचवे व उफराटे शेव असा असे. यांच्या जुन्या लग्नविधीला भोवरी ह्मणत असत. तो विधी असा:— नवरी मुलीला हळद लावण्याचे दिवशीं आंब्याचें लांकूड, हळद, कुंकु लावून मंडपांत रोवावयाचें. लग्नाचे दिवशीं सात होम करून सातवे होमाचे वेळीं लग्न पक्के ठरवावयाचें. परदेशी ब्राह्मण मंत्र सांगत असत. लग्नांत बहुले नसे. हा प्रकार हल्लीं बंद आहे. हल्लींचा प्रकार असा आहे कीं देव प्रतिष्ठेचे दिवशीं घोडा राउताचें चित्र भिंतिवर काढतात. कट्यारीच्या टोंकाला लिंबू टोचून तिची व कुळदेवाची पूजा करतात. मुलाचें उपनयन [मौंज] लग्नाचे वेळींच होतें. व तेव्हांपासून जानवें घालतात. लग्नांत होम आणि सप्तपदी करतात. नवऱ्यावर चवरी धरतात. घोड्यावर बसून व हातांत कट्यार घेऊन नवरा राशीं निघतो.

या वरील सनदेवरून मोहोड हे मूळचे राणे राजपूत आहेत. पण हल्लीं ते पाटील कुळंबी ह्मणवितात. यावरून कुळंबी व राणे राजपूत हे मूळचे एकच आहेत असें स्पष्ट दिसतें; हें क्षत्रियांचें घराणें आहे. देशाचारा-प्रमाणें रिवाज दक्षिणचे बहुजन समाजाचे रिवाजाप्रमाणें अलिकडे बदलले आहेत. हल्लीं या घराण्यांत भारद्वाज गोत्र व आंगिरस, बार्हस्पत्य व भारद्वाज हे प्रवर चालूं आहेत.

पळसो आणि काकडा येथिल सनदा:—

मौजा पळसो प्रगणें शिरसोली जि. उमरावती वऱ्हाड आणि मौजा काकडा तो. शेलिचपूर जिल्हा उमरावती वऱ्हाड, येथील वतनदार देशमुख रघुनांव इंगळे उर्फ बोंडे यांचा देशमुखी वतनाची सनद मिळाली. त्या सनदेची नकल खालीं दिली आहे. त्या वरूनहि स्पष्ट दिसून येतें कीं, हे इंगळे उर्फ बोंडे देशमुख जे हल्लीं कुळंबी उर्फ क्षत्रिय मराठा या नांवाच्या जातीनें ओळखले जातात ते मूळचे उत्तर हिंदुस्थानच्या लखनौ सुभ्या पैकीं गुजरगड येथील राणे रजपूत आहेत. ही सनद फसली सन ८९१ सालची ह्मणजे

आज ४५० वर्षां पुर्वीची आहे. त्या सनदेची असल वरहुकूम नक्कल येणें प्रमाणें:—

" कैफियत वंशावळी उपनांव इंगळे उर्फ वोंडे मकान गुजरगड सुबे नरवनूर सरहद हिंदुस्तान तक्त दिल्ली सन ८२१ फसली मूळ पुरुष बनाम उदेसिंग राने रजपूत, यांचा पुत्र नामे मलसिंग याचा पुत्र नामे लालसिंग याचा पुत्र नामे वलसिंग याचा पुत्र नामे देवीसिंग याचे वेडे मो. घोडे ७५० माडे सातसे हमरा सरफराझ बंदे वादशहा गाजी अलमगीर मु॥ तहेनाती सुभे दख्खन व मुक्काम औरंगाबाद सरफराज बंदे वादशहा मुकरी तनखा टक्के २७५३१ मो. देहात मौजे पळसो खुर्द प्रगणे शिरसोली व मौजे काकड प्रगणे हवेली अलजपुर [एलिचपूर] सरकार गावेल सुभे वराड पायांघाट सन ९१२ फसली मुकद्दमी सरकारी बनाम हीरू वा॥ नामाजी गवळी पळसोकर व भीकू वा॥ मानकोजी काकडेकर सरकार तनखा आदा न करदेव आज सबब वतन फरोक्ति मय काळी व पांढरी वगैरे मामुल बनाम हन. वतजी वलद परतापजी वोंडे याचा इस्तार पुत्र वलदियत रुद्राजी वोंडे याचे पुत्र तीन.

१ दानाजी वोंडे—२ मानाजी वोंडे—३ रुजाजी वोंडे ना अवल्याद. '

ही असल वरहुकूम नक्कल आहे. यांत वतन कसें मिळालें याच उल्लेख असून शिवाय मूळचें गांव व ठिकाण मकान ज्ञात वगैरे खुलासा आणि वतन मिळवे पर्यंतची मूळची वंशावळ या सर्वांचा खुलासा आहे.

दोन हजार वर्षां पूर्वीचा उज्जनी येथें सांपडलेला पाटीलकी संबधाचा ताम्रपट ज्याचें वर्णन वर दिलें आहे तो, ५०० वर्षां पूर्वीची मौजा माधान तो॥ एलिचपूर जिल्हा उमरावती--वऱ्हाड येथील मूळचे राणे रजपूत व हल्लींचे मोहोड पाटील उर्फ मराठा क्षत्रिय यांच्या सनदेची नक्कल वर दिली आहे ती, आणि मौजा पळसो व मौजा काकडा जिल्हा उमरावती—वऱ्हाड येथील हल्लींचे इंगळे उर्फ वोंडे पण मूळचे राणे रजपूत यांचे देशमुखीचे वतनाचे सनदेची नक्कल वर दिली आहे ती, या एकंदर पुराव्यावरून देशमुख, पाटील, कुळंबी,

मराठा क्षात्रिय व राजपूत या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या लोकांचें मूळ ठिकाण उत्तर हिंदुस्थान आहे. राणा उर्फ राणे हा किताब उदेपूरचे राजघराण्यांस लावण्याची वहिवाट अद्याप चालूं आहे. राणे राजपूत म्हणजे उदेपूरच्या महाराणाजीच्या जातीचे रजपूत हा त्याचा स्पष्ट अर्थ आहे. यावरून उत्तर हिंदुस्थानचे उदेपूरच्या राणाजीचें राजपुत घराणें व दक्षिणचे कुळंबी उर्फ मराठा क्षत्रिय–हे एकाच जातीचे आहेत असें सिद्ध होते. माधानकर मोहोड पाटील आणि काकडेकर वोंडे देशमुख पाटील यांचीं घराणीं आज वऱ्हाडांत नामांकित क्षत्रिय मराठा जातींत मोडत असून त्यांचा शरीरसंबंध सर्व वऱ्हाड प्रांतांत नामांकित देशमुख पाटील वगैरे क्षात्रिय मराठा कुळांशीं आहे. वरील सनदांवरून वऱ्हाडांतील वतनदारी मिळविण्याचे प्रकार देशमुख, पाटील, कुळंबी, मराठा, राजपुत याचें एक जातियत्व आणि देशकालमानानें त्यांच्यांत कसा फरक पडत गेला याचेंहि अनुमान चांगलें करतां येतें.

हल्लीं लग्नाचे वेळीं क्षत्रियास उचित असें हत्यार–कट्यार हातांत धारण करणें, लग्नांत वेदोक्त पद्धतीनें लाजाहोम व सप्तपदी हे विधी करणें, लाजाहोम करण्याच्या पूर्वी क्षत्रिय गांठीचें पवित्र यज्ञोपवित (जानवें) धारण करणें, घोडा आणि तरवारीचें क्षत्रियत्व दर्शक देवक मांडून त्याची पूजा करणें, जलपूजा करून देवक आणतांना हातांत शस्त्र धारण करणें, अंगावरील पोषाख न उतरतां भरपोषाखानें लग्नांत भोजन व देवक पूजा करणें, इत्यादि क्षत्रियत्व बोधक रिवाज व कुळाचार मराठा जातींत चालूं आहेत. कारण लग्न करणें म्हणजे पूर्वीच्या रिवाजाप्रमाणें वधू शौर्यानें हरण करणें असा या एकंदर रूढीचा अर्थ आहे. कोठें कोठें लग्नाच्या पूर्वी उपनयन उर्फ मौंज करण्याचा रिवाजहि क्षत्रिय मराठा जातींत आहे. श्रावण महिन्यांत वेदोक्त श्रावणीस भट्टभिक्षुकांचा विटाळ होऊं न देतां स्वतः जातीनें किंवा आपल्या जातीच्या पुरोहिताकडून श्रावणी करून दरसाल नवीन यज्ञोपवित धारण करण्याचा विधी करण्याची रूढी या लोकांत फार दिवसापासून सुरूं आहे.

बांडीचें साल:—इ. स. १९३२ सालीं वऱ्हाडांत भयंकर

दुष्काळ पडला होता. त्याला वांडीचें साल ह्मणतात. या वर्षीं पिकें अर्धवट वाढून पुढें पाऊस न आल्यामुळें पिकांची बांडी झाली व दुसरें वर्षीं ह्मणजे १८३३ या वर्षीं पुनः पाऊस मुळींच आला नाहीं तेव्हां भयंकर दुष्काळ पडला. त्याला अठरा महिन्याचा काळ ह्मणतात. या वेळीं ब्रह्मांडांत दो। अमली अमल चालूं होता. ह्मणजे मुसलमानी बादशहा आणिं सातारचे भोंसले यांचा अमल चालूं होता. त्यामुळें फारच अंदाधुंदी चालत असे.

वतनें व जमेंदारी

पाटीलकीच्या वतनादीच्या हक्काबद्दल इंग्रजी अमलापूर्वी पाटील लोकांना गांवच्या जमीनीपैकीं पुष्कळ जमीन इनाम ह्मणून सरकारांतून वंशपरंपरेनें काटून दिली जात असे व त्याबद्दल पाटलास सनद उर्फ ताम्रपट देत असत. अशा इनामी जमीनी बद्दल पाटील लोकांकडून सारा वगैरे कोणतांच कर घेतला जात नसे. गांवच्या इतर सरकारी जमीनी बरोबर ह्या इनामी जमीनी पाटील लोक आपल्या कुळांना पऱ्यानें देत असत. सरकारी जमीनीच्या पट्ट्यासुद्धां गांवचा पाटील आणि परगण्याचा देशमुख यांच्या दस्तखती (सह्या) शिवाय अमलांत येत नसे. यावरून पट्टी आणि पट्टा हे शब्द पाटिलाचे हक्क संबंधानें किती योग्य अन्यर्थक आहेत हें सहज ध्यानांत येईल.

यावरून पाटीलकी आणि देशमुखींचीं वतनें वरील उज्जनीच्या ताम्रपटांत दर्शविल्या प्रमाणें दोन हजार वर्षांच्या पूर्वी पासून चालत आलीं आहेत. दोन हजार वर्षां पूर्वीं दक्षिणेंत जाधव, कदम उर्फ कदंब, चव्हाण, तावडे उर्फ तायडे, तोंवर, नलावडे उर्फ नल, पौरव उर्फ पवांर, प्रतिहार, पल्लव मौर्य उर्फ मोरे, राष्ट्रे उर्फ महाराष्ट्रे--मराठे इत्यादी अनेक आर्य क्षत्रियांची राज्यें ठिकठिकाणीं होतीं. त्यांच्या कडून व त्यानंतर मुसलमान बादशहाकडून हीं पाटीलकीचीं आणि देशमुखींचीं वतनें स्वपराक्रमानें मिळविलीं आहेत. असें हल्लीं देखील कित्येक ठिकाणीं उपलब्ध असलेल्या सनदा पत्रावरून दिसून येतें.

सुमारें ५५ वर्षां पूर्वी ह्मणजे इ. स. १८७० च्या सुमारास इंग्रज सरकारनें " इनाम कमिशन " नेमलें होतें. त्या कमिशननें इनाम जमीनीच्या बाबतींत

बराच महत्त्वाचा फेरफार केला. यांतच पाटील लोकांच्या इनाम जमीनी खालसा करून पाटिलकी बद्दल मिळालेले इनाम जमीनींचे पूर्वीचे ताम्रपट उर्फ सनदा परत घेतल्या.

पाटील पासोडी:—गांवच्या काळ्याच्या सरकारी उत्पन्नावर पहिल्या हजारास शेंकडा ५ रुपये, दुसऱ्या हजारास शेंकडा ४ रुपये, तिसऱ्या हजारास शेंकडा ३ रुपये, चवथ्या हजारास शेंकडा २ रुपये आणि पुढें कितीही वसूल आला तरी शेंकडा १ रुपया याप्रमाणें नगदी रकम देण्याची वहिवाट सुरू केली. याला पाटील पासोडी म्हणतात. ही वहिवाट इ. स.१८५९ सालीं इंडिया सरकारच्या मंजुरातीनें प्रसिद्ध झालेले इनाम रूल ६ यांतील रकम ७ प्रमाणें व पुढें हैदराबादचे रेसिडेंट साहेबाचे पत्र नंबर १७४१ ता. २२-९-१८६४ यांतील प्यारा १५ प्रमाणें सुरू करण्यांत आली. याशिवाय दफ्तर खर्चाबद्दल कांहीं रकम पाटील लोकांस मिळत असे; परंतु पुढें दफ्तर खर्च बंद करून त्याचे ऐवजी शेंकडा १ रुपयाप्रमाणें एकंदर चिल्लर खर्च हल्लीं आकारतात व त्यापैकीं दोन तृतीयांश पटवाऱ्यास आणि एक तृतीयांश पाटलास देतात. इ. स. १८५२ सालीं हैद्राबादचे निझाम आणि इंग्रज यांचा वऱ्हाड संबंधानें तह झाला. मे. सी. मार्किस साहेबांनीं केलेले तहनाम्याचें पुस्तक आहे; त्यांत वऱ्हाड संबंधीं वरील तहनामा सविस्तर दिला आहे. वतन दार लोकांचे हक्क पूर्वीप्रमाणें बरोबर पाळूं अशी शर्त इंग्रजांच्या जबाबदार अधिकाऱ्यांनीं त्यांत मान्य केलेली आहे.

इ. स. १७६० मध्यें उदगीर येथें आणि इ. स. १७२५ मध्यें खर्डा येथें सातारच्या छत्रपतीतर्फे पेशवे आणि निझाम यांच्यामध्यें लढाया झाल्या. त्या दोन्ही लढायांत निझामाचा मोड झाला. नागपूरकर भोंसल्यांनीं पेशव्यास या लढायांत चांगली मदत दिली होती. या पराभवामुळें निझामानें वऱ्हाडचा बराच मुलुख छत्रपतीस तोडून दिला. तेव्हां मराठ्यांनीं विद्वान ब्राह्मण लोकांस व इतर लढवय्ये लोकांस त्यांच्या कर्तबगारीबद्दल पुष्कळ इनामें दिलीं तीं अद्यापि चालूं आहेत.

वऱ्हाडांत मराठ्यांचा अमल बसण्यापूर्वी हा प्रांत दिल्लीचे मोंगल बादशहाचे ताब्यांत होता. इ. स १६७१ मध्यें शिवाजीचा सरदार प्रतापराव गुजर यानें कारंज्यापर्यंत छत्रपतीचा अमल बसविला. पुढें इ. स. १७०७ साली औरंगजेब मरण पावला तेव्हां मराठ्यांची सत्ता वऱ्हाडांत फार बळावली. इ. स १७२४ यावर्षी बुलठाणे जिल्ह्यांत फत्तेखेडा येथें निझाम व मराठे यांची लढाई होऊन तह झाला तेव्हांपासून वऱ्हाडांत निझाम व मराठे या दोघांचा अमल सुरू झाला. त्याला दो अमली म्हणत असत. एकंदर सरासरी १२५ वर्षें भोसल्यांचा अमल वऱ्हाडावर होता. दिल्लीचे मोंगल, हैदराबादचे निझाम, सातारचे छत्रपति मराठे आणि मराठ्यांचे प्रधान पुण्याचे पेशवे या सर्वांकडून देशमुखी, पाटीलकी, इनामें इत्यादि वतनें जमेंदार लोकांना मिळालीं आहेत. ती अद्याप चालूं आहेत. बाराव्या शतकाचे अखेरीस दक्षिण देशी विद्यानगर येथें जाधव घराण्याचें राज्य होतें. विद्यानगरास अनागोंदी हें नांव पडलें कारण कर्नाटक भाषेंत ' अनी ' म्हणजे हत्ती आणि गोदी म्हणजे बांधण्याचें ठिकाण. हत्ती बांधण्याची जागा ती अनागोंदी. मुसलमानी जुलुमामुळें दक्षिणेंतील जमेंदार आपली इज्जत राखण्याकरितां वाट सांपडेल तिकडे फरारी झाले होते. त्यांना राजे रामदेवराव जाधव यांनीं पुनः बोलावून आणि त्यांची वतनें कायम करून व नवीन वतनें देऊन पुनः कायम केलें व देश आबाद केला.

लोक हितवादी कृत ऐतिहासिक गोष्टी भाग १ पान १५३ यांत शाश्वत आणि अशाश्वत अधिकारी यांची माहिती दिली आहे, ती अशीः—

"वुडाली पाटीलकी देशमुखांची व वुडाले कुळकर्ण देशपांड्यांचे" अशी एक म्हण आहे. पाटील पांडे व देशमुख देशपांडे यांना **" शाश्वत अधिकारी "** म्हणतात. कारण सरकारचे शेंकडो अधिकारी बदलतील किंबहुना सरकारही बदलेल पण वतनदारा वांचून सरकारचें चालावयाचेंच नाहीं म्हणून ते मात्र न बदलता वंशपरंपरेनें चालावयाचेच. पुरातनकाळीं या वतनांची प्रतिष्ठा इतकी होती कीं महादजी शिंदे हे

दहाकोट रुपये वसुलीच्या राज्याचे मालक होते तरी ते दाक्षिणेंत पाटीलक्या विकत घेत असत, आणि लोकांनीं आपणांस पाटील्वोवा ह्मणावें ही त्यांस मोठी हौस असे. तसेंच पहिले छत्रपती शाहु महाराज हे आपणास सरदेशमुख ह्मणवीत असत. याचें कारण पुर्वीचे सरकारांत जमेंदारांची योग्यता फार मोठी होती. महालाचा सर्व कारभार देशमुखाचे घरीं व गांवचा कारभार पाटलाचे घरीं चालत असे. सरकारी कर, सरकारी शेतसारा, पंचायती हीं सर्व कामें त्यांचेच मार्फत होत असत. सरकारी जमावंदी करण्याचें काम देखील त्यांचे मार्फतच होत असे. त्याला तावजी असें ह्मणत असत. यावरून अशी ह्मण पडली कीं:— **गांवकरी तें राव न करी** ह्मणजे गावचा जमेंदार नें करूं शकेल तें राजाला सुद्धां करतां येणार नाहीं. गांवचे जमेंदार हेंच आपल्या गांवच्या जमीनीचे मालक अमलवारीच्या दृष्टीनें असत. दुसरे गांवानें गांवची शिवदावली तर त्या दोन गांवात तंटे माजत व आपसांत बारुद गोळीच्या लढाया होत असत; तेव्हां शेजारचे गांवचे वतनदार अधिकारी मिळून ते तंटे तोडत असत. गांवांतील बारा बलुते आणि वारा अलुते हे सर्व जमेंदारांची चाकरी करीत असत. सुभेदार, मामलेदार व नायब हे सरकारचे अधिकारी येत तेव्हां त्यांचें वासलातीचे कागदावर त्या त्या परगण्याच्या किंवा कसब्याच्या देशमुख देशपांड्यांच्या सह्या झाल्यावाचून त्यांचा कागद सरकारांत मंजूर होत नसे. त्यामुळें सरकारच्या वरील अधिकाऱ्यांना जमेंदारांच्या तंत्रानेंच वागावें लागत असे. त्यामुळें जमेंदार लोकांची इज्जत व इभ्रत फार मोठी होती. गांवची रयत पाटलाच्या मुठींत आणि परगण्याची रयत पाटलासुद्धां देशमुखाचे मुठींत असे. या प्रमाणें प्रत्येक गांव व प्रत्येक तर्फ किंवा प्रत्येक परगणा हें एक स्वतंत्र राज्य असे. ज्या प्रमाणें मांडलीक राजे आपल्या सार्वभौम राजास खंडणी देतात, त्याप्रमाणें जमेंदार लोक सरकारला गांवचा ठरीव वसूल मात्र देत असत. इतर बाबतींत जमेंदार मुख्त्यार असत. पांडे व देशपांडे यांचे कडे अनुक्रमें गांवचें व परगण्याचें लिहिण्याचें काम असे ह्मणून पांड्या हा पाटलाचे हाताखालचा कारकून व देशपांड्या हा देशमुखाचा लेखक असें मानत असत. याच सत्ताधिकारामुळें

पाटलापेक्षां देशमुख श्रेष्ठ व पांड्यापेक्षां देशपांडे श्रेष्ठ असें मानण्याची रूढि झून गेली. पण खरोखर घरानदाजपणाच्या नात्यानें त्यांच्या जातींत मात्र श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा भेद नाहीं. प्रत्येक गांवास गढी झणजे लहानसा किल्ला असे आणि देशमुखा जवळ ज्याच्या त्याच्या लवाजम्या प्रमाणें कांहीं घोडे तोडेदार बंदुका आणि तरवार, भाला, बरची वगैरे हत्यारांचे सफाईदार काम बजावणारे चाके शिपाई देखील सेंग्रही असत त्यामुळें एकाएकी ते कोणास दाद देत नसत. इंग्रजी अमल सुरूं झाल्यापासून हें स्वातंत्र्य हळू हळूं नष्ट झालें.

वऱ्हाडांतील जाहगिरी व इनामें.

वऱ्हाडांत एकंदर १८ गांवें जाहगीर दिलेलीं आहेत. त्यापैकीं कांहीं देवस्थानास व कांहीं महत्वांचीं कामें केलेल्या मनुष्यास व वतनदारांस दिलेली आहेत. त्याचप्रमाणें प्रत्येक गांवांत कांहीं शेतें पाटील, पांडे, देशमुख, देशपांडे, महार, काजी, मुल्ला, वगैरे लोकांस दिलेलीं आहेत. गांवाच्या देणगीस "जहागीर" आणि शेताच्या देणगीस इनाम झणतात. दोन्हीसही एकच नियम लागूं आहेत. त्याला Berar Inam Rules असें झणतात.

पुढील राजांनीं व अधिकाऱ्यांनीं दिलेल्या जाहागिरी वऱ्हाडांत हल्लीं चालूं आहेत.

दिल्लीचे मोंगल बादशहा, सातारचे राजे, सातारच्या भोंसले राजांचे प्रधान–पेशवे, शिंदे आणि निझाम.

निझामाच्या राज्यांतील सनदापैकीं राजे नंदुलाल यांच्या दुसऱ्या दिवाणगिरींतील फसली सन १२५० तें १२५२ पर्यंतच्या सनदा (१८४० ते १८४२ इ.) व राजारामबक्ष यांच्या ता. १३-७-१८४९ पासून ता. ७-१०-१८५० पर्यंत आणि दिवाण सिराजुल्मुल्क याच्या तारीख २९-६-१८५१ ते ता. २६-५-१८५३ पर्यंतच्या सनदा त्या त्या दिवाणांच्या अधिकारावाहेरच्या ठरवून नामंजूर केल्या आहेत. वाकीच्या सर्व जाहागिरी व इनामें कायम झालीं आहेत.

परगणेदार:—पूर्वीच्या सनदावरून कांहीं गांवें वऱ्हाडांतील देशमुख व देशपांडे यांस दिलीं आहेत. त्यास पालेपट्ट म्हणतात. यांत निमजाहगिरी प्रमाणें चौथी ठरीव सारा बंगालच्या कायम धारलेल्या प्रमाणें मात्र द्यावा लागतो. बाकी सर्व माफी.

इजारा.—इ. स. १८६५ च्या नियमाप्रमाणें कांहीं गांवें इजाऱ्यानें दिलीं आहेत. त्यास इजारा गांवें म्हणतात. अशा इजाऱ्यांचीं गांवें फक्त येवतमाळ जिल्ह्यांत आहेत एकंदर इजारदारांची संख्या ६४ आहे. काळीचें उत्पन्नापैकीं निमें इजारदारांनें घेऊन निमें सरकारांत भरावें. आणि गांवची चतनदारी पाटीलकी करावी असा ठराव आहे.

जमींदार:—बेरार गॅझेटिअरच्या खालील उताऱ्यांत जमींदाराचा दर्जा व त्यांच्या शक्तीचें वर्णन केलेलें आहे.

Berar Gazetteer 1855 book No. 32

The whole Country was in disorder & Zamindars being pretty princes hardly acknowledging any authority on the part of the then Government. Generally they were Hindus. They had certain local privileges such as Jagirs, Inam lands and Lawajmas etc. which became heriditory & by degrees a new race of Zamindars sprang up.

वऱ्हाड **गॅझेटिअर १८५५** बुक नं. ३२. बहुतेक देशांत अंदाधुंदी माजली होती आणि जमेंदार लोक हे दुय्यम राजपुत्रच बनल्या सारखे झाल्यामुळें त्या काळच्या राजांच्या कोणत्याही अधिकाऱ्यास बहुत करून ते जुमानित नसत. जमेंदार बहुत करून हिंदु असत. त्यांना जहागिरी, इनाम जमीनी, लवाजमे इत्यादि प्रकारचे वतनदारी हक असत. तेच हक वंशपरंपरेनें कायम झाले आणि क्रमाक्रमानें जमेंदारांचा नवीन वर्ग निर्माण झाला.

मराठा:—'श्री रामचंद्राच्या कालीं आर्यांचा प्रवेश दक्षिणेंत वऱ्हाडांत व दंडकारण्यांत झाला होता पण वऱ्हाडा शिवाय इतरत्र त्यांची राज्ये स्थापन झालीं नव्हतीं. याचा भरपूर पुरावा रामायणांत आहे. त्या नंतर

इ.स पूर्वी [illegible] प्रांतांत [illegible] हे आर्य लोकांचा प्रवेश दंडकारण्यांत दक्षिणेत–महाराष्ट्रांत पुन. झाला व जेव्हां त्यांनीं गोदावरी नदीच्या दोन्ही थड्यांच्या मध्यें वसाहत केली, तेव्हां ज्या आर्य क्षात्रिय लोकांच्या बळावर ही वसाहत झाली त्याच क्षात्रियांचे [आर्यांचे] वंशज हल्लींचे मराठे आहेत असें नामांकित प्रो. प्राक्वे यांचें मत आहे व तें डॉक्टर भांडारकर यांस संमत आहे.

" So that the Marathas of the Modern times are the descendants of the Kshatriyas or Aryans who settled south of the Narmada & along thebanks of the Godavari. Dr. R. G. Bhandarkar's opinion.

इ. स. १९२० सालीं हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानास स्वराज्य सुधारणांचा जो पहिला हप्ता दिला त्यांत मुंबई इलाख्याच्या कौंसिलांतील सभासदांच्या सात जागा मराठा जाती करितां राखून ठेवण्यांत आल्या होत्या; त्या सात जागा भरण्य. पुरताच मराठा या शब्दांत कोणकोणत्या जातींचा समावेश करावा असा प्रश्न त्या वेळीं उद्भवला. तेव्हां ह्या सात जागा भरण्या पुरता मराठा या शब्दांत खालील जातींचा समावेश करावा असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

हिंदुस्थान सरकारचा सिमला येथें झालेला ठराव नं ७६७ ता. २७-७-२० यांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं मराठा, कुळंबी, माळी ,भंडारी, शिंपी, लोहार कुंभार, धनगर, लोणारी, बारी भावी, भोई, दळवी, शिंदे या संज्ञेत येणाऱ्या जातींचा समावेश मराठा या शब्दांत कौंसिलच्या सात जागा भरण्याकरितां होतो. या खेरीज आणखीही कोण्या जातीचा समावेश मराठा या शब्दांत करणें योग्य दिसल्यास तो त्याबद्दलचा निर्णय करून घेण्याचा अधिकार मुंबई सरकारास देण्यांत आला आहे.

टीप:–मराठा ही एक इतिहास प्रसिद्ध तरवार बहादर, परंपरेनें हजारो वर्षांपासून राज्योपभोग घेत आलेली, क्षत्रिय जात आहे. पण मराठा म्हणजे महाराष्ट्रांत राहणारा असाही मराठा या शब्दाचा अर्थ कोणी कोणी अलीकडे करूं लागले आहेत. त्यामुळें महाराष्ट्रांत राहणारे ब्राम्हण, मुसलमान, क्रिस्ती,

यहुदी, वलुची, चीनी, जपानी वगैरे सर्व जातींचा समावेश मराठा या शब्दांत होईल, आणि या अर्थानें सर्वच लोक या राखून ठेवलेल्या कौंसिलमधील सात जागांवर आपला हक्क दाखवून ते आपसांत भांडतील; मराठा या शब्दाच्या या विशिष्ट अर्थाची ही आपत्ति टाळावी म्हणून फक्त ह्या सात जागा भरण्यापुरतांच वरील जातींचा समावेश मराठा या शब्दांत सरकारनें केला आहे. सरकारच्या वरील ठरावास या पेक्षां ज्यास्त किंमत देतां येत नाहीं कारण जाती ठरविण्याचा अधिकार सरकारास मुळींच नाहीं.

गोदावरीचे कांठावरील मराठे स्वतःस महारट्ठे ह्मणवितात. तुंगभद्रेवरील लोक आपणास नुसते रट्ठे किंवा रड्डी ह्मणवितात. एवढ्यावरूनच त्यांच्या मूळच्या दजात भिन्नता मानण्यास कारण आहे असें आम्हास मुळींच वाटत नाहीं. हल्लीं ब्रिटिश सरकार एखाद्या जनोनदाराला " महाराज " हा किताब देते व तंजावरांतील शहाजी महाराजांच्या खास वंशजांना नुसते " राजे " ह्मणण्यासही कांकू करीत आहे, ह्मणून एवढ्यावरून वंशदृष्ट्या दरभंग्याचे ब्राह्मण महाराज तंजावरच्या हल्लींच्या क्षत्रिय शिवाजी महाराजांच्या राज वंशजाहून श्रेष्ठ आहेत असा सिद्धांत ठोकून देण्यास कोणीतरी तयार होईल काय ? " वर्णानां ब्राह्मणो गुरुः " या न्यायानेंच दरभंग्याचे ब्राह्मण महाराज जर दर्जानें श्रेष्ठ ठरतील अें ह्मणावें, तर मग पूर्णावतार गणलेल्या श्रीकृष्ण क्षत्रियाहूनही त्यांचा एखादा ब्राह्मण पाणक्याही श्रेष्ठ मानावा लागेल. रड्डी व रट्ठ हे आज एक हजार वर्षांपूर्वी किंवा त्याही पूर्वी जरा मराठ्याहून अलग झाले आहेत, त्यांची भाषा कानडी किंवा तेलगु आहे तर मराठ्यांची भाषा मराठी आहे. जैन धर्मांतून रड्डी हे लिंगायत

धर्मात गेले आहेत; तर महारट्ठे बुद्ध धर्मातून शैव धर्मात गेले आहेत, इत्यादि महत्त्वाच्या घडामोडीमुळें रड्डी व महारट्टे—मराठे आणि रड्डे यांच्यांत पुष्कळ अंतर आज दिसून येण्यासारखें आहे; पण ते मूळचे एकच आहेत. श्री. वैद्य प्राचीन-मध्ययुगीन भारत या ग्रंथाचे कर्ते यांनी आपल्या ग्रंथांत मराठ्यांना एक जात उत्तम क्षत्रिय असें ठरविलें आहे इतकेंच नव्हें तर १९२३ सालच्या जून महिन्याच्या अंकांत केसरी पत्रांत मराठे हे क्षत्रियच आहेत असें रा.

बैद्यानीं पुनः आपले सिद्धांत प्रसिद्ध केले आहेत.

मराठा या शब्दाचा उपयोग इ. स. पूर्वी सहाव्या शतकापासून झालेला आज सुमारे २५०० वर्षां पूर्वी पासून निरनिराळ्या तत्कालीन विद्वानांच्या ग्रंथांत दिसून येतो. तसेंच जुनी कोरीव लेणी, नाणी आणि ताम्रपट वगैरही त्याचा उपयोग केल्याचं दिसून येतें; इतकेंच नाहीं तर ९६ कुळांचा मराठा हा आर्यवंशी असल्याचे शास्त्रांत उल्लेख आहे, याचे सप्रमाण वर्णन **मराठ्यांचें प्राचिनत्व** या प्रकरणात यापूर्व ग्रंथांत आहीं तपशीलवार केलेलें आहे. सबब त्याची पुनरुक्ति येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. (मराठ्यांचे प्राचिनत्व व श्रेष्ठत्व हें प्रकरण पहा.)

अस्वामी:—गांवचा जो मुख्य सत्ताधारी जुमेदार—मालक तोच त्या गांवचा **स्वामी.** त्याच्या शिवाय इतर सर्व **'अस्वामी' 'असामी'** होत. गांवच्या मुख्य स्वामी शिवाय इतरांस असामी (अस्वामी) म्हणतात. असामी हा शब्द अस्वामी या शब्दाचा अपभ्रंश आहे.

भाट:—भट्ट. भिक्षुक, म्हणजे ब्राम्हण क्षात्रियांचे आश्रित पुजारी **भट:**—म्हणजे योद्धा—वीर—क्षत्रिय. भट या शब्दापासून भाट म्हणजे वीर्यशाली हा शब्द झालेला आहे. भाट लोक क्षात्रिय जातींचे असून ते वीररसप्रधान शीघ्र कवीत्व करणारे कवीच असतात. त्यांच्या वीर्यशाली कवितांच्या श्रवणानें कोणत्याही मनुष्याच्या अंगांत वीरश्रीचा प्रभाव विद्युल्लतेप्रमाणें होऊन अंग स्फुरण पावूं लागतें. या भाट लोकांनीं रणांगणांत, राजदरबारांत, क्षात्रियांच्या सभामंडपांत, क्षात्रियांच्या लग्नकार्यांत व क्षात्रियांच्या इतर सार्वजनिक प्रसंगांत वीररसप्रधान कवीत म्हणावे, वीर पुरुषांचीं चरित्रें गावीत, क्षात्रियांच्या वंशावळ्या लिहून ठेवाव्या आणि आपल्या मर्द कवनानें रणांगणांतील वीरांच्या अंगीं वीरश्री उत्पन्न कराची हीं त्यांचीं मुख्य कर्तव्यें आहेत. सारांश भाट हे राजदरबारी व राजमान्य क्षात्रिय आहेत.

राजपूत-रजपूत:—म्हणजे राजपुत्र. राजवंशी राजवंशांत उत्पन्न झालेला. पूत म्हणजे पुत्र. राजपूत हा मूळचा शुद्ध शब्द असून त्याचा अपभ्रंश

राजपूत असा झालेला आहे. राजपूतांचा सांक्षेप इतिहास पुढें एका निराळ्या प्रकरणांत दिलेला आहे.

ब्राह्मण:—खऱ्या खऱ्या सात्विक व निष्काम भक्तीनें ईश्वराचें चरणीं एकजीव झालेला असा शुद्ध, सात्विक, सदाचारी, मनुष्यमात्रांत भेद-भाव न मानणारा साधु पुरुष—जनें संत तुकाराम, नामदेव, सावतामाळी, नर-हरी सोनार, ज्ञानदेव, एकनाथ इत्यादि पुरुष हेच खरे ब्राह्मण होत. हे सात्विक गुण ज्यांच्या अंगीं नाहींत ते ब्राह्मण नसून बामण म्हणजे भ्रष्ट, दुष्ट, असे शूद्र समजावें. ब्राह्मण ब्रूव म्हणजे पढंत मूर्ख.

भट्ट:—यजमानावर अवलंबून असणारा, परान्नपुष्ट. क्षत्रियांच्या मिश्र बीजापासून उत्पन्न झालेली एक परान्नपुष्ट जात, असा अर्थ प्रोफेसर वैद्य एम्. ए. एल्एल्. बी. यांच्या संस्कृत कोशांत दिलेला आहे.

भिक्षुक:—भिक्षा मागून निर्वाह करणारा भिकारी, फुकट खाऊ.

जोशी:—आपल्या अन्नदात्या यजमानाला स्वतःच्या स्वार्थासाठीं खोटे मंत्र, खोटें तंत्र, खोटा धर्म, खोटें कर्म, खोटें पोथी पुराण सांगून लुबा-डणारा; अर्थात स्वार्थाकरितां अधर्म करणारा जोशी म्हणजे दांपी.

यजमान:—मालक, धनी; नौकर आपल्या धन्याला यजमान म्हणतो, भट्टभिक्षुक आपल्या अन्नदात्यास यजमान म्हणतो, वायको आपल्या नवऱ्याला यजमान म्हणते यज्=पुजा करणें. यावरून यजमान म्हणजे पुज्य, पूजनीय, सन्माननीय मालक असा त्याचा स्पष्ट अर्थ आहे. अशा थोर दर्जाचे यजमान स्वतः आपल्या [illegible] म्हणजे भट्टभिक्षुकांच्या पाया पडतात हें केवढें थोर पातक आहे, तें पहा!

शूद्र:—म्हणजे क्षुद्र, कवडीमोल, गुलाम, दास; शूद्र या शब्दांत हजार शिव्यांची एकच शिवी भरलेली आहे. स्वतःस शूद्र म्हणवून घेणें म्हणजे स्वतःस क्षुद्र, कवडीमोल, गुलाम, दास म्हणवून घेणेंच आहे. शूद्र म्हणजे स्वतःची माणुसकी गमावून पुच्छहीन पशुंच्या पंक्तींत बसणारा असा शूद्र शब्दाचा फारच वाईट अर्थ आहे.

उपाध्यायः—म्हणजे धार्मिक गुमास्ता. मजूरी घेऊन आपल्या मालकाचे धार्मिक विधि करणारा भट्टभिक्षुक; उपाध्याय हे यजमानाचे धार्मिक नौकर आहेत. प्राचीन काळीं धर्म संस्थापक, धर्मसंवर्धक व धर्म संरक्षक अशा सत्ताधारी क्षत्रिय राजांनीं धर्मप्रसारकांनां जे प्रचारक नेमले तेच हे भिक्षुक पुढें परंपरेनें उपाध्याय म्हणजे धर्मतत्वें सांगून सांगणारे उर्फ धर्माधिकारी बनले. पण मूळचा त्यांचा दर्जा पोटाकरितां वेतन घेऊन प्रचारकाची नौकरी करण्याचा आहे. यजमानानें मालकानें आपल्या अशा धार्मिक गुमास्त्यांच्या—नौकरांच्या पाया पडणें किंवा त्याचे पाय धुवून पिणें हें स्वतःस नर्कांत नेणारें घोर पातक आहे.

सत्पात्रीं दानः—म्हणजे ज्याला भूक लागली असेल त्याला जेवूं घालणें, तहान लागली असेल त्याला पाणा पाजणें, उघड्यास वस्त्र देणें, रोग्यास औषध देणें, म्हाताऱ्यास, लंगड्या पागळ्यास व आंधळ्यास सर्व प्रकारें मदत देणें, विद्यार्थ्यासं विद्या शिकविणें, सारांश गरजवंताची गरज फुकट भागविणें याला सत्पात्रीं दान म्हणतात; मग दान घेणारा कोणत्याही जातीचा असो. पण याच्या उलट धट्टया कट्टया किंवा सुखी किंवा दुर्व्यसनी किंवा गुणहीन अशा ब्राह्मणास, गोसाव्यास, बैराग्यास, फकीरास, मानभावास किंवा इतर कोणत्याही वेषधारी साधूस, फक्त त्यांचे कपड्यांचें नाटकी सोंग पाहून दान दिलें तर, किंवा ब्राह्मणांचें सहस्र भोजन घातलें तर, दान घेणाऱ्याच्या दुराचारामुळें दान देणारा स्वतः नरकाप्रत जातो. याला कुपात्रीं दान म्हणतात, व कुपात्राचे कुपरिणाम दात्याला भोगणें भागच पडतें.

गोब्रह्म प्रतिपालकः—ही बहुमानार्थी थोर पदवी कुडुजनांनीं श्रीशिवाजी महाराजास दिली होती. गो म्हणजे हिंदभूमि; आणि ब्रह्म म्हणजे हिंदुधर्म. रावणासारख्या अत्यंत पराक्रमी औरंगजेब बादशहाच्या मुसलमानी धर्माच्या तडाख्यांतून हिंदमाता व हिंदुधर्म यांचा प्रतिपाळ करून ज्या बहादुरानें हिंदुपदपादशाहीचा भगवा झेंडा हिंदुस्थानभर फडकाविला त्या प्रता-

पशाली, त्या प्रातःस्मरणीय शिवाजी महाराजाला, गोब्रह्म प्रतिपालक म्हणजे हिंदभूमि व हिंदुधर्म यांचे प्रतिपालकर्ते, असा यथार्थ किताब अखिल हिंदी लोकांकडून प्रेमानें व बहुमानानें बहाल केला जाणें ही गोष्ट खऱ्या प्रेमाचें खरें स्मारक आहे. पण शिवाजी महाराज ब्राह्मणांची सेवा करीत होते म्हणून त्यांच्या जातीबांधवांनींही ब्राह्मणांची सेवा करावी असें दर्शविण्याकरितां स्वार्थी भिक्षुकशाहीनें, आनंदीबाई प्रमाणें ध्र चा ब्र करून ब्रह्म या पवित्र शब्दाच्या जागीं ब्राह्मण हा शब्द घुसडून दे ऊन:—

गोब्रह्म प्रतिपालक याचें **गोब्राह्मण प्रतिपालक** असें गौणार्थी रूप बनविलें. गोब्राह्मण प्रतिपालक म्हणजे गाईंचें व ब्राह्मणांचें पालन करणारा; हा गौण अर्थ शिवरायाच्या पवित्र आणि अत्यंत उच्च अशा अवतार कार्याला कलंक लावणारा आहे. कारण फक्त गाईंचे व ब्राह्मणांचें पालन शिवाजीनें केलें आणि गाई शिवाय इतर पशुपक्षांचें व ब्राह्मणाशिवाय इतर ब्राह्मणेतरांचें पालन केलें नाहीं, असा पक्षपातीपणाचा गौणार्थ गोब्राह्मण प्रतिपालक या शब्दाचा होतो. या वरून पाहतां गोब्राह्मण प्रतिपालक ही भिक्षुकी पदवी योग्य अर्थ दर्शक नसून गोब्रह्म प्रतिपालक हीच श्रेष्ठार्थी थोर पदवी शिवरायाला शोभणारी व योग्य आहे. हें वाचकांचें ध्यानीं येईल.

भगवा झेंडा:—आर्य क्षत्रिय लोक प्राचीन काळापासून शंकराचें व आदिशक्ति पार्वती देवीचे उपासक आहेत. शंकराचा भगवा झेंडा हजारो वर्षांपासून शंकराचे देवालयासमोर दसऱ्याचे दिवशीं क्षत्रिय जमेंदार लोक उभारीत असतात-तेंच मराठा क्षत्रियांचें राष्ट्रीय निशाण आहे. दसऱ्याचे दिवशीं भगवा झेंडा उभारून व रण वाद्यें वाजवून ढोल निशाणासह मोठ्या थाटानें क्षत्रिय जमेंदार लोक सीमोल्लंघन करीत असतात. शत्रुवर स्वारी करण्याचें हें शुभ मुहूर्त आहे. विजयादशमी हें हिंदुंच्या साडेतीन मुहूर्तापैकीं एक मुख्य सुमुहूर्त आहे. " हरहर महादेव " ही रणगर्जना क्षत्रिय लोक शत्रुवर हल्ला करतांना करीत असतात. रणांगणावर शंकराचें नांवाचा जयघोष करून शंकराचाच भगवा झेंडा उभारतात. म्हणजे शंकराचेंच नांवानें एकतर

विजयश्री मिळवूं किंवा कामी आल्यास भस्मीभूत होऊन शंकरस्वरूपीं मिळून जावूं; ही उदात्त कल्पना यांत आहे. हा भगवा झेंडा रामदास स्वामींचें नांवाचे भगवें निशाण आहे असें कित्येक धूर्त लोक म्हणतात आणि रामदास स्वामी हे स्वतः शिवरायाचे राजगुरु होते व शिवाजीनें आपलें राज्य रामदास स्वामीस अर्पण केलें होतें म्हणून गुरूचें नांवाचा हा भगवा झेंडा शिवाजीनें सुरूं केला असा त्याचा बादरायणी संबंध धूर्त लोक जोडतात. पण ही कल्पित कथा साफ खोटी आहे. कारण रामदास स्वामी २५० वर्षांपूर्वी होऊन गेले पण मराठ्यांचा भगवा झेंडा तर हजारो वर्षांपासून चालत आला आहे. यावरून मराठ्यांचा भगवा झेंडा महादेवाचें दर्शक चिन्ह आहे; तें रामदासस्वामीचें फकीरी भगवें निशाण खास नव्हें ही गोष्ट निर्विवाद आहे.

शिवाजीचे गुरु कोण ! रामदासस्वामी हे शिवरायाचे समकालीन एक सत्पुरुष होऊन गेले. हे शिवाजीचे राजगुरु होते असे कित्येक धूर्त लोक म्हणतात. पण त्या गोष्टीला ऐतिहासिक आधार मुळींच कांहीं नाहीं. याच्या उलट पुरावा मात्र इतिहासांत पुष्कळ आहे. इ. स. १६४३ या वर्षीं शिवाजीनीं मोंगलांचा तोरणा किल्ला घेऊन स्वराज्याचें पहिलें तोरण तेथें उभारलें; त्यानंतर मावळे व मराठे लढवय्ये लोकांची मोठी फौज उभारून त्यांनीं आपली मातुश्री जिजाबाई यांच्या उपदेशाप्रमाणें व श्रीकुलस्वामिनी देवी भगवतीच्या कृपेनें महाराष्ट्रांतील पुष्कळ मुलुख जिंकून राज्य स्थापन केलें. विस्तीर्ण राज्य विस्तार झाल्यामुळें इ. स. १६६४ या वर्षीं त्यांनीं स्वतःस राजा हा किताब घेतला आणि इ. स. १६७४ सालीं रायगडी स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. तेथपर्यंत रामदासस्वामीचा आणि शिवाजी महाराजांचा मुळींच संबंध नव्हता. प्रोफेसर भाटे [ब्राह्मण] यांनीं **भजनगड स रामदास** या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे, त्यांत रामदास स्वामींच्या पट्टशिष्यांच्य हातच्या अस्सल पत्रांच्या नकला अक्षरशः प्रसिद्ध केल्या आहेत आणि त्या अस्सल पत्रावरून असें स्पष्टपणें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, रामदासांची आणि शिवाजी महाराजांची अगदी पहिली भेट इ. स. १६७२

सालीं झाली त्यापूर्वी परस्परांची दृष्टादृष्ट सुद्धां नव्हती. हेंच निर्विवाद सत्य. श्री. केळुसकर कृत शिवाजी महाराजांचें चरित्र या ग्रंथांत अनेक पुराव्यांनीं सिद्ध करून दाखविली आहे. ज्या अर्थी १६६४ सालीच शिवाजींनीं हिंदु पदपादशाहीची संस्थापना पूर्ण करून स्वतःस राजा हा किताबही घेतला होता, त्या अर्थी हिंदु पदपादशाही स्थापन करण्याचें कामांत रामदास स्वामीचा शिवाजीशीं मुळींच कांहीं संबंध नव्हता असें दिसून येतें. हिंदुपदपादशाही स्थापन करण्याचें कार्यांत शिवाजी महाराजांनीं आपली राजकार्यपटु माता जिजाबाई व इतर राजकार्य धुरंधर मुत्सद्द्यांचीं सल्ला मसलत वारंवार घेऊन मातेच्या उपदेशा प्रमाणेंच स्वराज्य स्थापनेचें कार्य पुढें चालविलें होतें, या बद्दल इतिहासांत शेंकडो ठिकाणीं स्पष्ट उल्लेख आहेत. त्याच प्रमाणें कुलस्वामीनी श्री जगदंबादेवीची पुर्ण कृपा शिवाजीवर असल्यामुळें कठीण प्रसंगीं ते देवीची आराधना करीत असत व देवी त्यांना स्वप्नांत प्रत्यक्ष दर्शन देऊन संकट निवारणार्थ दृष्टांत रूपानें कौल देत असे, अशाही अनेक गोष्टी शिवकालीन कागद पत्रांच्या आधारें इतिहासांत सुप्रासिद्ध आहेत. शिवाजी महाराज स्वतःच सिंहासारखे पराक्रमी, बृहस्पतीतुल्य बुद्धिवान, मुत्सद्दी आणि धैर्याचे मेरू असल्यामुळेंच त्यांना सर्व लोक श्री रामचंद्राचा अवतार मानीत होते व हल्लीं देखील तसें मानतात. त्यांतही राजकारणांत जन्म घालविलेल्या माता जिजाबाईच्या आशिर्वादानें आणि कुलदेवीच्या पूर्ण कृपेनें स्वराज्य स्थापना पूर्ण होऊन शिवाजीनें स्वतःस राजा हा किताबही घेतला होता. राजा हा किताब घेतल्यानंतर आठ वर्षांचा दीर्घकाळ लोटे पर्यंत रामदास स्वामींचीं व शिवाजीची भेट सुद्धां नव्हती. अशी खरी परिस्थिति असून सुद्धां शिवाजी हे रामदासाच्यां हातांतलें एक बाहुलें होतें, रामदास स्वामी शिवाजीचे गुरु होते, रामदासाच्याच मदतीनें व त्यांच्याच आशिर्वादानें स्वराज्य स्थापन झालें, म्हणून स्वराज्य स्थापनेचें खरें श्रेय शिवाजीस नसून रामदास स्वामीस आहे व म्हणूनच रामदासाच्या गांवाचा भगवा झेंडा शिवाजीनें सुरू केला वगैरे वगैरे निराधार वल्गना करणाऱ्या धुर्तांची कींव वं

केली पाहिजे.

इ.स. १६७४ सालीं शिवाजीस राज्याभिषेक झाला. त्यावेळीं काशी पासून रामेश्वरापर्यंतचे विद्वान, पंडित, साधुसंत, महात्मे, शिवरायानें मोठ्या आदराने बोलाविले होते, त्यांत रामदासस्वामी आणि काशीचा विद्वान व तेजःपुंज तपोनिधी गोसावी शीतलपुरी हेही आले होते. राज्याभिषेकाचा समारंभ आटोपल्यानंतर **शीतल पुरी** यांचा गुरुमंत्रोपदेश शिवाजीनीं घेतला; कारण त्यावेळीं स्वराज्य मंदिरावर कळस चढविला गेल्यामुळें व शिवरायाच्या शरीरास साऱ्या जन्माच्या दगदगीमुळें उतरती कळा लागली होती म्हणून [illegible] जास्त वेगानें वाहूं लागला होता. ही गोष्ट सरदेसाई कृत **मराठा रियासत** या ग्रंथांतील शिवाजीचा राज्याभिषेक या प्रकरणांत सविस्तर वर्णन केलेली आहे. मराठी रियासत पृ. २५१ पहा.

शिवाजी महाराजांच्या भरज्वानींत त्यांची व संत तुकारामाची भेट झाली होती; संत तुकारामाचें प्रासादिक वाणीचें व पारमार्थिक साधनाचें कीर्तन शिवाजिनें ऐकलें, त्यामुळें राज्य त्याग करून त्यानीं वैराग्य धारण केलें होते; पण संत तुकारामानें त्यांच्या मस्तकावर वरदहस्त ठेऊन उपदेश केला कीं, " या तरुण वयांत स्वराज्य व स्वधर्म संस्थापनेचें कार्य तुम्ही चालू ठेवावें, त्यांतच ऐहिक व पारमार्थिक साधनांची फलप्राप्ति तुम्हास होईल. स्वराज्य व स्वधर्म संस्थापनेचें कार्य पूर्ण झाल्यानंतर उत्तर वयांत तुम्ही पारमार्थिक मोक्षमार्गाचा स्वीकार करावा. " संत तुकारामाच्या या उपदेशावरून शिवाजीनें वैराग्याचा त्याग करून पुनः स्वराज्य संस्थानेचें कार्य नेटानें सुरू केलें. ही इतिहास प्रसिद्ध गोष्ट संत तुकाराम नांवाच्या नाटकांत सर्वांनीं पाहिलीच असेल. संत तुकारामाच्या या उपदेशाप्रमाणें इ.सन १६७४ सालीं स्वराज्य मंदिरावर कळस चढविला गेल्यानंतर राज्याभिषेक झाल्यानंतर शिवाजीनीं शीतलपुरीचा गुरु मंत्रोपदेश घेतला असावा हे मराठा रियासतींतील वर सांगितलेली गोष्ट जास्त सुसंगत व संभवनीय दिसते.

रामराम: —या शब्दांत फारच उत्तम; एक राष्ट्रीयत्वाचें पवित्र तत्व भरलेलें आहे. राम-राम म्हणजे तू रान व मीहि राम; अर्थात् आर्यधर्म तत्वानुसारें स्वदेशच आपला देव आहे ही हृदयांत रामरूपीं आत्मा वास करीत असतो म्हणजे म्हणणारा व ऐकणारा दोघेही एकजीव असून रामरूपीं धर्मबंधू आहोंत. आपल्या

देहांत राम आहे—जीव आहे—तोपर्यंत आपण [रामराम करणारानें व रामराम घेणारानें] प्रसंग विशेषीं परस्पराकरितां राम ह्मटलें पाहिजे ह्मणजे जीव दिला पाहिजे हा आपला परस्परांचा पवित्र धर्म आहे. या एकराष्ट्रीयत्वाच्या अत्यंत पवित्र तत्वाची ओळख 'रामराम' या शब्दानें पटाविली जाते. मुसलमान लोकांत फक्त मुसलमानालाच, '**सलाम वाले कौम**' 'वाले कौम सलाम' ह्मणजे आमच्याच शुद्ध रक्ताच्या धर्म बांधवा परमेश्वर तुझें कल्याण करो, असें परस्परास ह्मणतात. त्याचाही अर्थ असाच एक राष्ट्रीयत्वाचा, धर्मबांधवाचें नाते व बंधुप्रेम दर्शक आहे. तें खऱ्या बंधु प्रेमाचें नातें मुसलमान लोक स्वज्ञातींत ततोतंत पाळतात; ह्मणूनच प्रसंग पडल्यास एका मुसलमानाकरितां शेंकडों मुसलमान तुटून पडतात; व ह्मणूनच एक मुसलमान शंभर हिंदुंना दाबून आपलीच छाप त्यांच्यावर बसवूं शकतो. पण रामरामाचें खरें पवित्र नातें, हिंदु लोक पाळत नाहींत; ह्मणूनच आपसांतील दुहीमुळें ते आज सर्व दुनियेचे गुलाम बनले आहेत या करितां रामरामाचें पवित्र तत्व पाळा ह्मणजे तुमच्यांत कांहीं राम आहे असें स्वतः तुमच्या व जगाच्या अनुभवास येईल. रामाचें (आपल्या वडिलाचें) स्मारक या नात्यानें रामाचे पुत्र लव आणि कुश यांनीं प्रथम रामरामाची वहिवाट आर्य लोकांत सुरू केली. रामाचा प्यरा असा जो वज्रदेही, बाल ब्रह्मचारी, अजरामर वीर मारुती त्या मारुतीचे स्मारक करून अशा आणि खऱ्या वीराचें मूर्तिमंत चित्र सदैव डोळ्यापुढें रहावें व त्या वीरा सारखें वज्रदेही बनण्याचा लोकांनीं प्रयत्न करावा ह्मणून गांवोगांव मारुतीची स्थापना ग्रामदैवत या नात्यानें त्यांनींच सुरू केली; ह्मणूनच आज आसेतु हीमांचलांत—भारतवर्षांत प्रत्येक गांवीं मारुतीची स्थापना प्रथम करून नंतर गांव वसविण्याची वहिवाट हजारो वर्षांपासून चालूं आहे.

वर्मा:—हें क्षात्रियांचें सन्माननीय उपपद ह्मणजे पदवी आहे. वर्मा ह्मणजे शस्त्रास्त्र आणि कवच धारण करणारा शूर वीर. आश्रिताचें रक्षण करणारा शूर वीर क्षत्रिय.

शर्मा:—ह्मणजे पवित्र धर्म मंत्र ह्मणणारा भट्ट. वर्मा ही पदवी क्षात्रियांस, शर्मा ही पदवी विद्वान ब्राम्हणास आणि दास ही पदवी शूद्रास लावण्याची वहिवाट अद्यापि चालूं आहे.

मराठ्यांचें प्राचिनत्व.

१ मराठ्यांची पूर्वपीठिका २ मराठा क्षत्रियांत मोडणाऱ्या कांहीं जाती.

३ मराठा शब्दाची व्युत्पत्ति ४ मराठा शब्दाचें प्राचिनत्व.

५ वर्णदर्शक उपपदें ६ मराठे व जाट एकच आहेत.

७ नकली उर्फ नाटकी मराठे.

१ मराठ्यांची पूर्वपीठिका:—सुमारें ३००० वर्षांपूर्वी म्हणजे प्रमार उर्फ पवार कुळांत जन्मलेले कौरव पांडव यांच्यामधें झालेल्या सुप्रसिद्ध भारत युद्धांत लक्षावधी रणधुरंधर रथीमहारथी क्षत्रिय वीरांचा पवित्र रक्ताचा अभिषेक कुरुक्षेत्रावरच्या रणभूमीस करून व लाखो रणगाजींच्या शिरकमलांच्या अनंत पुष्पमालिका संग्राम भूमीस अर्पण करून तिला शांत केल्यानंतर ती प्रसन्न होऊन सत्यक्षाभिलाषी पांडवांस विजयश्रीनें माळ घातली. त्यानंतर पांडवांनीं अश्वमेध यज्ञ करून [illegible] खंडांतील अखिल राजा महाराजांकडून जयपत्र मिळवून करभार घेतला आणि भीमराजे हिंदुपदपादशहा या नात्यानें त्यांनीं व त्यांच्या वंशजांनीं शेकडों वर्षे [illegible] केलें. त्याचें वर्णन पांडवांचा दिग्विजय या प्रकरणांत दिलें आहे. सुमारें ४००-५०० वर्षांचा काळ पांडवांनंतर सुखासमाधानाचा व शांततेचा गेला. पांडवांच्या एका अमलांत ठिकठिकाणचे सर्व मांडलीक राजे पांडवांस व त्यांच्या वंशजांस कायमचे त्रस्त. पण कालांतरानें ते मांडलीक राजे शिरजोर होऊन आपापल्या गाया स्वतंत्र बळकावून बसले. पुनः स्वतंत्रतेची व श्रेष्ठत्वाची [illegible] लांस सुटली. वर्ष तो काय पिळी असा जबरदस्तीचा काळ पुनः सुरू झाला पांडवांनंतर सुमारें ४०० वर्षांनी म्हणजे इ स. पूर्वी सातवें शतकात आर्य क्षत्रियांत कुलश्रेष्ठत्व बद्दल आणि राष्ट्रीय वर्चस्व-बद्दल पुनः जोराचा वाद उपस्थित झाला. वरेच क्षत्रिय राजे हट्टास पेटले; स्वकीय स्वकीयांतच युद्ध जुंपलें भयंकर खडाजंगी उडूं लागली. अमर्याद रणकंदनें माजूं लागलीः ठिकठिकाणीं प्रलयाचे खच पडूं लागले; रक्ताच्या नद्या वाहिल्याः हजारों माणसें कापलीं गेलीं; अमोल मोहरें ईरेस पडलें. हजारों राजमंदिरें ढासळलीं; [illegible]

के. प्रभाकर पेंडसे गुरुजी, रा. ठाणें
यांचे [illegible] कार्यालय
ग्रंथालयास देणगी.

एकच कहर उसळला: ह्या प्रलय काळांत सांपडून दुर्दशा उडालेल्या कांहीं क्षत्रिय कुटुंबे उत्तर हिंदुस्थानास रामराम ठोकून दक्षिणेस नर्मदेच्या तिरीं वसण्याकरितां आली. इकडे आल्यानंतर आरंभी शेती वगैरे कृषिकर्मावर त्यांनीं आपला जम बसविला व पुढें स्वतःच्या अचाट बाहूबलावर स्वराज्य स्थापन केलें. ह्मणून ह्यांना ह्यांच्या अद्वितीय शौर्यावरून ' महारथी, मरहट्टे उर्फ मराठे ' ह्मणजे मरेपर्यंत मागें न हटणारे महान योद्धे असे वीरवाचक नांव प्राप्त झाले. अर्थात आर्य क्षत्रियांच्या कांहीं शाखा यावेळीं दक्षिणेंत येऊन प्रबल झाल्या, तेच मराठे होत. (प्रो. रमेशचंद्र दत्त यांचा प्राचीन हिंदुस्थानचा इतिहास पहा.)

Dr. Bhandarker's opinion published in Bombay Gazetteer by Sir J. Cambell K. C. I E. is as follows:—

One derivation which has the approval of Dr Bhandarker remains that MAHARASTRA is the Sanskritised form of Maratha vis. the Country of the MARATHAS or maharathies vis. the great Rathies a tribe which under the name of Rath or Rathies and its Sanskrit form Rastrakas or Rastrikas have at intervals ruled in the Bombay Presidency, Deccan and Karnatak, some centuries before the Christian Era. The word Maratha is derived from two Sanskrit words; Maha–great and Ratha or Rathi –a warrior and it means a great warrior.

या मराठा क्षत्रियांच्या अनेक उपनांवांच्या निरनिराळ्या शाखा दक्षिणेंत येऊन त्यापैकीं कोणत्या उपनांवांच्या घराण्याच्या क्षत्रियांनीं कोठें व कोणत्या शतकांत राज्यें " स्थापन केलीं. याचा अनेक शीलालेखांच्या व जुन्या नाण्यांच्या आधारानें मिळविलेली सप्रमाण माहिती ' दक्षिणेंत क्षात्रिय आर्यांचा प्रसार' 'वऱ्हाडांत आर्यांचीं

राज्ये' या भागांत व इतर भागांत विषयानुरोधानें दिलेंच आहे.

क्षत्रियांत मोडणाऱ्या जाती:—हल्लीं क्षत्रिय या नांवानें संबोधिले जाणारे निरनिराळ्या शाखांचे क्षत्रिय लोक जे आज कालमानानें भिन्नभिन्न जातींच्या नांवांनीं ओळखले जातात त्या बहुतेक क्षत्रिय जाती ह्मणजे हल्लींचे मराठे कुलवीज उर्फ कुळंबी, कूर्मी, ठाकूर उर्फ ठाकुरे, कायस्त, प्रभु, रजपूत उर्फ राजपूत, राठोड, राणे, खत्री, सहस्रार्जुन, भावसार, नाइक, मालव —माळी, गेइकवाड, भंडारी, वणजारी, भट्टी—भाटे लेवे-लवाणे लवंशी, कच्छवे उर्फ कडवे कुशवंशी; जाट, जडाईत, मारवन—(दक्षिणेतील रामनद व शिवगंगा येथील राजे मारवन जातीचेच आहेत.) कोच—कूच बिहारचे पोलीय —पलईत, गुरखे—गोरखे (नेपाळचे राजे) अहीर, नंद, गौळी-कोळी, शिंदी, वासार, धनगर, कुमावत, इत्यादि बहुतेक ब्राह्मणेतर जातीचे लोक ज्यांचे आचार विचार एकमेकांशीं जुळतात व ज्यांचा रोटी व्यवहार प्रांतपरत्वे थोडे फार होता व जे स्वतःस आज क्षत्रिय ह्मणवून घेऊन क्षत्रियांस योग्य अशा धर्मानें वागतात असे क्षत्रियांच्या आचार विचारांचे व मूळचे एकाच हाडामांसाचे सर्व लोक खऱ्या अस्सल आर्य क्षत्रियांचे वंशज आहेत यांत मुळींच संशय नाहीं. यापैकीं कांहीं उदाहरणाचे मुख्य वंश, गोटवंश, राजपुत्रांचीं नांवें, वंश उत्पत्तीचीं कारणें, आणि त्या राजघराण्यांचीं माहिती वंश कुळगोत्रांची माहिती वगैरे पुढें जातवार इतिहासाच्या भागांत दिली आहे.

मराठा या शब्दाची व्युत्पत्ति:—" मराठा " या शब्दाचे संस्कृत रूप " महाराष्ट्र " असें आहे. " महद्राष्ट्र " अर्थात् ज्यांचे राष्ट्र मोठें आहे ते मराठे असा अर्थ होतो. महाराष्ट्र, मरहट्टा, महारथ, महारथी ह्मणजे मराठा उर्फ राष्ट्रपति ह्या सर्व प्राचीन काळीं अतिशय शौर्यशाली, रणधुरंधर, क्षत्रिय राजविशेष पुरुषासाच लावीत असत. याला आधार रघुवंश सर्ग ६ मधील पुढील श्लोक आहे.

एकादश सहस्राणिं योद्धयेद्यस्तु धन्विनाम् ।
शस्त्रशास्त्र प्रविणश्च विज्ञयःस महारथः ॥

शब्दार्थः—शस्त्र शास्त्रांत ह्मणजे रणविद्येंत प्रवीण होऊन जो क्षत्रिय एकटा दहा हजार योध्या बरोबर लढू शकतो त्या रणधुरंधरासच महारथ अगर महारथी ह्मणतात. या संबंधानें सुप्रसिद्ध विद्वान संशोधक डॉक्टर रामकृष्ण गोपाल भांडारकर ह बॉंबे गॅझेटियरमध्यें लिहितातः—

"महारथ, महारथी, मरहट्टा आणि मराठा ह्या सर्व शब्दांचे संस्कृत रूप "महाराष्ट्र" असें झाले आहे; अर्थात "महाराष्ट्र" ह्मणजे मराठ्यांचा उर्फ मराठा देशांतील लोक होय.

डॉ भांडारकर यांनीं निर्विवादपणें असें सिद्ध केलें आहे कीं, ख्रिस्ती सनापूर्वी [illegible] ह्मणजे जवळ जवळ २५०० वर्षांपूर्वी आर्य लोक दक्षिण हिंदुस्थानांत राहूं लागले. या अनुमानाचा सगळ पुरावा त्यांनीं दिला आहे तो हा कीं, विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील देशासंबंधानें पाणिनी व्याहि पूर्वी कात्यायनानें आपल्या वार्तिकांत उल्लेख केलेला आहे. याहीपेक्षां जास्त निश्चित पुरावा ख्रिस्ती शकापूर्वीच्या तिसऱ्या शतकाच्या अशोक राजाच्या शीलालेखांवरून मिळतो. त्या लेखांत राष्ट्रिक व पैठनिक अशीं नांवें आढळतात. पैठण किंवा प्रतिष्ठान येथें राहणाऱ्या लोकांना पैठणिक अशी संज्ञा दिलेली आहे व ह्मणूनच मराठ्यांचे पूर्वज जे राष्ट्रिक त्यांचा उल्लेख रास्तिक या नांवानें आढळतो. अशोकाच्या शीलालेखांतून भोज लोकांचाही नामनिर्देश झालेला आहे. कुडे येथील शीलालेखांत महाभोजांचा उल्लेख आहे. यावरून असें अनुमान निघतें कीं, निरनिराळ्या राष्ट्रांत राहणाऱ्या राष्ट्रिक लोकांनीं स्वतःस समुच्चयानें महाराष्ट्रिक असें ह्मणून घेतलें त्यामुळें ते ज्या देशांत रहात होते त्याला अखेरीस महाराष्ट्र हें नांव पडलें. याप्रमाणें पतंजलीच्या पूर्वी शंभर वर्षे उत्तर व दक्षिण यामध्यें दळण वळण चालू होतें व महाराष्ट्र किंवा दख्खनमध्यें राष्ट्रिक महाराष्ट्रिक व भोज लोकांचें राज्यें होतीं. (भांडारकरकृत दक्षिणचा इंग्रजी इतिहास पान ११ पहा.)

हरिवंशांत असें सांगितलें आहे कीं, चार नागकन्यांपासून (नाग उपनांवाच्या क्षत्रिय राजकन्यांपासून) झालेल्या यदूच्या चार पुत्रांनीं सह्य द्रिपासून वेद न्याड्डारी पर्वत चार राज्यें स्थापिलीं. त्याचप्रमाणें विदर्भ देशाचे राजे राजर्षिवंशी असून ते यदूच्या कुळांत उतन आलेले आहेत, असा उल्लेखही

हरिवंश उर्फ यदुवंशांत सांपडतो यावरून हरिवंशाच्या हकीकतप्रमाणें महाराष्ट्र व वऱ्हाड प्रांतांत प्रामुख्यानें वसाहती करून राहणारे लोक चंद्रवंशी यादव उर्फ जाधव मराठे क्षात्रिय असून ते हिंदुस्थानांत आलेल्या आर्यांच्या दुसऱ्या टोळी पैकीं आर्यच होतें हरिवंश हें अर्ती प्राचीन पुराण असून त्याचा काळ ख्रिस्तीसनापूर्वी पहिलें शतक होय. यावरून डॉ. भांडारकर यांच्या वरील आधारास बळकटी येते आणि ख्रिस्ती सनापूर्वी सातव्या शतकापासून इ. स. तिसऱ्या शतकापर्यंत वऱ्हाड आणि महाराष्ट्रावर राष्ट्रे उर्फ महाराष्ट्रे आणि भोज यांचे राज्य होतें असें सिद्ध होतें पुढें हें अशोकाचे मांडलीक झाले. पण थोड्याच वर्षांनीं ते पुनः स्वतंत्र झालें व इ. सनाच्या सहाव्या शतकापर्यंत त्यांनीं राज्य केलें असें मालविकाग्नि मित्रावरून दिसून येतें. यावरून मुख्यतः सोमवंशी उर्फ चंद्रवंशी आणि सूर्यवंशी या दोन वंशाच्या आर्यापासून राष्ट्रे उर्फ महाराष्ट्रे उर्फ मराठे उत्पन्न झाले. ते आपणास सोमवंशी व सूर्यवंशी आर्य समजत असत असें त्यांच्या पूर्वपीठिकेवरून दिसते. देवगिरीच्या यादवांनीं ही पूर्वपीठिका आणि वंशावळ राखली आहे. ही पूर्वपीठिका पांचव्या शतकांतील शिलालेखामध्यें उपलब्ध असल्यामुळें ऐतिहासिक आहे यांत संशय नाहीं. ह्युएनसंग ह्मणतो "पुलकेशी राजा महाराष्ट्रांत राज्य करीत होता व तो जातीनें मराठा होता. प्राचीन चालुक्य राजें प्रमुखत्वानें मराठे असून त्यांच्या देशाला महाराष्ट्र ही संज्ञा होती. हल्लींसुद्धां त्यांच्या देशाला महाराष्ट्र देश असेंच नांव आहे."

वंशावळी व शहाण्णवकुळी:—नांवाच्या पोथींत व **क्षात्र वंश सागर** नांवाच्या ग्रंथांत चालुक्य व साळुंके हीं घराणीं सूर्यवंशी असल्याबद्दल उल्लेख आहे सहाव्या शतकापूर्वीच्या कदंबाच्या शिलालेखावरून (Ind. Ant. vol. p. 24) असें दिसतें कीं, कदंब आपल्याला मानव्य गोत्री मानून घेत असत.

आतापर्यंत आर्य क्षत्रियांचें दक्षिणेंत आगमन आणि **मराठा** या बहुमानार्थी वीरवाचक शब्दाची उत्पत्ति व महत्व याचे विवेचन केलें. आतां **मराठा** हा शब्द प्रचारांत कधीं आला या कालनिर्णयात्मक ऐतिहासिक मुद्याचा आपण विचार करूं.

मराठ्यांचें प्राचिनत्व:—भारत वर्षाच्या ज्या भागास " महाराष्ट्र " ही संज्ञा लाविली जाते त्याच भागास पुरातन काळीं दक्षिणापथ उर्फ दख्खन किंवा " जनस्थान " असें नामाभिधान होते. ह्या ' जनस्थानांत ' खर, दूषण, त्रिशिरा वगैरे नांवाचे राक्षसवृत्तीचे क्रूर कर्म करणारे दुष्ट लोक रहात असत असें रामायणांत वर्णन आहे. क्रूर कर्मानें वागणारांसच राक्षस, असुर, दानव दैत्य इत्यादि नांवांनीं रामायणांत संबोधिलें आहे. पण खरोखर ते आर्यांचे बंधुच होते. सुर, असुर, देव—दानव; कृष्ण—राक्षस ह्या बंधु बंधुच्या द्वैतदर्शक शाखा, वेद आणि रामायण या प्राचीन ग्रंथांतरी वर्णिल्या आहेत.

श्री वाल्मिकी रामायण अयोध्याकांड सर्ग ५ श्लोक ६ यांत राजा दशरथाला महाराष्ट्र विवर्धन म्हटलें आहे.

तांतु राजा दशरथो महाराष्ट्र विवर्धनः

यांत महाराष्ट्र विवर्धनः याचा अर्थ महाराष्ट्राचा वर्धन कर्ता असा आहे. प्रभु श्रीरामचंद्रानें १४ वर्षांचा वनवास भोगतांना महाराष्ट्रांतील नाशिक जवळचे दंडकारण्यांत बरेच दिवस वास्तव्य केलें होतें. ही रामायणांतील कथा सर्वश्रुत आहे. यावरून श्रीरामचंद्राचे काळीं दक्षिणेंत आर्य क्षत्रियांचा प्रवेश झाला होता ही गोष्ट सिद्ध होते. तसेंच महारथी म्हणजे मोठा योद्धा यावरूनच महारठ्ठा-मरहट्टा-मराठा म्हणजे राष्ट्रपती, अत्यंत शूर योद्धा, ही संज्ञा अत्यंत प्रखरतर क्षात्रतेज युक्त राजपुरुषानांच यथार्थ लागू पडते, आणि मराठ्यांचें जे राष्ट्र तें महाराष्ट्र असा त्याचा स्पष्ट अर्थ सिद्ध होतो. श्री रामाच्या काळीं महाराष्ट्रांत आणि वऱ्हाडांत मराठ्यांच्या निरनिराळ्या कुळांचे राजे राज्य करीत होते यावद्दल वऱ्हाडांत आर्य क्षत्रियांचा प्रसार या भागांत तपशीलवार वर्णन दिलें आहे

इ. स पूर्वी सहाव्या शतकांत म्हणजे आज सुमारें २५०० वर्षा पुर्वी जैन लोकांचा "कृतांगसूत्र" नावाचा ग्रंथ भद्रबाहू आचार्य यानें लिहीला. त्या ग्रंथांत "महाराष्ट्र" हा शब्द आढळतो, या कृतांगसूत्र ग्रंथाचें आधारानें "श्री प्रज्ञापना उपांगसूत्र" नामक ग्रंथ इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकांत म्हणजे आज २१०० वर्षांपूर्वी श्यामाचार्य यानें लिहिला. त्यांतही 'महाराष्ट्र' हा शब्द आला आहे. पश्चिम घाटांत कार्ल्याजवळ 'भाजे' या नांवाचें एक कोरीव लेणें आहे तेथील पाण्याच्या हादावर.

"महारथी साकोसिकी पुतसा। विष्णु दत्तसा देयाधमपोढी॥

म्हणजे कौशिकी पुत्र "**महारथी**" विष्णुदत्त यानें हें बांधलें. असें लिहिलें आहे. ह्या कोरीव लेण्याचा काळ इ. सनापूर्वी ३०० ते ३५० वर्षांचा आहे. मगध देशावर नंदाचें राज्य असतांना म्हणजे आज सुमारें २३०० वर्षांपूर्वी "वररूचि" नांवाचा एक विद्वान होऊन गेला त्यानें "प्राकृतप्रकाश" नांवाचें प्राकृत भाषेचें व्याकरण केलें. त्या व्याकरणाचें शेवटलें सूत्र "शेषं महाराष्ट्रीवत्" असें आहे.

अशोक राजाने धारगार येथील डोंगरांत कोरलेल्या एका आदेशांत "**महाराष्ट्र**" हा शब्द उपयोगांत आणला आहे. तसेंच नाना घाटांतील एका लेण्याच्या समोरच्या भिंतीवर मनुष्यांच्यामूर्ति कोरल्या आहेत. त्यावर '**महारथाग्रनी**" म्हणजे '**महशूर मराठा सेना नायक**' असे नांव कोरलें आहे. या लेण्याचा काळ इ. स. पूर्वी २०० वर्षे जाहे. या सर्व प्राचीन शिलालेखावरून आणि कोरीव लेण्यावरून पाहतां 'मराठा' 'महारथी' आणि 'महाराष्ट्र' हे शब्द २५००-२६०० वर्षांपूर्वी लोकांत प्रचलित होते म्हणजे त्यांची उत्पत्ति त्या काळाच्या पुष्कळच पूर्वीची आहे असें दिसून येतें.

कानडी भाषेंत मराठ्यांना ' आर्यर ' किंवा ' आरे ' म्हणण्याची फार जुन्दा काळापासून वहिवाट पडली आहे. ' **आर्यर म्हणजे आर्यांचा** ' असा त्याचा अर्थ होतो. ' आर्य ' या शब्दाचा अर्थ ' श्रेष्ठ ' असा आहे. अर्थात् आर्यर **मराठा** म्हणजे सर्व **श्रेष्ठ क्षत्रिय** ' असा कानडी भाषेतील ' आर्यर ' शब्दाचा निष्कर्ष निघतो. असाच एक सबळ पुरावा ग्रीक लोकांच्या इतिहासांत सांपडतो. ग्रीक लोकांचा प्रसिद्ध पुरुष ' टोलेमी ' याचे वेळीं तयार झालेल्या एका ग्रीक ग्रंथांत महाराष्ट्रास. म्हणजेच मराठ्यांच्या देशास **आर्यांके** (Ariake) म्हणजे **आर्यांचें राज्य** असें म्हटलें आहे.

प्रिंसिपाल नेशन्स ऑफ इंडिया (Principal Nations of India) या ग्रंथांत लिहिलें आहे कीं:—

मराठा ही दक्षिणेंतील वीर्यशाली मुख्य महत्वाची जात आहे त्यांनाच कुळंबी म्हणतात. यांच्या पैकीं जे शेतीचा धंदा करतात त्यांना कुळंबी म्हणतात व जे नोकरीचा धंदा करतात त्यांना व राजे महाराजे जाहागिरदार, देशमुख पाटील इ. पुढारलेल्या लोकांना मराठा म्हणतात पण दोघांचीही जात एकच. हे लोक आणि उत्तर हिंदुस्थानांतील राजपुत, क्षत्रिय लोक हे एकाच जातीचे आहेत. मुसलमानांचा अमल भारतवर्षांत सुरू होण्यापुर्वी या लोकांचे अंगांत जें क्षात्र तेज होतें व मध्यंतरी प्रतिकुल परिस्थितिनुरूप जें तेज झांकलें गेले होतें तेंच क्षात्रतेज श्रीशिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखालीं वेळ येतांच ज्या मराठा (कुळंबी) लोकांनीं एकदम प्रगट करून मरहट्टा हें आपल्या जातीचें परंपरेचे प्राचीन नांव यथार्थ करून दाखविलें त्याच जातीच्या लोकांना मरहट्टा उर्फ मराठा क्षत्रिय म्हणतात. श्रीशिवरायांचा जन्म किल्ल्यांत झाला, किल्ल्यांच्या कार्यांतच त्यांचा गौरव झाला आणि किल्ल्यांतच त्यांचें देहावसान झालें. खऱ्या क्षत्रियावाचून असे वीर्यशाली जीवन चरित्र इतरांस अशक्य आहे.

बॉंबे ग्याझेटियर व्हल्युम ९ भाग १ यांत म्हटलें आहे कीं कुळंबी यांची लोकसंख्या गुजराथप्रांतांत १४१०४२२ म्हणजे शेकडा १४·२६ आहे. त्यांच्यांत चार पोटभेद आहेत. त्यांना आंजन, कडवे उर्फ कडू लव उर्फ लेवे आणि मतिया असें म्हणतात. ते मोठ्या अभिमानानें स्वतःस क्षत्रिय म्हणवितात व त्याची वृत्तीही तशाच आहे-

मुंबई ग्याझेट १८८९ पृ. ५० यांत प्रसिद्ध झालें आहे कीं, श्रीरामचंद्रास दोन पुत्र होते. १ लव आणि दुसरा कुश. लवाचा वंश ते लेवे, लदगण, आणि कुशाच्या वंशांत उत्पन्न झालेले ते कुशवंशी, कच्छवे, कडवे, कडु.

बॉंबे ग्याझेटिअर कोल्हापूर भाग २४ यांत असें लिहिलें आहे कीं:—

मराठा जातीचे लोक सरळ, निष्कपट, स्वतंत्रवाण्याचे, उदार व सभ्य असतात. त्यांच्याशीं प्रेमानें वागणाराबर ते फार विश्वास ठेवतात. या जातीचे लोक चतुर

व साहसी असतात. कठिण प्रसंगी संग्राम आणि शांततेच्या काळीं शेती करणें हा आमचा पूर्वार्जित पेशा आहे असें ते मोठ्या अभिमानानें म्हणतात. श्रीमान मराठा आपल्या घरच्या लिहिण्याच्या कारकुनी कामाकरितां बहुत करून ब्राह्मणास नौकर ठेवितो त्याला दिवाणजी म्हणतात. राजाचा मुख्य कारभारी जसा दिवाण तसा श्रीमंत मराठ्यांचा मुख्य कारभारी दिवाणजी. दिवाणजी ठेवण्यांत ते मोठेपणा समजतात. पण हेच दिवाणजी आपल्या अन्नदात्या व आपणावर पूर्ण विश्वास ठेवणाऱ्या अशिक्षित धण्याला दिवाणे करून सोडतात. हा दिवाणजी स्वार्था साठीं मालकास धोका देतो आणि मालकाला दुर्व्यसनें लावून वेडकूट बनवितो; मालकाच्या इस्टेटीच्या बळावर स्वतः सावकार बनून व मालकास स्वतःचें कर्ज देऊन त्याला आपल्या चिमटींत दाबून धरतो. कोल्हापूर, ग्वालेर, बडोदा, धार, देवास, इ. संस्थानें क्षत्रिय मराठ्यांची आहेत.

याच ग्याझेटांत पुढें असें म्हटलें आहे कीं:—क्षत्रिय मराठ्याचा कोणी अपमान केला तर त्याचा मोबदला घेण्याकरितां खरा मराठा स्वतःचा प्राण देखील संकटांत घालतो; पण त्याला जो शरण येईल त्याचें तो रक्षण करितो.

सुप्रसिद्ध विद्वान प्रोफेसर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचा अभिप्राय बॉंबे ग्याझेटिअर मध्यें प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ते म्हणतातः—

मूळशब्द महारथ किंवा महारथी असा आहे. त्याचच संस्कृत रूप महाराष्ट्र असें झालें. महारथ किंवा महारथी याचा अर्थ मोठा योद्धा असा होतो. यावरून महाराष्ट्र म्हणजे महारथ्यांचा अर्थात मराठ्यांचा म्हणजे खऱ्या क्षत्रियांचा मुलुख असा अर्थ सुघड आहे.

महाराष्ट्र कुळवंशावली ग्रंथांत लिहिलें आहे कीं,:—

सर्वेषु एकवर्गाये कृष्यादि कर्म तत्परः ।
नमस्कारेण मंत्रेण पंचयज्ञाः सदैवहि ।
एषां ज्ञाति समुद्भातु कुलानीं षण्णवत्यपि ।
वंशाश्चत्वार एवात्र सूर्यैंदू यदु शेषकाः ।

भावार्थः— महाराष्ट्रीक महाराष्ट्रे उर्फ मराठे हा एक जातीवाचक वर्ण आहे. या जातीचे लोक शेतकऱ्यापासून राजा पर्यंतच्या सर्व कार्याला सदा तत्पर असतात. ते नमस्कारात्मक मंत्रानें पंचयज्ञ स्वतःच करितात. आपल्या वर्णाची विवाहादी सर्व कर्में ते स्वतः करितात. त्यांच्या जातींत ९६ कुळें आणि सूर्यवंश, चंद्रवंश, यदुवंश व शेष वंश असे चार वंश आहेत.

६ मराठे व जाट एकच आहेतः-मराठे, गुजर आणि जाट हे मूळचे आर्य वंशीय आहेत हें अगदी स्पष्ट असून कोणालाही तें नाकबूल करतां येण्यासारखें नाहीं. मझफरनगर ग्याझेटीअर आणि बॉंबे गॅझेटीअर यांत असें म्हटलें आहे कीं:—

"शरीर रचनेवरून जर कांहीं अनुमान काढतां येत असेल तर जाट आणि मराठे हे मूळचे आर्य वंशीय होत." त्यांचा वर्ण गौर, शरीराची काठी काटक आणि मस्तक व नाक लांब असल्यामुळें सरहर्बर्ट रिस्ले यानें सन १९०१ च्या खानेसुमारीच्या वृतांतांत ते आर्य आहेत असें कबूल केलें आहे.

वर्णदर्शक उपपदें:—निरनिराळ्या वर्णाच्या (जातीच्या) लोकांच्या नांवापुढें लावावयाची उपपदें पुढील श्लोकांत दिली आहेत.

। शर्मादेवश्च विप्रस्य वर्मा त्राताच भूभुजः ।
। भूतिर्दत्तश्च वैश्यस्य दासः शूद्रस्य कारयेत् ॥ १ ॥

मनुस्मृतिवरील कुल्लूकभट्टाची टिका अ, २ श्लो. ३.

भावार्थ:—ब्राह्मणाचे नांवापुढें शर्मा, क्षत्रियांचे नांवापुढें वर्मा म्हणजे रक्षणकर्ता वैश्याचें नांवापुढें भूति किंवा दत्त आणि शूद्राचें नांवापुढें दास अशी विशेषणात्मक उपपदें लावीत असत. हल्लीं देखील श्राद्ध, पक्षाच्यावेळीं पूर्वजांचें नांवांचा उच्चार करतांना हींच उपपदें लावतात.

स्मृती प्रमाणें सांगितलेलीं क्षत्रियांचीं मुख्य उपपदें वर्मन् व त्रातृ (वर्मांव त्राता) हीं होत, प्राचीन लेखावरून सेन, भट इत्यादी दुसरींही उपपदें असल्याचें दिसतें. वल्लभीचे राजे सेन व भट हीं उपपदें लावीत होते असें त्यांच्या लेखावरून दिसून येतें. अलीकडे मुसलमानी अमदानी नंतर विशेष प्रचारांत आलेलें सिंह हें उपपद सातव्या शतकांतील लेखांत क्वचित् आढळत नाहीं. तरी वल्लभी राजांच्या वंशावलींत द्रोणसिंह असें नांव आलेलें आहे

या सर्व विवेचनावरून "**मराठा**" या शब्दाचा तेरावी वर्षाचे 'प्राचीनत्व' कोणाचेही अंतःकरणांत बिंबल्याशिवाय राहणार नाहीं. पण मराठा हा क्षत्रियत्व बोधक वीरशाली शब्द फक्त तत्कालीन आर्यक्षत्रियांनाच लावण्यांत येत होता. क्षत्रियावलंबी म्हणजे क्षत्रियांवर अवलंबून राहणारा वीर्यहीन उपाध्याय वर्ग किंवा सेवाधर्मी मिश्रजात शूद्र उर्फ क्षुद्र वर्ण अशा निर्वीर्य लोकांना मराठा या वीरशाली शब्दानें मुळींच संबोधिलें जात नसे हा गोष्ट वरील एकंदर विवेचनावरून सिद्ध होते. सबब ही महत्वाची मुख्य गोष्ट विसरतां कामा नये. कोरकू, भिल्ल वगैरे रानावनांत राहणाऱ्या जंगली जाती म्हणजे महाराष्ट्रांतील मूळचे रहिवासी यांनाच मुख्यत्वेंकरून त्याकाळी शूद्र उर्फ क्षुद्र मानीत असत. त्यांच्या शिवाय ब्राह्मणेतर बहुतेक सर्व जाती क्षत्रिय आणि वैश्य वर्णात मोडत होत्या.

७ नक्कली मराठे:— वर दर्शविल्या प्रमाणें मराठा या शब्दांत वसत असलेल्या ऐतिहासिक श्रेष्ठत्वास आणि शौर्यशाली अर्थास मोहित होऊन कांहीं भिक्षुकीवृत्तीचे सेवाधर्मी ब्राम्हण लोक म्हणजे भट्टभिक्षुक हल्लीकडे स्वतःस मराठे म्हणवून घेऊं लागले आहेत. पण उपाध्याय उर्फ भिक्षुकी ब्राम्हण वर्ग वैदीक कालापासून

आज तागायत कधींहि क्षत्रियाप्रमाणें तरवार बहादर नव्हता व हल्लींहि नाहीं. अर्थात निर्वीर्य, परावलंबी व परोत्कर्षसहिष्णु आणि आपसांत दुही माजविण्या मेदनीति प्रवीण अशा भिक्षुकी ब्राह्मण वर्गास **मरहट्टा ह्मणजे मरेपर्यंत न हटणारा** या वीर्यशाली व क्षात्रियत्वबोधक नांवानें संबोधणें ह्मणजे इतिहास परंपरेवर धूळफेकून मराठा या श्रेष्ठतम शब्दाचा अर्थ विपर्यस्त करणे होय. मराठे या उपनांवाचे कांहीं कोकणस्थ ब्राह्मण आहेत. ते खऱ्या मराठ्यांचे दासीपुत्र तरी असावेत किंवा त्यांचे सेवक यात्नात्याने यजमानाचें नांव सन्मानार्थी त्यांनीं धारण केलेलें असावें.

महाराष्ट्रांत राहणारा तो मराठा, अशा मराठा या शब्दाचा दुसरा अर्थ करून त्या नात्यानें महाराष्ट्रांतील ब्राह्मण स्वतःस मराठा ह्मणविण्याचा हक्क सांगतात. हा अर्थ जर खरा मानला, तर मग महाराष्ट्रांत राहणारे मुसलमान, खिस्ती, यहुदी, पारशी इत्यादी लोकांना देखील मराठा ह्मणविण्याचा हक्क कां पोंचू नये? पण या लोकांचा समावेश मराठा या शब्दात होऊं शकत नाहीं. त्याच प्रमाणें महाराष्ट्रांत राहणाऱ्या ब्राह्मणांना देखील मराठा ह्मणवून घेण्याचा अधिकार मुळींच पोंचत नाहीं. मराठा ही एक इतिहास प्रसिद्ध क्षात्रकुलांची स्वतंत्र जात आहे. अर्थात मराठा हा क्षत्रियत्वबोधक वीर्यशाली शब्द दशरथ राजास प्राप्त लावण्यांत आला होता. यावरून मराठा या शब्दाचें प्राचिनत्व, श्रेष्ठत्व, वीर्यशालीत्व आणि क्षत्रियत्व ह्या गोष्टी सप्रमाण सिद्ध होत आहेत. मराठा हा शब्द प्राचीन ग्रंथांत ब्राह्मणास कोठेंही लावण्यांत आलेला दिसत नाहीं. क्षात्र वृत्तीच्या लोकांनांच प्राचीन काळापासून तो शब्द लावण्यांत आलेला आहे.

मराठेशाही स्थापन करण्याचे कामांत मराठेतर ब्राह्मणांनींही बहुमोल कामगिरी बजाविली आहे; आणि निमकहरामीपणानें कां होईना पण मराठ्यांची मराठेशाही मराठ्यांचेच मुख्यप्रधान असे जे पेशवे त्या पेशव्यांनीं कांहीं दिवस स्वतंत्रपणें [सातऱ्च्या छत्रपती महाराजांना मुलाबाळासुद्धां विश्वास घातानें कैदेंत ठेऊन] चालविली होती; ह्मणून मराठेशाही म्हणजेच पेशवाई असा विपर्यास रा. नरसिंह चिंतामण केळकर केसरी पत्राचे संपादक यांनीं केला असून पेशवाई बुडाली म्हणजेच मराठेशाही बुडाली असे दर्शविण्याचा प्रयत्न **मराठेशाहींचें शतसांवत्सरिकश्राद्ध** नांवाच्या त्यांनीं रचलेल्या पुस्तकांत केला आहे. पण शिवछत्रपतींच्या खास वारसाची मराठेशाहीची खास गादी कोल्हापुरास कायम आहे. ही गोष्ट केळकरांच्या ब्राम्हणी डोळ्यास दिसली नाहीं. यावरून त्यांच्या ब्राम्हणी हृदयाची परिक्षा होते.

याशिवाय खुलासा व शब्दमीमांसा याप्रकरणातील मराठा शब्दाचा अर्थ पहा.

मराठा साम्राज्यांतील थोरपुरुषांचें शिक्के.

१ **श्रीशिवाजी महाराज** हे १२ वर्षांचे होते. त्याच वयांत दादोजीकोंडदेव यांचे बिलकूल न ऐकता यांनीं आपलें नांवाचा शिक्का केला होता (इ. स. १६३९.)

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । शाहसूनोः शिवस्यैषा मुद्राभद्राय जायते ॥

२ श्री. संभाजी महाराजांची मुद्रा.

श्रीशंभोःशिवजातस्य मुद्राद्योरिव राजते । यदंकसे विनो लेखा वर्तते कस्यनोपरि ॥

३ श्री राजाराम महाराजांची मुद्रा.

धर्म प्रद्योतिता शेषवर्णा दाशरथे रिव । राजारामस्य मुद्रेयं विश्ववंद्या विराजते ॥

४ श्री शिवाजी महाराज दुसरे यांची मुद्रा.

प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । रामसूनोरियं मुद्रा शिवराजस्य राजते ॥

५ श्री. शाहूछत्रपती यांची मुद्रा.

वर्धिष्णुर्विक्रमोविष्णुः सामूर्तिरिव वामनी । शंभुसूनोरसौमुद्रा शिवराजस्य राजते ॥

६ श्री. रामराजाची मुद्रा.

गौरिशंभुवरं प्राप्य राज्य संम्राज्य संपदा । शिवसूनोरियंमुद्रा रामराजस्य राजते ॥

७ श्री. प्रतापसिंह महाराजांची मुद्रा.

गौरिनाथ वरप्राप्ता शाहुराजात्मनात्मनः । मुद्राप्रतापसिंहस्य भद्रासर्वत्र राजते ॥

८ श्री. संभाजी छत्रपती करवीरकर यांची मुद्रा.

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । शंभुछत्रपतेर्मुद्रा रामसूनोविराजते ॥

९ धनाजी जाधवांचा शिक्का.

राजाराम चरणी दृढभाव । सेनापती धनाजी जाधवराव ॥

१० श्रीशामराज निळकंठ पेशवे.

श्रीशिवनरपति हर्ष निधान । शामराज मतिमंत प्रधान ५

११ श्री. मोरे त्रिंबक पिंगळे.

इ. स. १६७२ श्रीशिवचरणी तत्पर । त्र्यंबकसुत मोरेश्वर.

इ. स. १६७६ श्रीशिवराजेंद्र हर्ष निधान । त्र्यंबकसुत मोरेश्वर मुख्य प्रधान.

इ. स. १६८० एवाश्री शिवराजेंद्र मुख्य मात्यस्य सत्यधृक ।

मुद्रा मोरेश्वरस्यास्तांभद्रा सद्रांग दायिनी॥

१२ श्री निळकंठ मोरेश्वर पिंगळे यांची मुद्रा.

इ. स. १६८३ श्रीशिवनरपति हर्ष निधान । मोरेश्वरसुत निळकंठ मुख्य प्रधान ॥

इ. स. १६८५ श्रीशंभु भजनोत्कंठ । मोरेश्वरसुत निलकंठ ॥

१३ श्रीभैरव मोरेश्वर पिंगळे यांची मुद्रा.

श्रीशाहू नरपति हर्ष निधान । मोरेश्वरसुत भैरव मुख्य प्रधान ॥

१४ श्री. रतनसिंह जाधवराव मालेगांवकर यांचा शिक्का.

श्रीशंभो रमर सिंहस्य सुवर्ण पदपंकजम् । यादवस्यकुलोत्तो रत्नासिंहो विराजते ॥

८ श्रीशिवी महाराजांनी मराठा सरदारांस दिलेले किताब

१ निंबाळकर—सरलष्कर. २ नागपूरचे भोसले—सेनासाहेब सुभा.

३ राम्हाडे—सेना धुरंधर. ४ आठोळे—समशेर बहादूर.

५ देवासचे पवार–विश्वासराव. ६ थोरात–दिनकरराव.
७ महादजी नाईक–पाणसंबळ. ८ शिंदे–समशेर बहादर.
९ धनाजीजाधव–जयसिंगराव. १० संताजी घोरपडे–हिंदुराव–ममलकतमदार.
११ अमीर उलउमराव. १२ मदार उल्मुल्क.
१३ सलाबत जंग बहादुर. १४ फतेजंग. १५ सरफन्उल्मुल्क.

चार वर्णांत क्षत्रियांचे श्रेष्ठत्व.

१ चार वर्णांत पहिला वर्ण क्षत्रियांचा आहे.
२ ब्राह्मणवर्ण क्षत्रियापासून निर्माण झाला.
३ चार वर्णांची उत्पत्ति.
४ मूळचे आर्य क्षत्रिय होते: भट्टीभिक्षुक नव्हते.

चातुर्वर्णांत पहिला वर्ण क्षत्रियांचा आहे:— क्षतात् त्रायते इति क्षत्रः ' म्हणजे ' क्षतापासून अर्थात संकटापासून मानवी जीवितव्याचें संरक्षण करणारा तो क्षत्रिय ' असें रघुवंशाचे द्वितीय सर्गांत स्पष्ट झटलें आहे. ' आपली, आपल्या कुटुंबाची, आपल्या समाजाची, आपल्या देशबांधवांची आणि जन्मदात्र्या मातृभूमीची भरभराट व्हावी अशी ज्यांचे अंतःकरणास जिव्हाळ्याची तळमळ लागलेली असून मातृभूमीकरितां स्वतःचे रक्ताचा सडा शिंपडण्यास जे सदा तत्पर, स्वदेशाकडे वक्र दृष्टीनें पाहणाऱ्या अपराधाचे नरडीचा घोट घेऊन त्याना कृतकर्माचा जबाब देण्यास यमसदनी पाठविण्याला जे समर्थ असतात, आपल्या जन्म भूमातेचे संरक्षण करण्याइतका ज्यांचे मनगटांत जोर असतो, तेच लोकाग्रणी, राष्ट्रशास्ते होतात आणि इतर सर्व लोक त्यांचे आज्ञेत राहतात. अशा प्रकारें **मानवी प्राण्यांमध्यें ज्यांच्याकडे पहिल्यानें श्रेष्ठपद आलें तोच क्षत्रिय वर्ग होय.** पूर्वी सर्व मानव प्राणी एकाच वर्गांत मोडले जात होते, पण पुढें जसजशी सृष्टी वृद्धिगत होत गेली तसतशा मानवी गरजा वाढूं लागल्या. त्या सर्व गरजांत मुख्यतः **जीवित्व संरक्षणार्थ पहिल्या प्रथम शास्त्यांची अवश्यकता तीव्रतेनें भासूं लागली. यामुळें इहलोकांतील मानवी जीवित्व परपीडेपासून व परचक्रापासून निर्भय ठेवण्याची जोखीम शिरीं घेणारा क्षत्रिय वर्ग प्रथम निर्माण झाला.** " अगोदर पोटोबा नंतर विठोबा या साध्या म्हणी प्रमाणें इहलोकांतील जीवित्व सुसंरक्षीत ठेवण्याची व्यवस्था अगोदर झाल्याशिवाय परलोकांतील सद्गतीच्या गप्पा सुचणें शक्य नाहीं. हा

सृष्टीचा आद्य नियम आहे. अर्थात शत्रूशी झुंज देण्याकरितां दंड ठोकून उभे ठाकणारे 'क्षत्रियत्व' प्रथम निर्माण झाल्यावर क्षत्रियाच्या आश्रयाखालीं निर्भय होऊन ब्रह्मज्ञानाच्या बाता बोलणारे 'ब्राम्हणत्व' क्षत्रियत्वानंतर जन्मास आलें. हें कोणीही समंजस मनुष्य आंजलमणें कबूल करील. यावरून पाहतां चातुर्वर्णापैकीं प्रथमतः क्षत्रिय वर्ग निर्माण झाला व त्या क्षत्रिय वर्गांतूनच पुढें ब्राह्मण वर्गास जन्म मिळाला हें निर्विवाद आहे. यासंबंधानें श्रुतिवचन स्पष्ट म्हणते कीं:—

तच्छ्रेयो रूपमत्यसृजत क्षत्रम् यान्येतानि देवत्रा क्षत्राणीन्द्रो वरुणः सोमो रुद्रः पर्जन्यो यमो मृत्युरीशान इति । तस्मात् क्षत्रात् परं नास्ति । तस्माद् ब्राह्मणः क्षत्रियादधस्ता दुपास्ते राजसूये ।

बृहदारण्यक ब्राम्हण. १४-४-२-२६

आणि बृहदारण्यक कोपनिषद १ । ४ । ११

भावार्थ:—या जगांत पहिल्यानें ईश्वरस्वरूप एवढेंच होतें त्यानें पुढें इंद्र, वरुण, सोम, रुद्र, पर्जन्य, यम, मृत्यु आणि ईशान या अष्टदेवतांचे अंशानंसून उत्तम प्रकारचा क्षत्रिय निर्माण केला. यास्तव या जगांत क्षत्रियाहून श्रेष्ठ कांही नाहीं आणि याच कारणास्तव राजसूय यज्ञाचे वेळीं ब्राम्हण क्षत्रियांचे खालीं बसतात. म्हणजे राजसूय यज्ञांत पहिल्या प्रतीचा मान क्षत्रियांनाच असतो:

ब्राह्मणाः संश्रिताः क्षत्रं न क्षत्रं ब्राह्मणाश्रितं ।
श्रिता ब्रह्मो पथात्रिघ्रा खादंते क्षत्रियान् भुवि ।
क्षत्रियेष्वाश्रिता धर्म प्रजानामु पतिपालनम् ।
क्षत्राद्धि सत्रं ब्राह्मणानां तैः कथंब्राह्मणोवरः ।

कार्तवीर्य उपाख्यान १५१—१७—१८

भावार्थ:—ब्राम्हण क्षत्रियांचे आश्रित आहेत पण क्षत्रिय ब्राह्मणावर अवलंबून मुळींच नाहींत. क्षत्रियांवर ब्राह्मण चरतात अर्थात् क्षत्रियच श्रेष्ठ होत. धर्माचें परिपालन व प्रजेचें रक्षण क्षत्रियामुळेंच होतें असें असतां ब्राह्मण श्रेष्ठ कसे होतील?

नग्नाक वृत्तः पुराविद्या ब्राह्मणान् गच्छति ।
तस्मादे सर्वेषु लोकेषु क्षत्रस्यैव प्रशासन मभूत ।

छांदोग्य उपनिषद.

भावार्थ:—प्रवाहणजैबालीजवळ जेव्हां गौतम मुनी आला तेव्हां प्रवाहण म्हणाला:—गौतमा, ब्रह्मविद्येचा संस्कार सुरुवातीपूर्वी इतर कोणत्याहि ब्राह्मणाला झालेला नाहीं. तुला तरी ब्रह्मविद्या क्षत्रियापासूनच मिळाली आहे. ती क्षत्रियामुळेंच अस्तित्वांत आली अर्थात् ब्रम्हविद्येच्या दृष्टीनेंहि क्षत्रियच ब्रम्हणापेक्षां श्रेष्ठ आहेत.

चार वर्णांची उत्पत्ति

ब्रम्हांड पुराणांत खालील आधार सांपडतो:—

ब्रह्मास्वयं भूर्भगवान् दृष्ट्वा सिद्धिन्तु कर्मजाम् ।
ततः प्रभृति चौषध्य काष्टःपश्चात्तु जज्ञिरे ॥१॥
संसिद्धायांतुवार्तायां ततस्तासां स्वयंभुवः ।
मर्यादास्थापयामास यथा रब्धाः परस्परम् ॥२॥
येवै परिगृहितारस्ता सामासन्बली यसः ।
इतरेषांकृत त्राणान् स्थापया मास क्षत्रियान् ॥३॥
उपतिष्ठतिये तान्वै या सन्तो निर्मला स्तथा ।
सत्यब्रह्म यथाभूतं ध्रुवंतो ब्राह्मणाश्च ते ॥४॥
येचान्यल्पबलास्तेषां वैश्य श्चंकर्म संस्थिताः ।
किनाशा नाशयंतस्म पृथिव्यां प्रागतं हिताः ॥५॥
वैश्यानेवं तु तानाहुः की नाशान् वृत्ति साधकान् ।
शोचं तश्च द्रवंतश्च परिचर्यासु ये रताः ॥६॥
निस्तेन स्वोल्पवर्यो श्च शूद्रास्तान नवित्तुसः ।
तेषां कर्माणि धर्माश्च ब्रह्मातु व्यदधात् प्रभुः ॥७॥
संस्थितौ प्राकृतायांतु चातुर्वर्ण्यस्य सर्वशाः ।
म्हांड पुराण अ. ७ । १५७ । १५८.

भावार्थः-ब्रह्मदेवानें कर्मापासून उत्पन्न होणारी सिद्धि पाहून, अर्थात् अन्न, औषधी वगैरे सृष्टि प्रथम निर्माण करून नंतर प्राणिगण सृष्टि (मानव सृष्टि) निर्माण केली. त्यानंतर त्या सज्जन प्रजा समूहाची अव्यवस्था होऊन जेव्हां त्यांच्यांत अस्वस्थता उत्पन्न होऊं लागली तेव्हां त्याची सुव्यवस्था लाऊन त्यांच्यांत सुख, समाधान व शांति राखण्याकरितां त्यांच्या अंगच्या गुणकर्मप्रमाणें चार वर्णांची स्थापना धर्म, कर्म आणि मर्यादा यास अनुसरून केली ती अशीः-

त्यांच्यापैकीं जे अत्यंत उदार, थोर अंतःकरणाचे, दानशूर आणि सर्वांत बलवान व बुद्धिवान असून बहुजन समाजाचें रक्षण करण्यास सर्वतोपरी योग्य होते त्यांना श्रेष्ठतम समजून क्षत्रिय ही संज्ञा दिली. म्हणजे सर्वांत श्रेष्ठ वर्ण त्यांचा केला. सर्व भूतांचेठायीं एकच सत्य परब्रह्म वास करीत आहे, मानवी प्राण्यांत धार्मिक व सामाजिक दृष्ट्या कांहीं भेदभाव नाहीं, अशा पवित्र भावनेत ज्यांनीं आपलें आयुष्य घालविण्याचें पसंत केलें आणि जे क्षत्रियांचे आश्रित होऊन राहिले त्यांना ब्राह्मण ही द्वितीय श्रेणीची संज्ञा दिली. त्यांच्यापैकीं जे बलानें कमी होते व जे शेती आणि गोरक्षणाचा धंदा करून व पृथ्वीपर्यटन करून व्यापार धंदा करीत असत त्यांना वैश्य ही संज्ञा दिली आणि जें दुःख शोक परायण तेजहीन, अल्पवीर्य असें असल्यामुळें कोणत्याही बौद्धिक कार्यांत ज्यांची गती पोचुं शकत नव्हती अशा निर्बुद्ध लोकांस शूद्र म्हणजे क्षुद्र, बुद्धिहीन, दास, ही संज्ञा दिली. अशी वर्णव्यवस्था सृष्टी उत्पन्न केल्यानंत

कराच काळ लोटल्यावर सृष्टीच्या व्यवस्थेकरितां करून दिली. पण हे चारही वर्णाचे लोक मूळचे एकच आर्य वर्णाचे होते. त्यांच्यांत मूळची वर्णव्यवस्था नव्हती.

छांदोग्योपनिषदात म्हटलें आहे कीं;—

बलं वाव विज्ञानाद्भूयोऽपि ह्यसं विज्ञानखतारमको ।
बलवानाकयंत्र स यदा बली भवत्यथोत्थाता ।
भवत्युत्तिष्ठन्परिचरिता भवति परिचरन्नुपसत्ता ।
भवत्युपसद्यद्रष्टा भवति श्रोता भवति मंन्ता भवति बोद्धा ।
भवति कर्ता भवति विज्ञाता ॥
भवति बलेन वै पृथिवी तिष्ठति ''बलं उपास्व ॥

छांदोग्योपनिषद् ७-८

भावार्थः—उशाच्या योगानें चारही वेद, सहाही शास्त्रें, आणि जगांतील यथावत वस्तूंचें ज्ञान होऊं शकों अशा विज्ञानापेक्षांही कांहीं श्रेष्ठ आहे काय?" अस नारदानें सनत्कुमारास प्रश्न केला असता, 'बल हें विज्ञानापेक्षां हा श्रेष्ठ होय, एकटा बलवान मनुष्य शेंकडों विज्ञानी माणसांस कामून काढूं शकतो, मनुष्याच्या अंगांत जर बल असेल तरच तो नाना प्रकारचा ज्ञानवाढी अगर चळवळी करूं शकेल ,लोक सेवा करूं शकेल, परिस्थितीचें यथार्थ ज्ञान करूं शकेल, नाना प्रकारच्या गोष्टी श्रवण करूं शकेल, जाणूं शकेल, आणि नंतर कांहीं तरी कार्य करूं शकेल, त्यालाच सर्व विज्ञान प्राप्त होईल बलावरच पृथ्वी व जगांतील यच्चावत पदार्थ अवलंबून आहेत. तेव्हां नारदा बल संपादन कर! बलाचीच उपासना कर." क्षत्रिय सर्व प्रकारें सर्वांति बलवान आहेत म्हणून ते सर्वांत श्रेष्ठ आहेत.

ब्राह्मण क्षत्रियापासून निर्माण झाले.

ब्रह्मा-विष्णु-महेश याना हिंदुधर्म शास्त्रांत अनुक्रमे सृष्टीचे उत्पादक, संरक्षक व संहारक मानतात. त्यापैकीं विष्णुला सृष्टीचा संरक्षक म्हणून क्षत्रिय मानतात. इं आणि विष्णु हे भाऊ भाऊ होते याच कारणामुळे क्षत्रिय लोक आपल्या यज्ञोपवीताला ब्रह्म गांठ न बांधतां विष्णु गांठ (बाणासारखी लांब गाठ) बांधतात. ब्रह्मा सृष्टीचा उत्पन्न कर्ता आहे असें मानतात. पण त्याची उत्पत्ति विष्णु या क्षत्रिय देवतेच्या नाभी कमलापासून झालेली आहे, असें धर्मशास्त्र सांगतें. यावरूनही ब्राह्मणांची उत्पत्ती क्षत्रिया पासूनच झाल्याचें दिसून येतें, यच्चयावत ब्राह्मण अत्यंत आदर पूर्वक ज्यांच्या पायावर लोटांगण घालून नाक घासतात ते प्रभु श्रीरामचंद्र प्रभुश्रीकृष्ण, गौतमबुद्ध, स्वामी विवेकानंद विष्णु, शंकर शिवाजी महाराज इ. थोरविभूती हेही क्षत्रियच होते. ब्राह्मण नव्हते हे ही येथें विचारांत घेतलें पाहिजे.

परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम ।
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगयुगे ॥ १ ॥ भगवद्गीता.

भावार्थ—श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत असें म्हटलें आहे कीं सज्जनांना तारण्याकरितां, दुर्जनांना मारण्याकरितां व धर्माची प्राणप्रतिष्ठा करण्याकरितां म्हणजे मृतवत् झालेल्या हिंदुधर्माचें पुनर्जीवन करण्याकरितां योग्यवेळीं मी अवतार धारण करीत असतों.

आजपर्यंत झालेले एकंदर सर्व अवतार क्षत्रिय वंशांतच झाले व त्यांनीं क्षात्रधर्मानें व क्षात्र तेजानेंच आपलें अवतार कार्य पूर्ण केलें. अठरा वर्णांचा राजा धर्म-संस्थापक, धर्म संरक्षक व धर्म संवर्धक हे अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे धार्मिक व राजकीय शास्तेपणाचे अधिकार सृष्टीच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत क्षत्रियांनींच उपभोगिलें आहेत व हल्लीं देखील क्षत्रियच उपभोगित आहेत. प्रभु श्रीशिवरायांनीं सतराव्या शतकांत अवतार घेऊन वरील गीतावचन प्रमाणें तंतोतंत आपलें अवतार कार्य पूर्ण केलें. शिवरायांचें [illegible] अवतार कार्य प्रभु श्रीरामचंद्रांच्या अवतार कार्याशीं तंतोतंत जुळते. यावरून क्षत्रिय [illegible] भूषण प्रभु शिवराय हे प्रभु श्रीरामचंद्राचा, कलियुगातील दहावा कलंकी अवतारच [illegible] खात्री पटते. कारण भविष्य पुराणांत सांगितलेले कलंकी अवताराचें चारित्र्य आणि श्रीरामचंद्राचें चारित्र्य श्रीशिवरायाच्या चरित्राशीं अगदी तंतोतंत मिळते आहे. प्रत्येक पंचांगांत संवत्सरफल वर्णन केलेलें असतें. त्यांत कलीयुगाची वर्षगणना आणि त्यांत झालेले अवतार यांचेही वर्णन दिलेलें असतें. पंचांगांत कलियुगांतील सहाव्या अवताराचें वर्णन खालील प्रमाणें लिहिलें आहे:—

षष्ठः करवीर पत्तने कर्नाटके कल्क्यवतार
तस्य शकः ८२१ एवं षट् ६ शककर्तारः

करवीर म्हणजे कोल्हापुरास कलियुगांतील सहावा कल्की उर्फ कलंकी अवतार होईल. त्याचा शक ८२१ वर्षे चालेल.

'अठरा वर्णके राजा' म्हणजे अठरावर्णांत श्रेष्ठ ही श्रेष्ठतम पदवी फक्त क्षत्रियांनांच आहे. सर्वांत आद्य असा जो ऋग्वेद तो बहुतांशीं क्षत्रियांनींच रचला आहे. याचे पुरावे वेद या प्रकरणांत स्पष्ट दिले आहेत ते पहा.

एका ऋग्वेदापासूनच बाकीचे तीन वेद निर्माण झाले. या गोष्टीचे स्पष्ट पुरावे वेदांतच आहेत. त्याच प्रमाणें विष्णुस्वरूपी एका क्षत्रिय राजपुरुषा पासूनच बाकीचे तीन वर्ण गुणकर्मांवरून निर्माण झाले ही गोष्ट पुराणांत सांगितली आहे. वेदांत चातुर्वर्ण्याचें नांवाचा पत्ता सुद्धांच नाहीं. यावरून वेदकाळीं आर्य क्षत्रिय हा एकच वर्ण असून त्याला आर्य म्हणत असत. आर्य म्हणजे श्रेष्ठ. क्षात्रिय, ब्राम्हण, वैश्य व शूद्र हे बाकीचे तीन वर्ण गुणकर्माप्रमाणें क्षत्रिय वर्णांतूनच भारतकाळीं म्हणजे श्रीकृष्णाचे वेळेपासून निर्माण झाले, ही गोष्ट निर्विवाद आहे.

मूळचे आर्य क्षत्रिय होते. महाभिक्षुक नव्हते:—

मूळचे आर्य ब्राह्मण होते असे हल्लींचे ब्राह्मण लोक ह्मणतात; पण हें ह्मणणें प्रथम दर्शनीच खोटें व निराधार असल्याचें दिसून येतें. कारण मध्यएशियांतून आर्य लोकांची एक टोळी सुमारे पांच हजार वर्षांपूर्वे आर्यावर्तांत आली आणि यानीं इकडच्या मूळच्या रहिवाशांशीं लढाया करून त्यांचीं राज्यें काबीज केलीं; अरण्यें व जंगलें तोडून आणि शेती करून नवीन वसाहती वसविल्या आणि त्यांची इकडच्या मुलखांत चांगली सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनीं श्रीराम अवतार काळीं ह्मणजे विश्वामित्राच्या काळीं वेद रचण्यास सुरुवात केली. सर्वांत आद्य असा जो ऋग्वेद त्या ऋग्वेदाचा प्रारंभीचा बराच भाग आणि सर्व वेदांचें सार म्हणजे ज्याला श्रीकृष्णानें "गायत्रिछंदसामहम,, ह्मणजे सर्व वेदांचें सार असा जो गायत्रिमंत्र तो मी आहे "असें ह्मटलें आहे तो गायत्रीमंत्र म्हणजे ज्या मंत्राच्या पुरश्चरणानें वसिष्ठास ब्राम्हणत्व प्राप्त झालें व हल्लींही ज्या मंत्रानेंच शूद्राचा ब्राम्हण मौंजीचे वेळीं होतो तो अत्यंत पवित्र गायत्रि मंत्र देखील विश्वामित्र क्षत्रिय राजऋषीनेंच रचला आहे. असे वेदांत व उपनिषदें आधार आहेत. यावरून हिंदुस्थानांत प्रथम जे आर्य आले व ज्यांनीं आपल्या शस्त्रास्त्रांच्या व बुद्धिबलाच्या सामर्थ्यावर हिंदुस्थानच्या मूळच्या राजांना जिंकून आपली सत्ता तेथें प्रस्थापित केली,ते मूळचे आर्य पोथी पुराणांच्या ब्रम्हज्ञानानें किंवा कथा कीर्तनाच्या प्रवचनानें किंवा पंचांगाच्या व ज्योतिष्याच्या भुलथापानें लोकांना भुरळ पाडून त्यांना जिंकणारे पेकट ब्राह्मण नसून शस्त्रास्त्रांत प्रवीण आणि मनगटाच्यां व बुद्धिबळाच्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर कार्य करणारे क्षत्रियच असले पाहिजेत. कारण ब्राम्हणांच्या पंचांगाच्या किंवा पळींपंचपात्रांच्या जोरावर राज्यें कमाविणें किंवा दुसऱ्यांचीं राज्यें काबीज करून आपली सत्ता प्रस्थापित करणें हीं क्षात्रवृत्तीचीं कामें होणें शक्यच नव्हतें व हल्लीही शक्य नाहीं. कपटानें मात्र केणाचाही विश्वासघात सहज करता येतो. तसे कपटी ब्राह्मण पुर्वीही होते व हल्लीं ही भले खानदानी कपटी व विश्वासघातकी ब्राह्मण आहेत.

आर्यांच्या प्रारंभकाळीं क्षात्रतेजाच्याच बळावर आर्यांनीं राज्यें कमाविलीं व वाढविलीं. त्यानंतर वैदिक काळीं ब्राह्मणवृत्तीचे नरम लोक गरम क्षत्रियांचे आश्रयानें आपले आयुष्य कंठीत असत व पदोपदीं क्षत्रियाश्रयासांचून त्यांचें नडत असें असें वेदांत शेकडो पुरावे आहेत. वेद मुख्यतः क्षत्रियांनींच रचले. याबद्दलचें पुरावे याच ग्रंथांत वेद या प्रकरणांत दिलेच आहेत. उपनिषदें रचण्याचा व तीं ब्राम्हणांस शिकविण्याचा मुख्य मान जनक राजाकडे आहे. भारतकाळीं भगवद्गीता नांवाचा धर्मग्रंथ श्रीकृष्णानें रचून तो प्रथम अर्जुनास उपदेशिला आज गीता लोकमान्य आहे. श्रीकृष्ण क्षत्रियच होते. त्यानंतर बौद्धधर्म गौतमबुद्ध नांवाच्या क्षत्रिय राजपुत्रानेंच रचला, संस्थापिला, संवर्धिला व संरक्षिला, जैनधर्माचा संस्थापक महावीर हा क्षत्रियच होता. आजच्या हिंदुधर्माचे संस्थापक, संरक्षक व संवर्धक पंवार, चालुक्य व चव्हाण हे क्षत्रिय राजेच होते.

अग्निहोत्राचे व यज्ञाचे तीन अग्नि पहिल्यानेंच गंधर्वापासून कोणी आणले ? व यज्ञाचा पद्धत अर्थ ह्मणविणाऱ्या क्षत्रियामध्यें प्रथम कोणी घातले ? तर पुरुरवा राजानें; अग्निहोत्राचा धर्मार्थ पहिल्यानेंच याज्ञवल्क्य ऋषीस कोणी शिकविला ? तर जनकराजानें; उत्तरायणांत मरणापासून सद्गती मिळते इत्यादि रहस्यें ब्राह्मणास पहिल्यानें कोणी शिकविलीं ? तर प्रवाहित राजानें. भक्तिवेड मूळचे कोणाचें ? तर राजर्षींचें; ब्रह्मर्षींच नव्हे. ज्या सावित्रि मंत्रानें रत्नें व मुलें प्राप्त्यास ब्राह्मणत्व येतें तो गायत्रि मंत्र कोणी केला ? तर विश्वामित्र क्षत्रिय राजऋषीनें; सारांश असा अत्यंत महत्वाचा धार्मिक ऐवज जो क्षत्रियांनीं आपल्या बाहुबलानें व बुद्धिबलानें स्वतः गोळा केला होता, तो शिष्यत्व स्वीकारलेल्या भिक्षुक ब्राह्मणांच्या पदरीं मोकळया मनानें व निरपेक्ष बुद्धीनें क्षत्रियांनीं उदारधी यजमानाच्या नात्यानें टाकला, त्यांत पूर्वीच्या क्षत्रियांचा खरा थोरपणा; आणि क्षत्रियांच्या खालचा आपला खरा दर्जा कबूल करून क्षत्रियांचा थोरपणा विनतकरार कबूल केला, त्यांत पूर्वीच्या ब्राह्मणांचा खरा ब्राह्मणपणा. आतांचें नामधारी ब्राह्मण जर भट्टभिक्षुक-भिकारवृत्तीचे ब्राह्मण ह्या खऱ्या गोष्टीसुद्धा कबूल न करीतील तर हा त्यांचा कृपणपणा होय ! आजकालच्या कृपणांनीं क्षत्रियांना जरी वैश्य शूद्रांच्या पंक्तींत नेऊन बसविण्याचा व्यर्थ प्रयत्न केला तरी जे खरे ब्राह्मण होते त्यांनीं मात्र आपली मूळची खालची पायरी आणि क्षत्रियांची मूळची वरची पायरी ह्या दोन्ही गोष्टी मोकळया मनानें मूळ ग्रंथांत नोंदून ठेवल्या आहेत. सबब त्या बद्दल आतां ज्यास्त लक्षपोह करण्याचें कारणच उरलें नाहीं.

राक्षस आणि वानर.

राक्षसः—राक्षस हा शब्द पुराणांत वाचतांक्षणीं तो एक भयंकर मनुष्य देहधारी पण बळिष्ठ व विद्रुप असा प्राणी होता अशी कल्पना येते. रामायणांत राक्षसांच्या उत्पत्ति संबंधानें कथाभाग आहे. त्या वरून इतकेंच सिद्ध होतें कीं मूलतः राक्षस हेच लोक रक्षक व लोकपालक होते. याविषयीं पुढीलप्रमाणें उल्लेख आहे.

रक्षाम इतियैरुक्तं राक्षसांस्ते भवंतुवः ।
यक्षाम इति यैरुक्तं यक्षाएव भवंतुवः ॥१३॥

वा. रामायण उ० ४

वेदकाळीं ज्यांना असुर ही संज्ञा देण्यांत आली त्यांनाच रामायण कालीं व नंतर राक्षस असें नांव देण्यांत आलें. मूलतः राक्षस किंवा असुर हे एकच. रामायणांत [illegible]ांच्या उत्पत्तिसंबंधानें जें वर वर्णन दिलें आहे त्याचा आशय कसा आहे.

" प्राचीनकाळीं प्रजापतीनें प्रजा उत्पन्न केली तेव्हां प्रजाजनांनीं " आह्मी काय

करावें." असा प्रश्न केला. प्रजापतीनें त्यांना "रक्षण करा" असें सांगितलें. त्यावर कित्येकांनीं 'रक्षामः' म्हणजे आम्ही रक्षण करतों असें उत्तर दिलें आणि कित्येकांनीं यक्षामः असें उ लें त्यांची गणना यक्षांत-उपदेवतांत म्हणजे क्षात्रतेजहीन अशा सात्विक लोकांत करण्य आली. रक्षामः असें ज्यांनीं म्हटलें त्यांना राक्षस अशी संज्ञा प्राप्त पतीनें दिली. रून दिसून येतें कीं जनतेचें रक्षण करण्याचें काम वीर्यशाली क्षत्रि- स्कडे होतें. व एकाच कुळांत राक्षस आणि यक्ष हे उत्पन्न झाले. उदाहरणार्थ रावणाचा सख्खा बंधु कुबेर हा 'यक्ष' होता. बिभीषण हाही रावणाचा बंधु पण त्याला राक्षस म्हणत नसत. अमरकोशांत राक्षस म्हणजे पूर्व देवा। असा उल्लेख सांपडतो.

राक्षसः कौणपः क्रव्यात्क्रव्या दोऽथ आशरः ॥५९॥
रात्रिंचरो रात्रिचरः कर्बुरो निकषात्मजः ।
यातुधानः पुण्यजनो नैर्ऋतो यातुरक्षसौ ॥६०॥

यावरून अर्थ दिसतें कीं राक्षसास पूर्वी देव म्हणत असत. हे रात्रीच्या वेळीं पहारा करून प्रजाजनांचे रक्षण करीत असत. सबब त्यांना पुण्यजन अशी ही संज्ञा देण्यांत आलेली आहे. मनुस्मृतींत त्यांचीं लक्षणें दिलीं आहेत तीं देखील त्यांच्या देवत्वाची साक्ष पटवितात.

अक्रोधनः शौचपराः सततं ब्रह्मचारिणः ।
न्यस्तशस्त्रा महाभागाः पितरः पूर्व देवसाः ॥

क्रोध न करणारे, स्वच्छतेनें वागणारे, सतत ब्रम्हचर्य धारण करणारे, शस्त्रानें कधीं प्रतिकार न करणारे महा भाग्यवान रक्षक (पितरः) असे जे तेच राक्षस म्हणजे पूर्व देव होत. हेच राक्षस काळे करून नीति भ्रष्ट झाले म्हणून राक्षस हा शब्द गौण वृत्तीचा द्योतक झाला.

सध्या उपलब्ध असलेल्या सर्व जुन्या ग्रंथांचें बारकाईनें परिक्षण केल्यास असें स्पष्ट दिसून येतें कीं या दक्षिणेकडे आलेल्या आर्यांच्या शाखेंत दोन पक्ष होते. ते देव आणि दानव या नांवांनीं पुराणांत व रामायण महाभारतांत प्रसिद्ध आहेत. त्यांच्या संबंधाचा इतिहास असा आहे कीं:—

वैवस्वत मन्वंतरांतील ब्रम्हापुत्र मरिचिऋषी यास प्रचेतस दक्षानें आपल्या तेरा कन्या विवाह करून दिल्या होत्या. त्यांचीं नावें अदिति, दिति, दनु, दनायु, सिंहिका, वगैरे होतीं. या प्रत्येकीची संतति नांवावरून प्रसिद्धीस आली उदाहरणार्थ अदितीचे पुत्र आदितेय किंवा आदित्य; दितीचे पुत्र दैत्य; दनुचे पुत्र दानव वगैरे.

कश्यप ऋषीच्या कुळांत हिरण्य कश्यपूचा पुत्र प्रल्हाद हा महान विष्णु भक्त व प्रल्हादाचा पुत्र बळीराजा हे उदारधी होऊन गेले. कश्यप हा मंत्रद्रष्टा ऋषी होता. कश्यपाच्या वंशांत जसे ऋषी जन्मास आले तसेच दुष्ट व नीच मनोवृत्तीचे पुरुषहि निर्माण झाले. विष्णु व इंद्र हे अदितीचे पुत्र भाऊ भाऊ होते असे रामायण व महाभा

रत व पुराणें यांत सांगितलें आहे. कश्यपाच्या इतर स्त्रियांच्या पोटीं अत्यंत दुष्ट मनोवृत्तीचे पुरुष जन्मास आले. त्यांपैकीं दितीचा पुत्र हिरण्यकशपू [दैत्य] हा होय दनुचा पुत्र केतु (दानव) दनायुचा पुत्र वृत्र, सिंहिकेचा पुत्र राहू हे विशेष प्रसिद्ध आहेत. कालेंकरून दैत्य व दानव हे शब्द समानार्थी योजण्यांत येऊं लागून त्या त्या लोकांच्या अद्वितीय पराक्रमामुळें सात्विक वृत्तीच्या प्रशांत लोकांना त्यांचें तेज बऱ्यांची धडाडी दुःसह झाल्यामुळें त्यांनीं त्यांचा निर्देश राक्षस या क्रौर्य दर्शक व निंदाव्यंजक नांवानें केला. पण यज्ञ वगैरे न करतां निराकार निर्गुण परमेश्वराची उपासना करणारे ते आर्यांचे अत्यंत पराक्रमी भाऊबंदच असावेत असें दिसतें.

या दोन्ही संततींत दीर्घ कालापर्यंत भांडणें चालली होतीं. देव आणि दैत्य यांचा स्वभाव परस्परांच्या अगदीं विरुद्ध असल्यामुळें त्यांचे पटेना. देव हे यज्ञयागादिक करून सोम नांवाच्या सुरेनें आपल्या इष्ट देवतांचें पूजन करीत व स्वतः तेही सुरापान करीत. दैत्य व दानव यांना यज्ञयागादिकांचा तिटकारा असून ते सुर ग्रहण करीत नसत; देव आणि दैत्य या दोघांनीं मिळून समुद्रमंथन केलें. अशी कथा पुराणांत आहे. समुद्रमंथन करून काढलेल्या चवदा रत्नांपैकीं सुरा हें एक रत्न आहे असें देव मानीत तें सुरा रत्न देवांनीं घेतलें. व म्हणून ते आवडीनें तिचा स्वीकार करीत असत. म्हणून सुरा [दारू] ग्रहण करणारे ते सुर-देव; किंवा अदितीचे वंशज ते सुर या नांवानें प्रसिद्ध झाले. ज्यांनीं सुराग्रहण केली नाहीं असें जे दितीचे वंशज म्हणजे दैत्य ते असुर या नांवानें संबोधिले गेले. यासंबंधानें रामायणांत पुढील श्लोक आढळतोः—

सुरा प्रतिग्रहाद्देवाः सुरा इत्यभिविश्रुताः
अप्रति ग्रहणात्तस्या दैतेयाश्चासुरास्तथा ॥

म्हणजे सुरेचा प्रतिग्रह केल्यामुळें देवास सुर हें नांव पडलें व सुरेचा प्रतिग्रह न केल्यावरून दैत्यास असुर असें नांव पडलें पण खरोखर हे दोघेही सख्ये आदितीचे व दितीचें पुत्र वधू वधूच होत.

बलुचिस्तानच वहूच लोक, रोहिले आणि काबूल व पेशावर यांच्या मध्यभागीं असलेल्या याकिस्तान नांवाच्या दर्गम व दुर्गम डोंगराळ प्रदेशांतील जंगली याकुती लोक राक्षसा प्रमाणेंच फार धिप्पाड बांध्याचे हल्लीदेखील आहेत. ते काबूल व इंग्रज या दोन्ही सरकारास जुमानत नाहींत. पेशावरप्रांतांत दिवसा दरवडे घालून एक एक मनुष्य १००-१०० माणसांना गाही लाही करून सोडतो. इकडील मनुष्यांना व स्त्रियांना वाघाप्रमाणें पकडून नेऊन अमुक इतके हजार रुपये आणून द्याल तर त्यांना सोडूं, नाहीं तर फाशीवरून चिरून टाकूं असे निरोप देतात. ते रुपये न मिळाल्यास राक्षसा प्रमाणेंच दोघांपाय धरून एकाझटक्यानें उभे चिरून टाकतात किंवा त्यांचे हाल हाल करून मारतात. वाटेल तें कच्चेमांस भक्षण करतात. हे लोक आजकालचे राक्षस नव्हत तर कोण आहेत ? असेच वज्रदेशी पुर्वीचे अरण्यवासी भयंकर लोक होते. पण त्यांची अगडबंब

चित्रे पोथ्यापुराणांत रेखाटलीं आहेत तसें मानवी रूप नव्हते. मात्र फार विद्वान व क्रूरकर्मी होते. रावण कुंभकर्णांचें वर्णन अतिशयोक्तीनें केलेलें आहे. रावण हा क्रूरकर्मी ब्राम्हण होता. पण त्याला १० तोंडें नव्हतीं त्यानें वेदांचीं १० खंडें केली म्हणून त्याला १० तोंडें लाविलीं आहेत.

वानर:—हनुमान, वाली, सुग्रीव, नल, नील, अंगद यांनी प्रगट केलेले विद्वत्ताप्रचुर उदात्त विचार, त्यांचीं वीर्यशाली अचाट कृत्यें त्यांचे ग्रामोच्चाराचे सात्विक व तात्विक भाषण व सुनीतीचे उत्तम व इमानी वर्तन, यांचा विचार केला असतां वानर हे तात्विक वृत्तीचे आर्याप्रमाणें सत्पथगामी लोक होते असें दिसतें. बहुधा हे हिंदुस्थानांतील मूळचे रहिवासी असावेत. ज्याप्रमाणें अमेरिकेंतील मूळचे रहिवासी (रेड इंडियन्स) हल्लीं देखील पशुपक्षाप्रमाणें कपडे धारण करतात. त्याचप्रमाणे वानर लोकांत वानराप्रमाणें, आस्वलाप्रमाणें व पक्ष्यांप्रमाणें पोषाख करण्याची चाल होती असें दिसतें. जटायु हा सूर्यवंशांतील रामाचा पूर्वज होता. तो पक्ष्याप्रमाणें पिसे व पंख लावून घेत असे त्यामुळेंच त्याला पक्षी म्हटले असावें. अंगदानें रावणाच्या सभेंत जाऊन जी उत्तम प्रकारची शिष्टाई केली त्यावरून त्याला वानर कोण म्हणेल ? तसेंच रामाचा जन्म ज्या पिंडांतून झाला त्याच पिंडांतून निर्माण झालेल्या मारुतीला देखील वानर कोण म्हणेल ? हे सर्व वानर नसून नर म्हणजे पराक्रमी पुरुष होते. याचा पुरावा रामायणांतच आहे तो असा:— नर वा नर-मनुष्य अथवा वीरपुरुष (नर—मनुष्य; वा—अथवा; नर—वीर पुरुष.) जेव्हां रामानें लंकेस वेढा दिला तेव्हां त्यानें सर्व वानर सेनेस आज्ञा दिली कीं, त्यानीं नर—मनुष्य रूपानें न लढतां वानर—मर्कट रूपानें लढावें. असें रामायणांत वर्णिलें आहे; असतु.

मिशनरी रेव्हरंड ब्रूम यांनी आफ्रिकेंतील अरण्यमय प्रदेशाचे वर्णन वर्तमान पत्रांत नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्यांत ते म्हणतात " आफ्रिकेंतील अरण्यांत कांहीं रानटी लोक राहतात. त्यांची उंची चार फुटाहून अधिक नसते. त्यांची मुखचर्या थेट माकडाप्रमाणें असून सर्वांगावर केस असतात. झाडावर चढण्यांत ते वानराप्रमाणें चपळ व फार कुशल असतात. धनुष्यबाण व भाला हीं त्यांचीं हत्यारें आहेत. ते आपली उपजीविका शिकारीवर करतात. कोणी तिऱ्हाईत मनुष्याजवळ आलेला पाहतांच हे लोक वानराप्रमाणें उड्या मारीत पळतात व दाट झाडींत जाऊन दडून बसतात. लोकांशीं व्यापार करण्याची त्यांची तऱ्हा फार विलक्षण आहे. शिकारीशिवाय दुसरा उपजीविकेचा मार्ग त्यांना समजत नाहीं. म्हणून शिकार करून आणलेले सावज आपल्या झोपाडीच्या दाराशीं ठेवून ते दूर बसतात आणि त्याबदल मोबदला मिळण्याची वाट पहात राहतात. त्याच्या बदलीचा योग्य पदार्थ तेथें ठेवून तें सावज कोणी नेल्यास त्याला ते हरकत करीत नाहींत. मात्र त्यांना त्यांत फसविण्याची सोय नाहीं.

कारण खांचाजवळ विषारी बाण आणि धनुष्य हीं नेहमीं सज्ज असतात. जर कोणीं त्यांना फसविलें तर त्यांचा ते या हत्यारांनीं कडेला उडवितात. त्यांची भाषा अप्रगल्भ व आपली भाषा त्यांना समजत नाहीं. ते दुसऱ्यास सहसा फसवीत नाहींत असे हल्लींचे लोक हल्लीं आफ्रिका खंडांतील अरण्यांत आहेत."

आपले हिंदुस्थानांतील पहाडी दाट झाडींच्या अरण्यमय प्रदेशांत कांहीं रानटी लोक राहतात. त्यांची ही राहणी जवळ जवळ जनावरांप्रमाणेंच असते व त्यांच्यातही कांहीं शूरवीर असून ते आपल्या अद्भुत सामर्थ्यानें दुसऱ्या लोकांना कधीं कधीं थक्क करून सोडतात. उदाहरणार्थः-मेळघाटच्या सातपुड्या पर्वतांतील तंट्या उर्फ तात्याभील हा असाच विलक्षण मनुष्य होता. त्यानें सरकारी पोलीस व फौजी लोकांना अनेक प्रसंगीं आपल्या अचाट सामर्थ्यानें थक्क करून सोडल्याबद्दल व कित्येकांचे बळी घेऊन कित्येकांचीं नाकें कापल्याबद्दलच्या गोष्टी प्रसिद्ध आहेत. क्षणार्धांत गुप्त होऊन व [illegible] प्रगट होऊन मोठमोठ्या नामांकित बहादुरांची त्यानें [illegible] त्याला विश्वासघातानें पकडण्यांत आले आणि [illegible] मनून मनून मिलाय-च्या लोकांना दाखविण्या-करितां इ. स. इंग्रजांनीं त्याला फांशी दिली. अशी गोष्ट इ. स. १८८० च्या सुमारास घडली.

हल्लींचा मनुष्यप्राणी मूळचा वानरप्रमाणे होता यांत कालांतरानें सुधारणा होतां होतां आजचा सुधारलेला मनुष्य बनला आहे. अशी युरोपिअन तत्व वेत्यांची कल्पना ग्रंथांतरीं प्रसिद्ध आहे.

यावरून पाहतां श्रीरामचंद्राच्या काळीं भयंकर दुर्गम अरण्यांत हल्लींच्या आफ्रिकेच्या अरण्यांतील वानरतुल्य मनुष्यांप्रमाणेच वानर जातीचे लोक रहात असावेत; ते वानर म्हणजे पशु नसून नर म्हणजे बहादुर अद्वितीय पराक्रमी लोक आणि तेही बहुधा हिंदुस्थानांतील मूळचे रहिवासी लोक म्हणजे आर्य लोकांचे शत्रु पक्षाचे लोक असावेत म्हणूनच त्यांची बरोबर आर्यांशीं तुलना करून देखील असावेत. अगदी रानटी लोकांतही शहाणे लोक असतात त्याप्रमाणेंच नल, नील, अंगद, सुग्रीव, वाली, माहती इत्यादि वानर हे त्यांच्यापेक्षां शहाणे व नामांकित वीर पुरुष असावेत असें वाटतें.



वर्णव्यवस्था.

१ आर्यावर्तांत आर्यांचा प्रवेश.
२ आर्य लोकांत वर्णभेद नव्हता.
३ श्रीरामचंद्राचे काळीं वर्णभेद नव्हता.
४ श्रीकृष्णकाळीं जन्मावरून वर्णभेद नव्हता.
५ बुद्धकाळीं वर्णभेद नव्हता.
६ अशोकाच्या काळीं जन्मावरून वर्णभेद नव्हता.
७ हल्लींच्या वर्णव्यवस्थेचा प्रारंभ.
८ हल्लींच्या भिक्षुकी हिंदुधर्माचा जन्म.
९ शूद्र शब्दाची व्युत्पत्ति.
१० चार वर्णांत रोटी बेटी व्यवहार चालू होता.
११ व्रात्य म्हणजे काय ?
१२ मौज न करणाऱ्या ब्राम्हण जाती.



१ आर्यावर्तांत आर्यांचा प्रवेशः—सुमारें पांच सहा हजार वर्षांपूर्वी क्षात्रिय पेशाचे वीर्यशाली आर्य लोक उत्तर ध्रुवापासून मध्यएशियांत उतरून नंतर खैबर घाटांतून हिंदुस्थानांत उतरले. त्यांची एक टोळी ग्रीस वगैरे युरोपखंडांतील देशांत जाऊन राहिली. त्यांचे वंशज युरोपियन आहेत. दुसरी टोळी इराण एशिआटिक टर्की, आरबस्तान वगैरे गरमाकडे वळली. त्यांचे वंशज मूळचा धर्म बदलून हल्ली मुसलमान झाले आहेत ते. पारशी लोक हे इराणांतील आर्यांचे वंशज आहेत. तिसरी फार मोठी टोळी हिमालयाचे उत्तर भागांत असलेल्या काबूल, कंदाहार, तिबेट, चीन वगैरे भागांत पसरली आणि हिमालयाचे खैबर घाटांतून दक्षिणेस येऊन सिंधु नदीचे आसपास पंजाबांत स्थिर झाली. त्यांना प्रथम आर्य म्हणजे श्रेष्ठ हें नांव असल्यामुळें त्यांच्या वसतीस्थानाला आर्यावर्त हें नांव पडलें. त्यांचा मूळचा एकच आर्य वर्ण व धर्म आर्य ही एकच जात आणि आर्य हा एकच धर्म होता. भारतवर्षांत उतरलेल्या या पहिल्या टोळीला सूर्यवंशी क्षत्रिय म्हणतात. कांहीं काळानंतर दुसरी आर्यांची टोळी हिमालयाचे दक्षिणेस खैबर घाटांतून व गंगा नदीच्या खोऱ्यांतून उतरली. त्यांची वस्ती गंगा, यमुना, सरस्वती, ब्रम्हपुत्रा इत्यादि नद्यांच्या आसपास झाली पण तेही आर्य जातीचे, आर्य धर्मीच होते. ही दुसरी टोळी चंद्रवंशी आर्य क्षत्रियांची होती. सुमारें पांच हजार वर्षांच्या पूर्वी म्हणजे श्रीरामचंद्राचे कालपर्यंत त्यांनीं उत्तर हिंदुस्थानचा बराच भाग काबीज करून आणि आर्यांच्या पूर्वी हिंदुस्थानांत राहणाऱ्या

आलेल्या द्राविड लोकांशीं व इकडच्या मूळच्या कृष्णवर्णी रहिवाश्यांशीं लढून त्यांना त्यांनीं जिंकले व आर्यांचीं राज्यें ठिकठिकाणीं स्थापन केलीं. राज्य स्थापनेची घडी साधारण बसल्यानंतर त्यांनीं ईश्वर स्तुतिपर स्तोत्रें गावून यज्ञयागादी धर्मकार्यें सुरू केलीं. त्या मंत्रास सूक्तें ह्मणतात. त्या काळीं लिहिण्याची कला अवगत नव्हती. ह्मणून अशीं सूक्तें तोंडपाठ करूनच त्यांचा संग्रह करण्यांत येत असे. अशा संग्रहास संहिता असे ह्मणत असत. प्रथम सर्व संहितांचा एकच वेद होता. त्यास ऋग्वेद ह्मणत असत. ऋग्वेदाचा बहुतक भाग क्षत्रिय राजऋषींनीं रचलेला आहे. क्षात्रतेजहीन अशा सौम्य वृत्तीच्या ब्राह्मण, वैश्य व शूद्र वृत्तींच्या ऋषींनींही कांहीं थोडीं सूक्तें रचिलीं आहेत. त्यांचें नांवनिशाणासहित सविस्तर वर्णन वेद या प्रकरणांत निराळें दिलें आहे.

२ आर्य लोकांत वर्णभेद नव्हता:—मूळचे आर्य लोक हे सूर्यवंशी व चंद्रवंशी लढवय्ये क्षत्रिय लोक होते; त्यांच्यात वर्णभेद मुळींच नव्हता. वर्ण म्हणजे मनुष्याच्या शरीराचा रंग. अमुक मनुष्य गोऱ्या वर्णाचा किंवा काळ्या वर्णाचा किंवा सावळ्या वर्णाचा आहे असें म्हणण्याची चाल अद्यापी आहे. मनुष्याच्या शरीराच्या रंगास वर्ण आणि इतर वस्तूंच्या रंगास रंग असें म्हणतात. जसें कोळशाचा रंग काळा, हळदीचा रंग पिवळा. सारांश वस्तूंच्या रंगास रंग आणि मनुष्याच्या रंगास वर्ण असें म्हणण्याची रीत आर्यांच्या वेळीं होती व हलींही आहे मूळचे आर्य लोक वीर्यशाली क्षात्र वृत्तीचे विप्लाड पुरुष असून त्यांच्या अंगांत सणसणणाऱ्या जाज्वल्य गरम रक्तामुळें ते अर्थातच रक्तवर्णाचे म्हणजे लालसर गौर वर्णाचे होते. त्यांच्यापेक्षां जे नरम वृत्तीचे म्हणजेच सात्विक वृत्तीचे सावलींत राहणारे निस्तेज लोक होते म्हणजे ज्यांच्या रक्तांत गरम तेज नव्हते असे निस्तेज लोक सृष्टि नियमानुसार साहजिकच फिक्या वर्णाचे होते. त्यांच्याकडून मर्दुमकीची कामें होऊं शकत नव्हतीं; म्हणून ते घरीं बसून किंवा एकांतांत राहून शांत वृत्तीनें क्षत्रियांच्या आश्रयानें आपला कालक्षेप करीत असत. अशा निस्तेज गोऱ्या फिक्कट वर्णाचा ब्राह्मण वर्ण होय. स्वपराक्रमानें देशपर्यटन व शेतीभाती उद्योग व्यापार करून धनसंचय करणारा व सुखसंपत्तीचा सुखोपभोग घेऊन ऐषआराम भोगणारा वर्ग अर्थातच सुखोपभोगामुळें गोऱ्या पिवळसर वर्णाचा वर्ग म्हणजे वैश्य वर्ण होय. हे तिन्ही वर्ण गौरवर्णाचेच असत; पण रक्त गौर, श्वेत गौर आणि पीत गौर असे साधारण फरक त्यांच्या वर्णांत (रंगात) असणें साहजिक होते. पण त्यांच्यांत भिन्न जात किंवा रोटी व्यवहाराचा भेद किंवा वर्णभेद म्हणजे जातीभेद मुळींच नव्हता. चवथा प्रकार जिंकलेल्या साधारण कृष्णवर्णाच्या किंवा सावळ्या वर्णाच्या द्राविड व मूळच्या रहिवाशांचा. हे लोक आर्यापेक्षां साधारण सावळ्या वर्णाचे असत. ह्मणून त्यांना कृष्णवर्णी ह्मणजे काळ्या वर्णाचे ह्मणत. हल्लींचे राज्यकर्ते रक्तवर्णी गोरे लोक आणि हिंदुस्थानचे हिंदी लोक, या दोहोंच्या गोरेपणांत फरक आहे. ह्मणून युरोपियनास गोरे लोक व इंडियनास काळे लोक असे ह्मणण्याची रीत आहे. जिंकलेल्या लोकांस आर्य

लोक दस्यु म्हणजे दास म्हणत असत. आजचे हिंदी लोक (जित) जेत्या इंग्रजी लोकांच दस्यु म्हणजे दास उर्फ सेवकच मानले जातात. तद्वतच आर्यकालीन दस्यु म्हणजे इंद्राचे (आर्यांच्या राजाचे) शत्रु या अर्थानें वेदांत दस्यु या शब्दाचा प्रयोग अनेक ठिकाणीं सांपडतो. यावरून वर्ण म्हणजे अंगाचा रंग असा अर्थ स्पष्ट होतो. या चारही वर्णांच्या लोकांत रोटी आणि बेटी व्यवहार राजरोसपणे होत असे. त्यामुळें कालांतरानें हाडा-मांसानें व रक्तानें आर्य आणि अनार्य लोक अगदी एक जीव झाले. हल्लींचे सर्व हिंदी लोक आर्यांच्या निर्भेळ शुद्ध रक्ताचे नसून आर्य आणि अनार्यांच्या मिश्रणाचे आहेत. यांत तिळमात्र संशय नाहीं.

हल्लींचे राज्यकर्ते गौरवर्णी युरोपियन लोक आणि काळे लोक यांच्या परस्पर मिश्रणानें झालेले युरेशियन, व त्यांच्यांत पुनः गरिबी व श्रीमंतीमुळें झालेले सर्वांचें पूर्ण मिश्रण व गरिबी श्रीमंती स्थितीमुळेंच भारतांत थोडासा भेदभाव हें उदाहरण मूळचे आर्य आणि दस्यू म्हणजे जेते आणि जित यांच्या मुळच्या वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण करण्यास चांगलें लागू पडतें.

३ श्रीरामचंद्राच्या काळीं वर्णभेद नव्हता:—अंगाच्या रंगाप्रमाणें रक्तवर्णी, श्वेतवर्णी, पीतवर्णी आणि कृष्णवर्णी असे वर्ण हल्लीं प्रचलित असलेल्या काळा-गोरा या भेदाप्रमाणें प्रथम सहज बोलण्यांत येऊं लागले पण काळा-गोरा हा जसा आज हिंदी लोकांत वर्णभेद मानण्यांत येत नाहीं त्याप्रमाणें आज ५००० वर्षांपूर्वीच्या श्रीरामचंद्राच्या काळींही असा भेदभाव मानण्यांत येत नसे. वडिलांचाच धंदा बहुत करून पुढील पिढी करूं लागते पण कधीं कधीं नवीन पिढी अगदीच नवीन धंदा करूं लागते. त्याप्रमाणें क्षात्रवृत्ती, सात्विकवृत्ती, वैश्यवृत्ती आणि दस्युवृत्ती अशा अंगच्या वृत्ती प्रमाणें म्हणजे गुणाप्रमाणें व कर्माप्रमाणें वर्ण भेदाचे म्हणजे रंगभेदाचे रुपांतर पुढें गुणकर्मानुसार चार भेदांत झालें. आणि त्यामुळें कालांतरानें गुणकर्मावरून चार वर्ण मानण्यांत येऊं लागले; पण ह्याकाळीं देखील हल्लीं सारखा तीव्र वर्णभेद मुळींच नव्हता. ज्याच्या अंगी जो गुण विशेष असेल त्या विशेष गुणाप्रमाणें त्यानें आपला चरित्रक्रम चालवावा अशी वहिवाट होती. त्यामुळें एकाच कुटुंबांत बाप क्षात्रवृत्तीचा, तर त्याचा दुसरा मुलगा सात्विक ब्राह्मण वृत्तीचा, तिसरा व्यापारी किंवा शेतकरी बनून वैश्य वृत्तीचा व चवथा निर्बुद्ध म्हणून शूद्र वृत्तीचा. आई शूद्र वृत्तीची तर मुलगी वृद्ध वृत्तीची आणि सून क्षात्र वृत्तीची. या प्रमाणें निरनिराळ्या वर्त्तांचीं व निरनिराळ्या गुणकर्मांचीं माणसें व स्त्रिया एकाच कुटुंबात आनंदानें व गुण्यागोविंदानें राहून सर्वच आपणास आर्य म्हणवीत असत. आर्य या जातीवाचक नांवाशिवाय दुसऱ्या नांवाची छाया त्या काळीं नव्हती. त्या काळीं वर्णभेद तर मुळींच नव्हता मग जातीभेद कोठून असणार? हे आर्य स्वतःस आर्य म्हणत व जिंकलेल्या लोकांस अनार्य उर्फ दस्यु-दास असें म्हणत. आर्य आणि दस्यु हे दोन शब्द ऋग्वेद

दांत सांपडतात. शंबुक नांवाच्या एका किरातानें म्हणजे कोळी जातीच्या शूद्रानें तप-श्चर्या केल्यामुळें एका ब्राह्मणाचा अल्पवयी मुलगा त्या पापानें मरण पावला. तेव्हां श्रीरामचंद्रानें त्या किरातची तपश्चर्या भंगवून त्याला त्याच्या धर्मबाह्य वर्तनाबद्दल देहांत प्रायश्चित्त दिलें आणि नंतर ब्राह्मणांच्या मेघसत्रांत तोच म्हणजे शिंत कर-ण्यांत आला अशी एक भाकडकथा बाकीकडच्या भट्टेभटुकांनी रामायणांत घुसडून दिली आहे त्यांचा त्यांत हेतु स्पष्ट दिसतो तो हाच कीं, श्रीरामचंद्राच्या काळीं जाती-भेद होता. शूद्राला तपश्चर्या करण्याचा अधिकार नव्हता, आणि ब्राह्मणाच्या मंत्रांत संजिवनीचे अत्यंत तेजस्वी सामर्थ्य होतें, अर्थात त्या काळीं देखील ब्राह्मण सर्वांत श्रेष्ठ व सर्वांत वंद्य होतें, हें सिद्ध करण्याकरितां ही भाकडकथा मागाहून घुसडली आहे. या बद्दलचे शेंकडो स्पष्ट पुरावे रामायणांतच आहेत. उदाहरणार्थः— शूद्रांत गणलेल्या भिल्लिणीचीं उष्टीं बोरें श्रीरामानें सेवन केलीं, अशी वरील कथेशीं अगदी विरुद्ध कथा रामायणांतच आहे तसेच वाल्मिक ऋषी हा गुरुचा वाल्या कोळी होता, त्यानें हजारो लाखो दुष्ट ब्राह्मणांचा वध केला. त्याच्या शरसंधानापुढें कोणाचेंच मात्रा चालेना, म्हणून नारद-कलीचा नारद या नांवाच्या तत्कालीन एका कावटपटु ब्राह्मणानें त्याला युक्तीनें बरळवून रामनामाची तपश्चर्या करण्यास सांगितलें. त्या तपश्चर्येमुळें पुढें तो वाल्ह्या कोळ्याचा वाल्मिक ऋषी झाला; त्यानें शतकोटी रामायण रामावतारापूर्वीच रचलें व त्यानें पवित्र मुखांतून निर्माण झालेलें रामायण सत्य करून दाखविलें. इतकेंच नाहीं तर त्या वाल्मिकास रामानें शिरसावंद्य मानिलें अशी शंबुकाच्या कथेशीं अगदीं तंतोतंत विरुद्ध कथा रामायणांतच आहे. शंबुकही कोळी व वाल्मिकही कोळी; पण त्यांचीं चरित्रें परस्पर विरुद्ध अशीं रामायणांतच आहेत. दुसरी वसिष्ठ ऋषीची गोष्ट पहा. वसिष्ठ ऋषीचा जन्म उर्वशी नांवाच्या अप्सरेच्या (सारंग णेच्या) पोटीं झाला, आणि तो पुढें श्रीरामाचा उपाध्याय झाला. वाल्ह्या कोळ्याचा किंवा शूद्र योनींत जन्मलेल्या वसिष्ठाच्या तपश्चर्येमुळें माल पाप झाले नाहीं इतकेंच नाहीं तर श्रीरामानें त्यांना वंद्य मानलें आणि शंबुकाला मात्र रामानेंच देहांत प्रायश्चित्त दिलें ! यावरून श्रीरामचंद्राच्या पवित्र व सात्विक आणि न्यायनिष्ठ चरित्रावर कलंक लावणारी ही रामायणांतील शंबुकाची कथा कुठल्या तरी [illegible] भट्टीभिक्षुकांच्या उलट्या काळजाचा साक्ष देणारी आहे यासाठी [illegible] ब्राह्मणांनींच करावा. तिसरी गोष्ट वसिष्ठ आणि विश्वामित्र ऋषींचा घ्या; आपल्या तपोबलानें प्रतिसृष्टी निर्माण करून ब्रह्म देवाचा जणूं विश्वामित्र राजर्षीनें पदच्युत पाडण्यास भाग पाडलें, ज्यानें सर्व वेदांचें सार आणि सर्व उपनिषदांचें अत्यंत पवित्र व अत्यंत तेजोमय सार असा ब्रह्म गायत्री मंत्र, खऱ्या हीन योनींत जन्मलेल्या विश्वामित्राला त्या ब्रह्म गायत्री मंत्राच्या सामर्थ्यानें शूद्राचा ब्राह्मण व ब्राह्मणाचा ब्रह्मर्षी करून घेतलें; याबद्दल वेद साक्ष देतात. असें असून त्याच मंत्रद्रष्ट्या भगवान विश्वामित्र

झणोला तोच वसिष्ठ ऋषी ब्राह्मण होऊं देईना, झणून त्या दोघांचा मेळ मत्सरयुक्त द्वेष सुरू होता, अशी उलटी कथा रामायणांत आहे. याचें मुख्य कारण वसिष्ठास ब्राह्मण मानलें असून विश्वामित्र ऋषी क्षत्रिय होता झणून ब्राह्मणी वर्चस्वाचें फाजील स्तोम माजविणाऱ्या क्षुद्र भिक्षुकी वृत्तीचें खोटें प्रदर्शन करणारी ही कथा नाहीं असें कोण झणेल ? सारांश श्रीरामचंद्राचें काळीं झणजे वैदिक काळीं वर्ण भेद नव्हता ही गोष्ट सप्रमाण सिद्ध आहे. इतकेंच नाहीं तर त्याकाळीं ब्रह्मवृत्तीच्या लोकांचें झणजे ब्राह्मणांचें वर्चस्व मुळींच नसून आर्य क्षत्रियांचाच श्रेष्ठपणा सर्व मान्य होता याबद्दल रामायण ग्रंथाचाच पुरावा भरपूर आहे. तसेंच ब्राह्मवृत्तीचे लोक सर्वतोपरी श्रेष्ठ क्षत्रि. यांचा वर्चस्वाचा हेवा व द्वेष करीत होते: पण त्यांचा कांहीं इलाज चालेना झणून क्षत्रिया क्षत्रियांत आपसांतच भेद नीतीचा प्रयोग करून त्यांच्यांत आपसांतच कलह लावावें व त्यांच्याच हातानें त्यांना नेस्तनाबूद व कमजोर करावें हा घरभेदेपणाचा दुर्गुण क्षत्रियांवर अवलंबून राहणाऱ्या वीर्य व शौर्यहीन अशा क्षत्रियांच्या पुजारी उपाध्याय वर्गाच्या अंगात अगदी प्रारंभापासूनच मुरलेला आहे असें प्राचीन इतिहासावरून दिसून येतें. उदाहरणार्थः—आर्यांच्या अगदी प्रारंभीच्या काळांत प्रसिद्ध असलेले **कळांचा नारद** हें पात्र प्राचीन ग्रंथांवरून सर्वांच्या ओळखीचें आहे. भृगुकुलांतील भार्गव झणजे परशुराम यांचेंही चरित्र हीच साक्ष पटविते. त्या परशुरामाचा पराभव करून त्याला काळ्यापाण्याची एकांत वासाची शिक्षा श्रीरामचंद्रानें केली अशी कथा मूळ रामायणांत व आहे. तरीपण त्यानें एकवीस वेळा निःक्षत्रिय पृथ्वी केल्याची खोटी कथा त्याच क्षत्रियाग्रपुट उपाध्याय वर्गानें पुराणांत घुसडून दिली आहे. तिसरी कथा कपटी वामनाची-श्रीमानें कपटानें बळीराजास त्रिपाद भूमी मागून पाताळांत घातलें. अशी कथा आहे. **क्षत्रियांना वळविण्यास कित्ता** या प्रकरणांत परशुराम आणि श्रीराम यांच्या लढाईची व परशुरामाला रामानें केलेल्या शिक्षेची सत्य हकीकत दिली आहे ती पहा. सारांश श्रीराम काळ, नंतर श्रीकृष्ण काळ, त्यानंतर बौद्ध धर्माचा काळ, व त्यानंतर हिंदु धर्माच्या नवीन स्थापनेचा काळ म्हणजे मुसलमानी व मराठी मिश्र रियासतीचा काळ व त्यानंतर शिवरायाचा काळ या सर्व काळांत घरभेदेपणा करून, कूटील नीतीनें आपसातच दुही माजवून राष्ट्रघात व धर्म द्रोह केल्याची भट ब्राह्मणांची शेंकडो उदाहरणें ग्रंथांतरी उपलब्ध आहेत.

श्रीकृष्णाच्या काळीं कौरव पांडवांत जी यादवी माजली त्यांचें कारण कौरवांचे पुजारी भटजींनीं कौरवांस युद्धाची आत्मघाती सल्ला देऊन त्यांत कौरव पांडवांस गोवले म्हणून दोन्ही पक्षाचा सपशेल सत्यनाश झाला. इतकेंच नाहींतर राष्ट्राचा व धर्माचाही घात झाला. त्यानंतर सात्विक बौद्ध धर्माकडे पहा. कुमारिल भट्ट आणि आद्य शंकराचार्य यांनीं प्रथम बौद्ध धर्मांत घुसून नंतर राक्षसी मायेने बौद्ध धर्माचे पोट फोडले ह्या नवव्या व दहाव्या शतकांतील गोष्टी इतिहास प्रसिद्ध आहेत. त्यानंतर स्वराज्याची

प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या शिवरायाच्या निमकहराम पेशव्यांची अंगावर रोमांच उभे करणारी कपटचतुरत्वाची भयंकर वर्णनें पहा. ज्यांनीं हिंदुपदपादशाही व हिंदुधर्म यांचा नायनाट केला आणि ब्राह्मणेतरांचा छळ खाटकाप्रमाणेंहि फारच अमानुषपणे केला अशीं पेशव्यांचीं कारस्थानें सर्वांच्या डोळ्यासमोर उभी आहेत. भिक्षुकशाहीस उचलून धरणारे टिळकांचे राक्षसी मायेचे राष्ट्रीय प्रेम आणि महात्मा गांधीसारख्या सच्च्या व सात्विक देशभक्तास देखील उलथून पाडणारे टिळक सांप्रदायी भटभिक्षुकांचे कपटी व स्वार्थी स्वराज्य-पुराण यांच्या एकेका अध्यायाचें सूक्ष्म निरीक्षण केलें म्हणजे वैदिक काळापासून तों थेट सांप्रतच्या चालू काळापर्यंत एकसारखी चालत आलेल्या भिक्षुकी भेदनीतीची आणि कपटपटुत्वाची पूर्ण साक्ष पटल्यावांचून रहात नाहीं.

४ श्रीकृष्णकाळीं वर्णभेद जन्मावरून नव्हता.

श्रीरामचंद्रानंतर सुमारें दोन हजार वर्षांनीं श्रीकृष्णाचा अवतार झाला. त्याला आज अंदाजा ३१०० वर्षें होऊन गेलीं. त्या काळीं वर्णभेद आतांच्याप्रमाणें होता काय हें आतां आपण पाहूं. त्या काळचा अत्यंत महत्वाचा आणि विश्वसनीय पुराव्याचा थोर ऐतिहासिक ग्रंथ म्हटला म्हणजे भारत ग्रंथ होय. भारत हा ग्रथ लोमहर्षण राजाचा पुत्र उग्रश्रवा उर्फ सुत यानें इ. स. पूर्वी तिसऱ्या शतकांत म्हणजे आज २२०० वर्षांपूर्वी लिहिला असे चिकित्सक विद्वानांचें मत आहे. त्यांत श्रीकृष्ण परमात्मा, पांडव, कौरव आदिकरून छप्पन कोटी यादवांचें अत्यंत वीर्यशाली अत्यंत वैभवशाली व रसभरित वर्णन आहे. ब्राह्मणांचें वर्चस्व त्यांत प्रामुख्यानें कोठेंच वर्णिलेलें नाहीं. उलटपक्षीं क्षत्रियांच्या सर्व श्रेष्ठ वर्चस्वासंबंधानें संबंध भारत ग्रंथ ओतप्रोत भरलेला आहे. पण त्यांत देखील क्षत्रियांच्याच उदार आश्रयानें रहात असलेल्या पण वर्चस्वाकरितां हपापलेल्या ब्रह्मवृत्तीच्या ब्राह्मणांनीं क्षत्रियांत आपसातच लाथालाथी करून दुही माजविण्याचें कारस्थानी प्रयत्न केल्याचें चित्र अनेक ठिकाणीं रेखाटलेलें सांपडतें. धार्मिक व सामाजिक स्थितीची उत्तम साक्ष पटविणारा त्या काळचा दुसरा अत्यंत महत्वाचा ग्रंथ म्हणजे क्षत्रिय कुलावतंस भगवान् श्रीकृष्णाची भगवद्गीता हा होय. भगवान् श्रीकृष्ण हा चंद्रवंशी यादव कुळाचा क्षत्रिय होता. भगवद्गीतेंत कृष्णानें चातुर्वर्ण्यसंबंधानें म्हटलें आहे कीं:—

चातुर्वर्ण्यं मयासृष्टं गुणभर्म विभागशः

म्हणजे प्रत्येक मनुष्याच्या अंगच्या गुणकर्माप्रमाणें मनुष्य मात्राचे **चार वर्ण मीं केलें आहेत**. हा श्रीकृष्णाचा काळ म्हणजे आज ३१०० वर्षांपूर्वीचा काळ होय. अर्थात् या गीतावचनाच्या पूर्वी वर्णव्यवस्था मुळींच नव्हती. यावद्दल हाच पुरावा जबरदस्त आहे श्रीकृष्णाच्या वरील गीता वचनानंतर वर्णव्यवस्थेची छाया जन्मावरून नव्हे तर अंगच्या गुणकर्मावरून समाजावर पडूं लागली. क्षत्रियाच्या पोटीं जन्मलेला तो क्षत्रिय, व ब्राम्हणाच्या पोटीं जन्मला तो ब्राम्हण अशी जन्मावरून वर्ण-

यवस्था मानण्याची रूढि मात्र भारत कालानंतर (श्रीकृष्णकालानंतर) सुमारें दोन हजार वर्षेपर्यंत अस्तित्वांत आलीच नाहीं. याचें सप्रमाण वर्णन क्रमशः पुढें याच प्रकरणांत येणार आहे. अंगच्या गुणाप्रमाणें आणि त्याच्या आचरणाप्रमाणें त्याचा वर्ण मानावा असें जरी ध्वनित झालें तरी चारही वर्णांत परस्पर रोटी आणि बेटी व्यवहार सर्रास चालूंच होता. वैदिक कालाप्रमाणेंच एकाच कुटुंबांतील चार पुरुष अंगच्या गुणाप्रमाणे चार वर्णांचे गणले जात असत; त्यांत भेदभाव मुळींच नसे. कारण चारही वर्णात रोटी आणि बेटी व्यवहार चालूंच होता. भगवद्गीतेंतः—

स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपियां तिपरा गतिम् ॥

या गीतेंतील वाक्यावरून हें बंड त्या काळींच सुरूं झालें होतें असें दिसतें. त्या काळीं ज्ञानहीन स्त्रियांना शूद्रांत गणण्याची प्रवृत्ति असल्याचें दिसून येतें. श्रीकृष्णाचे काळीं क्षत्रियांनें वर्चस्व फारच वाढलें होतें. धर्म संस्थापक, धर्म संवर्धक, व धर्म संरक्षक हे धार्मिक व सामाजिक अधिकार पूर्णपणें क्षत्रियांच्या हातांत होते. याचें स्पष्ट उदाहरण म्हटलें म्हणजे क्षत्रिय कुलावतंस श्रीकृष्णाची भगवद्गीता—ज्या गीतेला वेदाचे सार म्हणतात ती गीता त्या काळीं सर्वमान्य होती व आजही सर्वमान्य आहे. त्या काळीं धर्मसूत्रें ब्राह्मणांच्या हातीं नव्हती. असें भगवद्गीतेवरूनच दिसून येतें. ब्राम्हण वर्ग त्या काळीं देखील क्षत्रियांचा आश्रित वर्गच गणला जात असे. कारण निःसत्व निर्वीर्य वर्गाला परावलंबनावांचून गतीच नव्हती. त्यांनीं क्षत्रियांची धार्मिक सेवा करावी आणि त्याबद्दल क्षत्रियांनीं त्यांचें पालन पोषण करावें असाच प्रकार चालूं होता. म्हणूनच क्षत्रियांना **गोब्राह्मण प्रतिपालक** म्हणजे गाई ब्राम्हणांचे पालनकर्तेही बहुमानाची पदवी ब्राम्हणाकडून मोठ्या गौरवानें बहाल करण्यांत आली आहे. पुढें कौरव पांडवांचें राज्यतृष्णेमुळें घनघोर युद्ध झालें. त्यांत दोन्ही पक्षाचें अठरा अक्षौहिणी सैन्य कुरुक्षेत्राच्या संग्रामभूमीवर अठरा दिवसपर्यंत सारखें लढत होतें अठरा अक्षौहिणी सैन्याची प्रमाण गणती रामायण व महाभारत या प्रकरणांत दिली आहे. या युद्धांत छप्पन कोटी यादवांचा म्हणजे छप्पन कुळांचा [यदुवंशी क्षत्रियांचा] नाश होऊन अखेरीस पांडवांचा जय झाला. सुप्रसिद्ध रणधुरंधर व अतुल प्रतापी अशा निवडक क्षत्रिय वीरांचा नायनाट झाला म्हणून अर्थातच वीरवृत्ती जरा शांत झाली. पांडवांच्या एकछत्री राज्याचा व त्यांच्या वंशजांचा डोरा कांहीं काळपर्यंत चालू राहिला पण पुढें ४००–५०० वर्षांनीं बळी तो कान पिळी असा प्रकार हळूहळू पुनः सुरूं झाला. कारण जबरदस्त शास्ता एक छत्री राजा कोणी राहिला नव्हता. ५००—६०० वर्षांचा असा अंदाधुंदीचा काळ गेला. एकंदर बहुजन समाजांत म्हणजे धार्मिक, समाजिक व राजकीय सत्ताधारी क्षत्रियांत आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या ब्राह्मण व इतर वर्णांत दुर्व्यसनाचा फैलाव फार झाला. अश्वमेध, गोमेध, अजामेध इत्यादि प्रकारच्या हिंसाकारक यज्ञयागांना ऊत आला. त्यामुळें हिंसा फार वाढली. मांसाहार आणि मद्यपान सर्व वर्णांत अमर्याद होऊं लागले. लोकांची नीति फार बिघडली.

५ बौद्धाच्या काळीं वर्णभेद नव्हता:—अशा धर्मग्लानीच्या वेळीं:—

परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥१॥

या गीता वचनाप्रमाणें सज्जनांचा म्हणजे सदाचरणी लोकांचा प्रतिपाळ करण्याकरितां, दुष्कृत्य करण्याऱ्या दुर्जनांचा नाश करण्याकरितां आणि रसातळास चालले-ल्या धर्माचा पीछेहाट करून दऱ्या धर्माची संस्थापना करण्याकरितां परमेश्वरानें अवतार घेऊन इ. स. पूर्वी ५६७ व्या वर्षी वैशाख शु॥१५ या दिवशी गोरखपूर प्रगण्यां-तील कपिलवस्तु नांवाच्या सजधानींत शाक्य उर्फ इक्ष्वाकु चे चालुक्य या क्षत्रिय कुलांत शुद्धोदन राजाचे पोटी

गौतमबुद्ध

या नांवाचा प्रातःस्मरणीय पुण्यात्मा जन्मास आला. त्यानें मद्यमांसाचा व हिंसेचा निषेध करून व त्याचप्रमाणें वर्णभेद आणि वर्णद्वेश यांचाही निषेध करून अत्यंत पवित्र तत्वाचा व तत्कालीन लोकांना उचेल, पचेल व मानवेल अशा

अहिंसा परमो धर्मः

आणि

नविशेषोस्तिवर्णानां सर्वं ब्रह्ममयं जगत् ॥१॥

म्हणजे वर्णांचें महत्व मुळींच नाहीं. कारण सर्व जग ब्रम्हमय आहे म्हणजे एकाच परमेश्वराचीं लेकरें सर्व एकाच जातीचीं आहेत. या पवित्र तत्वाचा नवीन धर्म प्रस्थापित केला. त्याला बौद्ध धर्म म्हणजे बुद्धिवंतांचा धर्म (अर्थात् मूर्खांचा धर्म नव्हे) म्हणतात. गौतम बुद्धानें राज्यावरचा आपला हक्क सोडून देऊन नुकत्याच जन्मलेल्या पुत्ररत्नाचा व नवयौवन सुंदर स्त्रीचा त्याग केला आणि स्वतः ब्रम्हचर्य व्रतानें व संन्यास वृत्तीनें राहून धार्मिक व सामाजिक बाबतींत लोकांचा उद्धार केला. या बुद्धाला एकंदर दहा अवतारांपैकीं नववा अवतार मानतात. याचें पूर्वी ४००—५०० वर्षेपर्यंत बळी तो कान पिळी असा अंदाधुंदीचा काळ गेल्यामुळें वर्णव्यवस्थेला विकृत रूप प्राप्त झालें होतें. गुणकर्माचा लोप होऊन मनगटाच्या जोरावर जन्मावरून वर्ण मानण्याची प्रवृत्ति बोकावूं लागली होती. गरीब वृत्तीच्या ब्रम्हणास तर कोणीच विचारीत नव्हते पण सत्ताधर्मी क्षत्रिय राजांचा देखील एकाचा पायपोस एकाच्या पायांत नव्हता, हें वर सांगितलेंच आहे. त्यानंतर गौतम बुद्धानें सर्वं ब्रह्ममयं जगत् म्हणजे सर्व जग एकाच परमेश्वराचा अंश असल्यामुळें सर्वांनीं सर्वांस एकमय भेदभाव रहित बरोबरीचे धर्मबंधु समजावें हेंच तत्व प्रतिपादन केलें. या बौद्ध धर्मास बुद्धाच्या बापानें व सार्वभौम अशोक राजानें व इतर मोठमोठ्या लाखो राजांनीं आश्रय देऊन उचलून धरलें.

६ अशोकाच्या काळीं जन्मावरून वर्णव्यवस्था नव्हती.

त्यानंतरच्या काळांत अशोकानें आपल्या साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत एकंदर चवदा शीलालेख खडकांवर कोरविले होते. ते सर्व लेख त्या काळीं चालू असलेल्या सुप्रसिद्ध पाली भाषेंत कोरलेले आहेत. त्यांपैकीं पांच शीलालेख सांपडले आहेत. एक सिंधु नदाच्या किनाऱ्यावर, दुसरा यमुना नदीच्या कांठीं, तिसरा गुजराथेंत, आणि दोन ओरिसा प्रांतांत. या लेखांत निरनिराळ्या महत्वाच्या धार्मिक आज्ञा व लोक कल्याणाच्या आज्ञा कोरल्या आहेत. त्यांत स्थूलीं लिहिल्याप्रमाणें मजकूर आहे.

१ जनावरांची हिंसा करूं नये.

२ मनुष्याकरितां व जनावराकरितां औषधोपचाराची योजना केली आहे. त्याचा फायदा सर्वांनीं भेदभाव रहित मनसोक्त घ्यावा.

३ पंच वार्षिक धर्मोत्सव करीत जावे.

४ धर्मानुग्रह समजून घेऊन त्याप्रमाणें सर्वांनीं वागावें.

५ बौद्धधर्म प्रसारार्थ धर्माधिकारी व भिक्षु नेमले आहेत. त्याचा फायदा सर्वांनीं घ्यावा.

६ लोकांच्या नैतिक वर्तनावर नजर ठेवण्याकरितां नीतिशिक्षक नेमले आहेत.

७ सर्वांस धर्माची मोकळीक सारखी आहे.

८ विषय सुखापेक्षां धार्मिक सुख भोगणें चांगलें.

९ धर्म शिक्षण देणें व नीतियुक्त सल्ला देणें यांत फार पुण्य व पुरुषार्थ आहे.

१० खरा धर्मप्रसार करण्यांत खरें शौर्य आणि खरें वैभव आहे.

११ धर्मशिक्षण देणें हा परोपकारापेक्षां उत्तम मार्ग आहे.

१२ परधर्मी लोकांस धर्माची मोकळीक देऊन व आपला धर्म फार चांगला आहे अशी त्यांची समजूत करून त्यांस आपल्या धर्मांत बिनशर्त घ्यावें.

१३ कलिंग देश कांबीज केला आहे. ग्रीक देशांत व इतर पांच देशांत बौद्ध धर्माच्या प्रसारार्थ लोक पाठविले आहेत. त्या त्या देशांतील राजांनीं बौद्धधर्म स्वीकारला असून ते त्याप्रमाणें वागत आहेत. त्यांचीं नांवें:—१ सिरीआचा राजा ॲंटीऑक २ इजिप्तचा राजा टॉलेमी. ३ ग्यानिडसचा राजा ॲंटीगोनस. ४ सिरीयाचा राजा मागस. ५ एपीरसचा अलेक्झांडर. हे सर्व राजे बौद्धधर्मी होते. यावरून अलेक्झांडर हा बौद्धधर्मी होता असें दिसतें.

१४ वरील आज्ञांचें एकीकरण करून असे लेख कोरण्याविषयीं उत्तेजक निरूपण केलें आहे. वरील खडकांवर कोरलेल्या आज्ञाशिवाय स्तंभांवर कोरलेले अशोकाचे लेख आहेत त्यांपैकीं दोन दिल्लीत, एक प्रयागास, दोन उत्तर बहारप्रांतांत आणि एक मध्यप्रांतांत याप्रमाणें सहा शीलालेख सांपडले आहेत. त्यांतही वर प्रमाणेंच धार्मि-

क स्वरूपाच्या नीतीच्या व लोक कल्याणाच्या आज्ञा कोरल्या आहेत. धर्माधिकारी, धर्म संस्थापक, धर्म-संवर्धक व धर्म-संरक्षक हे अधिकार राजाचे असून बाहेर पाठविलेले धर्म प्रचारक हे राजाचे आज्ञाधारक दूत असून त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागणारे राजाचे मुख्त्यार आहेत. ते धर्म संस्थापक किंवा संवर्धक नाहींत असे स्पष्ट म्हटलें आहे. लोकोपयोगी, आज्ञांत त्यानें लिहिलें आहे कीं:-

मनुष्यास आणि जनावरांस छाया मिळावी म्हणून मी राजमार्गावर न्यग्रोध वृक्षांची दाट राई सर्वत्र लाविली आहे. बागांतून आम्रवृक्षांची लागवड करविली आहे. प्रत्येक अर्ध कोसावर विहीर खोदविली असून विश्रांती करितां व आरामाकरितां विश्रांतीगृहें बांधली आहेत. **उच्च नीचपणाचा किंवा श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा भेदभाव बिलकूल न ठेवतां सर्व धर्म बांधवांनीं एकसारखाच त्याचा उपभोग घ्यावा.** हा चक्रवर्ती धार्मिक राजा इ. स. पुर्वी २२२ या वर्षी मरण पावला. चंद्रगुप्त मौर्य हा अशोकाचा आजा होता. त्यानें ग्रीस देशाच्या बौद्धधर्मी राजाच्या राजकन्येशीं विवाह केला होता. यावरून त्याकाळीं जन्मावरून वर्णभेद तर पाळला जात नव्हताच मग जातीभेद कोठून असणार? मूळच्या आर्य धर्माच्या किंवा तदनंतरच्या वैदिक धर्माच्या मूळच्या पवित्र तत्वास धरून हा धर्म असल्यामुळें आणि त्याकाळच्या हिंसास्वरूपी किळसवाण्या हिणकस वैदिक धर्मास लोक कंटाळले असल्यामुळें बौद्धधर्माचा प्रसार तैल बिंदुप्रमाणें एकंदर सर्व हिंदुस्थानभर फार झपाट्यानें झाला. सर्व मनुष्यजात एकच आहे असें तत्त्व त्यांत असल्यामुळें फक्त स्त्री आणि पुरुष उर्फ माया आणि ब्रम्ह इतकाच भेद त्या काळीं मानीत असत. मग वर्णव्यवस्थेचा पत्ता त्यांत कोठें लागणार. क्षत्रिय ब्राम्हण वैश्य व शूद्र हा गूणकर्मावरून मानला जाणारा भेदभाव त्या काळीं अगदीं साफ नाहींसा झाला आणि वैदिक धर्माचीं तत्वें लोक विसरून गेले. क्षत्रियांचे वंश-गोत्र आणि ब्राम्हणांचे ऋषी गोत्र यांचा लोप सहजच झाला. या बौद्धधर्माचा प्रसार दक्षिणेस सीलोन उर्फ लंका, केप कन्याकुमारीपासून उत्तरेस हिमालयाचे टोंकापर्यंत आणि पूर्वेस बंगालच्या उपसागरापासून तों पश्चिमेस अरबी समुद्रापर्यंत भारतवर्षाच्या कान्याकोपऱ्यांत सुद्धां झाला. इतकेंच नाहींतर तिबेट, अफगाणिस्तान, चीन, जपान वगैरे बाह्य देशांत देखील झाला. अपवादादाखल कांहीं थोड लोक वैदिक व कांहीं बौद्ध अशा अर्धवट द्विदल धर्म पद्धतीनें वागून त्यांतून बचावून राहिले असतील. हा धर्म इ. स. पूर्वी सहाव्या शतकांत गौतम बुद्धापासून सुरू झाला तो आठव्या शतकाच्या अखेरीपर्यंत म्हणजे १४००-१५०० वर्षें पर्यंत सारखा टिकला. मध्यंतरी या धर्माच्या भिक्षुमध्यें निरनिराळे पंथ निर्माण झाल्यामुळें त्याचा जोर थोडा कमी होऊं लागला. बौद्ध धर्माचा पाडाव करण्याकरितां जैमिनीनें पूर्व मीमांसा व बादरायणानें उत्तरमीमांसा नांवाचें ग्रंथ प्रसिद्ध करून बौद्ध भिक्षुंत ते शिरले. त्यांच्यांत भेद नीतीनें घुसविला. त्यामुळें बौद्ध भिक्षुंत दोन तट होऊन ते आपसांत भांडू लागले, त्यामुळें

बौद्ध धर्मांचा जोर कमी होऊं लागला. त्यानंतर कुमारिलभट्ट व शंकराचार्य यांनी देखील विद्वत्तेच्या जोरावर बौद्ध धर्मावर फोडा आणि सोडा याच नीतीचा प्रयोग केल्याचे दिसून येते.

७ रूढीच्या वर्णव्यवस्थेचा प्रारंभः—

इतक्या दीर्घ कालानंतर इ. स. ७८८ या वर्षी आद्य शंकराचार्य यांचा जन्म झाला. त्याचा काळ इ. स. ८२० पर्यंत चालला त्यावर्षी त्यांनी समाधी घेतली. त्यांनी बौद्ध धर्मांतील कांहीं पवित्र तत्वें आणि वैदिक धर्मांतील कांहीं तत्वें यांचा जोड जुळवून व शांत आपला पदरचें कांहीं घालून उत्तर मीमांसा नांवाचा एक नवीन ग्रंथ लिहिला. त्याला भगवद्गीतेवर संन्यास वृत्तीची अकर्मक स्वरूपाची टीका केली आहे. यांनी बौद्ध धर्माचा व वैदिक धर्माचा साधारण मेळ मिळवून आणि हिंसायुक्त यज्ञयागाचा निषेध करून हल्लीं चालू असलेल्या रूढीप्रधान उर्फ आचारप्रधान-

८ भिक्षुकी हिंदुधर्माची नवीन रचना

केली. पूर्वीच्या मद्यमांस सेवनाचा निषेध दर्शवून सोवळ्या ओवळ्याचें प्रस्थ या नवीन धर्मांत शिरीक केलें. पण त्या ग्रंथाला उर्फ नुसत्या पुस्तकी ज्ञानाला लोक किंमत देतात कशाला? राजाश्रयावांचून धर्म संस्थापना होणें शक्यच नव्हतें सबब त्या काळचे प्रतिहार उर्फ पवार राजांचे राजधानीचें ठिकाण जें आबू संस्थान, त्या आबू पर्वतावर तपश्चर्या करून तेथील पंवार उर्फ प्रमार वंशी क्षत्रिय मराठा राजाला शंकराचार्यांनें वश करून घेतलें आणि त्यांच्याकडून नवीन पद्धतीचा यज्ञ करवून त्या यज्ञासाठीं इतर राजे बोलावण्यांत आले. त्यापैकीं पंवार, प्रतिहार, चौहान आणि साळुंके उर्फ चालुक्य या चार घराण्यांच्या राजांनीं या नवीन धर्मास आश्रय देऊन बौद्ध धर्मावर चाल केली. हा यज्ञ नवव्या शतकाच्या प्रारंभी झाला. त्यानंतर बौद्ध धर्माचा पाडाव जोरानें होऊं लागला. एकंदर १४००-१५०० वर्षेपर्यंत बौद्ध धर्माचा पगडा होता. या १५०० वर्षांच्या कालांत गुणकर्मावरून मानलेल्या वर्णव्यवस्थेचा अमल देखील नामशेष झाला होता. या नवीन रूढीप्रधान भिक्षुकी हिंदु धर्मामुळें हिंदु धर्माची सूत्रें शंकराचार्यांपासून कांहीं अंशानें ब्राम्हणांच्या हातीं गेलीं आणि सोवळ्या ओवळ्याच्या व शुद्धा-शुद्धतेच्या तत्वावर नवीन वर्णव्यवस्था त्यानंतर अमलांत येऊं लागली. क्षत्रिय ब्राम्हण व वैश्य हे आपापल्या वैदिक वंशाचा व गोत्रांचा पुनः शोध करूं लागले; आणि वंशाप्रमाणें व गोत्राप्रमाणें जन्मावरून हे चार वर्ण उर्फ या चार जातीचा समाजांत हळूहळू भेद होऊं लागला. पण त्यांतही आद्य वर्ण क्षत्रियांचाच मानला जात होता. पण धर्मसूत्रें आतापर्यंतच्या क्षत्रियावलंबी ब्राम्हण वर्गाच्या हातीं गेल्यामुळें प्रथांत ब्राम्हणी वर्चस्वाची घुसडाघुसड करून त्यांनीं हळूहळू जन्मावरून चातुर्वर्ण्य व्यवस्था कपटनीतीनें अमलांत आणली.

ब्रह्माड पुराणांत खालीं लिहिलेला आधार सांपडतो.

अजा स्वयंभूर्भगवान् दृष्ट्वा सिद्धन्तु कर्मजाम् ।
तद्वत् ओषधयः काष्ट पश्चात्तु जज्ञिरे ॥ १ ॥
ओषधीषु तु वार्तायां ततस्तासां स्वयंभुवः ।
क्षुधोपशमनार्थाय यथाख्याः परस्परम् ॥ २ ॥
ये च परिगृहितारस्ता सामासन्बली यसः ।
इतरेषां कृत त्राणात् स्थापयाम्रास क्षत्रियान् ॥ ३ ॥
उपतिष्ठंति ये तान्वै या वन्तो निर्भया स्तथा ।
सत्यं ब्रह्म यथा भूतं ध्रुवंतो ब्राह्मणाश्च ते ॥ ४ ॥
येचान्येऽल्प बलास्तेषां वैश्य संकर मास्थिताः ।
किनाशा नाशायंतिस्म पृथिव्यां प्रागतोहिताः ॥५॥
वैश्यानेव तु तानाहुः की नाशान् वृत्ति साधकान् ।
शौचं तथ द्रवंतश्च परिचर्यासु ये रताः ॥ ६ ॥
निस्तेन स्वोऽल्प वीर्यश्च शूद्रांस्तान ब्रह्मोत्तमः ।
तेषां कर्माणि धर्मांश्च ब्रह्मानु व्यदधात् प्रभुः ॥ ७ ॥
संस्थितौ प्राकृतायांतु चातुर्वर्णस्य सर्वशः ॥ ८ ॥

(ब्रह्मांड पुराण अ. ७ । १५१–१५८.)

टीपः—हें ब्रह्मांड पुराण इ. स. पूर्वी चवथें शतकांत लिहिलें आहे. (पुराणांचा तक्ता पहा)

भावार्थः—स्वयंभु ब्रम्हदेवानें कर्मापासून उत्पन्न होणारी सिद्धि पाहून' अर्थात अन्न औषधी वगैरे सृष्टि प्रथम निर्माण करून नंतर प्राणिगण सृष्टि (मानव सृष्टि) निर्माण केली. त्यानंतर त्या सज्जन प्रजा समूहाची अव्यवस्था होऊन जेव्हां त्यांच्यांत अस्वस्थता उत्पन्न होऊं लागली तेव्हां त्यांची सुव्यवस्था लाऊन त्यांच्यात सुखसमाधान व शांति राखण्याकरितां त्यांच्या अंगाच्या गुणकर्मांप्रमाणें चार वर्णांची स्थापना धर्म, कर्म आणि मर्यादा यास अनुसरून केली ती अशीः—

त्यांच्या पैकीं जे अत्यंत उदार, थोर अंतःकरणाचे, दानशूर आणि सर्वांत बल. वान व शूर दिसून असून बहुजन समाजाचे रक्षण करण्यास सर्वोपरी पात्र होते, त्यांना ब्रह्मदेवाजून क्षत्रिय ही संज्ञा दिली. म्हणजे चातुर्वर्णांपैकीं सर्वांत श्रेष्ठ अशा प्रथम वर्णाची स्थापना केली. सर्व भूतांचे ठायीं एकच सत्य परब्रह्म वास करीत आहे म्हणजे सर्व चराचर सृष्टी ब्रह्ममय आहे. मानवी प्राण्यांत धार्मिक व सामाजिक दृष्ट्या कांहीं भेदभाव नाहीं, अशा पवित्र व समसमान भावनेच्या चिंतनांत ज्यांनीं निर्भय चित्तानें आपलें आयुष्य घालविण्याचें पसंत केलें आणि अर्थातच स्वतः निर्वीर्य म्हणून जे क्षत्रियांचे आश्रित होऊन राहिले त्यांना ब्राह्मण म्हणजे ब्रह्मस्वरूपी-ईश्वरस्वरूपी लीन

झालेले देवभक्त ही द्वितीय श्रेणीची संज्ञा दिली त्यांच्या पैकींच जे बलानें कमी होते व जे शेतीचा व गोरक्षणांचा धंदा करून व्यापार धंदा करीत असत त्यांना वैश्य झणजे व्यापारी ही संज्ञा दिली; आणि जे दुःख शोकपरायण, तेजहीन, अल्पवीर्य, असे असल्यामुळें कोणत्याही बौद्धिक कार्यांत ज्यांची गती पोंचूं नव्हती ते अर्थात निर्बुद्ध असल्यामुळें इतर वर्णाची सेवा करण्यास योग्य व निम्न रहात असत त्यांना शूद्र झणजेच क्षुद्र, बुद्धिहीन, दास ही संज्ञा दिली.

अशी वर्ण व्यवस्था ज्याच्या त्याच्या अंगच्या गुणकर्मप्रमाणें झाली होती ती नष्ट करून केल्यानंतर कालांतरानें [बहुतकरून श्रीकृष्णानें केलेली ती ही असावी] सृष्टीच्या सुव्यवस्थेकरितां करून दिली. पण या चारही वर्णाचे लोक मूळचे एकाच आर्य वर्णाचे होते. त्यांच्यांत मुळची वर्णव्यवस्था नव्हती व नंतर जी वर्ण व्यवस्था अमलांत आली ती देखील जन्मावरून नसून गुणकर्मावरून अमलांत आली. कालांतरानें हिंदुच्या झाच मुख्य चार जाती वरीलप्रमाणें मानण्यात आल्या.

सृष्टीच्या प्रत्येक अनुरेणूमध्यें परमेश्वर भरलेला आहे असें हिंदुधर्माचें मत आहे त्यामुळें परमेश्वररूपी सर्व राष्ट्राला विराट पुरुषाची झणजे परमेश्वराची उपमा देऊन त्या विराट पुरुषाच्या शरीराचे झणजे राष्ट्राचे चार भाग मानिले आहेत. ते असेः—

ब्राह्मणोऽस्य मुखमासी द्बाहू राजन्यः कृतः ।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥

भावार्थः—ब्राह्मण मुखानें पवित्र धर्ममंत्र झणून राष्ट्राचा उपाध्येपणाचा धार्मिक धंदा करितात, म्हणून विराट पुरुषाचे तें मुख मानावें. राजन्य झणजे क्षत्रिय बाहुबलानें राष्ट्र चालवितात, झणून त्यांना राष्ट्र पुरुषाच्या बाहुची उपमा दिली. मांड्याच्या बलावर वैश्य व्यापार करून राष्ट्राची संपत्ती वाढवितात, झणून त्यांना राष्ट्राच्या मांड्याची उपमा दिली आणि शूद्राची बुद्धि कोणत्याच कामांत चालत नाहीं झणून निर्बुद्ध लोकांस झाडांची झगमे ओझे वाहणाऱ्या पाय्यांची उपमा दिली. वरील श्लोक अथर्ववेदांत आहे. आणि अथर्ववेद भारत काळीं झणजे श्रीकृष्णाचे वेळीं रचाला मेलातेव्हां श्रीकृष्णाच्या वेळीं झणजे आज सुमारें २००० वर्षां पूर्वी वर्णभेद गुणकर्मावरून मानण्यांत येऊं लागला. मात्र त्याकाळीं वर्णभेद जन्मावरून मुळींच मानिला जात नव्हता हें सिद्ध होतें.

९ शूद्र शब्दाची उत्पत्तिः—

शूद्र हा शब्द मूळचा सूद असावा, व तो संस्कृत 'सूद' म्हणजे स्वयंपाक करणें या धातूपासून झालेला असावा. स्वयंपाक करणें हा सेवकांचाच धंदा आहे. अर्थात सूद म्हणजे स्वयंपाकी, सेवक. हल्लीं स्वयंपाकयाचा धंदा करणारे जे ब्राह्मणेतर आहेत ते किंवा पाणी भरणारे जे पाणके आहेत ते सेवाधर्मी असल्यामुळें आमच्या धर्मतत्वाप्रमाणें त्यांस सूद उर्फ शूद्र त्यांच्या कर्मावरून लावणें खरोखर योग्य आहे.

आर्याऽधिष्ठिता वा शूद्राः संस्कर्तारः स्युः ॥ २ ॥

आपस्तंभ धर्मसूत्र प्रपा. २, पाठ १, खंड २०

शूद्रो जीवेत कारु कर्मभिः ॥ मनु अ. १० श्लोक ९९

म्हणजे शूद्रांनी आर्यांचा स्वयंपाकाचा धंदा करून आपला निर्वाह करावा.

१० चारवर्णांत रोटी व बेटी व्यवहारः—

भारत कालापासून इ. स. पु. ३०० पर्यंत वर्णभेदाचे बीजारोपण गुणकर्मा वरूनच मानले जात होते. जन्मावरून मानले जात नव्हते. कालांतरा नें श्रमविभागासाठी १ क्षत्रिय २ ब्राह्मण ३ वैश्य व ४ शूद्र हे चातुर्वर्ण्य जरी निर्माण झाले तरी एकाच कुटुंबांतील अनेक व्यक्तिप्रमाणें एकाच आर्य समाजाचे अवश्यक घटक चारही वर्णांस मानण्यांत येत असे. इ. स. पु. ३०० म्हणजे आज २२०० वर्षांपूर्वी मागस्थेनिस नांवाचा एक प्रसिद्ध ग्रीक ग्रंथकार चंद्रगुप्ताचे कारकिर्दीत हिंदुस्थानांत आला होता. त्यानें लिहून ठेवलेल्या वर्णनावरून दिसून येतें कीं त्यावेळीं हिंदुस्थानांत १ क्षत्रिय, २ ब्राह्मण ३ वैश्य आणि ४ शूद्र म्हणजे अनार्य या चारच जाती त्यावेळीं अस्तित्वांत होत्या. साधारणपणें इ. स. च्या दुसऱ्या शतकांत म्हणजे आज १७०० वर्षांपूर्वी स्मृतिकार मनुचा काळ येतो. त्या वेळीं वरील चार वर्णांत रोटी बेटी व्यवहार होण्यास निर्बंध नव्हता. (आपस्तंब धर्मसूत्र प्रश्न २ अ. १ कण्डिका ३ सूत्र ४ मनुस्मृति पराशर माधव, गौतम धर्मसूत्र इत्यादि ग्रंथांत रोटी व्यवहाराविषयीं स्पष्ट उल्लेख आहे.) मनुस्मृतींत म्हटलें आहे कीं:—

शूद्रो ब्राह्मण तामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम् ।
क्षत्रियाज्जातमेवंतु विद्याद्वैश्यात्तथैवच ॥

(मनुस्मृति अ. १० श्लोक ६५)

म्हणजे अंगच्या गुणानें शूद्राचा ब्राह्मण होतो व ब्राह्मणाचा शूद्र होतो. त्याच प्रमाणें इतर वर्णांतील पाहिजे त्या वर्णास गुणाप्रमाणें पाहिजे त्या वर्णांत जातां येतें.

यावरून मनुच्या काळीं म्हणजे इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत देखील म्हणजे आज १७०० वर्षांपूर्वी वर्णव्यवस्था गुणावरून चालू होती, ती आतांच्या सारखी जन्मावरून चालू नव्हती. मग जाती भेद कोठून असणार! ज्या काळीं वर्णव्यवस्था आतां प्रमाणें जन्मावरून कडक नव्हती आणि शूद्रांस ब्राह्मणांत जाता येत होते व शूद्रांचा धंदा वरील तीनही वर्णांचा स्वयंपाक करण्याचा होता त्या इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत चारही वर्णांत रोटी बेटी व्यवहार असलाच पाहिजे. आणि आतांच्या जातीची छाया त्यानंतर पडली हें उघड आहे.

इ. स. ६०६ च्या सुमारास बाणभट्टानें हर्ष चरित्र नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. ढोलेश्वरच्या तत्कालीन हर्ष राजाचा तो समकालीन असून त्याचा आश्रित होता. या

चरित्रकाराने आपल्या ग्रंथांत केलेलें वर्णन त्याच वेळीं हिंदुस्थानांत यात्रेसाठीं आलेल्या बौद्ध धर्मीय चिनी प्रवासी ह्युएनत्संग यानें दिलेल्या हकीकतीशीं फारच जुळतें ह्मणून ते विश्वसनीय असलेंच पाहिजे. बॉर्डेकृत ह्युएनत्संगाचे लेख पु. १ पान १४१ यांत तो ह्मणतो कीं," क्षत्रियांनीं आपली उच्च नीतिमत्ता, साधी राहणी आणि शौर्य या विषयींची आपली ख्याती कायम ठेविली आहे." यावरून इ. स.भावव्या शतकांत क्षत्रिय वर्ण प्रमुखपणाला सर्वथैव पात्र होता पुढें तो ह्मणतो (पान १६९ सदर)"या देशांत आनुवंशिक अशा चार जाती आहेत. त्या आपापल्या तत्वाला न सोडतां समाधान वृत्तीनें रहात असतात. त्यांच्यांत धार्मिक व सामाजिक विधि यथासांग होत असतात. या चार जातींत क्षत्रियांचा क्रम नंबर पहिला असून त्यांत राजे लोकांचा अंतर्भाव होतो. दुसरी जात ब्राह्मणांची म्हणजे धार्मिक उपाध्यायांची असून ते राजाश्रयानें राहून धर्मविधि चालवीत असतात. तिसरी जात वैश्यांची म्हणजे व्यापाऱ्यांची असून नानाविध वस्तूंचा व्यापार देशीं परदेशीं करून आणि शेती व गोरक्षण करून ते द्रव्य संचय करीत असतात. चवथी जात शूद्रांची ते श्रम करून आपल्या मजुरीच्या कामांत अगदी चूर झालेले असतात. या लोकांत विवाह फक्त जाती जातीमध्येंच होतो, क्वचित प्रसंगी जाती जातींत मिश्र विवाहही होतो. बापाकडून किंवा आईकडून कांहीं पिढ्या पर्यंत सपिंड संबंध असलेल्या स्त्री पुरुषांचा विवाह होत नाहीं, आणि स्त्रिया पुनर्विवाह कधीं करीत नाहींत."

असें हें सातव्या शतकांतील हिंदुस्थानांत आढळणारें जातीं चतुष्टयांचें वर्णन असून तें एका परकीय पण बुद्धिमान निरीक्षकानें येथील लोकांत अनेक वर्षें राहून, त्यांच्या भाषा शिकून व त्यांच्या चालीरीती नीट समजून घेऊन नंतर केलेलें आहे. सबब तें विश्वसनीय मानलेच पाहिजे.

विवाहाच्या बाबतींत तो आपल्या लेखांत ह्मणतो कीं, " ब्राह्मणांना खालच्या जातीच्या स्त्रीशीं विवाह करतां येतो. ही गोष्ट मनुवचनाला धरूनच आहे. मनूनें ह्मटलें आहे कीं:—

स्त्रीष्वनंतर जातासु द्विजोरुत्पादितान्सुतान् ।
सदृशानेव तानाहुर्मातृदोष विगर्हितान् ॥ मनुस्मृती १०; ६

ह्मणजे द्विजानें अर्थात ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीनही वर्णांनीं आपापल्या जवळच्या खालच्या खालच्या जातीची स्त्री केल्यास त्यापासून होणारी संतती त्याच्याच जातीची होते. याप्रमाणें सातव्या शतकांत म्हणजे आज १२०० वर्षांपूर्वी चारही जातींत परस्पर विवाह सुरू होते. उदाहरणार्थ:—ह्युएनत्संगानें सांगितलें आहे कीं हर्ष राजाची कन्या वल्लभीच्या ध्रुवभटाला दिली होती. हर्ष हा वैश्य आणि ध्रुवभट हा क्षत्रिय जातीचा होता; हर्षाची बहीण राजश्री कनोजच्या ग्रहवर्मा मौखरीला दिली

होतो असें बाणानेंही सांगितलें आहे. बाणानें आपल्या दोन पारशव बंधूंचा उल्लेख हर्ष चरितांत केलेला आहे.

भ्रातरौ पारशवौ चक्षुस्तेन मालूतेनौ (उच्छ्वास १)

पारशव म्हणजे ब्राह्मणाला शूद्र स्त्रीपासून झालेली संतती —

' कृषि गोरक्ष्य वाणिज्यं वैश्य कर्म स्वभावजम् '

हें भगवद्गीतेतील अध्याय १८ श्लोक ४४ मधील वचन आहे. सातव्या शतकांत तें शब्दशः अमलांत होतें; पण त्यानंतर शेती व गोरक्ष्य म्हणजे गवळीपणा हे वैश्यांचे धंदे सुटलेले आहेत असें मानण्याची प्रवृत्ती होऊं लागली; कारण शेतीमुळें जमीनीतील जीवजंतूंचा हत्या होते. हें बौद्ध धर्मानुसार पाप मानलें जाऊं लागलें; याचा परिणाम असा झाला कीं, बऱ्याच शेतकरी वर्गाचा मूळचा वर्ण क्षत्रियाचा व वैश्यांचा असूनही त्यांची या धंद्यामुळें शूद्रांत गणना होऊं लागली. यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, आजचे शेतकरी हे [illegible] क्षत्रियच होत. कारण आर्यांचा अगदी प्रारंभीचा धंदा देश जिंकणें व तेथें शेती [illegible] देणें. जरासंधानें कित्येक ब्राह्मणांस वेद उपनिषदें व अग्निहोत्र शिकविले [illegible] मगधदेशांतील नागर चालरीत असतांना त्याच्या नागराच्या फळास सीतेची पेटी लागून सीता सांपडली अशी कथा आहे.

व्रात्य :—इ. सनापूर्वी सहाव्या शतकापासून तों इ.सनाच्या नवव्या शतकापर्यंत १४००–१५०० वर्षें बौद्ध धर्माची छाप अखिल भरतखंडांत बसली होती. बौद्ध धर्मानुयायींना वेदोक्त गृह्य संस्कारांचें महत्व नव्हतें. म्हणून वैदिक धर्मप्रमाणें उपनयन करणें व मृतांचीं क्रिया करून श्राद्धपक्ष करणें व पिंड पाडणें हा मोठा बुद्ध धर्मानुयायींना मान्य नव्हता. त्यामुळें तिन्ही द्विज वर्णांतील उपनयन विधी तेव्हांपासून बऱ्याच अंशानें बंद पडला होता. म्हणून द्विजत्वाचा उपनयन संस्कार न करणाऱ्या [illegible] म्हणजे बुद्धधर्मी संघांत शरीक होणाऱ्या लोकांच्या मनोवृत्तीला आळा बसवावा [illegible] बुद्ध धर्मविषयीं तिरस्कार उत्पन्न करण्याच्या हेतूनें मनुस्मृतींत व्रात्य हा [illegible] न करणाऱ्यांस देण्यांत आली. व्रात्य म्हणजे 'विक्षिप्त' असा त्याचा अर्थ [illegible] बौद्ध धर्मांत जाऊन मौंजी न करणारे ते व्रात्य म्हणजे विक्षिप्त. जे ब्राह्मण, [illegible] मौंजी करणार नाहींत त्यांना व्रात्य हो संज्ञा मनुस्मृतींत दिलेली [illegible] ब्राह्मणांनीं वैदिक धर्माची मूळची पवित्र तत्वें स्वतः सोडून देऊन ते भ्रष्ट होत [illegible] यज्ञांत सोमरसाचा त्यांनीं यज्ञाच्या मिषानें अतिरेक केला. अश्वमेध, गोमेध, [illegible] मेध व नरमेध यादि प्रकारच्या अंगावर रोमांच उभे करणाऱ्या यज्ञांच्या नांवानें [illegible] निरपराध पशूंचा अनन्वित हिंसला लोक कंटाळून गेले त्यामुळें पवित्र बौद्ध [illegible] धर्म झाला म्हणजे ब्राह्मणांच्या निंद्य वर्तनाला त्रासून पवित्र बौद्ध धर्मांत [illegible] राहून व मौंजी न करणाराला व्रात्य हें कुत्सित नांव ब्राह्मणांनीं देऊन ते

फलम मनुस्मृतीं घुसडून दिली ल [illegible] संज्ञा मनुस्मृतींत ब्राह्मणांनीं घुसडून दिली ल [illegible] यांनी यौनसंबंधन होत नाही. तरी त्यांजकडे हे ब्राह्मण [illegible] देत नाहीत, व त्यांना व्रात्य अजूंही म्हणत नाहींत. ब्राह्मणेतरांना मात्र व्रात्य म्हणतात. उदाहरणार्थः—

१२ मौंजी न करणाऱ्या ब्राह्मण जाती.

गुजराथी ब्राह्मण, बंगाली ब्राम्हण, परदेशी ब्राम्हण, मारवाडी ब्राम्हण, पंजाबी ब्राम्हण, आसामी ब्राम्हण म्हणजे जगन्नाथाकडील ब्राम्हण आणि ब्रम्हा ब्रम्हण. उत्तर हिंदुस्थानांतील बहुतेक ब्राम्हण जातींत खरासरी शेंकडा ६०-७० ब्राम्हण लोक उपनयनादि वैदिक विधि बौद्ध धर्माच्या उत्कर्ष काळापासून आज तागायत करीत नाहींत. कोणत्या तरी एखाद्या देवाच्या देवळात जाऊन व देवाची पूजा करून जानवे देवा पुढें ठेवतात आणि उपनयनाचा म्हणजे मौंजेचा कांहीं एक विधी न करतां देवाजवळ ठेवलेलें जानवे देवाच्या साक्षीनें धारण करतात. त्यांना उपनयनाचे मंत्र व तंत्र शुद्धच माहित नसतात, इतकेंच नाहीं तर उपनयनाचें त्यांना फारसें महत्वही वाटत नाहीं. परदेशी भय्ये ब्राम्हण, गुजराथी पाणी भरणारे ब्राम्हण व मारवाडी भिक्षा मागणारे ब्राम्हण मेठमोठ्या शहरांत शेंकडों हजारो आहेत. त्यांचे जन्म पिढ्यानुपिढ्या दक्षिणेतच गेले आहेत. पण त्यांच्या मौंजीचे उत्सव आपण कधीं तरी पाहिले आहेत काय? याचा विचार करा. श्रीमान पंडित कथित प्रसंगीं हा विधि करितो पण बहुजन समाज मात्र हा विधि बहुत करून करीत नाहीं. पण त्या ब्राम्हणांना मनुस्मृती प्रमाणें व्रात्य किंवा शूद्र कोणीच मानत नाहीं. फक्त दक्षिणेतील क्षत्रियादि ब्राम्हणेतरांनीं किंवा दक्षिणी ब्राम्हणांनीं मौंज न केली तर त्यांना कधीं कधीं द्वेश बुद्धीनें व्रात्य म्हणतात. यावरून मनुस्मृतींत हें वचन दक्षिणी ब्राम्हणांनीं घुसडलें असून तें वचन पक्षपाती आहे इतकेंच नाहीं तर अशा पक्षपाती मनुस्मृतीची धार्मिक मान्यता फक्त महाराष्ट्रांतच ज्यास्त आहे. उत्तर हिंदुस्थानांत मनुस्मृतीला कोणी फारसा मान देत नाहीं अजूंही याच उदाहरणावरून दिसून येतें. तसेंच बौद्ध धर्माकडे लोकांचा ओढा राहूं नये म्हणून तत्कालीन लोकाकरितां ही एक आडकाठी मुद्दाम घातली असावी असेंही वरील प्रत्यक्ष प्रचलित भिन्न रूढीवरूनवाटतें.

वरील विवेचनावरून असें दिसून येते कीं प्रारंभीच्या आर्य कालापासून श्रीकृष्ण कालापर्यंत आर्य हा एकच वर्ण मानला जात होता. श्रीकृष्ण कालांत म्हणजे आज ३१०० वर्षांपुर्वीच्या सुमारास गुणकर्मावरून वर्ण मानण्याची प्रवृत्ति जन्मास आली. त्यानंतर बौद्ध कालीं गुणकर्मावरून वर्ण अशी मानण्यात येत असले तरी तें केवळ नांवापुरतेच होते. परस्पर भेदभाव मुळींच नव्हता. इतकेच नाहीं तर परस्पर रोटी बेटीव्यवहार होत होता. बौद्ध धर्माच्या ऱ्हासानंतर व हल्लींच्या भिक्षुकी हिंदुधर्माच्या जन्मापासून म्हणजे नवव्या शतकांतील आद्य शंकराचार्यापासून हल्लींच्या जन्मा-

वरून मानलेल्या वर्ण व्यवस्थेचें रुपांतर होत गेलें. सातव्या शतकांतही गुणकर्मांवरूनच वर्ण मानून परस्परांत रोटी व बेटी व्यवहार होत होता. याबद्दलचे ऐतिहासिक पुरावे वर दिलेच आहेत. नवव्या किंवा दहाव्या शतकापासून मात्र लाला विकृत रूप येऊं लागले व त्यानंतरच होतां होतां पुढें भिक्षुकी वर्चस्वाच्या काळांत जन्मावरून वर्णव्यवस्था मानण्यांत येऊं लागली व पेशवाई उर्फ सैतानशाहींत त्यावें फारच ऊग्र स्वरूप झालें. सारांश जन्मावरून मानलेल्या आजच्या प्रचलित वर्णव्यवस्थेचा जन्म ९०० किंवा १००० वर्षांपेक्षां जुना नाहीं.

जातीभेद.

१ जातीभेद आणि वर्णभेद केव्हां जन्मास आले.

२ जातीबंधनाचा गळफास व भिक्षुकी जुलूम.

---

१ सुमारे सहा हजार वर्षांपूर्वी भारतवर्षांत आलेल्या आर्य क्षत्रियांचा मूळचा आर्य धर्म, त्यानंतर सुमारे पांच हजार वर्षांपूर्वी म्हणजे प्रभु श्रीरामचंद्राच्या काळीं अस्तित्वांत आलेला क्षत्रियप्रणित वैदिक धर्म, त्यानंतर भारतकाळीं म्हणजे आज सुमारे ३१०० वर्षांपूर्वी क्षत्रिय कुलावतंस भगवान् श्रीकृष्ण परमात्म्यानें वेद आणि उपनिषदें यांचा सार काढून रचलेल्या भगवद्गीतेच्या रूपानें संस्थापिलेला गीता धर्म व त्यानंतर इ. सनाच्या पुर्वी ५६७ या वर्षी अवतीर्ण झालेल्या प्रातस्मरणीय गौतमबुद्धानें-क्षत्रिय राजपुत्रानें संस्थापिलेला बौद्धधर्म, बौद्धधर्माचा समकालीन महावीर क्षत्रिय; राजपुत्र यानें संस्थापिलेला जैनधर्म आणि इ. सनाच्या नवव्या शतकांत पंवार, प्रतिहार, चालुक्य उर्फ साळुंके आणि चव्हाण या चार कुळांच्या मराठा क्षत्रिय राजांनीं आपल्या संयुक्त सामर्थ्यानें आबूपर्वतावर नवीन पद्धतीचा यज्ञ करून व त्यानंतर लागलीच बौद्धधर्माचा पाडाव करून आद्य शंकराचार्यांच्या शांकरभाष्य उर्फ उत्तर मीमांसा नांवाच्या भगवद्गीतेवरील निष्कर्मवादी संन्यासवृत्तीच्या ग्रंथाधारें प्रस्थापित केलेला हल्लींचा हिंदु धर्म उर्फ रूढीप्रधान गुलामधर्म; याप्रमाणें गेल्या ५-६ हजार वर्षांत मूळच्या आर्य धर्माचीं पांच ठळक रूपांतरें झालेलीं आहेत. त्यांचें विस्तृत वर्णन हिंदुधर्माचीं रूपांतरें आणि दुष्परिणाम या प्रकरणांत याच ग्रंथांत दिलेलें आहे.

यापैकीं आर्य धर्म आणि वैदिक धर्म या कालांत तर आर्यांत वर्णभेदसुद्धां

मुळींच नव्हता मग जातीभेदासंबंधानें तर बोलावयासच नको, भारतकाळीं श्रीकृष्णानें अर्जुनास उपदेशिलेल्या भगवद्गीतेत मात्र:—

चातुर्वर्ण्य मया सृष्टं गुणकर्म विभागशः

असें वचन सांपडतें गुणकर्मावरून ह्मणजे ज्याच्या त्याच्या अंगचे गुण आणि त्याचें प्रत्यक्ष आचरण या दोन गोष्टींवरून प्रत्येक मनुष्य अमुक वर्णांत गणला पाहिजे असा स्पष्ट खुलासा मी केला आहे. असा श्रीकृष्णाच्या वरील वचनाचा अर्थ आहे. यावरून त्या काळांतही जन्मावरून वर्ण मानण्याची वहिवाट मुळींच नव्हती हिंगोष्ट उघड आहे. गुणावरून वर्ण मानण्याची छाया त्या काळांत पडूं लागली होती असे भगवंताच्या वरील वचनावरून स्पष्ट दिसते. अर्थात वर्णव्यवस्थेची छाया व ती देखील जन्मावरून नव्हे, अंगच्या गुणकर्मावरून ज्या काळांत प्रारंभी पडूं लागली होती त्या काळांत जातीभेद तर मुळींच नव्हता असा त्याच वाक्याचा स्पष्ट अर्थ होतो. त्यानंतर इ. स. पुर्वी सहाव्या शतकांत बौद्ध धर्म सुरू झाला. बौद्धधर्माचें सर्वांत अत्यंत महत्वाचें लक्षण झटलें ह्मणजे

सर्वं ब्रह्ममयं जगत्

म्हणजे अखिल सृष्टीच ईश्वरमय आहे. सबब मनुष्यमात्रांत उच्च नीच श्रेष्ठ कनिष्ठ वगैरे कृत्रीम भेदभाव मानूं नयेत. अर्थात जेथें वर्णभेद सुद्धां मानावयाचा नाहीं तेथें जाती भेदाची दाद कशी लागावी ? मुळींच नाहीं. हा बौद्धधर्म सुमारे १५०० वर्षे चालून अखेरीस इ. सनाच्या नवव्या शतकांत त्याचा मोड झाला. त्यानंतर हल्लींचा हिंदुधर्म ह्मणजे सोवळ्या ओवळ्याचा व उच्च नीचत्व किंवा श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा भेदभाव दर्शक हिंदुधर्म उर्फ रूढिप्रधान भिक्षुकी धर्म जन्मास आला आणि बौद्ध धर्माच्या पंधराशे वर्षांच्या दीर्घ काळांत अगदीं नामशेष झालेली उच्चनीचत्वाची वर्णव्यवस्था आणि तिचे अंडे बच्चे ह्मणजे जातीभेद वगैरे प्रकार तेव्हांपासून जन्मास येऊं लागले.

इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत मनुस्मृति करणारा मनुराजा होऊन गेला. मनुस्मृतींत चार वर्ण आणि कांहीं थोड्याशा जातींचें दिग्दर्शन केलेलें आहे पण त्याची अमलबजावणी व्यवहारांत झाल्याचा दाखला मिळत नाहीं. कारण त्या काळीं बौद्धधर्म जोरांत होता. मनूनें उल्लेखिलेल्या एकंदर ४५ जाती पैकीं १८ व्रात्यजाती म्हणजे आर्य ह्मणविणारा पैकीं उपनयन उर्फ मौंज न करणाऱ्या जाती आहेत. बौद्ध धर्माप्रमाणें मौंजबंधनाची अवश्यकता मुळींच नव्हती. मनुस्मृतीप्रमाणें द्विज वर्णांत गणले जाण्यास मौंजेची अवश्यकता मनुनें ठेविली होती. सबब मौंज करून बौद्धाचा हिंदु उर्फ द्विजकरून घेण्याची शर्त लागूं करून जे मौंज करून हिंदुंत येणार नाहींत ते संस्कारहीन व्रात्य म्हणजे शिक्षित समजले जावेत अशी सुट मनुस्मृतींत प्रथम जन्मास आली. तरी बौद्धधर्मी आणि वैदिक धर्मी यांच्यांत फारसा भेदभाव समाजांत मानला जात नसे. १८

त्यजाती मनूनें मानल्या त्या सोडल्या ह्मणजे बाकीच्या २७ जाती भिल्ल, चांडाळ, गोंड, कोरकू, पंचम वगैरे अनार्यांच्या बाकी राहतात त्याना दस्यु म्हणजे दास उर्फ शूद्र ह्मणत असत. यावरुन गोंड, कोरकू, भिल्ल, चांडाळ, पंचम वगैरे रानावनांत राहणाऱ्या, रानठी जाती शिवाय इतर जातींना मनूच्या काळीं शूद्र ह्मणत नव्हते असें दिसून येतें. शंकराचार्यानंतर कांहीं वर्षांनीं ह्मणज दाहावें शतकांत क्षत्रिय ब्राह्मण वैश्य व शूद्र या जन्मावरून मानलेल्या चार वर्णांची उर्फ चार मुख्य जातींची वाढ बौद्धधर्माच्या ऱ्हासामुळें व नवीनच जन्मास आलेल्या हिंदुधर्माच्या उत्कर्षामुळें जसजशी होऊं लागली व ते लोक आपआपलीं पहिलीं मूळचीं कुळें व गोत्रें स्मरणानें, विचारपुशीनें व कित्येक प्रसंगीं केवळ तर्कानें शोधून काढून त्यांत ते जसजसे सामील होऊं लागले तसतसे त्यांचे मोठमोठे संघ बनू लागले. अशा विशिष्ट संघापैकीं कांहीं लोक विशिष्ट प्रकारच्या धंद्यामुळें एक होऊन त्यांचे धंदेवार संघ बनू लागले. क्रमाक्रमानें असे धंदेवार अनेक संघ निर्माण होऊं लागले. आचार साधर्म्यानें त्यांच्यांत परस्पर शरीर संबंध घडून येत असत. कालांतरानें निरनिराळ्या संघांच्या धंदेवार जाती सहजच बनत गेल्या.
(विष्णुस्मृति अध्याय २६ सूत्र ३–४ आणि पारस्कर गृह्यसूत्र अध्याय १ कंडिका ४ सूत्र ११ पहा.)

धार्मिक आणि सामाजिक दृष्टीनें विचार केला तर हल्लीं चालू असलेला रूढी प्रधान हिंदुधर्म उर्फ श्रेष्ठ कनिष्टत्वाचा निष्ठुरी धर्म इ. सनाच्या नवव्या शतकांत आद्य शंकराचार्यापासून जन्मास आला. त्याचें सप्रमाण वर्णन हिंदुधर्म आणि त्याचीं रूपांतरें या प्रकरणांत केलें आहे. हिंदु हा शब्दच वापुर्वीच्या कोणत्याही ग्रंथांत सांपडत नाहीं. मग हिंदुधर्म किंवा हिंदुस्थान हे तज्जन्य शब्द कोठून सांपडणार ? हल्लीं चालू असलेले जन्मावरून मानलेले चार वर्ण आणि जाती यांचा जन्म जरी दहाव्या शतकापासून झाला तरी बौद्ध धर्माच्या परंपरेच्या संस्कारामुळें हे वर्ण किंवा ह्या जाती आतांच्या प्रमाणें परस्परापासून विलग झालेल्या नव्हत्या किंवा त्यांच्यांत पोटजातीही निर्माण झाल्या नव्हत्या. सातव्या शतकांत ह्युएनत्संग नांवाच्या चीनी प्रवाशानें हिंदुस्थानांत प्रवास करून येथील जाती व इतर वस्तुस्थितीचें वर्णन लिहून ठेवलें आहे. त्या वेळीं फक्त सातच मुख्य जाती हिंदुस्थानांत होत्या असें तो ह्मणतो. नवव्या शतकांतनंतर या सात जातींत भर पडूं लागली. नवीन जाती व पोटजाती निर्माण होण्याचें दुसरें एक मुख्य कारण असें आहे कीं बौद्धधर्मांतून लोक भराभर नवीन हिंदुधर्मांत येऊं लागले आणि निरनिराळ्या पौराणिक देवतांची उपासना करू लागले. स्थलपरत्वें या पौराणिक देवतांत आणि त्यांच्या उपासनेंत साहाजिकच फरक असत. त्या पोट भेदामुळें कुलदेवतांच्या कुळाचारा प्रमाणें मुख्य जातींत पोटभेद निर्माण होऊं लागले. बौद्ध लोक जातीभेद मुळींच मानत नसत आणि ते मद्यमांसही सेवन करीत नसत. बौद्धधर्माचें रूपांतर नवीन हिंदुधर्मांत होऊं लागल्यामुळें हिंदुधर्मांतील आचारधर्म, विचारधर्म, देव-

लाधर्म, पूजनधर्म आहारधर्म, विहारधर्म, सोवळाधर्म, ओवळधर्म, पवित्रधंदे, अपवित्रधंदे, इत्यादि नवीन भिक्षुकी प्रकारास आणि रूढीस ऊत आला आणि नवीन रूढीस अनुसरून हिंदु लोकांचे निरनिराळे संघ बनू लागले. तसेंच परस्पर संघटणाची व प्रवासाचीं साधनें त्याकाळीं उपलब्ध नसल्यामुळें १५-२० कोसाच्या अंतरावरील लोकांचे दळणवळण बंद पडून प्रांतपरत्वें, स्थानपरत्वें व देशपरत्वें एकाच जातीचे निरनिराळे संघ व त्यांचे निरनिराळे रीतीरिवाज पडून ते परस्परापासून दळणवळणाच्या अभावी भिन्नता पावूं लागले. कालांतरानें हे संघ मोठे होऊन त्यांना जाती हें नांव पडूं लागलें. ज्याचा जो धंदा त्याची ती जात बनू लागली तरी आचार साधर्म्यानें त्यांच्यांत परस्पर रोटी आणि बेटी व्यवहार बरेच दिवस पर्यंत चालू होते. पुढें हळूहळू दळणवळणाच्या अभावीं बेटीव्यवहार बंद होऊन रोटीव्यवहार चालू राहिला व त्यानंतरच्या २००-३०० वर्षांनीं धंद्यावरून स्वतंत्र जाती रूढीप्रमाणें कायम होऊन त्यांच्यातील परस्पर रोटीबेटी व्यवहार हळूहळू बंद होत गेले. धंद्यावरून जाती कशा पडल्या त्याची कांहीं थोडीं उदाहरणें नमुन्या करितां येथें देतो. उदाहणार्थ:—यजमानाच्या घरची भिक्षा घेऊन निर्वाह करणारे ते भिक्षुक उर्फ भट्ट; रंगाचा धंदा करणारे ते रंगारी, शिवण्याचा धंदा करणारे शिंपी, न्हाळ घालणारे न्हावी, हजामती करणारे हजाम, महालांत नौकरी करणारे ते महाली उर्फ म्हाली, तांबूल (विड्याचीं पानें) विकणारे ते तांबोळी, माळाचा-वाडीचा-वर्गीचाचा धंदा करणारे ते माळी, कुणबीकीचा (शेतीचा)धंदा करणारे ते कुळंबी, कुंभ (मातीचीं मांडी) कुंभाराचा धंदा करणारे कुंभार, चर्म उर्फ चांब म्हणजे चांबडे कमावणारे ते चांभार उर्फ चर्मकार, जीन (खोगीर) करणारे ते जिनगर, चित्र करणारे ते चितारी, तेलाचा धंदा करणारे तेली, कोष म्हणजे कपडा विणणारे ते कोष्टी, पारध करणारे ते पारधी, जाते वगैरे टाकणारे टाकणकार, लोह घडविणारे लोहार, सोनें घडणारे सोनार, लाकडाचे सुतबंद काम करणारे ते सुतार, तांब्याचें काम करणारे तांबटकर, पट म्हणजे रेशमी वस्त्र करणारे ते पटवी, गाई म्हशी म्हणजे गौ पाळणारे ते गोपाळ उर्फ गोळी, पोटांतील कोळ म्हणजे बारीक तंतुचें जाळें करून त्यांत फिडे धरणाऱ्या प्राण्याला कोळी म्हणतात त्या कोळ्या प्रमाणें विणलेलें जाळें समुद्रांत टाकून त्यांत जलचर प्राणी धरणाऱ्या जातीचे लोक ते कोळी. नावा चालविणारे ते नावाडी मरेपर्यंत लढाईत मागें न हटणारे शूरवहादर ते मरहटे उर्फ मराठे, क्षत् म्हणजे जखम, संकट, त्या क्षतापासून तारणारे ते क्षत्रिय, बहुजन कल्याणार्थ धान्य उत्पन्न करण्यासाठीं शेतात-क्षेत्रांत रममाण होणारे ते क्षेत्रीय. ब्रह्म म्हणचे ईश्वर त्या ब्रह्मस्वरूपी एकरूप झालेले म्हणजे एकनिष्ठ ईश्वरभक्त ते ब्राम्हण. वाण म्हणजे वस्तु, अर्थात हरएक वाणांचा धंदा करणारे ते वाणी; शूद्र म्हणजे क्षूद्र, कवडीमोल, गुलाम, दास इत्यादी. याप्रमाणें धंद्यावरून अनेक जाती बनल्या व पुढें त्यांच्यांत पोटजाती निर्माण होऊन जातींचें जाळें वाढत गेलें. यावरून स्पष्ट दिसतें कीं हल्लीं प्रचलित असलेल्या

जाती म्हणजे धंदे दर्शक वर्ग, असा त्याचा अर्थ आहे. वास्तविक एक हजार वर्षांच्या पूर्वी हल्ली सारखा कडक जातीभेद नव्हता. जाती ईश्वर निर्मित नसून वर दर्शविलेल्या अनेक कारणामुळें मनुष्यानें पाडलेले हे कृत्रीम भेद आहेत. ज्यांचे वंश, गोत्र, उपनांवें, आडनांवें, कुळें, कुळाचार, आचार, विचार इत्यादी मुख्य मुख्य धार्मिक व सामाजिक रीतीरिवाजांचा मेळ साधारणपणें पटतो अशा निरनिराळ्या सर्व जातींचे लोक मूळचे एकाच जातीचे आहेत. पण वर दर्शविलेल्या अनेक कारणामुळें त्यांच्यांत गेल्या आठ नऊशे वर्षांत थोडथोडा फरक पडतां पडतां ते परस्परास विसरून केवळ भिक्षुकी रूढीमुळें ते आज अगदी स्वतंत्र जातीचे मानले जात आहेत.

श्रीरामचंद्राच्या काळीं एका शंबुक नांवाच्या किरातानें तपश्चर्या केल्यामुळें त्या पापानें ब्राम्हणाचा मुलगा वारला; सबब त्या किरातास रामानें देहांत प्रायश्चित्त दिलें अशी कथा रामायणांत आहे. पण त्या कथेचें सप्रमाण खंडण आम्ही वर्णव्यवस्था या प्रकरणांत केलेलें जाहे. त्यावरून त्या काळीं जातीभेद मुळींच नव्हता असें निर्विवाद सिद्ध होतें.

वर दर्शविल्याप्रमाणें इसवी सनाच्या नवव्या किंवा दहाव्या शतकापासून जातीभेद व जन्मावरून वर्णभेद मानण्यास अंधुक स्वरुपांत सुरुवात झाली. त्यानंतर १००—२०० वर्षेपर्यंत हा भेदाभेद साम्य स्वरूपांतच होता. पुढें हा भेदा भेदाची वाहिवाट जसजशी जुनी होत गेली व ती लोकांच्या पचनी पडत गेली तसतसे त्या भेदाला तीव्र व तुटकपणाचें स्वरूप येत गेलें. हा राष्ट्रघातकी भेदभावाचा, आपसात दुही माजविणारा व परिणामी अखिल हिंद पुत्रांस दुसऱ्याचे गुलाम बनविणारा जाती-भेदाचा पाया स्थापन करण्याचें पुण्य आद्य शंकराचार्याच्या पदरांत बरोबर पडतें. याचें सविस्तर वर्णन **हिंदुधर्माचीं रूपांतरें व दुष्परिणाम** या प्रकरणांत केलें आहे. त्याच प्रमाणें वरील गोष्टीचा भरपूर पुरावा (India Craftman by Anand Koomarswamy.) या नांवाच्या ग्रंथांत आहे. तो पहा.

तरी एक गोष्ट येथें अवश्य नमूद करण्यास राखी आहे ती ही कीं, इ. सनाच्या नवव्या शतकांनंतर कित्येक शतकें जातीभेद अवनतीला पोंचला नव्हता. परस्पर जाती जातींत रोटी व्यवहार चालूंच होता. परस्पर जातींत बेटी व्यवहार मात्र हळूहळू बंद होण्याची सुरुवात झाली होती. तरी त्याला देखील कडक स्वरूप आतांच्या सारखें आलेलें नव्हतें. पोटजाती तर मुळींच नव्हत्या. धार्मिक ज्ञान संपादन करणें व धार्मिक संस्कार करणें हे आर्यांचे दोन जन्मसिद्ध हक्क सर्वांना समानतेनें उपभोगण्यास मिळत असत. त्यांत पक्षपात तिळमात्र होत नसे. धार्मिक ज्ञान संपादनाचा व धार्मिक संस्कार करण्याचा मक्ता ब्राम्हणासारख्या एखाद्या विशिष्ट जातीनें बळकाविलेला नव्हता. (विश्वब्रम्ह कुलोत्साह संग्रह ४ पृ. १०) आणि [मध्ययुगीन भारत भाग दुसरा पृ. ४-५ पहा.]

जातीविषयक नांवाचा ग्रंथ, ज्यांत निरनिराळ्या जातींचें वर्णन आहे तो ग्रंथ मुसलमानी अमल हिंदुस्थानांत सुरू झाला त्याच्या अगोदर लिहिला आहे. यावरून जाती मानण्याचा प्रघात एक हजार वर्षांच्या आंतील सुरू झाला असे दिसतें.

जातीची उत्पत्ति कशी झाली व त्यांचे प्रकार:—

इ. स. ६६४ मध्ये पहिल्यानें मुसलमान सिंध प्रांतांत मुलतान पर्यंत येऊन गेला पुढें इ. स. ७१५ मध्ये महमद कासीम नांवाच्या सरदारानें सिंधप्रांतावर स्वारी केली, पण त्यांचे पाय हळू हळू टेकले गेले नाहींत. इ. स. १० वे शतकापूर्वी सिंधुनदाच्या अलीकडे एकही मुसलमान आढळत नव्हता. दहाव्या शतकापासून म्हणजे आज एक हजार वर्षापूर्वीपासून पुढें परधर्मियांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या. त्यामुळें सर्वांना समानतेच्या न्याय्य मार्गानें शास्त्रविचारा क्षत्रियवर्ण परचक्र निवारणांत गुंतला गेला. धार्मिक बाबींत लक्ष घालण्यास त्यांना पुरेसा अवसर मिळेनासा झाला. ही संधी साधून हा धर्माध्यक्षत्वाचा हजारो वर्षांपासून परंपरेनें अधिकारानें चालत आलेला मूळचा क्षत्रियाचा अधिकार क्षत्रियांच्या आश्रयानें राहणाऱ्या ब्राह्मणांनी ही परचक्राची संधी पाहून हळूहळू बळकाविला. क्षत्रिय राजे आपले अधिकार हरवून बसलेले ना देखील धर्माच्या खेऱ्या भुलथापा देऊन, बराचा अलीकडच्या काळात म्हणजे अंदाजे बाराव्या व तेराव्या शतकांत ब्राह्मणांनीं आपलें वर्चस्व थोडें थोडें स्थापित केलें. कारण क्षत्रिय वर्ग या काळांत मुसलमानांशी लढण्यांत गुंतल्यामुळे धर्मसूत्रें क्षत्रियांच्या अज्ञानानें ब्राह्मणाच्या ब्राह्मणाच्या हातांत पडलीं. पुढें पुढें म्हणजे पेशवाईत म्हणजे ब्राह्मणाच्या चौदाव्या काळांत अस मिश्रुकी मत जाहीर केलें की कलियुगांत ब्राह्मण व शूद्र म्हणजे ब्राह्मणेतर हे दोनच वर्ण राहिले आहेत. क्षत्रिय व वैश्य हे वर्ण पूर्णपणें नष्ट झाले. पेशवाई काळांत ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांचीं यज्ञोपवितें हिरावून घेतलीं. जानवें घालणाऱ्या क्षत्रिय वैश्य वर्णाच्या लोकांच्या अंगावर लोखंडी सलईचे डाग देऊन तापलेल्या सलईचें कायमचें जानवें त्यांच्या शरीरावर डागून बसविलें. ब्राह्मणाशिवाय इतरांना वेद म्हणजे धर्मग्रंथ वाचण्याचा अगर ऐकण्याचा अधिकार नाही असें जाहीर करून वेद ऐकणाऱ्या ब्राह्मणेतरांच्या कानांत शिसें तापवून ओतलें आणि वेद वाचणारांच्या जिव्हा कापून टाकल्या. ब्राह्मणेतरांची सावली ब्राह्मणाच्या अंगावर पडली तर त्या सावलीनें देखील ब्राह्मण बाटत असें सक्त रस्त्यानें ब्राह्मणेतरास ब्राह्मण भेटला तर ब्राह्मणेतराने खालीं बसून ब्राह्मणाला नमस्कार करावा; तसें न केलें तर त्याला धरून बांधून फटके मारीत, त्याच्या अंगावर तापलेले कढत तेल ओतावें. असा कायदा पेशव्यांनीं केला होता. अशुद्र जातीचा जो रस्ता ब्राह्मणाच्या पायाच्या विटाळानें बाटत असे सबब त्यांनीं आपल्या पायखान्याच्या गल्लीकुचींतून जावें. हमरस्त्यांतून जाऊं नये. कदाचित जाणें भागच पडलें तर बाटलेला रस्ता लागलीच झाडून साफ करण्यासाठीं व आपलीं पावलें उमटूं देण्याच्या—

करितां त्यानें आपल्या कमरेला एक साडू बांधून तो या रस्त्यावरून ओढीत न्यावा. मद्रास इलाख्यांत वैकोम येथें यावद्दल हल्ली [illegible] नये. थुंकण्यासाठी गळ्यांत एक मडकें बांधावें. ब्राह्मणास अगर ब्राह्मणीस ब्राह्मणेतर जातीच्या कोणत्याही स्त्रीपुरुषानें स्पर्श करूं नये. मद्रास इलाख्यांत वैकोम येथें अलीच भिक्षुकी जुलुम [illegible] वाढू लागले. त्या विरुद्ध अस्पृश्यांचा सत्याग्रह सुरू झाला. महात्मा गांधींनी अस्पृश्य [illegible] भिक्षुकी जुलुम बंद केला. ब्राह्मणाप व त्यांचा [illegible] विटाळ होतो. ही विटाळाची कल्पना ब्राह्मणांच्या शिवाय हल्ली देशील पाळतात. म्हणजे सर्व ब्राह्मणेतरांना हल्ली देखील ते अस्पृश्य मानतात. इंग्रजी राज्यांत ब्राह्मणांना सार्वजनिक जागी ब्राह्मणेतरापेक्षां जास्त कांहीं मान मिळत नाहीं म्हणून त्यांनीं आपला हा अधिकार आतां आपला बायकाकडे सोपवून दिला आहे. अशाप्रकारें पेशवाई उर्फ सैतानशाहींत ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांना जनावरा पेक्षां देखील नीच प्रकारांनीं वागविले आणि त्यांना अनुचित छळ केला व मनुस्मृतींत व पुराणांतही तदनुसार द्वेषमूलक खोटीं तत्वें घुसडून दिलीं. कारण धर्माधिकारीपणाची कलम त्यांचेच हातीं होतीं. (मराठेशाही व इंग्रजी हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास पृ. ४९८ पहा) पुण्यप्रताप श्रीशिव [illegible] जातीद्वेश किंवा ब्राह्मण ब्राह्मणेतर हा द्वेषमूलक भेदभाव फारसा कडक मानला जात नसे. पण पेशवाईच्या अलीकडच्या काळापासून ब्राह्मण लोक ब्राह्मणेतरांना कुत्र्या मांजरापेक्षां देखील हलके मानून त्यांचा अपमानयुक्त द्वेष समाजांत पद्धतशीर करूं लागले. तेव्हांपासून जातीद्वेष किंवा ब्राह्मण ब्राह्मणेतर हा भेदभाव अत्यंत तीव्र झाला. हल्ली हिंदुस्थानांत हिंदुंच्या ३००० जाती आहेत. ह्या पैकीं ब्राह्मणांच्या १८८६ व क्षत्रियांच्या ५९० आहेत असें सर विल्यमहंटर यांच्या (Indian Empire) इंडियन एम्पायर नामक ग्रंथांत लिहिले आहे. यावरून हल्लीच्या राष्ट्रघातकी जातीद्वेषाचे व ब्राह्मण ब्राह्मणेतर या भेदभावाचें मुख्य श्रेय भिक्षुकशाही उर्फ सैतानशाहीकडे आहे तसेंच हल्लीच्या शतकापासून धर्म संस्थापक, धर्म संवर्धक व धर्म संरक्षक अर्थात धार्मिक व सामाजिक आणि राजकीय सत्ताधारी क्षत्रिय वर्ग परचक्राशीं सामना करण्यांत गुंतल्यामुळे त्यांना त्यांच्या आश्रित ब्राह्मणवर्गाकडे धर्मग्रंथ रक्षणाचे काम दिवाणजीच्या नात्यानें सहजच सोपविणें भाग पडलें. तेव्हांपासून ब्राह्मणांनीं आपल्या उदार, अन्नदात्या यजमानांशीं निमकहरामी करून हिंदुंच्या धर्मग्रंथात नवीन प्रक्षिप्त भाग घालून ब्राह्मणांचा दर्जा वाढविण्याचा आणि ब्राह्मणेतरांचा दर्जा घटविण्याची अन्याय्य खटपट केली. त्यामुळें तेव्हांपासून हिंदुधर्मातील भेदभावास ऊत येऊन या आधुनिक काळांतच म्हणजे गेल्या ८-१० शे वर्षांतच जातिभेदाचें विकृतस्वरूप अत्यंत तीव्र होत गेले व त्यामुळेंच आपसात फूट पडून बुळच्या स्वातंत्र्यप्रिय आर्यांचें स्वातंत्र्य नष्ट होऊन त्यांना आज शूद्र म्हणजे गुलाम बनावें लागलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. मुंबई.
क्षत्रिय कुल ..... नं: १००

प्रकरण २५ वें.

क्षत्रियांचे धार्मिक व सामाजिक अधिकार.

१ सातारच्या छत्रपतींस पेशव्यां- ५ इ. स. १८३२ सालची जाहिर सभा.
२ या सभेंत मान्य झालेले मुख्य ६ मं. ४ उदपुरच्या राणाजीचें मान्यतापत्र.
५ इ. स. १८३५ सालची धार्मिक सभा. ६ या सभेंत मंजूर झालेले ठराव.
७ इ. स. १९०५ सालची धार्मिक चळवळ ८ इ. स. १९०६ चें राणाजीचें दुसरेंपत्र
९ श्रीशिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय. १० श्रीशाहु क्षात्रिय वैदिक विद्यालय.
११ क्षात्र जगद्गुरुची नवीन योजना. १२ छत्रपतीचा राज्याभिषेक आणि विवाह.

पहिले शाहू छत्रपति महाराजांचे ज्येष्ठ पुत्र छत्रपति श्री. प्रतापसिंह महाराज हे इ. स. १८०८ सालीं सातारच्या गादीवर बसले. ही वेळ रावबाजींच्या अगदी मरमराटीची असून नानाफडणेसाची जागा त्रिंबकजी डेंगळे यांनीं पटकाविली होती. या पेशव्याच्या कारकिर्दीत सातारच्य[illegible] नवी दुर्दशा झाली कीं ती ऐकून ज्याच्या डाळयास पाणी येणार न[illegible]ाप ! वासोटा किल्यांत सातारचे प्रतापसिंह महाराज यांस त्यांच्[illegible] पेशव्यानें कैदेत ठेविलें होतें. वासोट्याच्या किल्लेदारास बाजीराव पेशव्[illegible] हुकूम होता कीं चालू पासपुर्तीत किल्ला इंग्रजांच्या हातीं जाण्याची वेळ आल्यास प्रतापसिंह महाराज व राजघराण्यातील इतर माणसें यांस ठार मारावें पण इंग्रजांच्या हातीं लागू देऊ नये. (ग्रांडडफचा इतिहास बुक ३ पृ. ३४४ पहा.) पण इंग्रजांनीं किल्ला घेतला व प्रतापसिंह महाराजांस पुनः गादीवर बसविलें इ स. १८३० सालीं त्यांना राज्याचा पूर्ण मुखत्यारी मिळाली. त्यानंतर लवकरच महाराजांनीं एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांत पेशव्यांनीं त्यांना कैदेत टाकून दुःखें व त्यांनी [illegible]मुळें केले कसायासारखे हाल हाल केले याचें अंगावर कांटे येण्यासारखें वर्णन प्रसिद्ध झालें होतें. यासारखा अधिकार मिळे हातीं आल्यावर प्रतापसिंह महाराजांनीं क्षत्रियांच्या अरिष्टनिवारणार्थ व त्यांच्या धार्मिक हक्काबद्दल ७-८ वर्षें अत्यंत परिश्रम करून सर्व वादग्रस्त मुद्यांचा निकाल पंडितांकडून लावून घेऊन त्यांत मराठा जातीचें व कायस्थ प्रभु जातीनें क्षत्रियत्व सर्वमान्य करून घेतलें. ही गोष्ट इ. स १८३० सालीं झाली. वे शा. संपन्न विद्वान सखाराम उर्फ आबासाहेब पारसनीस ना. का. प्रभु या विद्वान ग्रंथकारांनीं क्षत्रियांतर्फे मुखत्यारपत्र दिलें होतें. ब्राह्मणांतर्फे वे. शा. स. राघवाचार्य गजेंद्र गडकर या अत्यंत विद्वान पंडितांस मुख-

त्यापन्न होतें [illegible] हेते. काशी-
रूच्या राजवाड्यांत विद्येचे [illegible] ळी [illegible] तोडी वाद चालू होता. ज्या दिवशी
पंचांचा ठराव व्हावयाचा होता त्या. दिवशी सर्व महाराष्ट्रांतील हजारो विद्वान ब्राह्मण
मंडळी जमली होती. निकालाच्या वेळीं कदाचित क्षत्रिय पक्षाभिमानी पंडितांचा जा-
स्त मान होईल तो होऊं नये म्हणून महाराज स्वतः नागव्या तलवारीनें राजवाड्याचे
बंदोबस्त करीत होते. महाराजाच्या या आत्मोन्नतीच्या कृत्याबद्दल पुण्याच्या भिक्षुक-
शाहीनें त्यांचा सेनानी ब्रेश सुरू करून मराठेशाही बुडविण्याची उलट्या काळजाची.
पातळयंत्री कारस्थानें रचलीं आणि सत्ताधारी इंग्रजांच्या आश्रयानें सातारची मराठे-
शाही बुडविली. मराठेशाहीचा खून या प्रकरणांतही साग्र हकीकत दिली आहे. ती
वाचली म्हणजे भिक्षुकशाही बद्दल अंगावर शहारे येतात! अखेरीस पंडितांच्या
समेत वाद होऊन खाली दिलेले सिद्धांत दोन्ही पक्षांच्या सर्व पंचांस मान्य झाले:-

मान्य झालेले सिद्धांत.

(१) परशु रामानें २१ वेळ निःक्षत्रिय पृथ्वी केल्याबद्दलची कथा साफ खोटी आहे.

(२) आचाराप्रमाणें कर्णाट जाती ठरत नाहींत.

(३) मांस भक्षण करणें हा क्षत्रियांचा धर्मच आहे. त्यामुळें त्यांस वैदिक कर्म करण्यास कांहींच हरकत येत नाहीं.

(४) सोवळें ओवळें पाळणें हा क्षात्र धर्म नव्हे. कारण संकटाशीं सामना देण्याकरितां क्षत्रियांनीं सदा सशस्त्र आंग पोषाखानें सज्ज राहणें हाच त्यांचा खरा धर्म आहे.

(५) क्षत्रियांनीं शूद्रान्न भक्षण केलें तरी त्याच्या वैदिक कर्मांत बाध येत नाहीं.

(६) ज्या क्षत्रियांच्या घरीं कांहीं कर्मांचा लोप झाला असेल त्यांच्या वैदिक कर्माच्या अधिकारास त्यामुळें मुळींच बाध येत नाहीं.

(७) कोणत्याही क्षत्रियांस वेदोक्त श्रावणीचा व इतर वैदिक कर्मांचा अधिकार आहे.

(८) कलींत आतां क्षत्रिय नाहींत असें म्हणणारे लोक अधर्मी यवन समजावे.

(९) सातारा, नेंदो, तंजावर, कानडा, करवीर येथील राजघराण्यांचे मुळ एकच असून तेथें ऋग्वेदावरून कर्म चालतें.

(१०) नर्मदे पलीकडे क्षात्रयांकडे यजुर्वेदावरून कर्म चालतें. उदेपूरास अशीच वहिवाट आहे सातारास यजुर्वेदीय कर्म महाराजांनीं सुरू करावें.

(११) क्षात्रियांस मातुल कन्या विवाह वर्ज नाहीं. (मात्रची मुलगी करावी.)

(१२) क्षत्रियांत एकापेक्षां अधिक भोजन करण्याची चाल आहे ती वैदिक धर्माला धरूनच आहे.

(१३) क्षत्रियांची शहाणव कुळी योग्य आहे पण पंचकुळी व सातकुळी हे भेद द्वेष्ट्या लोकांनीं आपसांत फूट पाडण्या करितां नवीन निर्माण केले आहेत.

(१४) दक्षिणेतील महाराष्ट्र क्षत्रियांची उदमाजे त्यांची माहिती आणि भोसले, शिर्के, महाडिक, मोहिते, गुजर, अहिराव, पालकर, खानविलकर, माने, घाटगे, जाधव

इत्यादि क्षत्रियांच्या ९६ कुलांची गोत्रें व प्रवर यांचा निर्णय आणि उत्तर हिंदुस्थानांतील नांवें व दाक्षिणी नांवें पडण्याची कारणें यांचा निर्णय लावण्यांत आला.

(१५) क्षत्रियांचीं व शूद्रांचीं उपनांवें सारखीं असलीं तरी ओळख पटण्याचीं साधनें व मार्ग अनेक आहेत. ब्राह्मणांची व शूद्रांचीही उपनांवें एक आहेत पण ओळख पटण्याचे त्यांचेंही स्वतंत्र मार्ग आहेत.

(१६) वैदिक धर्मतत्वा विरुद्ध चालू असलेल्या रूढी मान्य नाहींत. सबब रूढी मोडल्या मुळें क्षात्र धर्मास बाध येत नाही.

(१७) उत्तर हिंदुस्थानांत क्षत्रियांत कांहीं श्रीमान लोक मुलाची मौंज बालपणीं करतात पण बहुतेक लोक लग्नाचे वेळीं जानवें धारण करण्याचा विधि करून जानवें धारण करतात. व कोणी मुळींच करीत नाहींत. पण त्यामुळें क्षात्रधर्मास बाध येत नाहीं किंवा त्याच्या ज्ञातींत उच्च नीचपणाचा फरक मुळींच मानला जात नाहीं. हाच नियम दाक्षिणेतही लागू आहे.

(१८) उत्तर हिंदुस्थानच्या ब्राह्मणांत देखील मौंजीसंबंधानें वरीलप्रमाणेच हल्लीं वहिवाट सुरू आहे.

(१९) मराठा, रजपूत, प्रभु इत्यादि जातींचे लोक व त्यांच्याशीं रोटी बेटी व्यवहार परंपरेनें चालू असलेले लोक हे आर्य क्षत्रियांचेच वंशज आहेत.

(२०) धर्म संस्थापक, धर्मसंरक्षक व धर्मसंवर्धक हे सर्व अधिकार क्षत्रियांचे आहेत. हे धार्मिक अधिकार ब्राह्मणांचे मुळींच नाहींत. याशिवाय आपलीं कांहीं किरकोळ धार्मिसंबंधानें उभयपक्षांच्या एकमतानें ठराव मंजूर झाले. (हिंदुधर्माची रूपांतरे व दुष्परिणाम या प्रकरणांत याचें सविस्तर वर्णन दिले आहे तें पहा.)

याप्रमाणें क्षत्रिय व ब्राह्मण या दोन्ही पक्षाच्या शेकडों पंडितांच्या मान्यतेनें वरील ठराव मंजूर झाल्यानंतर श्री प्रतापसिंह महाराजांनीं महाराष्ट्रांतील सर्व पंडितांचीं, शंकराचार्यांचीं व थोर पुरुषांचीं मानपत्रें आणविलीं व शेवटीं या पंडित मान्य सभेची हकीकत लिहून व त्यावर उभयपक्षांच्या सर्व शास्त्री पंडितांच्या सह्या घेऊन ते सर्व कागद पत्र आणि सातारच्या घराण्याची वंशावळ बरोबर देऊन शिवनंद शास्त्री व ठाकुरदास यांस तत्कालीन इंग्रज सरकारचे रेसिडेंट साहेब यांचे मार्फत उदेपूरच्या राणाजीस माहिती देण्याकरितां व तिकडील सर्व माहिती आणण्याकरितां उदेपूरास पाठविले होतें. तेथें उदेपूरच्या महाराणाजीचीं व त्या दरबारच्या पंडितांचा या गोष्टीस मान्यता मिळाली. सातारचे राजवंशाची वंशावळ राणाजीच्या वंशावळींत दाखल करावयाची गेली, इतकेंच नाहीं तर त्याचा दत्तक सातारच्यासही राहावा म्हणून सदरहू वंशावळींचा नक्कल राणाजींचे आज्ञेवरून घेऊन तींवर कंपनी सरकारचा शिक्काही घेतला. (सिद्धांत विजय परिशिष्ट ४ पान ७९ व परि ९ पान १३१ पहा.)

त्यावेळीं उदेपूरच्या महाराणाजीनीं सातारच्या प्रतापसिंह महाराजास पत्र

लिहून पाठविले. त्या पत्रांत ते लिहितात:—

" आम्हीं व आपण एकाच वंशांतील असून व्यवहारांत कांहीं एक भेद न हो; म्हणून आम्ही आपले शुभचिंतन करीत असतों. इकडे वैदिक कर्माधिकारी क्षत्रिय पुष्कळ असून फक्त दक्षिणी ब्राह्मण मात्र क्षत्रियांचा अभाव म्हणतात, यावरून त्यांचे ठिकाणीं मत्सर बुद्धि वास करीत आहे असें म्हटलें पाहिजे. "

यानंतर उदेपुरच्या ग्रंथ भांडारांतील प्राचीन ग्रंथ पाहून राणाजींचें घर लिहिण्याविषयीं पत्र बाळाजी महाराजांनीं इ. स. १८३१ सालीं महाराष्ट्रांतील सूर्यवंशी व चंद्रवंशी मराठा क्षत्रियांनीं आपली जोरदार सभा भरविली आणि क्षत्रियांचे वैदिक हक्क चालू व कसे हे खुलासेवार पाहून त्या संबंधीं त्यांनीं निर्णय केले.

याप्रमाणें क्षत्रियांचे अधिकार साताऱ्या येथील पंडितमान्य राजसभेनें मंजूर केलेले ठराव संक्षिप्त सर्व ठिकाणीं मान्य झाल्यानंतर इ. स. १८३५ सालीं क्षत्रिय मराठा मंडळीच्या सभेनें होऊन गेलेले असें ठरले कीं:—

" दक्षिणी ब्राह्मण, अथवा मराठ्यांचे घरीं मेलेले कर्म करण्यास कधीं कधीं नाकारतात तर त्याची गरज मुळींच ठेवूं नये उलट हिंदुस्थानांतून आपल्या खात्रीचे ब्राह्मण आणून त्यांचे कडून धर्म कर्म चालू करावे किंवा क्षत्रियांस पूर्ण वेदाधिकार असल्यामुळें स्वतःचे धर्म कार्य स्वतः क्षत्रियांनींच करावीं अगर इतर क्षत्रियांकडून करून घ्यावीं. दक्षिणी ब्राह्मण तर मुळींच बोलावूं नये. तसेंच उदेपूरवाले व आपण एकच असल्यामुळें त्यांचा आपला रोटी व्यवहार बेटी व्यवहार चालू करावा. परंतु हा व्यवहार तुटण्यास चालीच बंद झाल्यामुळें राणाजी व त्यांचे आप्त स्वकीय जर आपणाशीं एकपात्र करतील तरच वरील प्रमाणें रोटी बेटी व्यवहार करावा. पण एकपात्र जर करीत नसतील तर शरीर संबंध करूं नये ही प्रतापसिंह महाराजांची कामगिरी झाली.

इतकें झालें तरी कोल्हापूरचे छत्रपति श्रीमंत शाहू महाराज (दुसरे) यांचे कारकीर्दीत पुण्येश्वर भिक्षुकशाहीने पुनः कट कारून राजोपाध्याय गांवीं राजवाड्यांत वैदिक कर्म करण्याचें नाकारलें. तेव्हां शाहू महाराजांनीं राजोपाध्यायास कामावरून बरतर्फ करून त्यांची राजोपाध्यायपणाची जाहगीर जप्त केली. ही गोष्ट इ. स. १९०५ सालीं झाली. इतके झाल्यावर करवीर पीठस्थ शंकराचार्यांनें श्री. शाहू महाराजांचे व त्यांच्या आप्त स्वकीयांचें क्षत्रियत्व मान्य करून तसें जाहीर केले. पण राजोपाध्यायाची पुरी खाड मेल्याकरितां महाराजांनीं जहागीर जप्तीतच कायम ठेविली ती पुनः सोडलीच नाहीं यावेळीं श्री. छत्रपति शाहु महाराजांनीं क्षत्रियत्वासंबंधानें उदेपूरच्या राणाजींशीं पत्रव्यवहार केला. त्यावर उदेपूरच्या राणाजीचें हिंदित उत्तर आलें. तें सिद्धांत विजय परिशिष्ट ११ पृ १५२ पत्र नं. ५ यांत छापले आहे तें असें:—

" राजपुताने के क्षत्रियोंका आचार विचार नीचे लिखे अनुसार है:— राजपुताने के क्षत्रिय लोकोंमेंसे कोई कोई श्रीमंत लोक समक्ष पर यज्ञोपवीत [वरनयन]

संस्कार करते हे, कोई कोई विवाहमे करते है, और कोई कोई गरीबआदि करतेभी नही हैं, लेकिन उसमे जाती संबंधमे फर्क नही जाता वे लोक ब्राम्हण क्षत्रिय वैश्य और सत्शुद्र अर्थात भोई आदीके हातका जल तथा भोजन कर लेते है. और मांसका सेवन करते है, और इनके सब संस्कार वेदोक्त होते है, और स्त्रियोकाभी वेदोक्त संस्कार होता है. संवत १९६२ कार्तिक सुदि २ " [ता. २०-१०-१९०६]

टीपः—सातारा येथें छत्रपति प्रतापसिंह महाराजांच्या वेळीं इ. स. १८३२ सालीं भरलेल्या पंडितांच्या सर्वमान्य सभेंत जे ठराव उभय पक्षांस मान्य झाले त्यातील ठराव नंबर १७ [मौंजी संबंधीचा] आणि श्रीं. छत्रपति शाहु महाराजांच्या वेळीं इ. स. १९०६ सालीं उदेपूरच्या राणाजींनी पाठविलेलें वरील हिंदि पत्र या दोहोंचा मेळ आणि दक्षिण व उत्तरच्या क्षत्रियांच्या मौंजी वगैरे संबंधी रीतिभातींचा मेळ बरोबर पटतो. ही विशेष गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे

यानंतर शाहू छत्रपती महाराजांनी उपाध्यायाच्या कामा रितां पगारी नोकर नेमले. पगारी नौकराची वहिवाट कांहीं वर्षे चालू ठेवल्यानंतर मराठे क्षत्रिय जातींच्या नवीन होतकरू विद्यार्थ्यांना वैदिक कर्म शिकविण्याकरितां महाराजांनीं कोल्हापूरास इ. स १९२० सालीं

श्रीशिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय

या नांवाची नवीन संस्कृत पाठशाळा स्थापन करून त्यांत वैदिक मंत्र तंत्रांचें मोफत शिक्षण सुरू केलें. त्यांतून शेकडो मराठा पुरोहित तयार होऊन बाहेर पडू लागले होते. हल्लीं बहुतेक जातीचे ब्राम्हणेतर लोक ब्राह्मणाकडून आपलीं धर्मकार्ये करून न घेतां ती स्वतःच करितात किंवा ब्राम्हणेतर पुरोहिताकडून करवून घेत आहेत.

क्षत्रियादि ब्राम्हणेतरांवर ब्राम्हणांचें धार्मिक वर्चस्व मुळींच राहूं नये ते साफ उडवून द्या. या हेतूनें कोल्हापूर संस्थानांत पन्हाळा येथें 'क्षात्रजगद्गुरु' ची गादी शाहू महाराजांनीं इ. स. १९२१ सालीं स्थापन करून श्री सदाशिवराव लक्ष्मणराव बेनाडीकर बी. ए यांस पहिले क्षात्र जगद्गुरुचे जागीं नेमले आहे ते ग्रॅजुएट असून विद्वान आहेत. ते मराठा जातीचे होतकरू व बुद्धिमान तरुण आहेत.

कोल्हापूरचे कै. शाहु छत्रपतिंच्या गादीवर बसलेले, यांचे जेष्ठ पुत्र श्री. राजाराम महाराज छत्रपती यांनीं आपलें मंडलाचे जागानें इ. स. १९२२ सालीं

श्रीशाहु क्षत्रिय वैदिक विद्यालय

या नांवाची दुसरी वेदशाळा स्थापन केली आहे. तथा शाळेंत महाराष्ट्रांतील सर्व भागांतील ब्राम्हणेतर जातींच्या विद्यार्थ्यांना पुरोहित चे वैदिक मंत्रतंत्राचें शिक्षण फुकट दिलें जातें. जेवण, कपडा, पुस्तकें, दिवाबत्ती वगैरे सर्व फुकट देतात. वरील दोन्ही वैदिक शाळांमधें हल्लीं शेकडों ब्राम्हणेतर विद्यार्थी मोफत वैदिक शिक्षणाचा लाभ घेत आहेत. ता. १७. १०२१ रोजी श्री. पुण्यस्मारक राजर्षी शाहुमहाराज कैलासवासी

झाल्यावर त्यांचे जेष्ठ पुत्र हल्लींचे श्री. राजाराम महाराज यांस राज्याभिषेक झाला. हा राज्याभिषेक ब्राह्मणांच्या हस्ते करविला नसून वैदिक शाळेंतील क्षत्रिय मराठा जातीच्या विद्यार्थ्यांकडून वेदोक्त पद्धतीनें करविण्यांत आला. त्यांत क्षात्रजगद्गुरु अध्यक्षस्थानीं होते. त्याच प्रमाणें छत्रपति श्री. राजाराम महाराज यांचा द्वितीय विवाह तंजावरचे सुप्रसिद्ध ऐतिहासिक राजघराण्यांतील श्रीमंत आत्मारामराव मोहिते यांच्या कन्या श्रीमती राजसबाई यांचेशी कोल्हापूर येथें ता. १० माहे जून सन १९२५ रोजीं गोरजमुहूर्तावर झाला. याहा मंगलप्रसंगीं सर्व विधी क्षात्र धर्मानुसार यथोचित व्हावेत म्हणून श्रीमत् क्षात्र जगद्गुरु स्वतः तेथें हाजर असत. त्यांचा देखरेखीखालीं वरील वैदिक शाळेंतील विद्यार्थ्यांनीं छत्रपती श्री. राजाराम [illegible] सर्व वैदिक पद्धतीनें यथासांग पूर्ण केला.

जे हल्ली स्वतः क्षत्रिय असतील, ज्यांच्या [illegible] क्षत्रियांचें रक्त खेळत असेल त्यांनी क्षत्रियाचे वर दर्शविलेले धार्मिक व सामाजिक अधिकार बरोबर बजावण्यास मुळींच डगमगूं नये. जो कचरेल तो खरा क्षत्रियच नव्हे हीच त्याची साक्ष आहे.

ॐ तत्सत.



प्रकरण २६ वें
क्षत्रियांस वळ विण्यास कित्ता.

१ खऱ्या क्षत्रियाची खूण. २ श्रीराम व परशुरामाचें युद्ध.
३ परशुरामास काळ्यापाण्याची शिक्षा ४ रामाचा कित्ता गिरवा.
५ केरळ व कोंकण यांचीं मैत्री.

संस्कृत कवींत, कवी काय तो एकच भवभूति; ब्रह्मणी बाणा म्हणजे भरयाचा बाणा काय तो एका भवभूतीचा. बाकीचे कवी भट्टभिक्षुकीचे हालाहल अगदीं पूर्णपणें भरलेले; बाकीचे एकूण एक ब्रह्मण क्षत्रियांची पायमल्ली होत असता. उघड्या डोळ्यानें खयाल पाहणारे! वस्तुतः पायमल्ली करून उद्दामपणानें भरलेल्या परशुरामापुढें, विनयानें भरलेल्या रामास उभे करून आपल्या कवित्वाच्या जोरानें रामाची मान वांकविणारा! पण भवभूतीचें खरें हत्तोटी भवभूतीसच साधते.

भवभूतीचा दशरथ मोठा गंभीर गोड, शांत, पोक्त, दृढनिश्चयाचा असा आहे; रामही दशरथास शोभणाराच मुलगा आहे.

परशुरामाचा तो फाजिलपणा कानांनीं ऐकून व डोळ्यानींही पाहून दशरथ म्हणतोः—

" दूर-दान्तानां दमन विधयः क्षत्रियेष्य आय तन्ते
दूर दान्तस् त्वम् वयम् अपि च ते क्षत्रियाः शासितारः॥"

अर्थः— 'दुष्ट ताठ्यानें उभे राहिलेल्यांस शासन करणें क्षत्रियांच्य हातीं असतें. तूं दुष्ट ताठ्यानें उभा राहिलेला आहेस, तुला शासन करणारे क्षत्रिय हे आम्ही येथें आहो.,,

ताठा दोन प्रकारचा असतो. खऱ्यासत्याग्रहानें किंवा योग्य अभिमानानें जो ताठा किंवा पीळ उत्पन्न होतो, तो दुष्ट ताठा किंवा योग्य पीळः पण दुराग्रहानें वा फाजिल अभिमानानें जो ताठा किंवा पीळ उत्पन्न होतो तो दुष्ट ताठा किंवा व्यर्थ पीळ. परशुरामाचे अंगीं दुष्ट ताठा उर्फ व्यर्थ पीळ होता. म्हणून वर लिहिलेल्या प्रकारानें त्याचा योग्य पूजा दशरथाकडून झाली.

जे दुष्ट ताठ्यानें क्षत्रियांस शूद्र म्हणत असतील, जे फाजिल ताठ्यानें आपले क्षत्रियत्व साफ नाकबूल करीत असतील, ते गाल्वी असोत, पौंड्र असोत, द्रुह्यु असोत, गुरुस्वामी शंकराचार्य असोत किंवा त्यांचे जे गुरु असोत त्यांच्या दुष्ट ताठ्याबद्दल योग्य शासन क्षत्रियांकडून मिळाले पाहिजे तें योग्य

शासन जर मिळेल तरच क्षत्रिय म्हणविणाऱ्यांचा खरा क्षत्रियपणा साजेल व माजेल; नाहीं तर ते खरें क्षत्रियच नव्हेत. कारण त्याच्या शिरांतून व धमण्यांतून सणसणणारा क्षत्रियपणाचें जर नामशेष झालें, तर तो गाजणार कसा ? शूद्रपणा एकदाचा पदरीं घेतला म्हणजे स्वतः आपणच आपलें वाटोळे करून घेतलें, हें पक्कें समजा व उमजा. आमचे क्षत्रियांनो दशरथाचा कित्ता वळवून दुष्टपणानें मरलेले जे म्हणून तुमचे शत्रु असतील, त्या सर्वांस शासन करून शूद्रवीर आणणें हें तुमच्या हातीं आहे, नव्हें हें तुमचें अत्यंत पवित्र कर्तव्य आहे. तें पवित्र कर्तव्य तुम्ही बेघास्तपणें बजावून [illegible] नाहीं तर तुम्ही क्षत्रिय कसें ?

[illegible] कार्यानें तें रामाने केलें; जसें कायेनें व वाचेनें [illegible] व जगत्कर्ते व्यासें कसे सुरेख व मार्मिक वर्णन करीत

[illegible], रामाच्या कोथींत येतो– " **कोठेरे तो राम, कोठेरे तो राम** " असा जोराचा पांचजन्य करीत येतो. तेव्हां " **हा मी राम; हा मी राम;** " (अहं भोः) असा बिलकूल धीर खचूं न देता राम जबाब देतो, व तसाच कंबर बांधलेला राम धनुष्य बाण हातीं घेऊन लढाईस उभा राहतो. हें आरंभींच रामानें परशुरामास कायेनें केलेलें शासन. अंटाचरचा जोर न चालेला राम पण तो दशरथाच्या बोजाचा धीरोदात्त क्षत्रिय; तशात गायत्री रक्षणाच्या विश्वामित्र क्षत्रिय राजऋषीनें त्यास शस्त्रास्त्रविद्या शिकवून तरवेज केलेला ! परशुराम तर आपल्याच आईचा, आपल्याच आश्रयदात्याचा व त्याचप्रमाणें कार्हे क्षत्रियांचा खून पाडून त सगळे खून त्याच्या अंगांस या घडीस जसे काय डसळू लागलेले ! खून करण्यात रावणहत्त्येची मिळविलेला ! तरी खऱ्या सुष्ट तत्त्वानें व शांततेनें भरलेला तो रामाची कोवळी शामसुंदर मूर्ति, ब्राह्मण म्हणवून पुनः निंद्य निंद्य कृत्यें करण्यास न शरमणाऱ्या व कपटानें असंख्य खून करण्यात सर्व वय घालवलेल्या परशुरामास मुळींच भीक न घालतां व केसाग्रभरही न डगमगतां त्या त्या पुढें मोठ्या गांभिर्यानें उभा राहतो. हें कायेचें शासन होतांच परशुराम चमकला, घराच बचकला; तो कोवळी व शामसुंदर पण ताठ व खिळदार उभा राहिलेली मूर्ति पाहून, प्रेमानें घट्ट मिठी मारण्याची इच्छा तो उघड दर्शवूं लागला. (वक्षो स्वं अनाभे परिष्वक्तुम् इवेच्छति त्वाम्). पण हें सगळें गळे कापूनगाचें प्रेम असल्याची शंका रामास आली, व तो लगेच उद्गारला :–" मिठी मारण, हे न त्या कलेवरांत आपण आतां शोभत नाहींत " हें रामान परशुरामास वाचेनें केलेला पहिला दंड. जसा काठीनें डंवचलेला भुजंग तसा वाचेनें वर्मी विंधलेला परशुराम या शब्दांनीं फणातांसारखा खवळला. "क्षत्रियांच्या जातकांचीं पोटें चिरून त्यांतल्या गर्भांचेही तुकडे करणारा हा परशुराम "असें जो आपल्या राक्षसी कृत्याचें जोरदार वर्णन करूं लागला. "अग खून करणें हें पाप आहे

आणि क्षत्रियांच्या स्त्रियांचें गर्भछेदणें हा तर केवळ पंडराणा आहे त्याची तूं मूर्खीतारखी चढाई तीं काय आरतोस !" अस रामानें शांतपणें योग्य भाषेंत जबाब दिला. अर्थात तेल ओतल्याप्रमाणें या उत्तरानें परशुराम फारच खवळला. त्याचा राग अनावर झाला.

तेव्हां अर्थातच परशुरामानें आला फरशु म्यानाबाहेर उपसला; रामानेंही आपलें धनुष्य सज्ज केलें. क्षत्रिय कुलावतंस रामायुढ परशुरामाची ढाळ बिलकूल शिजली नाहीं. तो सपशेल हार जावून त्याची नुसती फजीतीच नव्हे तर त्या अहंमन्य भट्टाचा या युद्धांत सोळा आणे धुव्वा उडाला. पूर्वी केलले सर्व खून एकदम उतरे; उर्मटपणा साफ गेला, दुष्ट ताठा गेला, लुसलुसित भिक्षुकी लोण्याचा फुगुटीचा नरम-पणा त्याच्या चहऱ्यावर झळकूं लागला; रामानें बोलण्याप्रमाणें चालून त्या गुर्हेगार भिक्षुकांस ब्राह्मण पंचापुढे-भट्टभिक्षुकापुढे नव्हे-उभें केल, कारण पंचामुखी परमेश्वर हा न्याय आज कालचा नव्हे, तर अनादि कालापासून चालत आलेला आहे क्षत्रिय विश्वामित्राची गणना खऱ्या ब्राह्मणांमध्यच होत होती. हेही त्या पंचांत होतेच. पंचानीं जजमेंट दिला कीं अशा दुष्टाला फांशीची किंवा शुळाची शिक्षा देण म्हणजे त्याचे क्लेश एकदम मिटवणें हे नीट नाहीं;यांच दुष्टपणा अशा शिक्षनें जाणार नाहीं; पुढें जन्मांतरी त्याला तो नडणारच नडणार. सबब यास याच जन्मी याच देहीं ताळ्यावर आणण्यासाठीं एकांतवासाची जन्मठेप काळ्यापाण्याचा शिक्षा द्यावी. त्याप्रमाणें रामानें त्यास कोंकण पट्टीच्या सह्याद्रि पर्वताजवीकडे सपुद्र किनाऱ्याच्या स्मशानवटींत राहण्याची जन्म-ठेप दिली. (आज काल यालाच काळ्यापाण्याची जन्मठेप म्हणतात.) त्या स्मशान वटीतच त्याचा सर्वंजन्म गेला. पुढें तो ताळ्यावर आला किंवा नाहीं हें भवभूतीनें आपल्या काव्यांत वर्णिलें नाहीं. पण पंचाकडून त्या दुराभिमानी परशुरामास जी शिक्षा ठोठावण्यांत आली व जिची अंमल बजावणी रामानें केली, तीच शिक्षा त्या [illegible] रामाच्या अहंमन्य वंशजांस-भट्ट भिक्षुकास एकदरीत अ[illegible]

मराठा क्षत्रियांनो वरील कथचें तात्पर्य अंतःकरणांत [illegible] कोरून ठेवा. राम सात्विक वृत्तीचा व बंधुप्रेमाचा पुतळा होता. तसे [illegible] क्षत्रिय होता. तुम्हीही सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रियच आहात ना ! [illegible] जर परशुरामाचे व्रत अद्यापी बरोबर चालविताल तर तुम्ही रामाचे [illegible] आपल्या अचरणांत आणून आम्ही क्षत्रिय रामाचेच वंशज आहोत [illegible] दाखवित नाहीं ? रामानें दाखविलेल्या दिशेनें जाऊन आज भिक्षुकांना [illegible] पाहिजे तें खाली लिहिल्याप्रमाणें:—

१ कायेनें शासन:—भट्टभिक्षुकांचे तुम्ही यजमान म्हणजे अन्नदाते मा[illegible] आहांत; तरी मालकाला सुद्धां, भिक्षुक आपण होऊन पहिल्यानें नमस्कार करीतच नाहीं. अगोदर तुम्ही त्यांना नमस्कार केला पाहिजे अशी ते उलटी इच्छा करीतात: सबब तुम्ही त्यांना प्रथम नमस्कार करूं नका, त्यांस पश्चात देखील नमस्कार किंवा दंडवत

लिहूं नका: फक्त वि. त्रिशेष येथूनच पत्रास प्रारंभ करा कारण दडवन लिहिणें हें शूद्रांचें काम आहे. क्षत्रियांनीं दडवन कधींही ह्मणू नये. शूद म्ह०जे क्षुद्र, गुलाम, दास.

२ वाचेनें शासन:—त्यांस ब्राह्मण कधींही न ह्मणतां भट भिक्षुक म्हणावें. ते तुमच्याशीं आरे कारेची एकेरी भाषा बोलण्याचा नेहमीं प्रयत्न करतात, सबब जशास तसें या न्यायानें तुह्मीही त्यांचे उसनें तात्काळ फेडून टकीत जा; नाहीं तर या त्यांच्या ऋणाच्या बोजाखालीं तुह्मी दडपून जाल. लक्षांत ठेवा. त्यांच्याशीं धार्मिक दळणवळण बिलकूल ठेवणारच नाहीं अशी शपथ घ्या; व ती शपथ मोडणाऱ्यास जाती दंड करा; कारण दलालाच्या मार्फत मांड्यानें देवपुजा व धर्मविधि केले तर देव त्या दलालालाच ओळखतो, तुह्मांला देव ओळखत नाहीं व म्हणून पावतही नाहीं; त्यामुळें पैसे खर्चून तुह्मी उलट अधोगतीला कां जाता !

३ चालून शासन:—मुसलमानाप्रमाणेंच क्षत्रियांचें स्वतंत्र संघ ह्मणजे ब्राह्मणेतर हिंदु संघ स्थापन करा; मुसलमानाप्रमाणेंच ब्राह्मणेतर हिंदु राष्ट्रीय सभा स्वतंत्र स्थापन करा; तेव्हांच हे भिक्षुक वठणीला येतील, कारण शेंकडा पांचच भिक्षुक असून शेंकडा ९५ ब्राह्मणेतर हिंदु आहेत: सरव राष्ट्रीय सभा व राष्ट्रीय कार्याचीं सूत्रें ब्राह्मणेतर हिंदुंच्या हातींच असलीं पाहिजेत. जिल्हा बोर्ड, ताल्लुका बोर्ड, म्युनिसिपालिटी व कायदे कौन्सिल यांत आपले ब्राह्मणेतर जातीचेच प्रतिनिधि मुसलमानाप्रमाणेंच स्वतंत्र निवडा; वटवाघुळा सारखे दोन्ही दलावर हात ठेवून स्वार्थ साधणाऱ्या भिक्षुकांस मुळींच निवडूं नका, व त्यांच्यात मिसळूं नका.

कोल्हा आणि कोंकरु या दोघांची रास अगदीं एकच आहे; दोघांच्याही अंगावर सारखेच केस असतात, दोघांनाही चार चारच पाय असतात, दोघानाही शेपटें असतात, दोघांचीही गणना जनावरांतच होते, दोघेही दुरून आणि वरून आकारानें सारखेच दिसतात, पण दोघांच्या मूळच्या वृत्तींत जमीन अस्मननचें अंतर ! कोल्ह्याच्या पोटांतील करटविद्या आणि तोंडांतील मांसाहारी दात हीं झाकलेलीं प्राण घातक आयुधें वरून दिसत नाहींत. कोंकरानें कोल्ह्याची कितीही सेवा केली, कितीही त्याचें मनखुष ठेवलें, तरी संधी सांपडतांच या दोन अस्त्रांच्या साह्यानें कोंकरास गट करण्यास कोल्हा कधींही सोडीत नाहीं. कारण भक्ष्य आणि भक्षक हें नातें त्या दोघांत परंपरेनें सारखें चालू असतें. या गोष्टींतील मर्म लक्षांत ठेवा. त्यांच्या हातचे विटाळलेलें अन्न खाऊं नका. कारण त्यांची मूळ उत्पत्ति यवन, सिद्दी, बलुची, चांडाळ याच्यापासून आहे. असें असून तेच उलटा तुमचा विटाळ मानतात. ह्मणून तुह्मी त्यांचा विटाळ माना.

याप्रमाणें भिक्षुकाच्या भाकड भारुडावर बिलकूल विश्वास न ठेवतां त्याच्यावर ताटतूटीच्या अनिवार्य अग्न्यास्त्राचा अचुक प्रयोग केला, ह्मणजे पंचांच्या अनुमतानें रामानेंच परशुरामास केलेलें शासन, मराठा क्षत्रियांच्या ह्मणजेच सर्व भिक्षुकेतरांच्या राष्ट्रीय सभेच्या अनुमतानें काम करणाऱ्या मंडळीनें भट्टाभिक्षुकांस उत्तम प्रकारें केलें

म्हणून समजा. म्हाच काय तो एक रामबाण उपाय आहे. याच रामबाणानें यश खात्रीनें येईल: प्रयत्नीं परमेश्वर असून तो पंचामुखी असतोच. पण चिकाटीचाच एकजुटीचा प्रयत्न पंचाकडून हवा आहे. सख्ख बंधुनो, उठा, कामास लागा. यांत कुचरपणा करू नका.

उद्धरेत् आत्मआत्मानम् आत्मान-व सादयेत् ॥

म्हणजे आपला उद्धार स्वतः आपणच करून घेतला पाहिजे दुसऱ्यावर अवलंबून राहिल्यानें आपला उद्धार होत नाहीं. असें भगवद्गीतेंत भगवंतानें सांगितलें आहे. त्यास अनुसरून तुम्ही दुसऱ्यावर अवलंबून न राहतां स्वतःचा उद्धार स्वतः करून घेण्याच्या कार्यास लागा. असें तुमच्या हितचिंतकाचे सांगणें आहे. इतकथा उपर तुमची मर्जी. पण क्षत्रियानों लक्षात ठेवा, त्या ब्राह्मण म्हणविणारांचा धरलेला कांसोटा सोडून देऊन जर क्षत्रिय म्हणविणारीं माणसें, इतिहासांत नोंद राहण्यालायक सुधारणा स्वतंत्रपणें करण्याचें मनावर घेतील व त्यासाठीं कंबर बांधतील तर त्यांच्या अतीप्राचीन आर्य पूर्वजाप्रमाणें जो प्रशंसनीय व अभिनंदनीय किर्ता ते घेऊन देतील, तो ब्राह्मण-म्हणविणारीं माणसें पुढें आभारपूर्वक हळूच उचलतील. कारण परंपरेनें पाहतां क्षत्रियांचें क्षात्र तेजच दिव्य आहे असें हजारो वर्षांचा इतिहास ठेंठरवानें साक्ष देतो पण अद्यापही त्या स्वार्थांध मतलबी ब्राम्हणांचा कांसोटा सोडणें नसेल तर खुशाल सोडूं नका. जो बदमाष्टा त्यांच्याच करणीनें त्यांच्याच साठीं तयार होत चालला आहे त्यातच त्यांच्या पाठीस गून मेंढरा प्रमाणें धडाधड पडून त्यांच्या बरोबर विनाकारण मरण्याचें तुमच्या कपाळी खास येईल, इतकें मात्र खास लक्षात ठेवा. बस्स. बोलो शिवाजी महाराजकी जय, शाहू महाराजकी जय. ॐ तत्सत.

प्रकरण २७ वें.

ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाचें रहस्य.

१ जातवार पुरोहित कां असावेत.
२ ब्राम्हणेतर चळवळ निर्माण होण्याचीं कारणें
३ पोटाच्या खळग्यासाठी भट भिक्षुकांचा नीचपणा.
४ थोरथोर देशभक्त पुढाऱ्यांचें उद्गार
५ पहिली अखिल भारतीय ब्राह्मणेतर कांग्रेस.
६ उपसंहार.

आली ते ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद फार बोकाळला आहे. ब्राह्मणेतर सर्व जातींत जाज्वल्याभिमान जागृत होऊं लागला आहे. ब्राह्मणांच्या तिरस्करणीय वर्तनामुळें ब्राह्मणेतर लोक त्यांच्याकडे तुच्छतेने पाहूं लागले आहेत. ब्राह्मणांच्या मार्फत धर्मविधी करून घेण्यात पुण्य नसून उलट पापच आहे अशी समजूत सर्वत्र रूढ होत चालली आहे. धार्मिक विधी चालवावयास मुसलमान लोक स्वजातीय मुल्लाची योजना करितात; लिंगायत भट्ट्या उपयोगांत आणतात, जैन आपल्या जातीतील पंडिताला पसंत करितात; पारशाचा पुरोहित त्यांच्यापैकींच असतो; ख्रिश्चनांचे विधी पाद्री चालवितो; ब्राह्मणांचा विधिदर्शक ब्राह्मणच असता, इतकेंच नव्हे तर देशस्थ ब्राह्मणाला कोकणस्थ जातीतला भट्ट चालत नाहीं, सारस्वत ब्राह्मणाला सारस्वतच भट्टजी पाहिजे. मग मराठ्यांनीं मराठ्यांकडून किंवा सर्व ब्राह्मणेतरांनीं ब्राह्मणेतराकडून विधि करवून घेतले तर त्यांत विशेष तें काय? या क्षणघडीस सकृद्दर्शनीं कांहीं अवास्तव दिसत नाहीं; परंतु मानेवर जूं ठेवून घेऊन पाठींवर बसणारें आसुडाचे फटके सोसत गाडी ओढणारे गुलाम, गुलामगिरीचेंच ज्यावेळीं गोडवे गात होते त्याच वेळीं एकतंत्री राज्यसत्ता सुद्धा असह्य वाटणारीं राष्ट्रें जगाच्या पाठींवर अनेक होतीं. अशा **गुलामांना गुलामगिरी प्रिय वाटली, यांत आश्चर्य काय?** परंतु गुलामगिरीचें उच्चाटन करण्यासाठीं झटणाऱ्या वुइल्बरफोर्स सारख्यांना एकेक गुलाम, गुलामगिरीतून मोकळा होतांच चिंतामणि प्राप्त झाल्याचा आनंद झाला. तद्वतच भट्टानीं निर्माण केलेल्या शूद्रत्वाच्या जाळ्यांतून एखादे मराठ्याचें किंवा तसत्म जातीयांचें घराणें बाजूला झाले म्हणजें आम्ही आनंदित होतों. त्यांतल्या त्यांत ब्राह्मणेतरांतले राजे, महाराजे, सरदार, इनामदार वगैरेसारख्या बड्या लोकांनीं भट्टांची संगत सोडिली म्हणजे तर परमानंदच होतो. याचें कारण ते मोठ्या दर्जाचे झणून नव्हे. तर त्यांच्या वरील ब्राह्मणांचें गुलामगिरीचें जाळे जितकें अदृश्य आहे तितकें जास्त वळकट आहे! ब्राह्मणेतरांतील सामान्य व निकृष्ट लोकांकडून भट्टाना व्यक्तिशः प्राप्ति फार कमी असते, झणून ते आपले असलें नसलेलें सनातन कौशल्य राजे महाराजांना जखडण्यासाठीं तयार करावयाच्या जाळ्याकडे खर्च करितात आणि यामुळेंच तसल्या 'बड्या' लोकांना भट्टांच्या जाळ्यांतून सुटका करून घेणें मोठें कठिण जातें. ! साधारण लोकांच्या घरीं भट्टांचें पाऊल फार तर लग्नसमारंभांत घटिका अर्ध घटिका स्थिर असतें म्हणजे त्यांना भट्टांचा सहवास फारच कमी असतो. पण तशी गोष्ट या बड्या लोकांची नव्हे त्या बड्यांच्या बायकांना परसांतल्या तुळशीच्या झाडा-लाहि पाणी घालतांना यथासांग संकल्प सांगणारा उघडा बोडका ब्राह्मण हवा असतो! आणि असल्या संघटनामुळेंच कित्येकदां कित्येक घराण्यांत बायकांच्या आग्रहासाठींच पुरुषांना (!) भट्टांची संगत टाळतां येत नाहीं! बापड्या त्या अबला तरी काय करतील यत्रोदेवस ब्राह्मणमहिमाच त्यांच्या कानावर पडूं लागला तर "तन मन धन गुरूला अर्पण" याम्हणीप्रमाणें ब्राह्मणाला आपले सर्वस्वहि अर्पण करण्यास त्या मागें पुढें कां

पहातील ? धिःकार असो अशा वड्या लोकांवर व त्यांच्या मानसिक गुलामगिरीवर !!!

ब्राम्हणेतर चळवळ केवळ ब्राम्हणांचा द्वेष करण्याकरितां निर्माण करण्यांत आली, असा चांगले समजदार ब्राम्हण लोक जुन्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांवर व ब्राम्हणेतरांवर खोटाच आरोप करतात. ज्या कांहीं कारण मुळें ब्राम्हणेतरांना आपल्या उन्नतीकरितां ब्राम्हण अजिबात वगळून आपलें स्वतंत्ररीत्या संघटन करून चळवळ करणें भाग पडलें, तीं प्रमुख कारणें खालीं देत आहो. त्या कारणांचा सुज्ञ व व्यवहारदक्ष ब्राम्हण लोक विचार करतील तर अजूनही ब्राह्मणेतर चळवळे ब्राम्हणांशीं सहकार्य करण्यास तयार होतील, यांत संशय नाहीं.

२ ब्राह्मणेतर चळवळ निर्माण होण्याचीं कारणें.

(१) द्रव्यप्राप्तीकरितां वाटेल तीं वर्मी वाईट कामें करून ब्राम्हण लोक कितीही नीतिभ्रष्ट किंवा धर्मभ्रष्ट झाले तरी स्वतःला श्रेष्ठच समजतात. आणि ब्राम्हणेतरांना विद्वत्तेच्या कमतरतेमुळें मूर्ख समजून आपणांपेक्षां कनिष्ठ समजतात.

(२) पूर्वीचे ब्राह्मण जितके निस्पृह, स्वार्थत्यागी, परोपकारी व शुद्ध आचरण करणारे होते, तितकेच सध्याचे ब्राम्हण लोभी, स्वार्थी--इतके कीं, स्वार्थाकरितां वाटेल तो नीच धंदा पत्करणारे-आणि आचारभ्रष्ट बनले आहेत.

(३) वरील दुर्गुण ब्राह्मणांच्या अंगीं जडण्यांत ब्राम्हणेतरांचा व कांहीं ब्राह्मणांचा सरळपणा, भोळेपणा-पाहिजे तर मूर्खपणा म्हणा-पुष्कळ अंशीं कारणीभूत झाला आहे व होत आहे.

(४) अशाप्रकारे दोघेहि अपराधी असतांना, आपण दोघेहि अपराधी आहोत हें समजल्यानंतरसुद्धां, वृथाभिमानाच्या नादीं लागून प्रत्येकजण अपराधाचा ठपका दुसऱ्यावर ठेऊं इच्छितो. याचा दोष ब्राम्हण जास्त शिकलेले व समंजस म्हणून मी बहुतेक ब्राम्हणांकडेच देतो. इतके असूनहि अद्यापपर्यंत कोणीही वृथाभिमान सोडावयास तयार नाहींत; कारण संवयच तशी जडली आहे.

(५) ब्राम्हणांच्या श्रेष्ठपणाला किंवा अरेरावीला कंटाळून ब्राम्हणेतर लोकांनीं चळवळ करण्यास जेव्हां सुरवात केली तेव्हां ब्राम्हणांनीं 'हे वघा शिंचे ब्राम्हणद्वेष्टे' म्हणून त्याची निर्भर्त्सना केली: आणि या बुद्धीहीन लोकांकडून आपले काय वांकडें होणार' अशी खोटी समजूत करून घेऊन त्यांना तुच्छ लेखिलें आणि अद्यापहि कांहीं थोडें अपवाद खेरीज करून बहुतेक ब्राम्हण त्याच दृष्टीनें आपल्याच घमेंडीत खुष आहेत !

(६) जे ब्राह्मण लोक-विशेषतः सार्वजनिक चळवळे व वर्तमानपत्रकर्ते ब्राह्मणेतरांना त्यांच्या अन्यायाविरुद्ध चेकूं लागले व यथाशक्ति प्रतिकार करूं लागले,

म्हणून ब्राह्मणद्वेष्टे समजतात, तेच लोक ब्राह्मणेतर चळवळयांचा तिरस्कार करितात !

(७) ब्राह्मणांनीं आपणां स्वतःला भूदेव समजून घेऊन धर्माच्या नांवाखालीं वाटेल तसे अत्याचार करण्याची मुभा ठेविली आणि ब्राह्मणेतरांना मात्र वेदपठन किंवा श्रवणसुद्धां करूं नये एवढेंच नव्हे तर विद्याहि शिकूं नये असलीं दुहीचीं बिजें पेरणारी अन्यायमूलक धर्मबंधनें बेधडक घातलीं ! अद्यापहि ब्राह्मण तसें वागतात, हें स्पष्ट दिसत आहे.

(८) ब्राह्मणेतरांच्या सत्तेच्या वेळीं त्यांची सत्ता धुळीला मिळवून ब्राह्मणांनीं लोभाक्रांत होऊन पेशवाई स्थापन केली आणि तीं पेशवाई व आपला दाब ब्राह्मणेतरांवर कायम राहावा म्हणून नानाप्रकारच्या अनीतिकारक व अन्यायमूलक कायदे केले आणि धर्म ग्रंथांत स्वार्थ दृष्टीनें वाटेल तशी घुसडाघुसड केली.

(९) इंग्रजांच्या अमदानींत सरकारी नोकऱ्यांत, सार्वजनिक संस्थांत व सध्याच्या लोकप्रतिनिधिक संस्थांत ब्राह्मणेतर लायक असतांहि त्यांना मागें सारून ब्राह्मण नालायक असले तरी त्यांनाच पुढें मिरविण्याला व फायदा करून घेण्याला संधि दिली. अद्यापही प्रत्येक ठिकाणीं वरील प्रकार चालूं आहेत.

(१०) ब्राह्मणेतरांतील भडकबंदांत तंटे लावून आपलें खिसे गरम करून घेण्याचा व पुन्हां नामानिराळें राहण्याची लबाडीची वृत्ति ब्राह्मणांत आहे व ती अद्यापही सोडावयाला ते तयार नाहींत. वकील व भटनीं या वृत्तीचे मूर्तिमंत अवतार आहेत.

(११) हिंदुस्थानच्या भावी स्वराज्याच्या सत्तेचा अधिकांश-आपण संख्येनें कमी असलों तरी व कांहीं बाबतींत आपली योग्यता नसली तरी आपल्याच वाट्यांस यावा आणि आपण म्हणूं त्याचप्रमाणें राज्यशकट चालावा, अशी ब्राह्मणांच्या अंगीं फाजील महत्त्वाकांक्षा आहे.

(१२) कांहीं झालें तरी ब्राह्मणांना अंगमेहनतीचीं कामें पडूं नयेत, तीं कामें हलकेपणाचें व रानटीपणाचें आहे, तीं ब्राह्मणेतरांनींच करणें योग्य आहे. कारण हमाली करण्याकरितांच त्यांचा जन्म आहे, ही भावना ब्राह्मणांत असल्यामुळें शारीरकष्ट करण्यास ते टाळाटाळी करितात, आणि पोटाकरितां शरीरकष्टाविरहित खोटीनाटीं कामें उद्योग करितात.

(१३) सध्याच्या राजकीय चळवळींत ब्राह्मणांनींच विशेषतः पुढाकार घेतला, पण ब्राह्मणेतर समाजाला त्यांनीं भागपाडलें म्हणून कां होईना, परिस्थितीच्या पालटामुळें निरनिराळीं आश्वासनें दिलीं, फंड जमविला व मोठमोठीं आमिषें दाखवून आपल्या मनाप्रमाणें वागविलें. पण एकहि आश्वासन फलदायक झालें नाहीं; फंडाचा वाटेल तसा विनियोग केला आणि दाखविलेल्या आमिषांपैकीं एकहि साध्य न झाल्यामुळें लोकांचा विश्वास उडेल म्हणून पुनः नाना लटपटी केल्या; अडचणींच्या प्रसंगीं ब्राह्मणेतरांना पुढें ढकलून आपण मागें राहिले व ' चानेकु हम और चबनेकु तुम ' अशी वृत्ति आजपर्यंत ठेवीत आहेत,

(१४) ब्राह्मण वर्तमानपत्रकर्त्यांनीं व मासिककारांनीं स्वार्थबुद्धीनें व द्वेष-बुद्धीनें, ब्राह्मणेतरांनीं पुढे येऊन त्यांचे नांव होऊं नये म्हणून किंवा त्यांची बौद्धिक वाढ होऊन त्यांनां अमक्याशीं कागदयाही बाबतींत स्पर्धा करूं नये म्हणून ब्राह्मणेतराचे लेख किंवा कविता आपल्या वृत्तपत्रांतून किंवा मासिकांतून प्रसिद्ध करण्याची शेंकडा पंचाणवे वेळा टाळाटाळ केली व अद्यापहि करितात.

(१५) अनाथविद्यार्थीगृहें, महिलाश्रम, सेवासदन, अनाथविद्यार्थी फंड, धर्मार्थ दवाखाने पैसाफंड कारखान्यासारखे कारखाने व इतर सार्वजनिक संस्था विशेषतः ब्राह्मणेतरांच्या पैशावर पोसल्या जात असूनहि असल्या संस्थांत ब्राह्मणेतरांना बहुतेक मज्जाव असतो व ब्राह्मणांची केव्हांहि वर्णी लागते.

(१६) ब्राह्मणेतरांतील महासाधु श्री तुकाराम, नामदेव इत्यादि त्यावेळचे संत आणि या काळांतील कै. महात्मा ज्योतिराव फुले, शाहू छत्रपति करवीरकर, स्वामी दयानंद आणि सध्यां हयात असलेले महात्मा गांधी यांच्या सारख्या श्रेष्ठ विभूतिसंबंधीं ब्राह्मण लोक वाटेल तसें बरळतात व त्यांची कुटाळकी करितात आणि नीतिभ्रष्ट हलक्या ब्राह्मणांची स्तुती स्तोत्रें गातात.

(१७) ब्राह्मणांतील डॉ. कुर्तकोटी, श्री. नरसोपंत केळकर, दादा खापर्डे, आणि डॉ. मुंजे यासारख्या नीतिभ्रष्ट व सार्वजनिक फंडांत गुंडगिरी करणाऱ्या आणि वाटेल तेव्हां पगडी फिरविणाऱ्या पंचेवीस लोकांना ब्राह्मण लोक डोक्यावर नाचवितात व सोळसट ब्राह्मणेतरांनाहि नाचायाला लावितात.

(१८) जे ब्राह्मण लोक देशभक्त म्हणून मोठ्या दिमाखानें व डौलानें मिरवितात व लोकांकडून आपला मानसन्मान करवितात तेच लोक व्यक्तीचा किंवा स्वजाति स्वार्थाचा प्रसंग येतांच ज्या इंग्रज लोकावर ते प्लॅटफॉर्मवर वर्तमानपत्रांतून खूप कोरडे ओढतात व शिव्या हासडतात, त्याच इंग्रज लोकांचे व अधिकाऱ्यांचे अंकित होतीनें पाय धरतात !

(१९) काल पालटला व हर क्षणाला पालटत आहे, या परास्थितीकडे लक्ष न देता पूर्वीचींच धार्मिक व सामाजिक बंधनें तशींच कायम राहावींत, त्यांत फरक करूं नये असे म्हणणारेच बहुतेक ब्राह्मण आहेत. यांच्या उलट बहुतेक सुशिक्षित ब्राह्मणेतरांना वरील बंधनांत बदल पाहिजे.

(२०) वाटेल तें झालें तरी खोट्या इभ्रतीला फसून ब्राह्मण लोक ब्राह्मणेतरांवर आपलें वजन कायम राहिलें पाहिजे, अशा फाजील महत्त्वाकांक्षी वृत्तीचे आहेत.

वरील योग्य गोष्टींचा विचार करण्यास ब्राह्मण लोक अद्यापि तयार नाहींत. या बाबतींत सर्व पुढाऱ्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले आहेत. म्हणून अतां सुप्रसिद्ध कुद्दारी काय म्हणूं लागले आहेत तें ऐका:—

२ अहिंसेकांचा नीचपणा ! ! पोटाच्या खळग्यासाठीं !

[चाल—देशाचा पालनवाला.]

कवि—धनुर्धर.

(सदर पदांतील मजकुराला ऐतिहासिक सत्याचा पूर्ण आधार आहे, हें समग्र पद-वाचल्यानंतर कळून येईल.)

पोटाच्या खळग्यासाठीं । देश वर घालिती घाला ! ॥ ध्रु० ॥
धर्माच्या नांवाखालीं । बुडविली मायभू अपुली ।
चोरांच्या स्वाधिन केली । रडविलें सकला ॥ १ ॥ देशावर०
इतिहास पुढे ठेवावे । त्यांतूनीं सत्य शोधावें ।
निर्भीडपणें बोलावें । विनंति सकलां ॥ २ ॥ देशावर०
घ्या कोणत्याहि काळाला । जें दृश्य दिसें नयनाला ।
विश्वासघात कुणि केला ? । सांगा मजला ॥ ३ ॥ देशावर०
निजस्वार्थ साधण्यासाठीं । देशाची केली माती ।
जरि मेलें कोटी कोटी । क्षिति न मनाला ॥ ४ ॥ देशावर०
राज्यांचीं राज्यें मोठीं । घातलीं पालथीं उलथीं ।
इतिहास पुराणें दतीं । ग्वाही आपणांला ॥ ५ ॥ देशावर०
बळि-राज्य बुडविलें कोणी ! । बटु वामन वेश घेवोनी ।
कोणत्या जातीचा करणी । बोला बोला ? ॥ ६ ॥ देशावर०
पुण्यवंत नृपती बळीला । किती तरी भयंकर छळिला !
तिसऱ्याच पाउलीं नेला । पाताळी त्याला ! ! ॥ ७ ॥ देशावर०
श्रीरामचंद्र प्रभुजीचा । त्या काळीं अखिल जगाचा ।
तेहतीस कोटी देवांचा । कुणी छळ केला ! ॥ ८ ॥ देशावर०

सीतेला चोरुनी नेली । धर्माला ग्लानि आली ।
मांगाची करणी केली । कोणी बोला ! ॥ ९ ॥ देशावर०
दशकंठ जयाला वदता । जातीचा ब्राह्मण होता ।
जाहीर असें ही वार्ता । अखिल जगाला ॥ १० ॥ देशावर०
श्री छत्रपती शिव गेले । देशाचे तुकडे केले ।
ब्राह्मणी राज्य स्थापीलें । घालुनी घाला ॥ ११ ॥ देशावर०
राजास चोर ठरविलें ! । चोराचे राजे झाले ।
प्याद्याचे फर्जी बनले । कहरचि केला ! ॥ १२ ॥ देशावर०
देवाच्या देव्हाऱ्यांत । साधूसम बसतो धूर्त ! ।
ऋषि मुनी जणू ध्यानस्थ । पुजेला बसला ॥ १३ ॥ देशावर०
पूजेचे मांडुनी ठाण । वक समान करितो ध्यान ।
हृदयाचा जाणा खूण । काळा काळा ! ! ॥ १४ ॥ देशावर०
देतो मी एक प्रमाण । सांगती हजारो सुजन ।
ऐकाहो देऊनी ध्यान । ऐका बोला ॥ १५ ॥ देशावर०
ही नागपूरची वार्ता । मन मटजी ब्राह्मण होता ।
पोटाच्या खळगीकरितां । कसाई बनला ! ! ॥ १६ ॥ देशावर०
गोपुच्छ धरिलें हातीं । राजास पाडिली भ्रांती ।
सद्धर्म सोडिली नीती । नरकी गेला ! ! ॥ १७ ॥ देशावर०
मारिला भोंसला रघुजी । प्याद्याचा झाला फर्जी ।
इंग्रजास केलें राजी । घातची केला ! ॥ १८ ॥ देशावर०
धिःकार असा नीच ला । जातीचा कुणीहो असला ।
संतान दुष्ट नरपशुला । जाळा जाळा ! ! ॥ १९ ॥ देशावर०
आजहि राज्यकर्त्याला । देतात कोण मदतीला ।
हा विचार करुनी बोला । दोष कुणाला ! ॥ २० ॥ देशावर०
झालें नें गेलें जळलें । हृदयाला मिळवा हृदयें ।
स्वातंत्र्य सर्व मिळवूया । जय जय बोला ! ॥ २१ ॥ देशावर०
स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं । देशाच्या प्रेमासाठीं ।
स्वार्थास द्यावी मुठमाती । हर हर बोला ! ॥ २२ ॥ देशावर०

पंडित मन्मथनाथ भट्टाचार्य हे बंगाल्यातील ब्राम्हण जातीचे गृहस्थ असून कलकत्त्यास राहतात ते तिकडील समाजाचे सन्माननीय पुढारी आहेत. त्यांनीं मद्रासच्या ब्राम्हण नांवाच्या पाक्षिक पत्रांत जानेवारी १९२५ च्या अंकांत असें प्रसिद्ध केलें आहे कीः—

"आतां बहुतेक हिंदुस्थान ब्राम्हणांच्या मागें हात धुवून लागल्या सारखें दिसत आहे. आज जेथे ब्राम्हणविरुद्ध चळवळ नाहीं असा प्रांत क्वचितच आढळेल. ब्राह्मणांची आणि त्यांनीं निर्माण केलेल्या स्वार्थीस्वरूपाच्या जुन्या व नव्या पोथ्या पुराणांची राख उडविणें हा ब्राह्मणेतरांचा एक नेहमीचा करमणुकीचा विषयच होऊन बसला आहे. अलीकडे बंगालचे ऋषितुल्य पूजनीय सुप्रसिद्ध पुढारी सर प्रफुल्लचंद्रराय आणि देशबंधु बॅरिस्टर दास यांच्या सारखी बडीं बडीं ब्राह्मणेतर धेंडंही या आगींत तेल ओतण्यासाठीं पुढें सरसावलीं आहेत."

सर प्रफुल्लचंद्र राय ह्मणतातः "हिंदुस्थानांतील सारी ब्राह्मणजात पोत्यांत भरून हिंदी समुद्रांत बुडावली पाहिजे. त्या वांचून हिंदुस्थानचा उद्धार होणारच नाहीं. (The Brahmins should be drowned in the Indian Ocean in a tight bag.)"

देशबंधुदासांनी तर काम अगदी कमालच करून सोडली आहे. ते म्हणतातः- "माझ्या स्वराज्यांतले अगदी आरंभीचें कार्य ह्मणजे ब्राह्मण जातीवर बहिष्कार घालणें, ब्राह्मणांना महारमांगा बरोबर सक्तीनें जेवावयास लाऊन त्यांच्या जातीवर्चस्वाच्या घमेंडीचें नाक ठेंचणें आणि त्यांच्या मुलींचीं धोब्यांच्या व महारमांगाच्या मुलांशीं लग्नें लावणें हें आहे. हेंच कार्य मी आतां सुरू करणार !

The first work of my self Government would be to non-cooperate with the Brahmins. Brahmin's caste prejudice would be destroyed by enforcing them to take the cold dinner of a Chandal. Their daughters are to be given to washermen or Chandal."

अलीकडे ब्राह्मण द्वेषाचा वणवा फारच भडकला असून ब्राह्मणांवर जाहिर रीतीनें बहिष्कार पाडण्यासाठीं कलकत्त्याच्या आलबर्ट हॉलमध्यें एक जंगी जाहीर सभा भरवण्यांत आली होती यां सभेंत ब्राह्मणांची सावली सुद्धां पडूं दिली नाहीं.

मि. मन्मथनाथ मुखर्जीनी जानेवारी १९२५ च्या बंगाली पत्रांत प्रसिद्ध केलेल्या पत्राचा सारांश खालीलप्रमाणें आहे.

महात्मा गांधी हे जानेवारी १९२५ या महिन्यांत मद्रास इलाख्यांतील वैकोम येथील अस्पृश्यांचा सत्याग्रह आणि त्यांस तेथील ब्राह्मणांचा होत असलेला अन्याय

विरोध या जोरदार प्रकरणांत तंडजोड करण्यासाठीं तेथें गेले होते. पण त्यांचे म्हणणें ब्राह्मणांनी तिळभर देखील ऐकून न घेतां अस्पृश्यांशी पशुतुल्य वर्तन केलें आणि स्वतः महात्मा गांधींना सुद्धां जातीं मत्सराच्या, उच्चनीच भावनेच्या भिंती आड राहून जोरदार केप कन्याकुमारी येथील मंदिरांत जाण्यास मनाई केली. अस्पृश्यांशी होत असलेले ब्राह्मणांचे पशुतुल्य राक्षसी वर्तन पाहून महात्माजींनी यंग इंडिया पत्रांत प्रसिद्ध केलें आहे कीं "ब्राह्मण लोक राष्ट्रघातकी आहेत, त्यांना स्वार्थापलीकडे दुसरें कांहींच दिसत नाही; कुत्र्यामांजरांची किंवा इतर जनावरांची ते जितकी किंमत करतात तितकीही ते ब्राह्मणेतरांची किंमत करीत नाहींत."

सन १९२४ च्या डिसेंबर महिन्यांत बेळगांव येथें अखिल भारतीय ब्राह्मणेतर कांग्रेसचें पहिलेंच अधिवेशन झालें. या ब्राह्मणेतर कांग्रेसला मद्रास मुंबई प्रांताशिवाय उत्तरहिंदुस्थानचेही नामांकित पुढारी जमले होते. त्या कांग्रेसमध्यें देवी सरोजिनी नायडू यानीं उघडपणें सांगितलें कीं "ब्राह्मणेतरांना आपली वेगळी स्वतंत्र कांग्रेस भरविण्यास ब्राह्मणच कारण झाले आहेत. आजपर्यंत ब्राह्मणावर विश्वासून ब्राह्मणेतर मागले त्यामुळें ते फसले. ब्राह्मणावर बहिष्कार घालून स्वतंत्रपणें आपली चळवळ केल्याशिवाय ब्राह्मणेतरांना खरें दश मिळणारच नाहीं. आजची स्वतंत्र ब्राह्मणेतरांची कांग्रेस पाहून मला फार संतोष वाटतो"

या ब्राम्हणेतर कांग्रेसमध्ये जे अनेक महत्वाचे ठराव सर्वानुमतें पास झाले त्या सर्वांत अत्यंत महत्वाचा ठराव असा आहे. तो असा:—

"या कांग्रेसचें सभासद ब्राम्हणास कोणत्याही शर्तीवर होता येणार नाहीं फक्त ब्राम्हणेतरांपैकीं २१ वर्षांच्या वयानंतर कोणासही मेंबर होता येईल."

यावरून ब्राम्हणांच्या स्वार्थी व पातळयंत्री कारस्थानांची पक्की ओळख आतां थोरथोर ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना नक्की पटली आहे आणि त्यामुळें अखिल हिंदुस्थानांतील ब्राह्मणेतरांनीं यापुढें ब्राह्मण वर्गासी फार सावधगिरीनें वागून स्वतःचें आणि अखिल राष्ट्राचें खरें हित साधण्याकरितां ब्राह्मणांच्या तोंडाकडे न पाहतां स्वतःच्या पायावरच उभें राहिलें पाहिजे. तरच कांहीं कार्य साधेल. नाहीं तर स्वार्थत्याग पूर्वक केवळ निरपेक्ष बुद्धीनें देशसेवेकरितां आपलें सर्वस्व अर्पण करून ज्यांनीं केवळ देशाच्या कल्याणाकरिताच ब्राह्मणवर्गाशीं सहकारिता करण्यांत आपला जन्म घालविला, पण त्या मार्गानें कार्याची सुफलता न होतां उलट भिक्षुकशाहीच्या स्वार्थी व उलट्या काळजाच्या कपटी वर्तनाचे चटके लागून ज्यांचीं अंतःकरणें होरपळून गेलीं

ब्रह्मज्ञ अशा थोर वरील महात्म्यांचें बराल अनुभविक उद्गार बाहेर निघाले, स्व[illegible] अनुभवजन्य अमोल ज्ञानोपदेशाची आपण मातीं केल्याचें पाप आपल्य मर्थीं सूत शेवटीं आपणासही पश्चात्ताप करण्याची पाळी खास येईल. याकरितां स्वार्थांध भिक्षुकशाहीशीं पूर्ण असहकारिता करून अगदीं फटकून वागा. याच मंत्रानें [illegible] यांनीं पोपशाही व भिक्षुकशाहीला पायाखालीं दडपलें तेव्हांच त्यांना [illegible] स्वदेशोद्धारार्थ डोकर करतां आलें आणि नंतर अगदीं अल्पावका[illegible] जणूं स्वयंप्रकाशानें चमकूं लागले. सबब आपणही तोच मंत्र जपा यवतेच्च दूर पुं.

शरीरसंबंध उर्फ बेटी व्यवहार.

पौराणिक कालापासून तों थेट चालू वीसावे शतकापर्यंत दक्षिण आणि उत्तर हिंदुस्थानांतील राजघराण्याचें व इतर प्रतिष्ठित क्षात्रिय घराण्यांचे शरीरसंबंध इतिहासाच्या आधारें या प्रकरणांत क्रमशः दिले आहेत.

शरीरसंबंधाची अनुक्रमणिका.

१ उत्तरेच्या राजघराण्याशीं दक्षिणेच्या राजघराण्याचे पौराणिक काळचे शरीरसंबंध. २ वैदर्भातील प्राचीन शरीरसंबंध.

३ वऱ्हाडांतील देशमुख, पाटील कुळंबी यांचे महाराष्ट्रांतील मराठ्यांशी चालू वसावें शतकांतील नवीन शरीरसंबंध.

४ छत्रपति भोंसले आणि जाधव यांचे इतर घराण्याशीं बेटी व्यवहार.

५ बडोद्याचे गायकवाडांचे सोयरे

६ श्री. गंधवराव उर्फ महादजी शिंदे यांच्या ९ राण्या.

७ श्री. करवीरकर संभाजी महाराज छत्रपती राजे यांच्या ७ राण्या.

८ श्री. करवीरकर शिवछत्रपती यांचे जनानखान्याची यादी.

९ श्री. करवीरकर संभाजीराव राजे यांचे जनानखान्याची यादी.

१० श्री. करवीरकर शिवछत्रपती यांच्या ३ कन्या.

११ उत्तर हिंदुस्थानचे शरीरसंबंध.

१२ पृथ्वी राजाच्या पांच राण्या.

पौराणिक काळचे शरीरसंबंध.

१ अयोध्येचा इक्ष्वाकुवंशी राजा इक्ष्वाकू (सूर्यवंशी) याची बहीण ईला नांवाची होती. तो चंद्रवंशचालक बुधराजा याचा पण तु पुरू यास दिली होती. तिच्या ४३ वे पिढींत परमारवंशी पांडवांचा पूर्वज धृतराष्ट्र झाला.

२ मौर्य घराण्याचा संस्थापक चक्रवर्ती महान पराक्रमी राजा चंद्रगुप्त मौर्य यानें ग्रीसचा राजा सेल्युकस (सिकंदर बादशाहाच्या मागून गादीवर बसलेला) याचे मुलीशीं लग्न केलें होतें. कारण ग्रीस देशचें राजघराणें मूळचें आर्यवंशी आहे. ही जाणीव त्यावेळीं जिवंत होती. इ. स. पु. ३२०

३ **विदर्भातील प्राचीन शरीरसंबंधः**—अगस्ति ऋषीची पत्नि लोपामुद्रा ही विदर्भ म्हणजे वऱ्हाडच्या राजाची मुलगी होती. (आपटे कृत कोश पृष्ट ९७४)

४ रघुकुलाचा मूळ पुरुष सगरराजा याची राणी केशिनी ही विदर्भ राजकन्या होती. (रामायण बालकांडसर्ग ३८)

५ निषध देशाचा राजा नल याची राणी दमयंती ही वऱ्हाडांतील भीमक राजाची कन्या होती. (नलचंपू)

६ अयोध्येच्या दशरथराजाचा बाप **अज** याची राणी इंदुमती ही वऱ्हाडांतील कुंडिनपूरच्या भोजराजाची बहीण होती. स्वर्गातून फुलाचा हार अंगावर पडून ही मरण पावली. (रघुवंश सर्ग ६)

७ श्रीकृष्णाची राणी रुक्मिणी ही वऱ्हाडांतील भीष्मक राजाची कन्या होती. (हरिवंश विष्णुपर्व अ ५०)

८ श्रीकृष्णाचा पुत्र प्रद्युम्न यानें विदर्भाच्या रुक्मी राजाची कन्या शुभांगी इच्याशीं लग्न केलें होते. मामाची मुलगी करण्याची चाल वऱ्हाडात अद्याप आहे.

९ प्रद्युम्नचा पुत्र अनिरुद्ध यानें विदर्भाचा राजा रुक्मी याच्या मुलाची मुलगी रुक्मावती इच्याशीं लग्न केलें होते.

१० दुसरा मिल्लम यादव यानें ठाण्याच्या झंझ नांवाच्या शाखिदार राजकुलांतील कन्येशीं लग्न केलें होतें. या राजकन्येचे नांव लक्षियव्वा असें होतें

११ वरील लक्षियव्वा राणी इची आई राष्ट्रकूट उर्फ महारट्ट घराण्यापैकी होती. ती ठाण्याच्या शीलाहारवंशी राजास दिली होती. इ. स. १०००

१२ मिल्लमानंतर वेसुगी (यादव) गादीवर आला. त्यानें चालुक्यराजा गोगी याची मुलगी नायलदेवी इच्याशीं लग्न केलें. इ स १०२५

१३ विदर्भातील वाकाटक उर्फ सेनवंशी राजा दुसरा रुद्रसेन यानें उत्तर हिंदुस्थानांतील दुसरा चंद्रगुप्त मौर्य याच्या प्रभावती नामक राजकन्येशीं लग्न केलें होतें. इ. स. ३९५

१४ विदर्भातील सेनवंशी नरेंद्रसेन राजा याचें लग्न वनवासीच्या कदंब राजकन्येशीं झालें होतें.

१५ इराण देशाच्या इतिहासांत प्रसिद्ध असलेला आर्यवंशी राजा भीमसेन यज्ञ वंशी यानें कावूलच्या शहा नांवाच्या आर्यवंशी घराण्यातील राजकन्येशीं लग्न केलें होतें. (रॉबर्टी कृत अफगाणिस्थान पान ६२)

१६ एका पारसिक चक्रवर्ती राजानें कावुलच्या आर्यवंशी यवन उर्फ यवनाश्व घराण्याच्या राजकन्येशीं विवाह केला होता. पारसिक राज्यामध्यें कावूल

आणि झाबूल ह्मणजे हल्लीचा गिझनीचा भाग व सिंधु नदापर्यंतचा मुलुख समाविष्ट झाला होता. शहा व यवन उर्फ यवनाश्व या वंशांचा उल्लेख आर्वी ग्रंथकार आणि राजतरंगिणीकार कल्हण यांनीही आपल्या ग्रंथांत केला आहे. शहा ही पदवी धारणकरणारे क्षत्रिय राजघराणें गुजराथेंत हल्लींही आहे, ते आपणास ब्रह्मवंशी उर्फ ब्रह्मक्षत्रिय ह्मणवितात. चीनी यात्रेकरू मि. ह्युएन संग हा इ. स. ६३० मध्यें काबूलांत गेला होता. तो आपले प्रवास वर्णनात्मक इतिहासांत लिहितो कीं:—त्यावेळीं काबुलांत बौद्धधर्मी क्षत्रियराजे राज्य करीत होते. ते आपणास शहा घराण्याचे ह्मणवीत असत.

१७ बापारावळनेंही इ. स. ७३० च्या सुमारास काबूल कंदाहार गिझनी येथील यवन उर्फ यवनाश्व आर्य राजकन्या वरल्या होत्या. त्यापासून त्याला ३२ पुत्र झाले होते. ते यवन मुसलमान नसून आर्य होते असें वरील आधरावरून दिसतें

१८ दक्षिणचा राष्ट्रकूट मराठा क्षत्रियांच्या सोयरिकी डत्तरेचे राजपूत, बंगालचे पाल, चेदीचे हयहय, यांच्याशीं होत होत्या (मध्ययुगीन भारत भा. २ पृ. २५२ पहा.)

वऱ्हाडचे देशमुख, पाटील, कुळंबी यांचे महाराष्ट्रांतील मराठ्यांशीं शरीरसंबंध २० वें शतकांतील नवीन बेटी व्यवहार.

१९ रा० व. केशवराव भाऊसाहेब देशमुख खामगांवकर ह्यांचा दिग्रज जि. नागपूर येथील खळतकराचा सोयरे संबंध आहे. खळतकर हे साताऱ्या कडील मराठा आहेत.

20 राजा देऊळगांवकर श्रीमंत दत्ताजीराव हे भैसांगकर प. वा. नारायणराव रावसाहेब ह्यांचे साडू आहेत. चांडोलकरांची मुलगी म्हणजे आर्वीकर बाईचा म्हणजे आर्वीकर केशवराव देशमुखांची बायको यांची बहीण त्यांना दिलेली होती चांडोलकराची एक मुलगी दत्ताजीराव जाधव देऊळगांवराजा, दुसरी नारायणराव देशमुख भैसांगकर आणि तिसरी आर्वीकर केशवराव देशमुख यास दिली होती. देऊळगांवकर हे सिंदखेडकर जाधवांचेंच घराणें आहे.

२१ चांडोलकराचे मुलीची मुलगी बडोद्याचे श्रीमंत पिलाजीराव गायकवाड ह्यांना दिलेली आहे.

22 अमळनेरकराचे सोईर संबंध जुन्या काळापासून वऱ्हाडकर देशमुखांशीं आहेत व अमळनेरकरांचे संबंध देवास, धार, ग्वाल्हेर वगैरेकडे आहेत नगरदेवळीकरांचे संबंध तोरखेडकर फदम बांडे ह्यांचेशीं आहेत.

२३ नाशिक जवळील देवळालीकर प. वा. बाळासाहेब देशमुख ह्यांचा चांडोळकर देशमुखांशीं सोयरे संबंध आहे.

२४ खानदेशांतील चाळीसगांवकर व वरणगांवकर (जिजाबराव वगैरे) जाधव देशमुखांचे संबंध वऱ्हाडच्या देशमुखांशीं तसेच महाराष्ट्रांतील व खानदेशां-

तील मराठे मंडळीशीं आहेत.

२५ श्रीमंत व्यंकटराव तात्यासाहेब गुजर नागपूर यांच्या पत्नी वर्धा जिल्ह्यातील आर्वीकर केशवराव देशमुख यांच्या भाकड्या बायकोच्या नातलग आहेत.

२६ खानदेशांतील चाळीसगावकर कृष्णराव देशमुख यांची बहीण वर्धा जिल्ह्यांतील सालोडकर देवराव बळंतराव देशमुख यांना दिली होती.

२७ खानदेशांतील चाळीसगावकर व्यंकटराव देशमुख मॅनेजर चाळीसगाव मिल्स यांच्या २ मुली अनुक्रमे नागपूर जिल्ह्यांतील मोहोपेकर गणपतराव उर्फ दिपुभाऊ शिंदे देशमुख यांचे चिरंजिव आणि पुतणे यांना दिल्या आहेत

२८ नागपूर जिल्ह्यातील मोहोप्याचे गणपतराव सदाशिवराव उर्फ बाबासाहेब देशमुख शिंदे ह्यांनी मुलगी यांना त्रिपुर येथील मराठ्याची मुलगी दिली आहे.

२९ वर्धा जिल्ह्यातील सालोड (हिरापुर) येथील देवराव बळंतराव देशमुख यांना देवळीचे प. वा. बाळासाहेब देशमुख यांची मुलगी दिली आहे.

३० वर्धा जिल्ह्यांतील सालोडकर बळवंतराव अन्याजी देशमुख यांचे चि. पुरुषोत्तमराव यांस चाळीसगावकर प. वा, फकीरराव देशमुख यांची मुलगी दिली आहे.

३१ वरील सालोडकर बळवंतराव अन्याजी देशमुख यांचे सासरे जामठीचे प. वा. खुशालराव देशमुख यांना धारच पवार यांची मुलगी दिली होती.

३२ सालोडचे प. वा. गोपाळराव देशमुख यांचे धाकटे चिरंजीव बाबासाहेब यांना अमळनेरकर श्री. केशवराव देशमुख यांची मुलगी खासासाहेब दिलेली आहे.

३३ वर्धा जिल्ह्यातील सालोडचे गोपाळराव देशमुख यांचे थोरले चि. विठ्ठलराव उर्फ रावसाहेब यांना अमळनेर येथील राष्ट्रीय विद्यालयाचे व्यायाम शिक्षक ग. दौलतराव यांची बहीण दिलेली आहे.

३४ तोरखेडचे (खानदेश) कदमसाहेब यांचे मुलाला अमरावती जिल्ह्यांतील जरूडचे रावराजे वानखेडे श्री. शंकरराव उर्फ नानासाहेब देशमुख यांची मुलगी दिली आहे. इ स. १९२५

३५. सद्हु श्री. शंकरराव उर्फ नानासाहेब जरूडकर यांना बडोदे येथील डायरेक्टर ऑफ ऑग्रिकल्चर श्री. माधवराव साहेब शितोळे बॅरिस्टर यांची मुलगी दिली आहे. तसेच रावराजे वानखेडे जरूडकर विनयेंद्रसिंह देशमुख यांना बडोद्याचे श्री. गणपतराव साहेब गायकवाड दिवाण यांची कन्या दिली आहे.

३६ बडोद्याचे दिवाण श्रीमंत गणपतराव गायकवाड यांची कन्या जरूडकर श्री. रामराव तात्यासाहेब राजे वानखेडे यांना दिली आहे.

३७ माणिकराव देशमुख थाटरवाडा तो कोटोळ यांची मुलगी देवास सीनियरचे पवार यांस दिली आहे.

३८ उमरावती जिल्ह्यांतील दर्यापुरकर व्यारिष्टर श्री. गंभीरराव देशमुख यांना ग्वाल्हेरचे सरदार शिंदे यांची मुलगी दिली आहे हा आनंदीबाई व गजेंद्र ह. मं. यांचे कुटुंबाचे वहीणींची मुलगी आहे.

३९ जिल्हा आकोला ता० मुर्तीजापुर येथील कुरुमकर खुश लराव पांडुरंगराव देशमुख यांच्या पत्नी चाळीसगांवकर कृष्णराव देशमुख यांची बहीण आहे.

४० खानापुरचे (खानापुर तो खानापुर जि. सातारा.) धोंडजी पाटील यांचे संबंध वऱ्हाडांत दिग्रज येथील सळतकर यांनेही लाहेत.

४१ नागपूरचे श्री. ताल्यसाहेब गुजर यांच्या पत्नीची बहीण प. वा. श्री. महाराज आप्पासाहेब भोसले सातारकर यांना दिली आहे.

४२ आर्वीताल्लुक्यांतील (जि. वर्धा) विरुळचे निळकंठराव बाबासाहेब देशमुख साळुंखे यानीं साताऱ्याचे भोसले राजघराण्यांशीं संबंध असलेले रा. विनायकराव भोसले या 21 वर्षांच्या सुशिक्षित तरुणास दत्तक घेतले आणि या दत्तकाचा विवाह आर्वीकर परलोकवासी रामराव देशमुख मालगुजार यांची ज्येष्ठकन्या शांताबाई यांच्याशीं केला दत्तविधान आणि विवाह समारंभ फाल्गुन महिन्यांत मार्च १९२५ मध्ये झाले मुक्कामीं श्री. [illegible] आहे संबंधामुळें वऱ्हाड व सी. पी. मधील कुळ[illegible] आणि महाराष्ट्रांतील मराठाक्षत्रिय हे अगदी [illegible] आहेत असें सिद्ध झाले. (शहमीमांसा या नं. ३ च्या अंकांतील कुळंबी शाखेची व्युत्पत्ति पहा.)

छत्रपती भोसले आणि जाधव यांचे इतर घराण्यांशीं शरीरसंबंध.

४३ मालोजी राजे भोसले यांची राणी म्हणजे शहाजी राजे यांची आई दीपाबाई ही निंबाळकरांची कन्या होती.

४४ शहाजी राजे भोसले यांची पहिली राणी जीजाबाई शिवाजी महाराजांची आई ही लखजी जाधवांची कन्या.

४५ दुसरी तुकाबाई ही बाजी मोहिते पागुरवाडीकर यांची कन्या होती. (व्यंकोजीची आई)

४६ शिवाजी राजे भोसले यांची पहिली राणी सईबाई संभाजीची आई ही निंबाळकरांची कन्या होती.

४७ दुसरी राणी सोयराबाई राजारामाची आई शिर्क्यांची कन्या होती.

४८ तिसरी राणी पुतळाबाई ही घोरपड्यांची मुलगी होती.

४९ शिवाजीची मुलगी सखूबाई ही बाजी निंबाळकर (जिजाबाईने मुसलमानाला हिंदु करून घेतलेला) यांचा मुलगा मालोजी याशी

दिली होती.

५० शिवाजीची तिसरी मुलगी राजकुंवरबाई ही गणोजी राजे शिर्के यास दिली होती.

५१ शिवाजी महाराजाची तिसरी मुलगी अंबीकाबाई ही हरजी राजे महाडिक यास दिली होती.

५२ [illegible] राजे यांचा वंश हल्ली भोसा-[illegible]

५३ [illegible] संभाजी महाराज यांची राणी येसूबाई ही मालेकर शिर्के यांची कन्या होती.

५४ राजाराम महाराज यांच्या बायका ३-हिंदी जानकीबाई ही प्रतापराव गुजर यांची कन्या.

५५ दुसरी ताराबाई ही हंबीरराव मोहिते यांची कन्या.

५६ तिसरी राजसबाई ही नळवडीकर घाटग्यांची कन्या.

५७ शाहु महाराज यांच्या बायका ४ सावित्रीबाई ही कंकेरकर शिर्क्यांची कन्या.

५८ दुसरी राजसबाई ही शिंदखेडच्या रस्तुमराव जाधवांची कन्या.

५९ तिसरी सकवारबाई ही राणोजी शिर्क्यांची कन्या.

६० चवथी-सगुणाबाई ही नेपासकर फोंडसांची कन्या.

६१ तंजावरचे व्यंकोजी राजे भोसले याची बायको दीपाबाई ही इंगळे यांची कन्या

६२ कोल्हापूरचे संभाजी महाराज याची पत्नी जिजाबाई ही तोरगलकर शिर्क्यांची कन्या.

६३ कोल्हापूरचे दुसरे संभाजी महाराज यांची राणी दिपाबाई ही जिवाजी शिर्के सरनाईक यांची कन्या.

६४ कोल्हापूरचे दुसरे शिवाजी महाराज यांची बायको [illegible]बाई ही बडोद्याचे दिवाण गणपतराव गायकवाड यांची कन्या.

६५ सावंतवाडीचे भोसले रघुनाथराव सावंत (१६९६) यांची बायको खंडे-राव गायकवाड यांची मुलगी.

६६ बाजाजी नाईक निंबाळकर फलटणचे यांची बायको सगुणाबाई ही राजाराम महाराज यांची कन्या.

६७ करवंद तो शिवाजी वर्‍हाड प्रांतील देवगडचे इंगळे यांची मुलगी दीपाबाई तंजावरकर भोसल्यांत राजे तुलजा यांस दिली होती. इ. स. १७२०.

६८ शिंदखेडचे दुसरे जाधव मालोजी राजे यांना चार पुत्र (१ राघोजी, २ दत्ताजी, ३ जयप्पाजी, ४ महादुरजी) व सर्वात धाकटी कन्या जिजाबाई अशी पांच अपत्ये होती. (बाकीचा वृत्तांत पुढे पहा.)

६९ राघोजीची शाखा दुसरी औरंगाबादेस आहे. (राजे आनंदराव)

७० राघोजीची दुसरी शाखा दुसरी देऊळगांवगना येथे आहे. (राजे दत्ताजीराव)

७१ अचलोजीची शाखा दुसरी वऱ्हाडांत शेलगांव व मेळुणे येथे आहे. ही शाखा सुप्रसिद्ध रोजगार [illegible] जाधव यांचा आहे.

७२ [illegible] यांची कन्या अंबिकाबाई ही [illegible] दिलेस [illegible] दिली आहे.

७३ कागलचे जाहागिरदार सखारामराव घाटगे यांची कन्या बायजाबाई शिंदे यांचा विवाह ग्वाल्हेरचे दत्तकांतरांव शिंद्यांशी झाला होता. यांचे देऊळ त्यांच्या मूर्तीसह व अन्नसत्राच्या जाहागीरीसह पंढरपुरास हल्ली भट्टांच्या ताब्यांत आहे.

७४ आपासाहेब शिलेदार यांची बहीण होशंआंका साहेब यांचे लग्न लक्ष्मीराव घोरपडे चीफ ऑफ कांपशी यांच्याशी झाले होते. १८७१

७५ जयाजीरांव महाराज शिंद यांची कन्या मनुराजासाहेब यांचे लग्न आपासाहेब शिलेदार यांच्याशी झाले. ता. १-५-१८९०

७६ हेमसिंहराजे भोसले बनसेंडेकर यांचे कुटुंब भागीरथीबाई आणि तंजावरचे राजे शेवटचे शिवाजी महाराज भोसले (तंजावरचा वंश) यांची राणी-सुताई बाईसाहेब ह्या सख्या मावसबहिणी होत्या.

७७ ह्या सुताई बाईसाहेब नानीसाहेब घाटगे यांची कन्या होत्या.

७८ सुताई बाईसाहेब (तंजावची राणी) यांची बहीण ही सखाराम साहेब मोहिते तंजावर यांचे बंधु दाजीसाहेब मोहिते यांना दिली होती.

७९ तंजावरचे शेवटचे शिवाजी महाराज भोसले यांची मुलगी + सखाराम साहेब मोहिते यांना दिली होती.

८० दाजीसाहेब मोहिते तंजावरकर यांना मुली ३ होत्या एक श्री. सयाजीराव महाराज गायकवाड यांना दिली होती. तीच थोरली राणी, चिमणाबाई साहेब होय.

८१ दुसरी कमलाबाई बडोद्यास सरदार शायबर किल्लेदार यांस दिली.

८२ तिसरी-नेपाळचे सिसादिया भोसल महाराजांचे दिवाण जंगबहादुर (जंगबहादुर किंवा पंतार) यांच्या मुलास दिली होती.

८३ तंजावरचे शेवटचे भोसले शिवाजी महाराजांचे राणीचे दत्तक + + हा खुद्द ठाणा जिल्ह्यांतील चिखला तालुक्यांतील करवेढ (बाय तबुरजी) भोसले इंगळेराव चा मुलगा होता. त्यांचा मुलगा हल्ली तंजावरचे जमीनदार आहे.

८४ तंजावरचे शिवाजी भोसलेयांची मुलगी + + करवेढ तो. चिखली भोसले इंगळेराव यांचे घरी दिली होती.

८५ नानीसाहेब घाटगे (तंजावरचे राणीचे आई) यांची बहीण कल्याणकर इंग-

ळखास दिली होती.

८६ नानीसाहेबाची दुसरी बहीण तानीबाई सिंदखेड जि. बुलढाणा येथील जाधवांचे वंशज आनंदराव लक्ष्मणराव राजे जाधवराव जवळखेडकर (सिंदखेडचे जवळच आहे) त्यांना दिली होती.

८७ आनंदराव लक्ष्मणराव राजे जाधवराव जवळखेडकर यांचा मुलगा गणपतराव उर्फ बुवासाहेब यांची मुलगी खानवली जि. रत्नागिरी येथे खानवलकर यांस दिली आहे.

८८ वरील खानवलकर घराण्यांतील बाई—लक्ष्मीबाई ह्या कोल्हापुरचे छत्रपति श्रीशाहुमहाराज यांच्या राणी आहेत.

८९ आनंदराव राजे जाधवराव जवळखेडकर यांची मुलगी भागीरथीबाई ही इंदूरकर राजे हेमसिंह भोसले यांना दिली होती.

९० सातारचे अधिपती प्रतापसिंह महाराज यांचे सख्खे चुलतबंधु बळवंतराव राजे भोसले सेनापती (बावीकर) यांचे पुत्र शहाजी उर्फ जंगलीमहाराज हे मौ. प्रतापसिंह महाराजास दत्तक दिले होते.

९१ बळवंतराव राजे भोसले बावी शेडगांवकर भोसल्यांचा मुलगा दुर्गासिंह दत्तक घेतला होता.

९२ वरील दुर्गासिंह भोसले यांना तात्यासाहेब तळसरकर शिर्के यांची मुलगी सकवारबाई दिली होती.

९३ वरील दुर्गासिंह राजे भोसले बावीकर यांना नागपुरचे मोहिते यांची कन्या धन्याबाई ही [दुसरे कुटुंब] दिली आहे.

९४ नगरदेवळ्याचे पवार बाळासाहेब जाहगीरदार यांचे सोयरे मोरोजी निंबाळकर व भवानजी काटकर हे आहेत.

९५ वरील मोरोजी निंबाळकर यांची बहीण हीराबाई वनसेंद्रकर गणपतराव राजे भोसले यांस दिली आहे.

९६ भवानजी काटकर यांची बहिण गोपिकाबाई ही वनसेंद्रकर गणपतराव राजे भोसले याना दिली आहे.

९७ गणपतराव राजे भोसले वनसेंद्रेकर यांचे बंधु आबाजीराजे भोसले यांची मुलगी कोंड्याबाई ही मु. सुराणे जि. नाशिकेथील नानासाहेब कच्छवे उर्फ टोके यांस दिली हे कच्छवे स्वतःस रजपूत म्हणवितात.

९८ पिंपळगांव तो. जालनापुर जि. औरंगाबाद येथील दाजीसाहेब सखाराम पाटील यांची मुलगी भुल्याबाई सुराणे येथील नानासाहेब कच्छवे यांचा मुलगा अण्णासाहेब यांस दिली.

९९ मुंगी नि. नगर येथील बुवासाहेब राजे भोसले यांची बायको भागीरथी जि.

औरंगाबाद येथील गुजराथी मुलगी आहे.

१०० तारलेक महाडिक यांची कन्या ही सातारचे प्रतापसिंह महाराजांचे दत्तक शहाजी उर्फ अगली महाराज यांची राणी होय.

१०१ थोरले छत्रपती शाहुमहाराज यांची राणी कन्हेरखेडचे शिंद्यांची मुलगी होती

१०२ थोरले शाहू महाराज यांची [illegible]ई ही तेथ्याजी राजे महाडिक यांस दिली होती—ती सती गेली.

बडोद्याच गायकवाडांचे सोयरे.

१०३ जगताप (पिंपळे व सासवड जि. पुणे येथील) यांना गणपतराव महाराज गायकवाड बडोदे यांची मुलगी ताराबाई ही अंबेदेवराव जगतापास दिली.

१०४ कदम (शिरवी जि० सातारा) बाळासाहेब कदम यांची कन्या बडोद्याचे राजपुत्र शिवाजीराव गायकवाड यांस दिली.

१०५ हांडे (ओतुर जुन्नर जि० पुणे) येथील हांडे देशमुख यांची कन्या बडोद्याचे राजपुत्र जैसिंगराव गायकवाड यांस दिली.

१०६ कडू (पुणे जिल्ह्यातील) बापूसाहेब कडू यांची कन्या बडोद्याचे श्री. अबचि-तराव गायकवाड (श्री. सयाजीराव गायकवाड यांचे मुलत बंधु) यांस दिली

१०७ श्री. उमाजीराव उर्फ काकासाहेब गायकवाड यांची मुलगी आपासाहेब सावंत (खानदेशांत राहतात) यांना दिली,

१०८ घोरपडे (सांडूर संस्थानचे घोरपडे—) नरसिंगराव बापासाहेब घोरपडे अमी. रावसाहेब यांची बायको ही आपासाहेब काळे बडोदा यांची मुलगी आहे.

१०९ घाटगे (इनामगांव जि० नगर) येथील बाजीराव घाडगे यांची कन्या राणी चिमणाबाई साहेब ह्या हल्लीच्या श्री. सयाजीराव महाराजांची राणी आहे.

माधवराव उर्फ महादाजी शिंदे यांच्या ९ बायका

११० (१) जैसिंगराव घाटगे यांची मुलगी अन्नपूर्णाबाई

१११ (२) शिंदोजी घाटके यांची मुलगी भवानीबाई

११२ (३) नरसिंगराव घाटके यांचा बहीण पार्वतीबाई

११३ (४) संगमकर देशमुखाची मुलगी भवानीबाई

११४ (५) पटवर्धन जावळ यांची कन्या गंगाबाई

११५ (६) पद्मसिंग राऊळ यांची बहीण राधाबाई

११६ (७) तुळजापूरचे कदम (भोपे) यांची कन्या लक्ष्मीबाई

११७ (८) कर्डेकरांची मुलगी भागीरथीबाई

११८ (९) रामसिंग राऊळ दवडाईकर यांची बहीण यमुनाबाई

११९ थोरले शाहूमहाराज यांची बहीण भवानीबाई ही संभाजीराजे महाडिक यांस दिली होती, ती सती गेली.

१२० सावंतवाडीच्या खेम सावंतसि गमोतेरचे जयाजीराव शिंदे(श्री.राणो-
जी शिंदे याचे तृतीयपुत्र) यांची मुलगी लक्ष्मीबाई दिली होती.

१२१ सर्जेराव घाटगे याची मुलगी रूपाबाई सिंघांस दिली होती.

करवीरकर छत्रपती संभाजी महाराज राजे यांच्या राण्या.

राजाराम महाराज छत्रपति यांचे पुत्र (ताराबाईचे पुत्र शिवाजी महा-
राज, आणि राजसबाज महाराज यांस राजसबाईपासून
झालेले पुत्र संभाजी महाराज यांच्या जनानखान्याची यादी.

१२१ (१) सौ. आनंदीबाई साहेब घाटगे यांची कन्या.
१22 (२) सौ. उमाबाई साहेब खानविलकर यांची कन्या.
१२३ (३) सौ. जिजाबाई साहेब शिंदे यांची कन्या.
१२४ (४) सौ. सुंदराबाई साहेब घाटगे यांची कन्या.
१२५ (५) सौ. सकवारबाई सो. सूर्यवंशी राजे यांची कन्या.
१26 (६) सौ. दुर्गाबाई सो. मोहित्यांची कन्या.
१२७ (७) सौ. कुसाबाई सो. वाडीकर सावंत यांची कन्या.

कोल्हापूरच्या श्री. जिजाबाई यांनी दत्तक घेतलेले शिवछत्रपती यांच्या जनानखान्याची यादी.

१२९ (१) सौ. सईबाई साहेब, तुळजीराव घाटगे सर्जाराव काग़लकरांची कन्या
१३० (२) सौ. चिमाबाई साहेब राणोजीराव शिंदे चावरेकर यांची कन्या.
१३१ (३) सौ. सकवारबाई सो. लक्ष्मणराव शिंदे तोरणगडकर यांची कन्या.
१३2 (४) सौ. उमाबाई सो. मुकुंदराव देशाई यांबुडकर यांची कन्या.
१३३ (५) सौ. सुंदरबाई सो. रत्नाजीराव खानविलकर यांची कन्या.
१३४ (६) सौ. अहिल्याबाई सो. राणोजीराव घाटगे कागलकरांची कन्या.
१३५ (७) सौ. आनंदीबाई सो. जानराव घाटगेकर यांची कन्या.
१३६ (८) सौ. मैनाबाई सो. लक्ष्मणराव शिंदे तोरमलकर यांची कन्या.
१३७ (९) सौ. गंगाबाई सो. अथणीकर देशाई पवार यांची कन्या.
१३८ (१०) सौ. दर्याबाई सो. सयाजीराव घाटगे मुरडकर यांची कन्या.
१३९ (११) सौ. सकवारबाई सो. खंडेराव शिंदे कळमकर यांची कन्या.
१४० (12) सौ. आनंदीबाई सो. धोंडजी पाटणकर यांची कन्या.
१४१ (१३) सौ. कमळाबाई सो. लिंबाजी निंबाळकर नाईक निंबाळकर यांची कन्या

श्री. संभाजीराव राजे छत्रपती यांचे जनानखान्याची यादी.

१४2 (१) सौ. सईबाई सो. त्रिंबकराव खानविलकर यांची कन्या.
१४३ (२) सौ. जिजाबाई सो. धारराव निंबाळकर गजेंद्रगडकरांची कन्या.
१४४ (३) सौ. सईबाई सो. नारायणराव शिंदे यांची कन्या.

कोल्हापूरच्या श्री जिजाबाईचे दत्तक पुत्र श्री. अप्पासाहेब यांच्या कन्या खालील प्रमाणांत दिल्या होत्या.

१४५ सौ. त्रिंबकाबाई सौ. नागोजीराव पाटणकर यांस दिली होती

१४६ सौ. यमुनाबाई सौ. नारायणराव घाटगे नागपूरकर यांस दिली होती.

१४७ सौ. वेणूबाई सौ. शिंदेजीराव नाईक निंबाळकर निपाणीकर यांस दिली होती.

१४८ सौ. अलकाबाई सौ. यशवंतराव घाटगे कागलकर यांस दिली होती.

उत्तर हिंदुस्थानचे क्षत्रियवंश.

१४९ दिल्लीचा अनंगपाळतुवर चंद्रवंशी याची एक कन्या कमलादेवी ही अजमेर उर्फ द्रोणगिरी येथील राजा सोमेश्वर चव्हाण सूर्यवंशी यास दिली होती.

इ. स. ११४७

१५० अनंगपाळची दुसरी मुलगी कनोजचा राजा विजयपाळ राठोड (सूर्यवंशी यांस दिली होती.

१५१ अप्पाराजा रावळ यानें इराण, तुराण, इस्पहान, काश्मिर, काबूल वगैरे ठिकाणच्या सूर्य व चंद्रवंशी यवन आर्यवंशी क्षत्रिय राजकन्यांशी लग्न केलें होतें. त्याला हिंदी स्त्रियांपासून ९८ आणि यवन क्षत्रिय स्त्रियांपासून ३२ पुत्र होते. इ. स. ७०८

१५२ चितोडचा भीमसिंग यानें सिंहलद्वीपचा चव्हाण राजा हमीरसिंग याची कन्या पद्मनी इच्याशी लग्न केलें होतें. अलाउद्दीनाच्या पापी दृष्टीमुळें इनें अग्निकाष्ट भक्षण केलें. इ. स. १२९०

१५३ चितोडचा कांखाराणा यानें मारवाडचा रणमल्लराणा ठाकूर याचे कन्येशी लग्न केलें होतें. इ. स. १३९७

१५४ चितोडचा कुंभाराणा यानी वायकी मेरठकर्या ठाकुराची कन्या मिराबाई ही होती. ही फार भगवद्भक्त होती. हिचे अभंगाची गाथा प्रसिद्ध आहे. इ. स. १४५० चे सुमारास.

१५५ कुंभेराण्याची दुसरी बायको झालावाड येथील ठाकुराची कन्या झालिनी ही होती.

१५६ मेवाडचा राजा रायमल याची मुलगी पीरनारचा ठाकूर सूरजा यादव यास दिली होती.

१५७ मेवाडचा राजा रायमल याची मुलगी (दुसरी) सिरोहीचा ठाकूर चयमल देवरा यास दिली होती.

१५८ धारानगरचा राजा परमारवंशी राजकुमारचंद यानें आपली मुलगी मेवाडचे संग्रामसिंह दिली होती.

१५९ थोदाचा रावसूरताल (शूरस्थान) याची मुलगी तारा ही पृथ्वीराजा चव्हाण यास दिली होती.

१६० मेवाडचा महाराणा रतनसिंह सिसोदिया यानें बुंदिया हाडिया राजे यांची मुलगी वरली होती. १५३०

१६१ चितोडचा संगराणा याची राणी जिवाहीरबाई ही राठोड कन्या होती. तिचा मुलगा विक्रमाजित याचे वरोबर तिनें दिल्लीचा सुलतान बहादुर बलाबीखान फिरंगि यांच्यापासीं चितोडच्या रक्षणार्थ पुरुष वेषानें लढाई मारली. खांत ती पडली. इ. स, १५९६

१६२ चितोडचा राणा उदयसिंग यानें कोठारियाचा चव्हाण, सोनीगडचा ठाकूर आणि झालवाडाचा राव यांच्या कन्यापासीं विवाह केले होते.

१६३ मेवाड (उदेपूर) च्या सिसोदिया कुळांतली महाराणा जगतसिंग याची मुलगी लहान मोठे दर्जाचा भेदाभेद न ठेवतां मारवाडचा राजपुत्र कुमार विजयसिंग यास दिली होती. इ. स. १७३६

१६४ उदेपूरचा राणा भीमसिंग (कृष्णाकुमारीचा बाप) याची एक कन्या जसलमीर आणि दुसरी बिकानीरच्या राजपुत्रास दिली होती.

१६५ उदेपूरचा राणा जवानसिंह (कृष्णाकुमारीचा भाऊ) यानें रेड्याच्या भगेले वंशाच्या राज कन्येशीं लग्न केलें होते. तिजपासून झाला मुलगा झाला. १७९९.

१६६ दमाजी गायकवाड यानें इ. स. १७२० साली काठेवाडांतील मोढील [गोहलोद] राजपुत राज कन्येशीं लग्न केलें होतें. यामुळेकरून त्याला कांहीं गावे ब्राह्मण मिळाली होतीं.

(भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष 2 अंक ४ पोलीस "काठेवाडांतील मराठी शिलालेख" हा लेख पहा.—)

पृथ्वीराजाच्या पांच राण्या

१६७ (१) चितोडचा राणा समरसिंह गोहेल याची बहीण पृथ्वीराजास दिली होती.

१६८ (२) आबूचा राजा जैतप्रमार(पवारचे हल्लींचे पवार घराणें)याची मुलगी इच्छिणी

१६९ (३) समुद्रशिखर येथील यादवकुलीं नीलमजा विजयशूर याची कन्या पद्मावती

१७० (४) चामुंडराव सांवत यांची बहीण चामुंडिणी.

१७१ (५) कनोजचा राजा जयचंद राठोड यांची सुंदर कन्या संयोगिता. ही पृथ्वी राजानें हरण करून आणिली. [illegible] राजा यवनेश्वर झाला. पण तिच्यापासीं तो अनर्दोष [illegible] अश्वमुखी होऊन [illegible]

कैद करून गिझनीला नेले तेथें त्याचे डोळे काढ
मरण पावला. दिल्लीचीगादी पांडवांपासून आली (हिं.
वेळेपासून म्हणजे इ. स. ११९३ पासून मुसलमानांचे राज्यात गेली. पृथ्वी
राज चव्हाण हा शेवटचा हिंदुपदपादशहा होय.

वंशगोत्र विचार

अनुक्रमणिका

१ क्षत्रियांचे वंश
२ सूर्य वंश
३ चंद्र वंश
४ नाग उर्फ शेषवंश (चंद्रवंशाचा पोटभेद)
५ यदुवंश उर्फ यादव (चंद्रवंशाचा पोटभेद)
६ अग्निवंश (निरधार वंश)
७ वंश व पिढ्यांची कालगणना आणि दिल्लीची परंपरा
८ गोत्रें आणि प्रवरें
९ गोत्र व प्रवर म्हणजे काय ?
१० गोत्र प्रवरांचे महत्व
११ शीलालेखाचे दाखले
१२ क्षत्रियांचीं गोत्रे स्वतंत्र आहेत.
१३ एकाच वंशांत व एकाच गोत्रांत शरीरसंबंध होऊं शकतात काय ?
१४ गोत्र प्रवरांचा विसर केव्हां व कां पडला ?
१५ उपाध्ये, जोशी, नवब्राह्मण देण्यांत आलेले अनेक ब्राह्मणेतर जातींचीं गोत्रें
१६ ऋषींचे गोत्र असणें
१७ काही मात्र गोत्रऋषींचीं नांवें
१८ गोत्र, मूल पुरुष व प्रवरे.
१९ गोत्र प्रवर कुळें व गोत्रें कुळे कांहीं.
२० ब्राह्मणांचे गोत्र
२१ ब्राह्मणांच्या गोत्रासंबंधें मनुस्मृतीचे वचन.
२२ मनुस्मृतीच्या आधारें गोत्रांचे पद
२३ क्षत्रिय वैश्यांनी ब्राह्मण कुलगोत्राचा तक्ता नं १
२४ सध्यां वैभवें सुप्रसिद्ध क्षत्रिय घराण्यांची कुळें व गोत्रें तक्ता नं. १ व
२५ मराठा क्षत्रियांचीं गोत्रें व प्रवर

सूर्य वंशाचीं गोत्रें व प्रवरें तक्ता नं. २
चंद्र वंशाचीं गोत्रें व प्रवरें तक्ता नं ३
चंद्र वंशाच्या ब्रह्मक्षत्रिय शाखांचीं गोत्रें

क्षत्रियांचे वंश

टीप:—महाभारत अध्याय ४ पृ १९, भविष्योत्तर पुराण, स्कंदपुराण सह्याद्रिखंड, सिद्धांत विजय आणि पंडित बलदेव प्रसाद मिश्र यांचा दिंडी मार्वेलि राजस्थानचा इतिहास यांत क्षत्रियांचे वंश आणि वंशावळ्या दिल्या आहेत. त्या सर्वांचा मेळ मिळवून या पांच कुलांच्या आधारानें ही वंशगोत्र व कुळांची माहिती तयार केली आहे. देवीभा पुराण, त्रिपुरा देवी पुराण वगैरे आधुनिक ग्रंथांत कांहीं माहिती आहे. पण हे वंश आणखी अनेकांत कसे असू शकतात याची गणना खऱ्या पुराणांत मुळींच केलेली नाही. शिवाय त्यांतील माहिती दुसऱ्या ग्रंथांशी मिळती नसून असंबद्ध व अशास्त्रीय लिहिलेली असल्यामुळे अप्रमाणिक दिसते म्हणून ती विश्वसनीय मानतां येत नाहीं-पण वरील पांच वंशांचा साधारण ऐतिहासिक मेळ परस्परांशीं मिळतो.

१ क्षत्रियांचे मुख्य दोन वंश आहेत. एक सूर्यवंश आणि दुसरा चंद्रवंश पण हे दोन्ही वंश एकाच आदिनारायणापासून उत्पन्न झालेले आहेत. कित्येक ग्रंथकार चार वंश मानतात—१ सूर्यवंश, २ चंद्रवंश, ३ नागवंश उर्फ शेषवंश आणि ४ ब्रह्मवंश उर्फ यदुवंश. हे चंद्र वंशाचे पोटभेद आहेत. यदुवंशाला हरिवंश असेही म्हणतात. याशिवाय चंद्रवंशांत हैहय वंश, कलिंजर, केरळ, पांड्य, चोल, कौशिक, रघु, शौर, कान्ह इत्यादि अनेक पोटवंश होऊन गेले. तसेच सूर्यवंशांतही इक्ष्वाकुवंश, रघुवंश, लवंश, कुशवंश इत्यादि अनेक पोटवंश निर्माण झाले. मोठा पराक्रम करणारा राजा होऊन गेला म्हणजे त्याच्या नांवावरून किंवा त्याच्या राजधानीच्या मुख्य गावावरून पुढे त्या वंश चालवणाऱ्या अशी प्रवृत्ति होती. मराठा क्षत्रियांची ९६ कुळें, रजपुतांची ३६ कुळें व कायस्थांचीं ८2 कुळें हीं परस्परांशीं बहुतांशीं मिळती असून हरएक निवाड्याची सत्यता पटविताहत. पण या सर्व पोटवंशांचा अंतर्भाव सूर्यवंश व चंद्रवंश या दोन मुख्य वंशांतच होतो. सूर्यवंशाचें प्रारंभीचें राज्यस्थान शरयूनदीच्या अयोध्या व त्याच्या पश्चिमेकडील भाग असून चंद्रवंशाच्या विशाल शाखा प्रयागराज काशीपासून गंगा यमुनेच्या कांठचा प्रयाग, अलाहाबाद वगैरे लांबलांबच्या प्रदेशांत पसरल्या व या दोन्ही वंशांच्या देश निरनिराळ्या वेळी उत्तरेकडून खैबर घाटातून सुमारे ६००० वर्षांपूर्वी येऊन राहिल्याचा अंदाज आहे; यासंबंधी आणखी खुलासेवार माहिती पुढील प्रकरणांत दिलेली आहे.

२ सूर्यवंश

मूळ पुरुष आदिनारायण उर्फ विष्णु. विष्णु म्हणजे इंद्र चा भाऊ हा देवादिकांच्या-वैकुंठाचा पहिला राजा होता हिमालयांत कैलास पर्वताचे म्हणजेच वैकुंठ पर्वत या नांवाचें शिखर आहे. विष्णुला म्हणजे आदिनारायणाला क्षत्रिय मानतात त्याला ब्राम्हण मानण्याची प्रवृत्ति कोणत्याहि ग्रंथांत दिसून येत नाहीं. कारण पौर्वात्य आर्या सत्वगुणी ब्राम्हण स शौर्यशाली राजा होणाऱ्या अधिकारच पोंचत नाही. विष्णुचा पुत्र ब्रह्मदेव उर्फ ब्रह्मा; ब्रह्म देवाचा पुत्र मरिची, मरीचीचा पुत्र कश्यप आणि कश्यपाचा पुत्र सूर्य उर्फ विवस्वान. याच सूर्यापासून म्हणजे आदिनारायणा नंतर पांचव्या पिढीपासून सूर्यवंश सुरू झाला. सूर्याचा पुत्र वैवस्वतमनु; या मनुला ईला नांवाची एक कन्या होती. तिचा विवाह चंद्राचा पौत्र बुध याच्याशी झालेला होता. या ईलेला पृथ्वी मानतात. कारण इच्यापासून पुढें जो विस्तीर्ण वंशविस्तार झाला त्या वंशाला चंद्रवंश हें नांव पडलें. त्याची माहिती चंद्रवंशांत दिली आहे.

मनुला ९ पुत्र होते. त्या ९ पुत्रापासून सूर्यवंशांत निरनिराळ्या ९ शाखा निर्माण झाल्या. त्या सर्वांत वडील पुत्र ईक्ष्वाकु नांवाचा होता. या ईक्ष्वाकुपासून सूर्यवंशांत अयोध्येचें इक्ष्वाकुकुल (श्रीमद्भगवद्गीतेचें कुल) निर्माण झाले. ईक्ष्वाकुला १०० पुत्र होते. त्यांच्या पासून निरनिराळे पोटवंश निर्माण झाले. या ईक्ष्वाकु कुलांतच प्रभु रामचंद्राचा अवतार झाला. सूर्यापासून ३४ वे पिढींत सुप्रसिद्ध त्रिशंकु राजा झाला. त्याची राणी चांगुणा नांवाची होती. याच त्रिशंकु राजानें आपला एकुलता एक पुत्र विजयाच्या यज्ञ कापून व राणी चांगुणानें त्याचें मस्तक उखळांत कांडून अतिथिरूपानें इच्छा भोजन मागण्यास आलेल्या ऋषिकरवी पुत्राच्या मांसाचें इच्छा भोजन देऊन तृप्त केलें; आणि आपलें सत्व गमावून पण सत्यास टाकल्यामुळें युद्ध शंकरानें त्यांचा पुत्र जिवंत केला अशी कथा आहे. याच वंशांत राजा हरिश्चंद्र, राणी तारावती व त्यांचा पुत्र रोहिदास हे झाले. विश्वामित्र ऋषीनें हरिश्चंद्रापासून स्वप्नांत राज्यदान घेतलें आणि जागे झाल्यावर राज्यदानावरची दक्षणा मागितली. त्यासाठीं हरिश्चंद्रानें स्वतःस व राणीस आणि पुत्रासहि विकून पैसे आणि विश्वामित्रास सुवर्ण दक्षणा दिली. त्यामुळें विश्वामित्रानें प्रसन्न होऊन स्वतःच साठ हजार वर्षांच्या तपश्चर्येचें पुण्य आणि अगणित राज्यवैभव त्यांना परत केलें अशी कथा आहे सूर्यवंशाच्या ४३ वें पिढींत सगर राजा झाला; त्यानें सागरास खणलें. ४७ वें पिढींत भगीरथ राजा झाला. त्यानें कैलासांतून भागीरथी उर्फ काशीची गंगानदी मृत्युलोकांत आणिली. बद्रिनारायणाचे उत्तरेस हिमालयांत कैलास पर्वत नांवाचें शिखर आहे. तें हिमाच्छादित असल्यामुळे दुर्गम आहे. तेथून भागीरथी नदी निघाली. ती बद्रिनारायण,

क. ढुर वर्षे रा गच्या नीतिस्थानवरून कांगी न मनीरथानें आणिली लागून तिला भगी रथी असतात. ६४ वे पिढींत राजा नल झाला. त्याचे नल दमयंती आख्यान सुप्रसिद्ध अहे. ६२ वें पिढींत राजा रघुनाथचा चक्रवर्ती राजा झाला. त्याचे वंशजास पुढें रघुवंशी हें नाव पडलें. हल्लीं रघुवंशी रजपुत पुष्कळ आहेत. सूर्यवंशाचे ६५ वें पिढींत प्रभुरामचंद्राचा अवतार झाला. श्रीरामचरित्राचा सुप्रसिद्ध ग्रंथ रामायण नांवाचा आहे. श्रीरामचंद्राचे पुत्र लव आणि कुश या दोन पुत्रांना श्रीरामचंद्रानें आपलें राज्य वाटून दिलें. या दोघांपासून पुढें दोन कुळें निर्माण झालीं. लवंवंशी यांना-लेवे. रेवे उर्फ रेवती आणखी कुश वंशाना कच्छवे कच्छवाह, कूरम, कूर्म, कूर्मी, कुळवी असें म्हणतात. कुश वंशजांचे कच्छ राज्य उर्फ कच्छवा. विदेह देशाचा राजा जनक आणि भरतखंडाचे सूर्यवंशातील झाले विश्वामित्र हे सूर्यवंशातील मुख्य गोत्रकर्ते एक [illegible] समकालीन होता. विश्वामित्रवंशाचा राजा चंद्र [illegible] वंशांतही चालू आहे.

[illegible] प्रभु रामचंद्राचा अवतार झाला. श्रीरामचंद्राचे वंशांत ५५९ [illegible] इ. स. ७१४ चे सुमारास होऊन गेला. या [illegible] पर्यंत फक्त ११५ राज्य मानणें असंभवनीय आहे, अशी येथें [illegible] गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, इक्ष्वाकूला १०० पुत्र होते. त्यांपैकी [illegible] वंश झाले. प्रत्येक वंशाच्या शाखेंत अनेक राजे झाले. अयोध्येच्या सूर्यवंशाच्या [illegible] चंद्रवंशाच्या राजांनीं अनेक घेळ जिंकून नामशेष केले व अनेक ठिकाणी [illegible] असा आर्यांचा इतिहास आहे. त्यांत फक्त सुप्रसिद्ध राज्यकर्त्या राजांचीच नांवें इतिहासांत व पुराणांत आलीं आहेत. मधल्या [illegible] गाच्या पुष्कळ पिढ्या राज्याच्या अभावामुळें लोपण्याचा संभव आहे. त्यामुळें या पिढ्या कमी अधिक होत गेल्या व निरनिराळ्या वंशजांच्या पिढ्या मोजतांना त्याना देखील लागू पडते. म्हणजे सुप्रसिद्ध राजांचीं नांवें हिशोबांत घेतलीं गेलीं व अप्रसिद्धांचीं सुद्धां असावी लागल्यामुळें शेंकडा वर्षांत सरासरी तीन पिढ्या पडतात. याच हिशोबानें पिढ्या मोजण्याचा विद्वानांचा सर्वसंमत रीत आहे. तीच सरासरी येथेंही लागू पडते सबब ती संयुक्तिक दिसते. सूर्यापासून गेहेलोद उर्फ सिसोदिया वंशाच्या उत्पत्तिपर्यंतची वंशावळ पुराणांत, भागवतांत आठव्या स्कंधांत दिली आहे, व बापारावळपासून पुढील वंशावळ राजस्थान नांवाच्या ऐतिहासिक ग्रंथांत दिलेली आहे.

सूर्य वंशांत रामचंद्रापासून ११९ वा राजा बापारावळ झाला. हा रावळ [illegible] पुत्र होय. बापारावळ हा अत्यंत पराक्रमी सार्वभौम राजा होऊन गेला. [illegible] अविरत चालू झालें. बापारावळचा जन्म मूळच्या गुहिलोद कुळांत [illegible] वंशापासून गुहिलोद वंशांत रावळ ही पोट शाखा निघाली. त्या

गायव्यकुलाचें वर्णन उत्तर हिंदुस्थानच्या क्षत्रियांच्या कुलांत--कुळगोत्राच्या तक्त्यांत नं. ३० वर केलेलें आहे. बापारावळनें काबूल, कंदाहार, तातार व सौराष्ट्र इत्यादि देशावर राज्य करून तिकडील यवन राजवंशांच्या अनेक राजकन्यांशीं स्वतः लग्न केलें. त्यापासून त्याला १३० पुत्र झाले. त्यांपैकीं ९८ हिंदुस्थानांतील राजकन्यांपासून व ३२ काबूल कंदाहारच्या राजकन्यांपासून झाले होते. त्या १३० पुत्रांपासून राजपुतांच्या एकंदर ३६ कुळांचा विस्तार झाला. ही सर्व राणी आर्य वंशाचि होत्या. चंद्रवंशांत ३६ वा राजा 'यवन' नांवाचा झाला. त्याच्या वंशजांस 'यवनवंश' हें नांव पडलें. या 'यवन' राजाचा नातू 'यवनीर' नांवाचा होऊन गेला तसेंच सूर्यवंशांत ७ वे पिढींत 'यवन' उर्फ 'यवनाश्व' नांवाचा राजा झाला. त्याचेही वंशजांस 'यवन' हें नांव पडलें. यावरून 'यवन' म्हणजे म्लेच्छ किंवा मुसलमान असा त्याचा अर्थ नसून यवन म्हणजे चंद्रवंशी व सूर्यवंशी 'यवन' शाखेचे आर्य क्षत्रिय असा त्याचा अर्थ आहे. मुसलमानी धर्माचा संस्थापक महंमद हा आरबस्थानांत सातवे शतकांत होऊन गेला. तो इ. स. ६३२ मध्ये अरबस्थानांत मरण पावला. दहावे शतकापर्यंत हिंदुस्थानांत व त्याच्या उत्तर भागांत मुसलमानांचें राज्य मुळींच नव्हतें. यावरून इतिहास साक्ष देतो. यावरून बापारावळचे वेळी म्हणजे इ. स. ७०८ अलीकडे ते इ. स. ७६३ राज्य संन्यास--या ५०-६० वर्षांत हिंदुस्थानचे आसपास मुसलमानांचें राज्य मुळींच नव्हतें त्यांच्या स्वाऱ्या झाल्या पण त्यांचा बस बसला नव्हता व इकंड त्यांचे पाय टेकले गेले नव्हते पण त्याकाळीं आर्य क्षत्रियांची निरनिराळ्या वंशांची राज्यें मध्यएशांत भरभराटीस होतीं यावरून इतिहास साक्ष देतो. तर मग बापारावळनें यवन राजकन्यांशीं केलीं असेल यवन म्हणजे मुसलमान राजकन्यांशीं नसून तीं यवन नांवाच्या आर्य क्षत्रिय वंशांतील राजकन्यांशींच केलीं होतीं असेंच सिद्ध होतें. याचा उल्लेख वर्णव्यवस्था आणि जातिभेद या प्रकरणांतही केलेला आहेच. यवन या शब्दामुळेंच बापारावळचे वंशज म्हणजे राजपुत हे मुसलमानांचें वंशज आहेत असा त्यांच्यावर कित्येक लोक आरोप करतात तो वृथा असून निराधार आहे. ही गोष्ट वरील सिद्धांतावरून दिसून येते.

मेवाडचे राणाजीचे पूर्वजांपैकीं महारथी, अतिरथी, अचलसेन, कनकसेन इत्यादि दिग्विजयी राजे याच सूर्यवंशांत झाले. उदेपूरचे भोजराजीराणा व त्यांचे पुत्र देवराजजीराणा हे सूर्यवंशांत होऊन गेले भोसाजीराणा यांचे पुत्र देवराजजीराणा हे प्रथम दक्षिणेंत आले आणि वसाहत करून राहिले. भोसाजीराण यांचे नांवावरून उदेपूरच्या या सिसोदिया वंशास भोसले हें नांव दक्षिणेंत पडलें. अपनी सरकारच्या शिलेच्या भोसलेवंशी सिसोदिया उर्फ भोसले घराण्याची वंशावळ यांतलें शेवटले राजे श्री. प्रतापसिंहराजा महाराज, यांना इंग्रज सरकारनें १८३ साली कोकणी ब्राह्मणांच्या अंगीं निमकहरामपणाच्या, अंगावर शहारे येण्याइतक अगदीच नीचपणाच्या

सोव्या कारस्थानामुळें पदभ्रष्ट केल्यानंतर त्यांनीं शास्त्रत्या विलायतच्या अपीलांत दाखल केली होती; त्या वंशावळींत वर दर्शविल्याप्रमाणे सर्व नांवें लिहिलेलीं आहेत. या वंशावळींत उदेपूरचे राजांचीं पूर्वज आणि पालार व कोल्हापूरचे भोसले राजघराण्याचे पूर्वज एकच असल्याचा मेळ घरांघर मिळविलेला आहे. सिद्धांत विजय ग्रंथाचें परिशिष्ट १ पृष्ठ १३१ यांत ही वंशावळ दाखली आहे. यावरून साहजिक भोसलेजीराणा यांचे पासून वरंच झालेले इंडियांतील भोसले घराणें आणि उदेपूरचें (उदेपूरचें) सिसोदिया (अग. दी मूळचें गेहलोत घराणें) हीं एकच आहेत. असें सप्रमाण सिद्ध होतें.

३ चंद्रवंश.

अदि नारायणाचा म्हणजे विष्णुचा पुत्र ब्रह्मदेव उर्फ ब्रह्मा नांवाचा होता. त्या ब्रह्मदेवाचा एक पुत्र नरिष्ती याचे पासून सूर्यवंशाची शाखा फुटली. त्याचें वर्णन सूर्य वंशात केलेले आहे. ब्रह्मदेवाचा दुसरा पुत्र अत्रि, अत्रिचा पुत्र समुद्र, समुद्राचा पुत्र चंद्र, आणि चंद्राचा पौत्र बुध. या बुधराजास सूर्य वंशाचेंही मनुची कन्या 'इला' ही दिली होती. 'इला' ही पृथ्वी मानली गेली व तिचा पासून झालेला संतान चंद्रवंश हें नांव चालू झालें. बुधाचा पुत्र पुरुरवा याला ६ पुत्र होते. त्यापकीं 'आयु' आणि 'यादो' या दोन पुत्रांना अनुक्रमें तातार आणि चीनचे लोक आपापले मूळ पुरुष मानतात. यावरून तातार, तिबेट आणि हिंदुस्थान येथील लोकांचे पूर्वज हे मूळचे एकच आहेत असें दिसून येतें.

चंद्रवंशांतील सुप्रसिद्ध व पराक्रमी राजांच्या नांवावरून अनेक देशांच्या निर्माण झाल्या. त्यापकीं एका शाखेंत चंद्रापासून ३२ वे पिढींत हस्ती नांवाचा राजा झाला. त्यानें दिल्लीजवळ हस्तिनापूर नांवाचें नगर वसवून तेथें मोठा किला बांधला. बुधापासून ४४ वे पिढींत यदु नांवाचा एक सुप्रसिद्ध राजा झाला हा ययाती राजाचा देवयानी नांवाच्या राणीचा वडील पुत्र होता. त्याचे वंशज यादव म्हणवतात. याच चंद्रवंशाचे ५५ वे पिढींत यादव वंशांत अर्जुन, भीम, धर्म, नकुल, सहदेव वगैरे ५ पांडव(पंडू पासून झाले ते पांडव) आणि दुर्योधन वगैरे कौरव १०१ (कुरु पासून झालेले कौरव) होऊन गेले चंद्र वंशाच्या यादव कुळाच्या दुसऱ्या एका शाखेच्या ५७ वे पिढींत सुप्रसिद्ध श्रीकृष्णाचा अवतार झाला. चंद्रवंशाच्या एका शाखेच्या ५८ वे पिढींत कंस नांवाचा राजा झाला. द्रुपदराजाची कन्या द्रौपदी ही चंद्रवंशांतील एका शाखेंत चंद्रापासून ४९ वे पिढींत उत्पन्न झाली होती तिचे पंच पांडवांशीं झालें होतें. श्रीकृष्ण, कौरव, आणि पांडव हे सर्व यादव कुळांतच होते यादवांची एकंदर निराळीं ५६ कुळें होतीं. हा मुळ छप्पन कोटी यादव असें म्हणण्याचा प्रघात आहे. ५६ कोटी म्हणजे ५६ कुळांचे असा अर्थ आहे. पवार उर्फ प्रमार हा यादव कुळाचीं

च एक शाखा आहे. पांडव हे पवार उर्फ प्रमार शाखेचे यादव होते. चंद्रवंशाच्या दुसऱ्या एका शाखेत हैहय नांवाचा राजा झाला त्याचे वंशजास हैहय वंशी म्हणतात. या हैहय वंशांतच पुढें कलचुरी वंश निर्माण झाला. चांद्रसेनीय कायस्थ हे आपणास हैहय वंशी कलचुरी वंशाचे म्हणवितात. या हैहय वंशांतच सुप्रसिद्ध राजा कार्तवीर्य आणि त्याचा पुत्र सहस्रार्जुन हे अनुक्रमें 27 व २८ पिढींत झाले. मातृहत्या करणाऱ्या दुष्ट परशुरामाचा निःपात याच सहस्रार्जुनाच्या पुत्रानें केला. सहस्रार्जुनाला १०० पुत्र होते. त्यांचे नांवांनीं निनिराळे १०० वंश चालू झाले. 28 वे पिढींत जन्मलेला राजा शकुंतल याला ४ पुत्र होते. १ कलिंजर, २ केरल, ३ पांड्य आणि ४ चोल. या चौथ्यानीं आपापलें नांवाने चार नवीन देश वसवून प्रत्येकानें आपापलें नांवाचा वंश चालविला. ४५ वे पिढींत राजा कुशिक झाला. कुशिकाचा पुत्र गाधि आणि गाधीचा पुत्र सुप्रसिद्ध विश्वामित्र राजऋषी होऊन गेला. विश्वामित्र हा गाधीचा पुत्र असल्यामुळें आणि कुशिकाचा नप्तु असल्यामुळें त्याला गाधिज किंवा कौशिक असेंही म्हणतात. विश्वामित्र नांवाचा राजऋषी सूर्यवंशांतही होऊन गेला. ५६ वे पिढींत राजा परिक्षिती झाला. या परिक्षितीला तक्षक उर्फ नाग नांवाच्या नागवंशी राजानें दंशकांत करून नामशेष केलें अशी कथा पुराणांत आहे.

४ नाग उर्फ शेष वंश.

चंद्र वंशापैकींच दुसऱ्या एका शाखेत नंदीवर्धन उर्फ तक्षक नांवाचा राजा झाला. या राजानें परिक्षितीला मारून त्याच्या राज्याचा विध्वंस केला. हा तक्षक उर्फ नागवंशाचा पहिला राजा होता. यानें आपलें राज्य तक्षक उर्फ शेषनाग किंवा शिशुनाग नांवाच्या आपल्या वंशजास अर्पण केलें. हे राजे आपल्या नांवापुढें 'नाग' हे पद लावीत असत जसें शिशुनाग, अजयनाग वगैरे, म्हणून त्यांना नागवंशी म्हणतात. त्यांच्या ध्वजावर नागाचें चिन्ह असे. हे नागवंशी राजे इ. स. पूर्वी ४०० ते ५५० वर्षांचे सुमारास होऊन गेले. नागवंश उर्फ शेषवंश हें चंद्रवंशापैकीं एका पेटवंशाचें नांव आहे. नाग म्हणजे सर्प असा त्याचा अर्थ नाहीं. हे आर्य क्षत्रिय होते. इ. सनापूर्वी झालेला विक्रमादित्य हा चंद्रवंशी होता. सेन, शुंग, कान्व इत्यादि वंशाचे राजे चंद्रवंशीच होते. ग्वाल्हेरचे सुप्रसिद्ध शिंदे घराणे चंद्रवंशाच्या कोट भेदापैकी नागवंशाचे आहे. त्याचे नाण्यावर आणि राज चिन्हावर व निशाणावर नागाचें चित्र असतें. सूर्यवंशापेक्षां चंद्रवंशाचा विस्तार फारच मोठा होऊन गेला. इंद्रप्रस्थ, दिल्ली मगधदेश, मथुरा, द्वारका, हिमालय, काबूल, कंदाहार, चीन वगैरे भागांत चंद्रवंशाचें प्राबल्य जास्त होतें. नागवंशी क्षत्रिय राजे आपल्या राज चिन्हावर नागांचे (सर्पांचे) वंशदर्शक चित्र काढतात. ही त्यांची मोठी खूण आहे. नागवंशी राजे नाग म्हणजे सर्प खातात म्हणून नव्हते. ते पराक्रमी आर्यवंशी मानव होते. मूळ पुरुष वंशज उर्फ नाग नांवाचा

झाऊन गेला व ते आपल्या नांवापुढें नाग हें उपपद लावीत असत झणून त्या वंशास नाग वंश हें नांव पडलें.

५ ब्रह्मवंश उर्फ यदुवंश उर्फ हरिवंश.

चंद्रवंशी ययाती राजाचा वडील पुत्र यदु याचे पासून यदु (यादव जाधव) वंश चालू झाला असें चंद्रवंशांत वर सांगितलें आहे. या यदुच्या वंशजांना यादव उर्फ जाधव हें नांव पडलें. याच यदूच्या कुळांत पुढें ब्रह्मदत्त नांवाचा एक चक्रवर्ती राजा झाला. तेव्हां पासून त्यांच्या वंशजास ब्रह्मवंश हें नांव पडलें यदुवंशांतच सुप्रसिद्ध श्रीकृष्ण होऊन गेला. त्याला हरि असेंही झणतात. हरिवंश-पुराण हें याच नांवानें सुप्रसिद्ध आहे. याच कारणामुळें ब्रह्मवंश उर्फ यदुवंश उर्फ हरिवंश हीं तिन्ही नांवें एकाच अर्थी चालू आहेत. यावरून हे स्पष्ट दिसतें कीं मुख्य चंद्रवंश आणि त्याचे पोटभेद यदुवंश उर्फ ब्रह्मवंश. याचप्रमाणें चंद्रवंशाचाच पोटभेद शेषवंश उर्फ नागवंश देखील आहे:—मूळचा चंद्रवंश त्याचा दुसरा नाग उर्फ शेषवंश आणि तिसरा यदु उर्फ ब्रह्मवंश उर्फ हरिवंश.

चंद्रवंशापैकीं ब्रह्मवंशांत मौर्य उर्फ मोरे कुळांत उत्पन्न झालेला सुप्रसिद्धराजा चंद्रगुप्तमौर्य यानें ग्रीसदेशाच्या आर्यवंशी सिकंदर बादशहाच्या नातीशी लग्न केलें होतें इराण देशाच्या इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या प्रतिभीमसेन नांवाच्या ब्रह्मवंशी आर्य राजानें काबूलच्या राजकन्येचें पाणीग्रहण केलें होतें. तद्नंतरच्या एका पारसिक चक्रवर्तीनें काबूलच्या आर्यवंशी राजकन्येशीं विवाह केल्याचा दाखला इतिहासांत आहे. पारसिक साम्राज्यामध्यें काबूल शामिल झालें म्हणजे हल्लींचा मिश्नर प्रांत व सिंधु नदीच्या पर्वतचा मुलुख देखील समाविष्ट झालेला होता. अर्थात त्या मुलुखांतील लोक व काबूलचे तत्कालीन राजे देखील निःसंशय आर्यवंशी असून त्यांचा एकीकडून पारसिक आर्यांशीं व दुसरीकडून भारतीय आर्यांशीं विवाहसंबंध घडत असे. इ. स. १०२० चे सुमारास तुर्क लोकांनीं काबूल जिंकलें. त्यापूर्वी तेथें आर्यक्षत्रियांचें राज्य चालू होतें. म्हणूनच हिंदुस्थानांतील आर्य राजवंशाशा त्यांचे बेटीव्यवहार राजरोषपणें चालू होते असे दिसतें. (रॉबर्टसकृत आफगाणिस्तान पान ६२ पहा.) ह्यूएनत्संग नांवाचा चिनी यात्रेकरू इ. स. ६३० सालीं काबुलांत गेला होता. त्यानें आपल्या प्रवास वर्णनांत असें स्पष्ट लिहून ठेविलें आहे कीं इ. सनाच्या सातव्या शतकांत काबूल प्रांतांत बौद्ध धर्मी क्षत्रिय घराणें राज्य करीत होतें. ते आपणास शक्षाक्षणवंशीत असत त्यांनीं चीनी, हिंदी व इराणी या तीनही परंपरांचा व सुधारणांचा एकत्र मिलाफ केला होता. शक वंशाचा इतिहास आर्य ग्रंथकार आणि राजतरंगिणीकार कल्हण पंडितांनीही आपापल्या ग्रंथांत घेतला आहे. गुजरातेंत जाणारी क्षत्रिय (गुर्जर) कुळेंही आहेत.

यांच्यांत. शहा ही पदवी अद्यापि उपनांवाप्रमाणें नांवापुढें वापरतात. काबूलची प्रजा सामान्यतः बौद्ध धर्माची होती पण लंपाक आणि गांधार येथील लोक बहुतांशी हिंदु धर्माचे होते. असें ह्युएनत्संग आपल्या प्रवास वर्णनांत ह्मणतो. (कनिंग ह्याम कृत हिंदुस्थानचें प्राचीन भूवर्णन प्रवास वृत्तात्मक परिशिष्ट पान ५६३ पहा.) रजपुतांचा मूळ पुरुष बापा रावळ यानें काबूल, कंदाहार गिझनी येथील राजकन्यांशी विवाह केले होते व त्यापासून त्याचा वंश वाढला. असें सूर्य वंशाचें प्रकरणांत आह्मी ह्मटलें आहे. काबूल कंदाहार येथील तत्कालीन राजे यवन किंवा रहा असें वंशनाम धारण करणारे आर्य होते. ते यवन ह्मणजे मुसलमान नव्हते याचा योग्य निकाल तत्कालीन वरील ग्रथकारांचे ग्रंथाधारावरून चांगला लावतां येतो.

६ आह्मिवंश

इसवीसनाच्या नवव्या शतकाच्या प्रारंभी आद्य शंकराचार्य नांवाचा एक विद्वान पंडित झाला. त्यानें अद्वैतवादितेच्या आधारानें उत्तर मिमांसा नामक ग्रथाचें प्रतिपादन करून वेदांताचें मंडन केलें. भगवद्गीतेंत वेदांताचें व आर्य धर्माचें सार दिलेलें आहे. भगवद्गीता हिंदुधर्म तत्वाचा मुख्य आधारग्रंथ आहे. त्यावेळीं सर्व हिंदुस्थानभर बौद्ध धर्माला जोर होता. शंकराचार्यानें बौद्धधर्माचीं कांहीं तत्वें उत्तर मिमांसेंत घेऊन बौद्धधर्म व आर्यधर्म यांच्या मिश्रणाचा हल्लींच्या नवीन हिंदुधर्माचा पाया घातला. आणि अशाप्रकारें नवीन पद्धतीच्या तत्कालीन लोकांना रुचेल व पचेल अशा हल्लींच्या रूढिप्रधान ब्राह्मणी धर्माची उर्फ हिंदुधर्माची रचना केली आणि त्या रूढिप्रधान नवीन हिंदुधर्माच्या सुत्रानें बौद्ध धर्माच्या पोटांत घुसून त्याचे पोट फोडण्याचा प्रयत्न केला. पण त्या गोष्टीला राजाश्रय नसल्यामुळें त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. राजाश्रया वांचून नुसती ग्रंथ रचना कवडीमोल ठरूं लागली. राजाश्रयावांचून धर्म संस्थापना प्राचीन काळीं कधींही झाली नाहीं व हल्लीं देखील होत नाहीं. म्हणून पवार उर्फ प्रमार नांवाच्या राज वंशाचे मुख्य राजधानीचें ठिकाण जो आबू पर्वत त्या आबू पर्वतावर तपश्चार्याकरून शंकराचार्यानें पवार घराण्याच्या राजाला प्रसन्न करून आपल्या पक्षांत घेतलें. व त्याला आपल्या साह्यार्थ पाचारण करून नंतर आबूपर्वतावर ईश्वर प्रीत्यर्थ अनुष्ठान व यज्ञ त्याजकडून करविला. कारण यज्ञ करण्याचा क्षत्रियांनाच अधिकार आहे. ब्राह्मणास यज्ञ करण्याचा अधिकार नाहीं. त्या यज्ञाकरितां अनेक राजे एकत्र झाले. हा यज्ञ त्या पुर्वीच्या अधोगतीस गेलेल्या मांसाहारी व किळसवाण्या वैदिक धर्माप्रमाणें पशुयज्ञ न करितां नवीन हिंदु धर्माप्रमाणें मंत्रतंत्राच्या होम हवनादी तत्वास धरून फलभूत यज्ञ केला. ह्मणून तो तत्कालीन बौद्ध धर्म मिश्रित हिंदु धर्माच्या रात्रांना पटला. अर्थातच

सर्वंब्रह्म मयंजगत आणि **अहिंसा परमोधर्मः**

या नवीन तत्वांच्या हिंदुधर्माची संस्थापना करण्याची प्रतिज्ञा करून पुढील चार कुळांचे क्षत्रिय राजे जे पवार राजाच्या आमंत्रणावरून यज्ञास आले होते त्यांना तो धर्म आवडून ते बौद्ध धर्माचा प्रतिकार करण्यास एकत्र झाले व एकमतानें पुढें सरसावले त्या चार कुळांची नांवें:- १ पंवार उर्फ प्रमार २ प्रतिहार ३ चव्हाण आणि ४ सोळंखे. त्याकाळीं गौतम बुद्धाचा मुख्य अनुयायी पार्श्वनाथ नांवाचा मुख्य बुद्ध भिक्षु असून त्याच्या आज्ञेंत इतर हजारो भिक्षु बौद्ध धर्माच्या प्रसारार्थ कार्य करीत होते. ह्यांपैकीं भिक्षुकांनीं बौद्धधर्मांत प्रवेश करून त्यांच्यांत आपसात फूट पाडली होती आपसातील मतभेदांतरामुळें त्यांच्यात फूट पडून अर्थातच या फाटाफुटीमुळें बौद्ध-धर्मास उतरती कळा लागली होती. त्याचा फायदा घेऊन त्यांच्या विरुद्ध वरील चार कुळांचे हिंदुधर्मी राजे उठले व त्यांनीं बौद्ध धर्माचा बराच मोड केला. बौद्ध धर्माचा प्रवाह त्यांनीं चांगल्या जोरानें हटविला. होमहवनांतील अग्निनारायणाच्या कृपेनें या चार कुळांतील राजांनीं आग्नेयमार्गे बौद्ध धर्माची राखरांगोळी केली म्हणून तेव्हांपासून त्या चार कुळांना अग्नि वंशी म्हणूं लागले. वसिष्ठ ऋषीच्या अग्निकुंडांतून या चार वंशांचे मूळपुरुष निर्माण झाले.अशी एक दंतकथा आहे. पण ती निराधार आहे. कारण वसिष्ठ ऋषी श्रीरामाचे काळीं होऊन गेले, आणि अग्निवंशाची उत्पत्ती आबु पर्वतावरील यज्ञा-चेवेळे पासून म्हणजे इ. सनाच्या नवव्या शतकापासून झाली. या बद्दल सप्रमाण इति-हास आहे. अग्निकुंडांतून मनुष्यजन्म होणें ही गोष्ट अशक्य आहे. व त्याला इतर अनुवंशिक पुरावादी मुळींच नाहीं. अग्निवंशी म्हणजे यज्ञांतील अग्निनारायणाच्या कृपेनें धर्म संस्थापनार्थ पुढें आलेले वंश असा त्याचा अर्थ आहे. खरोखर पाहिलें असतां या अग्निवंशाच्या उत्पत्तिला दुसरें आधार मुळींच नाहीं. म्हणून अग्निवंश हा आधार भूतवंश नसून प्रक्षिप्त वंश आहे. वरील चार कुळांपैकीं पंवार उर्फ प्रमार हे चंद्रवंशी क्षत्रिय असून दक्षिणचे पंवार सूर्यवंशी वसिष्ठगोत्री आहेत. प्रतिहार, चव्हाण आणि सोळंखे हे सूर्यवंशी क्षत्रिय आहेत.अर्थात अग्निवंश हा खरा वंश नाहीं. याचें वरील प्रमाणें वर्णन पुराणांतरी आहे. हीं चारही कुळें क्षत्रिय मराठा जातीच्या ९६ कुळांपैकीं आहेत. याव-त्या क्षत्रिय मराठ्यांच्याच पूर्वजांनीं प्रथम आर्य.धर्माची संस्थापना केली (वेदांचो इतिहास या भागांतील वर्णन पहा.) त्या नंतर चंद्रवंशी श्रीकृष्णानें गीता धर्माची संस्था-पना केली. या आर्य वैदिक धर्मांत मद्यमांस सेवनाचा व अश्वमेध, गोमेध, अजामेध, नरमेध उर्फ आत्मयज्ञ वगैरे प्रकारची पशुहिंसा व नरहिंसा कालांतरानें फार बोकाळली; तेव्हां साधारण इ.पू साडेपांच शतकांच्या क्षत्रिय कुळांत अवतारलेल्या गौतम बुद्धानें म्हणजे गोरखपुर परगण्यांतील शुद्धोदन नांवाच्या राजाच्या पुत्रानें त्या हिंसाकारक वैदिक धर्माला मागें हटविणाऱ्या बौद्ध धर्म नांवाच्या नवीन धर्माची संस्थापना करून त्याचा प्रसार सर्व हिंदुस्थान, आफगाणिस्थान, तिबेट, चीन, जपान वगैरे देशांत केला. बौद्ध-धर्म इ. सनापूर्वी सहाव्या शतकापासून सुरू झाला. इ. सनाच्या सहाव्या शतकापर्यंत

म्हणजे सुमारे १२००-१३०० वर्षे पर्यंत त्याची भरभराट होती. पुढें त्याच्या अनुयायांमध्यें पोटभेद व पोटपंथ निर्माण झाल्यामुळें त्याला उतरती कळा लागली. नवव्या शतकांत त्याचा राजाश्रय वर दर्शविल्या प्रमाणें बराच कमी झाला. त्यामुळें नवव्या शतकाच्या अखेर पर्यंत तो धर्म कसाबसा टिकून दहाव्या शतकांत हिंदुस्थानांत बौद्धधर्म बहुतेक नामशेष झाला. आज हिंदुस्थान बौद्ध धर्मियांची लोकसंख्या सव्वाकोटी आहे आणि पृथ्वीवरील चीन, जपान, तिबेट वगैरे देश मिळून एकंदर बौद्धधर्मीलोक धर्म स्थापन करण्याचें श्रेय क्षत्रिय वंशाकडेच आहे व तो बुडवून हल्लीचा हिंदुधर्म अंदाज ४३ कोटी आहेत. बौद्ध पुनः स्थापन करण्याचें श्रेय देखील क्षत्रियांकडेच आहे असें वरील इतिहासावरून दिसून येतें.

अग्निकुलाची कल्पना निराधार आहे ही गोष्ट शीलालेखावरून व इतर ऐतिहासिक पुराव्यानेंही सिद्ध होते. तेजस्वी चंद्रसूर्यापासूनच तेजदार क्षत्रियांची उत्पत्ति झाली ही दृढ समजूत हल्लीं हिंदुस्थानांत रूढ झाली आहे. संतत सूर्यवंश आणि चंद्रवंश ही भारतीय क्षत्रियांची वंशकल्पना इतिहासांत एका दृष्टीनें फार महत्त्वाची असून घेण्यासारखी आहे. कारण ही फार जुनी व संतत आहे. हिचा उगम ऋग्वेदांतही आहे. यावरून ही गोष्ट निर्विवाद आहे कीं प्राचीन काळीं भारतवर्षांत दोन वंशांचे आर्य आले या प्रमाणें सूर्यवंश व चंद्रवंश या दोन वंशमूलक समजुतीचें ऐतिहासिक महत्त्व आहे. आर्यांत अग्निवंश होता असा वेदांत कोठें सुद्धांच दाखला नाहीं. वसिष्ठ ऋषीनें आग्निकुंडांतून चार क्षत्रिय कुळें निर्माण केलीं ही गोष्ट पृथ्वीराजरासा नांवाच्या ग्रंथांत चंदभाटानें अगदी प्रथमतः लिहिली आहे. नवव्या शतकापासून तें बाराव्या शतकांतील पृथ्वीराज व चंदभाट यांच्या कालापर्यंतचे शीलालेखावरून असें स्पष्ट सिद्ध होतें कीं चौहान प्रतिहार हे सूर्यवंशी क्षत्रिय आहेत. लोकही तसेंच मानत होते. उदाहरणार्थः-ज्या प्रतिहारांनीं कनोज येथें साम्राज्य स्थापिलें ते रामचंद्राचा बंधु लक्ष्मण याच्या वंशांतले आहेत असें ग्वाल्हेर येथील दहाव्या शतकांतल्या भोजाच्या शीलालेखांत नमूद आहे. लक्ष्मण हा रामचंद्राचा प्रतिहारी म्हणजे द्वार रक्षक होता. यावरून प्रतीहार हें नांव पडलें आहे अशी दंतकथा आहे. मग बाराव्या शतकांत चंदभाट या कुळाला अग्निवंशी कसा बनवू शकेल ? तसेंच पृथ्वीराजरासा व त्या नंतरच्या अनेक लेखांत चाहुमान, चौहान सूर्यवंशी असें म्हटलें आहे. हर्ष शीलालेखांत (ए. इ. २ पा. ११९) चव्हाणांची वंशावळ दिलेली आहे. **पृथ्वीराज विजय** या नांवाचें एक काव्य पृथ्वीराजाच्या दरबारांतील एका कवीनें केलेलें डेक्कन कॉलेज लायब्ररीत आहे. त्या काव्यांत चाहुमानास सूर्यवंशी असें स्पष्ट म्हटलें आहे. अजमीर येथील शीलालेखांतही तसेंच आहे. आतां तिसरें कुळ चालुक्य याचा आधार पाहू. उत्तरकडील चालुक्य हे चंद्रवंशी आहेत असें उल्लेख शीलालेखांत आहेत. दक्षिणचे वातापीचे चालुक्य आणि वेंगीचे चालुक्य हेही चंद्र-

वंशी आहेत. असें वेंगीच्या शीलालेखांत आहे. दक्षिणच्या चालुक्यांचे गोत्र मानव्य आहे पण उत्तरेचे हुषा भारद्वाज गोत्री आहेत. चंदभाटानें हींच गोत्रें नमूद केली आहेत. बिलहरीयेथील शीलालेखांत (ए. इ. १ पा. २५२) असें झटले आहे कीं केयूरवर्ष हैहयानें भारद्वाज गोत्रीचा चालुक्य अवनीवर्मा याची कन्या नोहवदेवी हिला वरले. हा शीलालेख इ. स. ११ व्या शतकाच्या आरंभीचा ठरला आहे. दक्षिणेकडील परमार हेहो वासिष्ठगोत्री सूर्यवंशी झणून प्रसिद्ध आहेत. ९६ कुळींच्या पोथींत तर ते सूर्यवंशी आहे. वच. सारांशः—

१ परमार उर्फ पंवार २ प्रतिहार, ३ चालुक्य उर्फ साळुंके उर्फ शाक्य आणि ४ चौहान उर्फ चाहुमान हीं चारही कुळें इ. स. १००० च्या पुर्वी व तदनंतर बाराव्या तेराव्या शतकापर्यंत अग्निवंशी झणून सूर्यवंशी व चंद्रवंशी झणजे आर्यांच्या मूळच्या वंशांचीच झणून प्रसिद्ध होतीं. अग्निवंशाचें नांव तेराव्या शतकापर्यंत कोणत्याही शीलालेखांत सांपडत नाहीं. चंदभाटाच्या काव्यांत अगदी पहिल्यानें तें नमूद झालेलें दिसतें. वेदकालीन आर्यांच्या वंशांत देखील अग्निवंशाचें नांव नाहीं. नवव्या शतकांत बौद्धधर्माचा पाडाव करण्याकरितां आबूपर्वतावर केलेल्या यज्ञानंतर बौद्धधर्माचा पाडाव या चार कुळांनीं केला तेव्हांपासून कवि कल्पनांच्या कल्पना तरंगावर अग्निकुल नवीनच निर्माण झालें. नवव्या शतकांत झालेल्या यज्ञाकरितां पांच हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेले रामाचे समकालीन वसिष्ठऋषी हजर असणे शक्य नाहीं. यावरून अग्निकुलाला प्राचीनत्व देण्याकरितां वसिष्ठाचा बादरायणी संबंध कवींनीं जोडून दिला आणि अशा प्रकारें हा नवीन प्रक्षिप्तवंश नागदी अलीकडच्या काळांत चंदभाटापासून जन्मास आला व त्याचा अनुवाद इतरांनीं केला झणून कालांतरानें खऱ्या इतिहासाच्या अभावी तीच समजुत कर्णोपकर्णी अंधश्रद्धेनें रूढ होत गेली. असें वरील शीलालेखांच्या व इतर ऐतिहासिक पुराव्यानें सिद्ध आहे. यावरून अग्निवंश हा मूळच्या आर्यांचा वंश नसून अलीकडचा नवीन प्रक्षिप्तवंश आहे यांत संशय नाहीं.

७ वंश व पिढ्यांची कालगणना
आणि
दिल्लीची परंपरा.

आदि नारायणापासून सातवे पिढींत चंद्रवंशाचा मूळ पुरुष बुधराजा झाला. बुध हा चंद्राचा नातु होता. या बुधराजास सूर्य वंशापैकीं सूर्यपुत्र मनूची कन्या 'इला' ही दिली होती. तिच्यापासून चंद्रवंश चालू झाला. मनूला एकंदर १० पुत्र

होते. त्या पैकीं वडील पुत्राचे नांव ईक्ष्वाकु होते. सूर्यवंशांत ईक्ष्वाकु नांवाचा पहिला राजा अयोध्येंत होऊन गेला. त्याचे ६५ वे पिढींत क्षत्रिय कुलावतंस प्रभु रामचंद्राचा अवतार झाला. रामचंद्रा नंतर ५६ राज पुरुष झाले. जयपूर, जोधपूर, उदेपूर, कोल्हापूर येथील राजवंश त्या वंशा पैकींच आहेत. जयपूरचे राजे कच्छवाह (कुशवंशी) असून त्यांची मूळची गादी तरवगड होती. उदेपूरचे सिसोदे वंशी राजे यांची मूळ गादी वल्लभिपुरास होती. जोधपूरचे राठोड वंशी राजे प्रथम कनोज येथें होते.

चंद्रवंशी वुधाचे २७ वे पिढींत हस्ती नांवाचा राजा झाला. या हस्ती राजाने प्रथम **हस्तिनापूर** वसविलें. त्याचे ४२ वे पिढींत चंद्रवंशी परमार उर्फ पंवार वंशांत युधिष्टीर (पांडव) राजा झाला. तो हस्तिनापूरच्या सुप्रसिद्ध भारत युद्धांत विजयी झाल्यानंतर त्यानें हस्तिनापूरास सोडून वसविला **इंद्रप्रस्थ** हें नांव दिलें युधिष्टिराच्या परमार (तुवर) वंशांत ३० पिढ्यापर्यंत इंद्रप्रस्थाची गादी राहिली. परमार वंशाचा ३० वा राजा क्षेमराज याला त्याचा प्रधान विसर्प यानें मारून इंद्रप्रस्थाची गादी बळकाविली. विसर्पाचे घराण्यांत ही गादी ३८ पिढ्या चालली. अंडतीसावा राजा राजपाळ यास कुमावूचा राजा सुखवंत यानें मारून इंद्रप्रस्थचें राज्य बळकाविलें. तुवर वंशी विक्रमादित्य यानें तें राज्य त्याचे पासून पुनः परत मिळविलें. तेव्हां पासून १९ पिढ्या पर्यंत ही राजधानी तुवर वंशाकडे होती. या तुवर वंशांतील शेवटचा राजा अनंगपाळ तुवर हा निर्वंश असल्यामुळें त्यानें आपलें हें राज्य आपल्या मुलीचा मुलगा सूर्यवंशी पृथ्वीराज चव्हाण यास दिलें. पृथ्वीराजात कैद करून त्याचे डोळे काढून व हाल हाल करून महमद घोरी यानें इंद्रप्रस्थाचें राज्य इ. स. ११९३ मध्यें घेतलें. आणि मुसलमान बादशहानीं इंद्रप्रस्थास दिल्ली हें नांव दिलें. दिल्ली या नांवास आज अंदाजा ७३२ वर्षें झालीं आहेत.

या वरून ठोकळ मानानें फक्त राज्यकर्त्या पुरुषांच्या पिढ्या पाहतां चंद्रवंशाच्या उत्पत्ति पासून पृथ्वीराजा पर्यंत १३८ राजांच्या पिढ्या व पृथ्वीराजापासून आज पर्यंतच्या ७३२ वर्षांत अंदाजा 22 पिढ्या मिळून एकंदर १६० पिढ्या लोटल्या असाव्या असें वाटतें. चंद्रवंश आणि सूर्यवंश या दोन्ही वंशांची सुरुवात शेंड्याशा झाल्यानें जवळ जवळच आहे. परंतु राजक्रांतीमुळें राजकर्त्याशिवाय इतर पिढ्या सुटल्याचा संभव आहे. शंभर वर्षांत सरासरी तीन पिढ्या आशा प्रमाणानें मानवी पिढ्यांची गणना करण्याची विद्वन्मान्य रीत आहे. या हिशेबानें पाहतां चंद्र सूर्य वंशांच्या क्षत्रिय आर्यांच्या भरतखंडांतील राज्योपभोगाच्या अस्तित्वास आज अंदाजे ५३०० वर्षे किंवा राज्यक्रांतीमुळें सुटलेल्या पिढ्यासह ६००० वर्षें झालीं असावीं असें वाटतें. आर्य आणि वेद यांच्या भारतीय प्राचिनत्वा संबंधानें निरनिराळ्या विद्वानांनीं अनेक महत्वाच्या पुराणावरून जी कालगणना ठरविली आहे त्याच्याशीं वरील गोष्टींचा मेळ पडतो. (याच ग्रंथांतील वेद व पुराणें हीं प्रकरणें पहा.)

आफ्रिकेतील सहारा नांवाच्या अफाट व दुर्गम वालुकामय शुष्क सागराच्या खालील जमिनींत व उत्तर ध्रुवाच्या भागांत अलीकडे अगदी प्राचीन मनुष्यांची हांडे सांपडलीं आहेत. त्यांच्या आकारावरून व मोजमापावरून आजच्या मानवी आकृतींशीं तुलना केली असतां सृष्टी उत्पन्न होण्यास आज सगासरी अडीच लाख वर्षे झालीं असावीत असा अंदाज तज्ञ लोक वसवीत आहेत. यावरून पाहतां हिंदुस्थानांत आर्यांचा प्रवेश होण्या पूर्वीचा अगणित कालाचा अनंत इतिहास आज मुळींच उपलब्ध नाहीं—या अत्यंत प्राचीन इतिहासावर प्रकाश पाडणें म्हणजे वंशाच्या मोठ्या बांधणेंच होय.

८ गोत्रें आणि प्रवरें

१ सूर्यवंश, 2 चंद्रवंश, ३ शेष उर्फ नागवंश आणि ४ ब्रह्म उर्फ यदुवंश उर्फ हरिवंश या चार क्षत्रिय वंशांत जे सुप्रसिद्ध ऋषि आणि मंत्रद्रष्टे म्हणजे वेदमंत्र रचणारे ऋषी होऊन गेले त्यांचा नांवावरून या त्या वंशांचीं गोत्रें चालू झालीं. गोत्र ऋषी म्हणजे त्या कुळाचा मूळऋषी.

९ गोत्र व प्रवर म्हणजे काय?

कुळाचें प्रवर ऋषी. म्हणजे ज्यांनीं ऋग्वेदांतील सूक्ते रचिलीं व त्या सूक्तांनीं अग्नीची स्तुति केली असे पूर्वज.

॥ ओर्वय मृग्नेरत्यमग्निं यजमानस्य ऋषिसंतानत्वात् तं वृणीते प्रार्थयते होत्रादिभिः॥

अर्थः—यज्ञ करणारा यजमान अग्नीची प्रार्थना करितो कीं "हे अग्ने! ऋग्वेदांतील सूक्तांनीं ज्यांनीं तुझी स्तुति केली आहे अशा ऋषींचा मी वंशज आहे." यावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं यजमान हा मुख्य प्रवर ऋषींचा वंशज आहे.

गोत्रऋषीः—हा प्रवर ऋषींचा वंशज आहे म्हणून तो मंत्रकृत् किंवा मंत्र-रचना करणाराच असला पाहिजे असें नाहीं. गोत्रऋषी हा प्रवर ऋषींचा एखादा विख्यात वंशज असल्यामुळें त्याच्या पासून उत्पन्न झालेली शाखा किंवा नवीन घराणें त्यांचें नां त्या घराण्यांत लागूं होते. म्हणून गोत्रऋषी म्हणजे त्या कुळाचा मूळ ऋषी असा त्याचा अर्थ आहे. यावरून एका प्रवरापासून म्हणजे मूळच्या मंत्रऋषी पासून अनेक गोत्र ऋषी उत्पन्न होऊं शकतात. म्हणून गोत्रें अनेक आहेत; परंतु प्रवर थोडे व ठराविक आहेत. प्रवर ऋषी हे प्रत्येक गोत्रास बहुधा तीन किंवा पांच असतात. गोत्रऋषी हा या प्रवर ऋषी पैकींच असतो.

मांधाता, अंबरीष, युवनाश्व, त्रसदस्यु, पुरुकुत्स हीं प्रवर ऋषींच्या यादींत दिलेलीं नांवें, सूर्यवंशांतील प्रसिद्ध राजांचीं नांवें आहेत; आणि शुनहोत्र, अजमीढ वगैरे

चंद्रवंशांतील राजांची नांवें आहेत. भृगू व अंगीरस गण प्रवरांतील ऋषी यांतील बहुधा क्षत्रिय राजे आहेत असें दिसून येते.

१० गोत्र प्रवराचें महत्व.

वैदिक धर्मीय हिंदु आर्यांना लग्न, श्राद्ध, पक्ष, उत्तरक्रिया वगैरे धर्म कृत्यास प्रारंभ करण्यापूर्वी आपल्या गोत्राचा व प्रवराचा उच्चार करावा लागतो. त्यावरून आपण कोणत्या वैदिक पूर्वजाचे वंशांत उत्पन्न झालों त्या पूर्वजाचें स्मरण असतें. बहुधा वेद रचण्यांत आले तेव्हां पासून आज पांच हजार वर्षांवर, किंवा निदान भारत काळाच्या पूर्वीपासून आर्यांनीं आपल्या वंशोत्पत्तीची आठवण कायम ठेविली आहे.

पूर्व कालीन शिलालेखांत व ताम्रपत्रांत आठवण असलेलीं गोत्रें आज कालही क्षत्रिय घराण्यांत दिसून येतात. यावरून गोत्र धारण करणारे क्षत्रिय हे वैदिक कालचे अस्सल आर्य क्षत्रिय आहेत असें सिद्ध होतें. वेदकालीं क्षत्रिय व वैश्य यांना ब्राह्मण होता येत होतें व तसेंच ब्राह्मणही क्षत्रिय आणि वैश्य वर्णांत गुणकर्मानें येत असत. म्हणून क्षत्रियांचीं आणि ब्राह्मणांचीं कांहीं थोडीं गोत्रें एकच आहेत. पण बहुतेक सर्व गोत्रऋषी क्षत्रियच आहेत.

११ शिलालेखाचे आधार.

पूर्व कालीन लेखांत आपणास गोत्रांचे उल्लेख दिसतात ते क्षत्रियांना आपण आर्य वंशांत उत्पन्न झालेले आहोत हें सांगण्यांत वाटत असलेल्या अभिमानामुळें होत, असें म्हणणें जरूर आहे. आतां आपण ज्याप्रमाणें आपलीं अडनांवें लावतों त्याप्रमाणें वैदिक व पौराणिक काळीं क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य इत्यादि लोक आपल्या गोत्रांचा उपयोग करीत असत. आपलीं अडनांवें हीं मुद्दां गोत्रावरूनच आलेलीं आहेत. बारहूत येथील तोरणावरील लेखांत पुढील प्रमाणें लिहिलें आहे.

"**गार्गीपुत्तसाबिसदेव पुत्तेन गोतीपुत्तस अगराजस पुत्तेन वाछि पुत्तेन धनभूतिना कारितां तोरणं.**" कनिंगह्यामनें याचें भाषांतर केलें आहे तें येणें प्रमाणें:—राजा धनभूतीनें उभारलेलें तोरण; जो धनभूति राजा वत्सगोत्रांतील राणीच्या उदरीं स्वतःचें गोत्र (कौत्स) गोत्रीय राणीचा पुत्र अगराज याचा मुलगा, आणि गर्ग गोत्रोत्पन्न राणीचा पुत्र बिसदेव त्याचा नातु होता. येथें राजाची आई, आजी आणि पणजी यांच्या कुलांच्या गोत्रांचा जो सन्मानानें उल्लेख केला आहे. तो त्या सर्व राण्या आर्य कुलांतच उत्पन्न झाल्या आहेत हें दाखविण्या साठींच केलेला आहे.

१२ क्षत्रियांचीं गोत्रें स्वतंत्र आहेत.

क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र यांना मूळचीं स्वतंत्र गोत्रें व प्रवरे नाहींत, म्हणून

ते आपल्या ब्राह्मणउपाध्यायांचीं गोत्रें मानतात आणि ब्राह्मण उपाध्यायांच्या अंशा डसने घेतलेल्या गोत्रांतच ते समाधान मानतात अनें कित्येक अहंमन्य ब्राह्मण केवळ खोडसाळपणानें म्हणून ब्राह्मणेतरांचा अपमान कधीं कधीं करतात. पण खरा प्रकार त्याच्या अगदी उलट आहे; ब्राह्मणांची बहुतेक गोत्रें व प्रवरें क्षत्रिय ऋषीपासून व वैश्य ऋषी आणि शूद्र ऋषीपासून देखील सुरू झालीं आहेत. हें याबद्दल सप्रमाण दाखले ब्राह्मणी गोत्रांच्या प्रकरणांत आले आहेतच.

१३ एकाच वंशांत व एकाच गोत्रांत शरीरसंबंध होऊं शकतात काय ?

एका सूर्यवंशी इसमाचा दुसऱ्या सूर्यवंशी इसमा बरोबर विवाह होण्यास कांहीं हरकत नाही. उदेपूरचे गुहिलोद आणि जयपुरचे कच्छवाह हे दोघेही सूर्यवंशी, परंतु त्यांच्यांत विवाह होतो. राम आणि सीता ही दोघेही सूर्यवंशीच होतीं. त्याच प्रमाणें अर्जुन व द्रौपदी ही दोघेही चंद्रवंशी होतीं. पुराण काळीं क्षत्रिय कुलनावें मागजे उपनावें पहात नव्हते. ते फक्त गोत्रच पहात असत. राम वसिष्ठ गोत्राचा व सीता गौतम गोत्राची असल्यामुळें त्यांचा विवाह होऊं शकला. एका गोत्रांत किंवा एका कुळांत शरीरसंबंध होत नाहींत.

१४ गोत्र प्रवराचा विसर केव्हां व कां पडला ?

इ. स. पूर्वी ५६७ वैशाख शु० १५ या दिवशीं गौतम बुद्धाचा जन्म झाला. त्यानें बौद्ध धर्म स्थापन केला. इ. स. पूर्वी ५०० पासून बौद्ध धर्माचा प्रसार सर्व भरतखंडभर झाला. अशोक हा सार्वभौम राजा बौद्धधर्माचा पुरस्कर्ता होता. त्यामुळें त्याचे सर्व मांडलीक राजे आणि इतर बहुतेक राजे बौद्धधर्मी बनले. त्यामुळें क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य आणि शूद्र म्हणण्याच्या कोट्यावधी लोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला. त्यावेळीं वैदिक धर्मांत प्राणीहत्या फारच वाढली होती; अश्वमेध, गोमेध, अजामेध, नरमेध उर्फ आत्मयज्ञ वगैरे प्रकारच्या यज्ञांत पशुवध व मानववध होऊं लागला होता. त्याला बहुतेक लोक कंटाळले होते. तेव्हां—

"अहिंसा परमोधर्मः"

हें धर्माचें मुख्य तत्व पुढें करून त्या तत्वावर बौद्धधर्म बुद्धाने सुरू केला. त्याला उत्तम राजाश्रय मिळाल्यामुळें तो धर्म सर्व हिंदुस्थान, चीन, जपान, तिबेट, सीलोन इत्यादि देशांतही पसरला. बौद्ध धर्मांत सर्वांना समान मानत असत. वर्णभेद किंवा जातीभेद ते मानीत नसत म्हणून गोत्र मानण्याची त्यांना गरजच नव्हती. या बौद्धधर्माचा चांगला जोर सुमारे इ. स. आठवे शतकाचे अखेर पर्यंत म्हणजे १४०० वर्षे पर्यंत चांगलाच चालू होता. म्हणून आर्य लोकांना आपल्या गोत्रांचा विसर सहाजिकच पडला. त्यानंतर

इ. सनाच्या नवव्या शतकांत श्री शंकराचार्यांनें उत्तर मीमांसा नांवाचा वैदिक धर्माचा ग्रंथ लिहिला. त्याच्या मताला राजाश्रय मिळाला सबब. त्यानंतर १०००—१५०० वर्षांत अगदी इकडच्या शतकांत पुनः वैदिक धर्म जागृत झाला आणि विस्मरणांत गेलेले पूर्वसंस्कार व नवे प्रचार यांचा शोध व जीर्णोद्धार पुनः होऊं लागला. क्षत्रिय, ब्राह्मण आणि वैश्य या तीन्ही जातींत मोठाले दिग्गज होऊन गेले असून वैदिक धर्माचा उदय अगदी प्राचीन काळी झाला होता हें निर्विवाद सिद्ध आहे.

१८ व्या शतकांतील काही ऐतिहासिक चक्रवर्ती राजांच्या नांवांचा वंशवृक्ष पहिला असे चक्रवर्ती राजे व त्यांचीं गोत्रें.

अश्वलायन गृह्य सूत्राचें परिशिष्टांत पुढील माहिती दिली आहे. तीच माहिती ऐतिहासिक कथा भाग २ पान १३६-१३७ यांतही दिली आहे. ती अशी:—

अ. नं.	राजाचें नांव.	कोणत्या देशांत झाला.	गोत्र.
१	सूर्य	कलिंग देश	काश्यप
२	सोम उर्फ चंद्र	यमुना तीर	आत्रेय
३	मंगळ	अवंती देश	भारद्वाज
४	बुध	मगध देश	अत्रि
५	गुरू	सिंधु देश	अंगिरस
६	शुक्र	भोजकट देश	भार्गव
७	शनी	सौराष्ट्र देश	काश्यप
८	राहु	बर्बर देश	वैश्रवस
९	केतु	मध्य देश	जैमिनी.

वरील नऊ चक्रवर्ती राजे अत्यंत तेजःपुंज होऊन गेले. म्हणून त्यांनीं नवग्रहांना देण्यांत आलीं. अशीच सप्तऋषींची नांवें आकाशांतील सात ताऱ्यांच्या समूहास देण्यांत आलीं आहेत. कारण आर्यांच्या भरभराटी नंतर खगोल विद्या व ज्योतिष हीं त्यांनीं निर्माण केलीं.

१६ ऋषींचे प्रकार.

ऋषींचे पांच प्रकार आहेत ते येणें प्रमाणें:—

१ छंदऋषि. 2 ब्रह्मऋषि. ३ महर्षि. ४ राजऋषि. ५ देवऋषि. वसिष्ठ, कण्व, कात्यायन इत्यादि ऋषी हे छंद ऋषी होते कारण यांनी यज्ञ प्रसंगे कोणी छंद रचले. अग्नि कोण ब्रह्मऋषी; ब्रह्म यज्ञांत ईश्वराची आराधना करून ईश्वर प्राप्ति करून देणारे. भृगु वंगेरे महर्षि तिसऱ्या वर्णातील समजावे ज्यांचे पूर्वज मोठे तपस्वी. विश्वामित्र, जनक, कहुवर्ण, अत्रि. वसिष्ठ, अंगिरस, जैमिनी, याज्ञवल्क्य, कौंडिण्य, भारद्वाज इत्यादि राजऋषि-ब्रह्मर्षी यांच्या मंत्रद्रष्टे ऋषी (छंदऋषि) होते. आणि नारद हा ब्राह्मण्या वर्णातील देवऋषि होता असें मानतात.

या ऋषिवर्णे क्षत्रिय वैश्य, शूद्र, अप्सरापुत्र, इत्यादि सर्व वर्णातील लोक होते फक्त ब्राह्मण कूळ व गोत्र मूळ शोधूनये अशी प्रथा पडली आहे. राजऋषी हे सर्व मुलचे क्षात्र राजे असून उतार वयांत राज्य त्याग करून वानप्रस्थाश्रम घेऊन ब्रह्मचर्य करून ऋषी होते. छंदऋषी प्रसंगे वेद मंत्र करीत-आणि देवऋषी प्रसंगे हिमालयांतील अदृश्य भूमीत राहून देवभूमींत वास्तव्य करणारे ऋषी.

१७ मुख्य सप्त गोत्रऋषींचीं नांवें.

अगदी अर्वाचीन मतप्रमाणें म्हणजे अर्वाचीन मताप्रमाणें सात मुख्य गोत्रऋषी आणि आठवा अगस्ति हेच आठ गोत्र ऋषी मानतात. पण हें मत प्राचीन मानण्यांत नाहीं. अगस्त ऋषीचा अंतर्भाव सप्तऋषींत केलेला नाहीं यावरून असें दिसतें की मूलचा भारतीय आर्यांचे आठ घराणीं मानण्यांत येत असत. ती अशीं:—
१ विश्वामित्र, 2 जमदग्नि, ३ भारद्वाज. ४ गौतम, ५ अत्रि. ६ वसिष्ठ. ७ कश्यप, ८ अगस्त्य. हे आठही ऋषी मूलचे आर्य क्षत्रिय होत. यांचीं त्या आठही ऋषींचीं नांवें क्षत्रिय मराठा जातींत आढळतात. ऋषिः —ज्याने मंत्राचा कर्ता, असा ऋषी याचा अर्थ एका सूक्तांत सांगितला आहे. मन्त्रकृतो वृणीते ऋषिः म्हणजे धर्ममंत्र कर्ते वृणतात ऋषि म्हणतात.

ऋग्वेदांतील सूक्त रचणाऱ्या ऋषींच्या वंशजांनीं मूळ पुरुषांचीं (मूल ऋषींचीं) नांवें वंशपरंपरेने वापरण्याचा चाल अमलांत आणिली म्हणजे वेद काळचे मूळ ऋषिपुरुषांचीं व तेच गोत्रांचीं नांवें प्रसिद्ध आहेत हजारो वर्षां गेलीं तरी वेदांतील ऋषींचीं गोत्रांचीं नांवें बदलली नाहीं. यावरून ऋषींचीं नांवें हीं [illegible] या अर्थाने वापरण्यांत आलीं असावीं असें वाटतें.

१८ गोत्रावळ कुळांचा उपयोग.

वरचें आपलगा स्वतःच्या गोत्राच्या किंवा प्रवराच्या शाखेचा उल्लेख करतात. तसा विवाह क्षत्रिय आणि ब्राह्मण या दोघांनाही लागतो. बुचवलाकेड, एपि० इंडि. २–१२९ यात प्रतिहारी गोत्राचा उल्लेख आहे. प्रतिहार हे मराठा क्षत्रियांच्या ९६ कुळांपैकी एक मुख्य कुळ आहे. यावरून बौद्धकाली वैदिक धर्माचा लोप झाल्यामुळें वैदिक कर्मास अवश्य असा गोत्राचा विसर क्षत्रिय वैश्यांना व ब्राह्मणांनाही पडला व नेतर इ स. १००–११०० शतकात पुनः वैदिक धर्म ऊर्जितावस्थेस आला तेव्हां क्षत्रियांनी गोत्रांचे ऋषी कुलाचार्य अंगिकार केला असें वरील शिलालेखावरून दिसतें. नवव्या व दहाव्या शतकांत धर्माची मोठी क्रांती झाली. तेव्हां पासून विसरलेल्या गोत्रावळ कुलांची वहिवाट सुरू झाली असावी असें वरील पुराव्यावरून दिसून येतें.

कोणाकोणांत विवाहसंबंध होऊं नये हें ठरविण्याकरितां क्षत्रियांनी अर्वाचीन काळांत ऋणत्रे दहाव्या शतकापासून कुळपद्धतीचा स्वीकार केला आहे त्यामि अशा पद्धतीनें पुरोहिताचा गोत्र पाहण्याचा पद्धतीची अडचण त्यांनी जरा सुलभ केली आहे. कारण १० वें शतकापासून कुलपरंपरा पुनः अमलांत येऊं लागली. क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य व शूद्र असे चारहि हिंदु लोकांत मानतात. हे चारही वर्ण व त्यानंतर उत्पन्न झालेल्या इतर जाती आणि त्यांशिवाय इतर सर्व धर्मांचे लोक देखील एकाच परमेश्वरापासून उत्पन्न झाले आहेत, तात्पुरते सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या सर्व मानव जातींचें मूळ एकच आहे. एकाच परमेश्वरापासून उत्पन्न झालेल्या आर्य उर्फ हिंदु लोकांत कालांतराने दोन मुख्य वंश म्हणजे सूर्यवंश व चंद्रवंश निर्माण झाले. सूर्य व चंद्र यांतील भिन्न भिन्न तत्त्वांना पुढानीं स्वतंत्र होऊन निरनिराळी स्वतंत्र राज्ये स्थापन केलीं त्यांपैकी सुप्रसिद्ध पुरुषांच्या नांवावरून व आद्वितीय पराक्रमावरून रघुवंश उर्फ अग्निवंश, नागवंश उर्फ शेषवंश, रघुवंश इत्यादी पोटवंश निर्माण झाले. या पोटवंशांतील ऋषींनी अथ ऋग्वेदादी निरनिराळीं सूक्तें रचिलीं. त्यामुळें धार्मिकदृष्ट्या त्या ऋषींना प्रवर म्हणजे वेदमंत्र रचणारे मूळ ऋषी अथवा मूळ पुरुष मानूं लागले. त्या प्रवर ऋषींच्या वंशांत पुढें सुप्रसिद्ध ऋषि निर्माण झाले व त्यांच्या पासून निरनिराळे नवीन वंश पुनः त्यांच्या नांवाने सुरू झाले व त्यांना त्या त्या नवीन कुळांचे गोत्रऋषि मानण्यांत आले. गोत्र ऋषिपासून सुरू झालेल्या वंशांत उत्पन्न झालेल्या अनेक प्रसिद्ध पुरुषांपासून पुन नवीन कुळे मानण्याची प्रवृत्ति सुरू झाली. त्यामुळें राजपुतांची मुख्य ३६ कुळे, मराठा क्षत्रियांची मुख्य ९६ कुळे, कायस्थ क्षत्रियांची ४२ कुळें आणि ब्राह्मणांची व वैश्यांची शेकडों कुळें निर्माण झालीं. अशा शेकडों कुळांचा विस्तार पुनः अमर्याद झाल्यामुळें त्या प्रत्येक कुळांतील अनेक प्रसिद्ध

पुढ़ांच्या पराक्रमावरून किंवा कांहीं विशेष गुणावरून, गोत्रांच्या नांववरून व अन्य हेतूनें [illegible] कुळांस शेकडो उपनांवांच्या उपशाखा निर्माण झाल्या. [illegible] किंवा अडनांवें झालेलीं आहेत. क्षत्रियांत आणि ब्राह्मणेतर सर्व जातींतील एक उपनांवाच्या अथवा अडनांवाच्या कुळांत परस्पर शरीरसंबंध होत नाहींत. कारण शेकडा ९९. लोकांना स्वतःच्या गोत्रांचा व प्रवरांचा विसर बौद्धधर्मापूर्वी १४००-१५२० वर्षे पडला होता. तथागत गौतमबुद्धानंतर बौद्ध धर्मांतर झाला. तसा विसर पडणें अपरिहार्य आहे, म्हणून गोत्रा ऐवजीं उपनांवेंच पाहतात. ब्राह्मणांपैकीं कोणी पुराणमतवादी म्हणजे जीर्णमतवादी ब्राह्मण स्वतःच्या ब्राह्मण जाती पुरतीच, विसर पडलेल्या मूळच्या खऱ्या गोत्र प्रवरांची ही सत्य गोष्ट देखील नाखुषीने करीन असतील तर तो शुद्ध दुराग्रह आहे. कारण वेदमंत्र रचणारे प्रवर ऋषी व गोत्र ऋषी हे मुख्यत्वें क्षत्रियांमधून आणि सामान्यतें क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य व शूद्र या चारही वर्णांतून होऊन गेले आहेत व या चारही वर्णांच्या लोकांत पूर्वी परस्पर रोटी व बेटी व्यवहार राजरोसपणें हजारों वर्षेपर्यंत होत आला आहे. याबद्दल मनुस्मृति, वेद पुराणें आणि इतिहास यांत हजारों उदाहरणें उपलब्ध आहेत. या मुद्याचें स्पष्टीकरण वर्णन उदाहरणासह करूं लेखास फार विस्तार होईल. सबब यापैकीं ब्राह्मणांचीं गोत्रें या प्रकरणांत क्षत्रिय महात्म्य पुराणांतील एक उतारा दिला आहे तेवढाच पुरे.

१२ ब्राह्मणांचीं गोत्रें क्षत्रिय मूळचीं कशीं झालीं:—

वैदिककाळीं व भारतीयकाळीं देखील आर्यांत हल्लींचे चार वर्ण अस्तित्वांत नव्हते. जेते आणि जित म्हणजे आर्य आणि दस्यू असे दोनच भेद मानीत असत. पण गुणकर्मावरून केवळ समाधानाकरितां चार वर्ण तत्कालीन आर्यांचे झाले तरी क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य आणि शूद्र हे आपल्या सांत शरीरसंबंध करीत असत इतकेच नाहीं तर ब्राह्मणांचे क्षत्रिय व क्षत्रियांचे ब्राह्मणही होत असत म्हणून क्षत्रिय व ब्राह्मणांच्या प्रवरांचे आणि गोत्रांचे मूळ बहुतेक क्षत्रिय आणि क्वचित ब्राह्मण असे दोघेही आहेत. बहुतेक ब्राह्मणांचे गोत्र आणि प्रवरकर्ता म्हणजे मूळ पुरुष क्षत्रिय होते. बहुतेकांचे क्षत्रिय महात्म्य पुराणांत अगदीं थोड्या शब्दांत एकत्रित केलेला माहती ओतिलेला आहे. ती जशीच्या तशी आम्ही येथें नमूद करतो:—

क्षत्रिय पुराणांतील उतारा.

विप्रा ।नी गात्र साधित । साधित झाले क्षत्रिय पवित्र ।
मांधाता विप्रांचे गोत्र । मांधाताही क्षत्रिय ॥ १ ॥
अंगिरस हैगंदर्भ क्षत्रिय । ब्राह्मण तयाचे गोत्रीय ।
हारित कौत्सादी बहुक्षत्रिय । गोत्र प्रवर्तक विप्रांचे ॥ २ ॥

ययाती राजा क्षत्रिय असुनी । त्याची भार्या देवयानी ।
ती तों ब्राह्मण नंदिनी । विप्र जामात क्षत्रिय ॥ ३ ॥
ययातीची भार्या दुजी । शर्मिष्ठा नामें सुतासिंधु जी ।
द्रिज्ञासूनी पुरु वंशाग्रजी । दुष्यंत राजा क्षत्रिय ॥ ५ ॥
दुष्यंत सह विधली शकुंतला । तो ब्राह्मण कन्या सुशीला ।
भरत भारद्वाज कन्युमाला । गार्ग्य कुल तिजपासुनी ॥ ५ ॥
गर्भी ब्राह्मण क्षत्री झाले । क्षत्री पासून गार्ग्यकुल झालें ।
ऐसे क्षत्रियापासून जन्मले । ब्राह्मण गार्ग्य कुळाब्ज ॥ ६ ।
कुळाचार्य मुद्गल गोतम । यांचें मूळ क्षत्रियोत्तम ।
नाम मुकुलिद्ध चवन । क्षत्रियोत्तम विप्रत्व ॥ ७ ॥
ही प्रसिद्धीची नावें असती । अप्रसिद्धांस कोण पुसती
असतील ऐसे लक्षावधती । काय वर्णीव तयांना । ८ ॥
अनंतक ऐसे होतिती जार । होईल ग्रंथ विस्तार ।
तथापि कळो आला सार । विप्र.पासे क्षत्रियांतुनी ॥ ९ ॥

६ शिव महात्म्य पुराण.

२० ब्राह्मणांचा पिंड.

जितक्या शूद्रांपासून ब्राह्मणांच्या बायका आहेत त्या सर्व धार्मिक दृष्टीनें खरेखर शूद्र आहेत. असें कां ? तर शूद्रास मुंज नाहीं तशीच ब्राह्मणांच्या बायकांसही नाहीं. शूद्रा जसें शूद्रांनें तसेंच ब्राह्मणांच्या बायकांचेही धर्मकृत्य पुराणोक्त होतें असतें; वेदोक्तानें होत नसतें. अर्थात ब्राह्मणांच्या बायका धार्मिक दृष्टीनें शूद्रांच्या बहिणी समजल्या जातात. अशीं दरोबरत ब्राह्मण म्हणविणारी माणसें आईकडून धार्मिक दृष्ट्या शूद्रांपासून आलेलीं असतात. प्रत्येकाचा बाप त्याच्याच धार्मिक दृष्टीनें ब्राह्मण, व प्रत्येकाची आई त्याच्याच धार्मिक दृष्टीनें शूद्र; यामध्यें जो धार्मिक दृष्टानें बाप ब्राह्मण त्याच धार्मिक दृष्टीनें आई शूद्र; अशा निजोड जोड्यापासून आजचीं दरोबरत ब्राह्मण म्हणविणारी माणसें जन्मलीं आहेत.

ब्राह्मण म्हणविणारी माणसें स्वतःस सात ऋष्य ऋषींच्या वंशजापैकीं समजतात. १ अंगिरा, २ भृगु, ३ विश्वामित्र किंवा कौशिक, ४ कश्यप, ५ वसिष्ठ, ६ अत्रि आणि ७ अगस्ति, हीं सात ऋष्य ऋषींचीं नांवें. या सात ऋषींपैकीं तिसरा ऋषि जो विश्वामित्र हा तर क्षत्रिय होता. कौशिक गोत्र क्षत्रियांचें होतें व आहे विश्वामित्राला[illegible] अर्थात आहेत. या गोलांतली मुलगी मिळाली तर भृगुचे गोत्र आपले [illegible] समजे, जमदग्नीची आई सत्यवती, ही विश्वामि-

त्याची बहीण होती. बायको रेणुका ही देखील जातीनें क्षत्रियच होती. अंगिरा, भृगु, कश्यप, अत्रि हे तर निर्भेळ क्षत्रिय कुलोत्पन्न होते. या प्रमाणें चित्पावन ब्राह्मणांचें कुलदैवत होऊन बसलेला परशुराम हाच तर बापा आजाकडून कच्चा ब्राह्मण आणि आईआजी कडून पक्का क्षत्रिय, मिळून पक्का गंगाजमनी गोत्रांतला असा एक कच्चा ब्राह्मण होता. हा याप्रमाणें खरा ब्राह्मणही नव्हता ना धड क्षत्रियही नव्हता. वशिष्ठ हा तर उर्वशी नांवाच्या एका कलावंतीणीचा मुलगा असून त्याच्यात गोत्रांतला परशुरामानें एका मच्छी मारू कोळणीच्या मुलीस पदरीं पडूं लावून कामापुरतें पवित्र करून घेतलें होतें; या प्रमाणे परशुरामाच्या गोत्रांत आणखी एका मच्छा मारू कोळाचेंही रक्त पडलें होतें. मत्स्य कन्या; राणी बापको लोपमुद्रा, ही राजकन्या होती, त्यामुळें जी ब्राह्मण भर्गे वगैरे मंडळी आज अगस्ति गोत्रांची असतील त्यांच्या रक्तांत क्षत्रियांच्या रक्ताची मिसळ झाली असून बेलाशक गंगाजमनी नव्हे. भृगु, कौशिक, वशिष्ठ व अगस्ति या चारही गोत्रांच्या ब्राह्मणांत आणखी काश्यप व अत्रि या तीन गोत्रांशी पूर्वापासून इतकें भलतें आहे की, हीं सातही गोत्रेंच खरीं ब्राह्मणक्षत्रियच होतां. याप्रमाणें सातही गोत्रांपैकीं एका गोत्रांत जन्मून आज ब्राह्मण झालेल्यांचीं लग्नें आजकाल देशीं आहेत त्यांच्या पिंडांत क्षत्रियांचें, कोळ्याचें व दुसऱ्याचेंही रक्त कमजास्त प्रमाणानें पूर्वीच पडून गेलें आहे व म्हणून "ब्राह्मणें कुठे पाहूं नयें" अशी म्हण आबाल वृद्धाच्या तोंडीं झालेली आहे. तेव्हा आज ब्राह्मण म्हणविलेल्या माणसांची निराधार व रिकामटेकडेपणाची पवित्रतेची उंच उंच बढाया घालणें व्यर्थ आहे.

२? ब्राह्मणांच्या गोत्रा संबंधानें मनुस्मृतींत एक वचन आहे तें येणें प्रमाणें:—

हस्तिन्यामचलो जात उल्लुक्यांकश्च पिंगलः ।
अगस्त्योऽगस्ति पत्न्यश्च कौशिकः कुश संभवः ॥
कपिलः कपिलाज्जातः शाल गुरुमाश्च गौतमः ।
द्रोणाश्वत्थेषु कलशा लिंसेवी तितरीषु सुतः ॥
[illegible]
कैवर्तिन्यामदृष्यासः कौशिक श्च शूद्रिकाः ॥
व्यासो लुब्धक संभूता वसिष्ठः उर्वशी सुतः ।
नाण्डा राजीवजः शौंडा विधवा सुतः ॥
सांख्य श्राद्ध विभूत्यां गार्ग्यो गर्भात सुतः ।
नरेऽस्मिन ब्राह्मणो माता लोकाज्ज्वारा इमे ब्राह्मणः ॥ १ ॥

या मनुस्मृतीच्याच आधारानें ब्राह्मणांचीं कुलगोत्रें मानलीं आहेत. वरील मनुस्मृतीच्या आधारानें ब्राह्मणांच्या कुळगोत्रासंबंधानें मराठींत एक पद एका कवीनें केलें आहे. तें येणें प्रमाणें:—

२२ मनुस्मृतीच्या वचनाच्या आधारें ब्राह्मणांच्या उत्पत्तिबद्दलचें पद.

॥ पद ॥

नसतां ब्राह्मणी माता । ब्रम्हण कसें तुम्ही म्हणता ? ॥ धृ ॥
अगस्त्याच्या फुलापासून अगस्ति ऋषि जन्मला ।
सरळ सोंड हत्तीच्या पोटीं अचल मुनी तो आला ॥ नसतां० ॥
वानरीच्या पोटीं जन्मला प्रसिद्ध कपिल मुनी ।
द्रोणाचार्य ऋषी जन्मला पत्राकाठिच्या द्रोणी ॥ २ ॥ नसतां० ॥
तित्ति ऋषी तित्तिर पक्षाच्या पिंगल ऋषी घुबडीचा ।
शृंगऋषी हा मृगी पोटुनी कौशिक कुशगवताचा ॥ ३ ॥ नसतां० ॥
गौतम ऋषी सस्यःपोटीं संभाग्य कोल्हीचा ।
मांडव्य ऋषी मेंढुक पोटीं गर्गमुनी गाढवीचा ॥ ४ ॥ नसतां० ॥
अती शूद्र ते सांख्यमुनी ते कविलर पाराशर ।
मातंग ऋषी मांगिणपोटीं टंक ऋषी चांभार ॥ ५ ॥ नसतां० ॥
सत्यकाम जाबाल दीर्घतम कुंवारिच्या पोटीं ।
परशुराम रेणुका धुष्टी पुराणीं ह्या गोष्टी ॥ ६ ॥ नसतां० ॥
कोळणीच्या पोटीं जन्मला व्यास पुराणें कर्ता ।
वाल्या कोळी वाल्मिक झाला प्रसिद्ध ह्या ऋषि वार्ता ॥ ७ ॥ नसतां० ॥
उर्वशी वेश्येच्या पोटीं वसिष्ठ जन्मा आले ।
ऋषपेक्षुष जीच कुलांतुनी पवित्र ब्राह्मण झाले ॥ ८ ॥ नसतां० ॥
जानश्रुती पुराणग भारद्वाज ऋषी हे दोन ।
शूद्री पोटीं जन्मा आले साक्षी वेद पुराण ॥ ९ ॥ नसतां० ॥
विश्वेत्र पोटीं कौशिक ऋषी धोविण नारद मानी ।
मुख्य मुख्य सांगितले येथें सोडा विस्तर आतां ॥ १० ॥ नसतां० ॥
श्रुती स्मृतींच्या उपनयनांतुनी कल्पनी पुष्पें गोळा ।
घाली भटांच्या गळ्यांत गुंफुनी गोत्र ऋषींच्या माळा ॥ ११ ॥
नसतां ब्राह्मणी माता । ब्राह्मण कसें तुम्ही म्हणतां ? ॥

या प्रकारें ब्राह्मणांच्या गोत्रांची उत्पत्ति मनुस्मृतीचा आधारें मांडिली आहे. पारमार्थिक दृष्ट्या मानवपैकींच जे विशेष पुरुष म्हणजे वेदमंत्रकर्ते होऊन गेले त्यांना ऋषी म्हणतात. ऋषि म्हणजे देव असा अर्थ किंवा वाटा समज पुर्वी कधींच नव्हता व हल्लींही नाहीं. वेद ऋषी प्रणित आहेत. वेद ईश्वर प्रणित नाहींत. हें आतां निर्विवाद सिद्ध झालें आहे वेदकाळीं लेखनकला नव्हती म्हणून श्रुति, स्मृति आणि वेद तोंडपाठ करून स्मरणांत ठेवीत असत हेंही सिद्ध झालें आहे त्याच प्रमाणें प्रभु श्रीरामचंद्र आणि श्रीकृष्ण यांना देवांचे अवतार मानतात; पण ते देखील आपआपल्या आईच्या पोटींच जन्मास आले होते. आर्यांच्या ज्या चंद्रवंशांत किंवा सूर्यवंशांत हे सर्व ऋषी आणि ईश्वरतुल्य अवतारी पुरुष होऊन गेले त्या वंशांचे मूळ पुरुष सर्व आपल्या आईच्याच पोटीं जन्मास आले. सारांश मानव जन्म मानव योनीशिवाय अन्य मार्गानें होणें शक्यच नाहीं. हा निर्विवाद गोष्ट सर्व धर्मास व सर्व शास्त्रास मान्य आहे. असें असतां त्याच मानव योनींतून जन्मास आलेल्या ऋषींपैकीं कोणी हत्तीनी पासून तर कोणी वानर, कोल्हे, हरीण, ससा, गाढव, बेडूक, तित्तरपक्षी, घुबड, गवत, अगस्त्याचें फूल, पत्रावळीचा द्रोण, मातीची घागर, व पायाची धूळ या पासून जन्मास आल्या बद्दलच्या अशक्य व अतींच खोट्या गोष्टी ज्या पुराणांत आणि हिंदु धर्म शास्त्रांत म्हणजे मनुस्मृतींत देखील भट्टांनीं लिहून ठेविल्या आहेत, अशा त्या भट्टांच्या भाकडकथारूपी पुराणांना व त्या मनुस्मृतीला अर्थात भ्रष्ट भट्टांनीं भ्रष्ट्वि लेल्या त्यांतील भाकड कथारूपी असंभवनीय प्रक्षिप्त भागांना आजच्या ज्ञान युगांत सुज्ञांनीं कितीं धिक्कार दिला पाहीजे याचा निष्कर्ष सुज्ञ वाचकांवरच आम्ही सोपवितों.



या तक्त्यांतील जाडेजा आणि जम्मुवाल हीं दोन कुळें रजपुतांच्या मुख्य ३६ कुळांच्या यादींत सांपडत नाहींत. रजपुतांची १२ गोत्रें, वंश आणि परिशिष्ट नं. १ च्या तक्त्यांत नं. ३० पासुन नं. ५३ पर्यंत दर्शविलेल्या उत्तर हिंदुस्थानच्या क्षत्रिय राजकुलांपैकीं बरीच कुळे मराठा क्षत्रिय जातींच्या वंश कुळगोत्रांशीं बरोबर मिळतात. या शिवाय सातार्‍याचे छत्रपति प्रतापसिंह महाराज यांनीं इ. स. १८२५ सालीं उदेपुरच्या महाराणाजीस पत्र लिहून त्यांचा व आपला कुळ गोत्रांचा आणि वंशावळींचा मेळा मिळवून दाखविला आणि राणाजींनीं तो मेळ मान्य केला. यावरून आठव्या शतकांत उदयास आलेले राजपुत आणि इ. सनाच्या पूर्वी पांच सहा शतकांपासुन इतिहासप्रसिद्ध असलेले क्षत्रिय-मराठे हे एकच आहेत व प्राचीन मराठा शब्दातूनच राजपुत म्हणजे राजपुत्र हें अर्वाचीन नांव निर्माण झाले ही गोष्ट सिद्ध होते. या तक्त्यावरून असेंही दिसतें कीं क्षत्रियांच्या ब्राह्मण उपाध्यायांचीं गोत्रें क्षत्रियांनीं उसनी घेतली नाहींत. क्षत्रियांचीं गोत्रें स्वतंत्र आहेतच तीं क्षत्रिय राजऋषींपासुन सुरू झालेलीं आहेत. मात्र क्षत्रिय राजऋषींचीं गोत्रें ब्राह्मणांनीं उसनीं घेतलीं आहेत यावद्दल गोत्र या प्रकरणांत अनेक पुरावे दिले आहेत.

घार आणि देवास येथें पंवार उर्फ प्रमार घराण्याच्या गाद्या असल्याबद्दल नं. ५-६-७ मध्यें यांत वर्णन केलेंच आहे. त्याशिवाय उत्तर हिंदुस्थानांत, बुंदेलखंडांत अजयगड, मध्यभारतांत राजगड व नरसिंगगड, बिहार प्रांतांत भोजपुरिया व बक्सरिया, संयुक्त प्रांतांत टिहरी व गढवाल या प्रमाणें एकंदर सात लहान लहान संस्थानें पवारांचीं आहेत त्यांची तपशीलवार इतर माहिती मिळाली नाहीं म्हणून हीं संस्थानें यां तक्त्यांत दाखल केली नाहींत. पण दक्षिण आणि उत्तरचे पवार हें राजघराणें एकच आहे.

दक्षिण हैद्राबाद-निझामचें संस्थानांत-पब्लिक्युडेटरीचीफ म्हणजे पोटसंस्थानिकांच्या मराठा-क्षत्रियांच्या-गाद्या १० आहेत. त्या येणें प्रमाणें:—

(१) महाराजा रावरंभा जीवंतबहादुर; संस्थान बलदा (२) राजा सोमेश्वरराव महाबलवंत बहादुर, नामपल्ली; (३) राजा राजेश्वरराव महायशवंत बहादुर नामपल्ली स्टेशन; (५) सवाई राजा रामेश्वरराव व हरी-बलवंत महाभूपाल बहादुर वनपरती संस्थान; (६) राजा सिताराम सिंह भूपाल बहादुर अमरचिंता संस्थान; (७) राजा सिताराम भूपाल बहादुर गदवाल; (८) राजाराम भूपाल बहादुर गदवाल; (९) राजा रघुनाथराव महारणधीरवंत बहादुर हैद्राबाद. (१०) राजा कुंडराव्ही बहादुर चिंचवड संस्थान.

नं.	संस्थानचें नांव.	संस्थानिकाचें आडनांव.	पदवी.	जात.	वंश.
१	२	३	४	५	६
१	कोल्हापूर	भोसले	G. C. I. E.	क्षत्रिय मराठे	सूर्य
२	ग्वाल्हेर	शिंदे	G.C S.I. G. C.V.O.GB.E. L.L..D.D.C.L	,,	चंद्र (शेष)
३	बडोदे	गायकवाड	G. C. S. I. G C I.E.	,,	चंद्र
४	इंदूर	होळकर	G. C. I. E.	क्ष.म. धनगर	,,
५	धार	पवार	K.C S.I.K.B.E.	क्षत्रिय मराठे	,,
६	देवास (सी.)	,,	K. C. S. I.	,,	,,
७	देवास (जू.)	,,	,,	,,	,,
८	अक्कलकोट	राजे भोसले	राजासो.	,,	सूर्य
९	सावंतवाडी	सावंत भोसले	सरदेसाई	,,	,,
१०	फलटण	नाईक निंबाळकर	C. S I.	,,	चंद्र
११	मुधोळ	राजे घोरपडे	K. C I. E.	,,	सूर्य
१२	जत	डफळे(चव्हाण)	चीफ राजे सो.	,,	,,
१३	सोंडूर	घोरपडे	,,	,,	,,
१४	कापशी(कोल्हापूर)	चव्हाण	राजा	—	सूर्य
१५	वालेगांव (पुणे)	जाधव	राजे	—	चंद्र
१६	कागल (सीनी)	घाटगे	सर्जेराव वजा रतसा आब	—	सूर्य
१७	,, (जूनि)	,,	सरलष्कर	—	,,
१८	मिरज (पटवर्धन)	निंबाळकर	हिंमतबाहदर	,,	चंद्र
१९	,, (पंती)	सरदेशपांडे	फ्युडेटरीचीफ	,,	सूर्य
२०	तोरगळ(कोल्हापूर)	शिंदे	,,	,,	,,
२१	दत्तवाड	घोरपडे	अ. डल उमराव	,,	चंद्र (शेष)
२२	तळेगांव	दाभाडे	सेनापती	,,	सूर्य
२३	सातारा	भोसले	छत्रपति	,,	चंद्र
२४	गजेंद्रगड	घोरपडे	—	,,	सूर्य
२५	तंजावर	भोसले	राजे	,,	,,
२६	नागपूर	,,	राजे बहादुर	,,	,,

गोत्र.	वार्षिक उत्पन्न.	खेरा.
७	८	९
वैजवाप.कौशि, शांडिल्य	८७,६६,२९०	H H महाराजा श्रीराजाराम महाराज छत्रपति
	२,१९३१,६१७	H. H महाराजा मुख्तारुल्मुल्क अजीमुल इक्तेदार रफी शुश्वान, वालिपिकों मोहतपाम दौरान, उम्दतुल उमरा महाराजाधिराज माधवराव महाराज.
वसिष्ट	२,१०,००,०००	फर्जंदखास दौलत इंग्लीशिया महाराजा सरसयाजीराव गायकवाड सेनाखास खेल शमशेर बहादूर (H. H.)
,,	१,२५,००,०००	H. H. महाराजाधिराज राजश्री. सर तुकोजीराव होळकर
,,	१३,२६,०००	H. H. महाराजा लेफ्टनंट कर्नल सर उदाजीराव पवार
,,	३,५०,०००	H. H. महाराजा सर तुकोजीराम पवार सेनाखासखेल.
,,	६,१०,०००	H. H महाराजा मल्हारराव बाबासाहेब पवार.
कौशिक,वै.	९,५९,०९२	H.H. महाराजा भोसले साहेब.
,,	६,८१,०३०	कं.H.H राजेबहादूर खेमसावंत भोसले जामूनी.सरदेसाई
शांडिल्य	२,२८,४५९	म. लेफ्टनंट श्रीमंत मालोजीराव उर्फ बाबासाहेब महाडिक
वसिष्ट	३,९ ८००	सर मालोजीराव व्यंकटराव राजे घोरपडे.
,,	१६००००	रामराव अमृतराव उ. अबासो. उ. इफळे नानासाहेब.
,,	१५००००	राजासो. चीफ ऑफ सोंडूर
,,	१,०६,६२०	मे.जयसिंहराव घोरपडे सेनापती कोल्हापूर सं. जाहगीरदार
अत्रि	१०५०००	राजे शंभुसिंह अमरसिंह जाधव
वसिष्ट	३,०८,६३१	कोल्हापूर संस्थानांतील जाहगीरदार.
,,	१०३,४४६	,, ,,
शांडिल्य	६००००	,, ,,
भारद्वाज	७५०००	,, ,,
,,	५००००	,, ,,
कौंडिण्य	१,०२,२६०	कोल्हापूर सं. जा. ठाकूर निर्भयसिंह सेनाखासखेल
वसिष्ठ	५०,०००	को. सं. जा.
शांडिल्य	५०,०००	यशवंतराव खंडेराव दाभाडे
कौशिक उ.वै.	७५०००	भाऊसाहेब महाराज
,,	४००००	
,,	५०००००	
,,	३०००००	राजे बहादुर रघुजी भोसले.

नं.	संस्थानचे नांव.	संस्थानिकाचे घराण्याचें नांव.	पदवी	जात	वंश
१	२	३	४	५	६
७	पाटणावं स्थान (कोल्हापुरांतगत.)	संकपाळ	क्षात्रजगद्गुरु	क्ष. मराठा	चंद्रवंश
८	त्रावणकोर		G. C. S. I.	,,	,,
	म्हसुर		G. C I E.	,,	,,
	डुंगरपूर (डुंगरपूर)	गुहिलोद (सिसो)	G.c.S.I.G.c.I.E	राजपूत क्षत्रिय	सूर्यवंश
	रतलाम (रतलाम)	राठोड	K.C V.O.	,,	,,
	जोधपूर (अलवार)	कछवाह	G.c S I.G c.1.E. G c.U.O c.B E	,,	,,
१२	सुदा (सिरोही)	हाडाचौहान	G c S.I.G,S I.E. G.C.V.O.	,,	,,
१४	कोट (झालवाडा)	,,	महाराव G.c.S.I. G.c.L.E.C.B E.	,,	,,
	धरमपुरिया	परमार	...	,,	सूर्य
	भावनगर	गुहिल	...	,,	चंद्र
३७	कोटडा	चुडासम	...	,,	चंद्र
३८	कच्छ	जाडेजा	G.c.S.I.G.c I.E.	,,	,,
३९	नवानगर	,,	G.c S.I G.B E,	,,	,,
४०	गोंडळ	"	L c.I E.L.L DD GL.M D,F,R L	,,	,,
४१	मोरवी	,,	ठाकोरसो.	,,	,,
४२	राजकोट	,,	K C I E.	,,	च
४३	धांगध्रा	झाला	G.c.I E.K C S.I	,,	,,
४४	लिमडी	,,	म. K-C.1.E.	,,	,,
४५	वांकानेर	,,	,,	,,	सूर्य
४६	पाटण	,,		,,	,,
४७	लूनावाडा (कठि.)	सोळंकी	म. ,,	,,	,,
४८	रेवाकांठा	—		,,	,,
४९	पेठपूर (महीकांठा)	—		,,	,,
५०	रीवा (बुंदलखंड)	चावडा (सोळंकी)		,,	,,
५१	काश्मीर	डग्गूवाल	G.c.S.I.	,,	सूर्यवंश
५२	सिधौर	चंदल ...		,,	चंद्रवंश
५३	दिल्ली-पाटण	तुवर ...		,,	

गोत्र	वार्षिक उत्पन्न.	शेरा.
७	८	९
गर्ग	१००००	सदाशिवराव लक्ष्मणराव बनाडोकर बी. ए. यांस श्री. साहू छत्रपतींनी १९२१ साली क्षात्रजगद्गुरुंच्या पदवीवर नेमलेले हे भगवी पदवीधर क्षात्रजगद्गुरु आहेत.
वसिष्ट	२,१०,६६,८३०	H. H- महाराजा रामेश्वरसिंग
चंद्रसेय.	३ २८,०२,०००	H. H महाराजा राव श्रीकृष्णराज बाहादूर महादूर
वैजवाप	५१ ००,०००	चंद्रशेखरप्रसाद सिंहदेव बहादूर यांचे पूर्वजांचे गो. सा.
गोतम	१,२०,००,०००	His H. H राजराजेश्वर महाराजाधिराज सरमदी राजाधिराज श्री सर जयदमिंग व. पु.गो. भा.
मानव्य	९६,००,०००	H. H. सरमदी राजाहाय हिंदुस्थान राजराजेंद्र म. वि. श्री. म. सवाई मानसिंहजी व. पु. गोत्र वत्स
वत्स	१०,००,०००	महाराव राजा सर रघुवीरसिंह बहादूर (H-H-)
,,	५३,००,०००	H.H.कॅप्टनंट कर्नल सर उमेदसिंहजी बहादूर
वसिष्ट	३०००००	
गौतम	७०,७४,६२९	,, महाराजा श्रीकृष्णकुमारसिंहजी पु. गो. काश्यप
अत्रि	३०००,००	
,,	२३,००,०००	,, महाराजाधिराज मिर्जा महाराव श्री खेंगारजी स.ब.
,,	६४०,००,००	,, महाराजा जाम ले. क. श्री सर रणजीतसिंहजी ब.
,,	५०,०००००	,, भावसिंहजी ठाकोरसाहेब
,,	८,९६,१७९	H.H the ठाकोरसाहेब श्री लुखधीरजी बहादूर
,,	९,९१,२१५	,, ,, सर ले जीराज साहेब
,,	२५,००,०००	,, महाराजा सर श्रीमंतसिंहजी बहादूर
मार्कंडेय	१०,००,०००	,, ,, ,, दौलतसिंहजी
,,	७,४७,३३३	,, राजासाहेब अमरसिंहजी बानेसिंहजी
,,	३५०००	
,,	४,१९,०२१	,, महाराणा दखतसिंहजी दालेसिंहजी
भारद्वाज	३००००	
,,	,,	
,,	,,	,, महाराजा गुलाबसिंहजी बहादूर
,,	३५४००००	,, ,, सर प्रतापसिंहजी इंद्रमणिंदर ब. पु.गो. वसिष्ठ
,,	३००००	,, ,, इंद्रमणीश्वर प्रसादसिंहजी पु. गो. काश्यप
वंद्रसेय	,,	
विजयगढ		

क्र.	संस्थानिकाचे नांव.	संस्थानिकाचे घराण्याचें नांव	पदवी	जात	वंश
१	२	३	४	५	६
१४	कोल्हापूर.	भोसले	राजे	क्षत्रिय मराठा	चंद्र
१५	बडोदे.	मोहिते.	हंबीरराव	...	सूर्य
१६	नागपूर	गुजर.	सरदार	...	सूर्य
१७	माहड	महाडिक	राजे	...	सूर्य
१८	बडोदा	आहेरराव	राजे	...	सूर्य
१९	बडोदा	पालकर	राजे	...	चंद्र
२०	कोल्हापूर	सुर्वे	राजा	...	सूर्य
२१	कोल्हापूर	खानविलकर	राजे	...	सूर्य
२२	नागपूर	दळवी	सेनापती	,,	सूर्य
२३	नागपूर	सळुंखे, पाटनकर	सरदार	,,	सूर्य
२४	नागपूर	दाभाडे	सेनापती	,,	चंद्र
२५	नागपूर	आंग्रे.	सरखेल	,,	सूर्य
२६	बडोदा	गिरोळे			

हिंदुस्थानांत हिंदु, मुसलमान, गोंड, कारकू, मिश्र वगैरे संस्थानिक पोटसंस्थानिक मिळून एकंदर ७५० लहानमोठे संस्थानिक आहेत त्यांपैकी फक्त क्षत्रिय जातीच्या ठळक संस्थानिकाची माहिती वांतदिली आहे.



तत्सत्

गोत्र.	वार्षिक उत्पन्न	शेरा
७	८	९
वैयाघ्र.		
वसिष्ठ		
अत्रि		
हरित वत्स.		
भारद्वाज.		
गोतम.		पालकर गायकवाडचा पोट भेद आहे.
भारद्वाज.		
जाबाली.		खानविलकर हल्लीचे राजाराम छत्रपती महाराज यांचे मामा.
वसिष्ठ.		
वानव्य.		
शांडिल्य.		
कौशिक.		



सूर्य वंशाचीं गोत्रें.——— परिशिष्ट नं. २

टीप:— स्कंद पुराण सह्याद्रिखंड अध्याय २७ यांत सूर्यवंशाचीं १२ मु. गोत्रें सांगितलीं आहेत. त्यांचीं नांवें नंबर २–३–४–६–७–८–९–११–१३–१४ १७–१८ आहेत. बाकींचीं सहा गोत्रें नंतर वहिवाटींत आलीं आहेत. एकाच नांवाचें कांहीं ऋषी सूर्य आणि चंद्र वंशांत होऊन गेल्यामुळें तींच गोत्रें दोन्ही वंशांत चालू आहेत; व याच कारणामुळें हल्लीं सूर्य वंशाचीं एकंदर १८ गोत्रें प्रचारांत आहेत. वर्णानुक्रमानें सूर्यवंशाच्या गोत्रांची यादी खालीं दिली आहे.

अ. नं.	गोत्र.	मागचा आपला वंशाचा तोलनं.	प्रवर.	शेरा.
१	आत्र.	१	त्रिप्रवर:-आत्रेय; आर्यवान; शाश्वत	
२	कश्यप.		त्रिप्रवर:-काश्यप; वत्स; नैधृव.	कश्यप सूर्याचा बाप होता.
३	कौशिक.	६	पंचप्रवर:-शौनक; भारद्वाज; गृत्स्यमद; कौशिक; धनंजय.	विश्वामित्राला ही
४	कौंडिण्य.	२८	त्रिप्रवर:-कौंडिण्य आंगिरस बार्हस्पत्य	कौशिक ह्मणतात कारण
५	गौतम.	८	,, आंगिरस; आयास्य; गौतम.	तो कौशिका
६	पूतिमाक्ष.		,, ...	च्या मागण्यांत
७	ब्रह्मजनार्दन.		पंचप्रवर	त जन्मला.
८	भारद्वाज.	१६	त्रिप्रवर:-आंगिरस; बार्हस्पत्य भारद्वाज.	
९	मांडव्य.	१८	,, च्यावन; आप्नवान; जमदग्नि.	
१०	मानव्य.		,, ...	
११	वसिष्ठ.	२३	,, वसिष्ठ; शक्ति; पराशर.	
१२	वत्स.		पंचप्रवर: भार्गव; च्यावन; आप्नवान; और्व; जामदग्न्य.	
१३	वृद्ध विष्णु.		त्रिप्रवर:-	
१४	विश्वामित्र	२५	,, भारद्वाज; धनंजय; विश्वामित्र	
१५	वैजवाप-वाजपेयी.		,, ...	
१६	शौनक	३१	,, शौनक; भारद्वाज; गृत्स्यमद.	
१७	सौपंल. उर्फ सौतल्य.		,, ...	
१८	हारित.		,, आंगिरस; अंबरीष; मानवाश्व.	

परिशिष्ट. नं. २

चंद्रवंशाचीं गोत्रें ५७ आहेत त्यांपैकीं जीं गोत्रें प्रसिद्ध आहे। तीं येणेप्रमाणें

टीप:—स्कंद पुराणांतर्गत सह्याद्री खंडाचा अध्याय २७ यांत चंद्रवंशाचीं २५ मुख्य गोत्रें सांगितलीं आहेत. पण चंद्र आणि सूर्य या दोन मुख्य वंशांत एकाच नांवाचे कांहीं राजऋषी होऊनें गेले, त्यामुळें गोत्रांचा संख्या ५७ झाली. त्यापैकीं हल्लीं ३३ गोत्रें प्रचारांत आहेत. त्यांचीं नांवें त्यांचें प्रवरासह येथें वर्णानुक्रमानें दिलीं आहेत.

अ नं.	गोत्र.	अगस्त्याचा सूर्य वंशांतील नंबर.	प्रवर.	शेरा:-
१	अत्रि.	१	त्रिप्रवर:-आत्रेय; आर्चनानस; श्यावस्व.	
२	अगास्ति.		पंचप्रवर:-अगस्ति: दार्ढ्यच्युत; इधावह; असित; शावाश्व.	
३	उपम.		त्रिप्रवर:-	
४	कण्व.		,, अंगिरस; अजामीढ; कण्व.	
५	कपिल.		पंचप्रवर:-अंगिरस; उपमन्य; बार्हस्पत्य; चत्राण; कपिल.	कपिल-चंद्रवंशांतील दुसऱ्या शाखेचा ४० वी पिढी.
६	कौशिक.	३	पंचप्रवर:-शौनक; भार्गद्वाज; गृत्स्यमद; कौशिक; घनंजय.	चंद्रवंश २७ पिढीचा राजा.
७	गार्ग्य.		पंचप्रवर: गर्ग; अंगिरस; वैन्य; बार्हस्पत्य; भारद्वाज.	
८	गौतम.	५	त्रिप्रवर:-गौतम: अंगिरस; औतथ्य.	
९	चंद्रात्रेय.		.... ,,	
१०	जमदग्नि.		पंचप्रवर:-भार्गव; च्यवन; आप्नवान: और्व; जमदग्न.	
११	दुर्वास.		त्रिप्रवर:-दुर्वास; अत्रि; कौशिक.	
१२	पराशर.		,, पराशर; वसिष्ठ; शाक्ति.	
१३	प्रल्हाद.		.... ,,	
१४	पुलस्त्य.		,, अगस्ति; मद्देंद्र: मयोभुव (पुलह)	
१५	बकदालभ्य.		....	
१६	भारद्वाज.	८	,, अंगिरस: बार्हस्पत्य भारद्वाज.	भारद्वाज चंद्रवंशांतील २८ वी पिढी.

१७	मकुन.		... ...	
१८	मांडव्य.	९	त्रिप्रवर:-च्यावन; आप्नवान; जमदग्नि	
१९	मार्कंडेय		पंचप्रवर:-	
२०	याज्ञवल्क्य		त्रिप्रवर:—	
२१	लामश.		... ...	
२२	वत्स.		पंचप्रवर:-भार्गव: च्यावन; आप्नवान; और्व; जामदग्न्य.	
२३	वसिष्ठ.	११	त्रिप्रवर:-वसिष्ठ; शाक्त: पराशर.	
४	व्यास.		... ...	
२५	विश्वामित्र.	१४	त्रिप्रवर:-भारद्वाज: धनंजय: विश्वामित्र.	विश्वामित्र क्षेत्र-वंशांतील ४० वे पिढीत जन्म ला यालाच कौशिक असेंहि ह्मणतात.
२६	शांडिल्य.		त्रिप्रवर:-शांडिल्य; असित; देवल.	
२७	शुक		... ...	

चंद्रवंशापैकीं क्षेत्र उर्फ नाग या पोट वंशाचीं गोत्रें:—

२८	कौंडिण्य.	४	त्रिप्रवर:-कौंडिण्य: आंगिरस; बार्हस्पत्य.	
२९	माल्यवंत.		,, माल्यवंत; विश्वामित्र; उदालक	
३०	विश्वावसु.		,, शेषनाग; मांधाता; विश्वावसु.	
३१	वैयाघ्रपद.		,, देवरात; विश्वामित्र; औदाल उर्फ सांकृत्य.	
३२	शौनक्य.		... ...	

चंद्रवंशापैकीं ब्रह्मवंशाचीं गोत्रें.

चंद्रवंशापैकीं ब्रह्मवंशाचीं गोत्रें अनेक आहेत पण त्यापैकीं एकच प्रसिद्ध आहे. ब्रह्मवंश उर्फ यदुवंश उर्फ हरिवंश ही चंद्र वंशाच्या एकाच पोट भागाचीं नांवें आहेत.

३३	गानक-शौनक्य उर्फ सांकृत्य.	१६	त्रिप्रवर:-शौनक्य; आंगिरस: ब्रह्म.	

मराठा क्षत्रियांचे कुळगोल कुळाचार वगैरे

परिशिष्ट नं. ४ अ. ४ ब. आणि नं. ५

अनुक्रमणिका.

१ सूचना उर्फ उघडण्याची किल्ली
२ पंचकुळें व सप्तकुळी
३ मराठा क्षत्रियांचीं शहाण्णवकुळें परिशिष्ट नं. ४ अ.
४ मराठा क्षत्रियांच्या ९६ कुळांचीं वर्णानुक्रमवार यादी. परिशिष्ट नं. ४ ब.
५ कुळें, पोटकुळें, वंश, गोत्र, कुळाचार यांचा तक्ता. परिशिष्ट न.५

सूचना उर्फ उघडण्याची किल्ली.

१ परिशिष्ट न. ६ मध्यें सर्व महाराष्ट्र, वऱ्हाड, सी. पी. सह्य दख्खन व उत्तर हिंदुस्थानांत चालू असलेलीं तीन हजार उपनावें वर्णानुक्रमानें दिलीं आहेत. त्यांत प्रत्येकानें आपलें उपनाव वर्णानुक्रमानें पहावें त्याच्यापुढें शहाण्णव कुळांपैकीं ज्या मुख्य कुळांत त्याचा समावेश होतो त्या मुख्यकुळाचा नंबर दिला आहे. त्या नंबरचें कूळ परिशिष्ट नं. ५ मध्यें काढून पहावें म्हणजे त्याची सर्व माहिती त्यांत सांपडेल.

२ यांत दिलेल्या उपनांवाचे मराठा क्षत्रियलोक उत्तरेस, नेपाळ, भुतान, काश्मीर पासून दक्षिणेस मद्रास इलाखा, म्हैसूर गोमेश्वर व केप कन्याकुमारी पर्यंत आणि पूर्वेस बंगालच्या उपसागरा पासून तों पश्चिमेस अरबी समुद्र पर्यंत सर्व हिंदुस्थानभर व त्याच प्रमाणें जपान, चीन, इराण, काबूल, आफ्रिका व युरोप खंडात सुद्धां हल्ली पसरलेले आहेत.

३ मध्यंतरीं सुमारे १४००-१५०० वर्षे बौद्धधर्माचा अमल हिंदुस्थानांत होता. त्या धर्मांत वंश गोत्राची, चातुर्वर्णाची किंवा जातिभेदाची मान्यता तिळभर सुद्धां नव्हती म्हणून या दीर्घ काळांत बहुतेक लोकांना आर्य हे एकच नांव होतें. कुळ, गोत्र वंश, जात, वगैरेचें महत्व त्या काळांत विशेष नव्हतें. यामुळें बहुतेक लोकांना आपले वंश, गोत्र कुळांचा विसर पडला. या नंतर गेल्या एकहजार वर्षांत वैदिक धर्माची परंपरा पुनः वर डोकें काढू लागली त्यामुळें पुनः पुर्व संस्कारांचा शोध झाला. व त्याचा निश्चय, विचारपुसानें व प्राचीन कुल परंपरेच्या स्मृतीनें ठरविण्यांत आला. या एकाच मुख्य कारणामुळें एकाच कुळांत अनेक वंश गावांचे लोक हल्लीं कां सांपडतात याचा खुलासा होतो. याचा ज्यास्त सविस्तर खुलासा प्रकरण न. ३२ वंश, गोत्र विचार या प्रकरणांत केला आहे तो पहा.

४ एकाच आदिनारायणा पासून (परमेश्वरापासून)सर्व सृष्टि उत्पन्न झाली. म्हणून परमेश्वर हेच सर्व सृष्टीचें मूळ होय. सृष्टी उत्पन्न होऊन नौकडों पिढ्या लोटल्या नंतर आर्यलोक भरतखंडांत म्हणजे हिंदुस्थानात आले. त्यांच्या दोन मोठमोठ्या टोळ्या होत्या. त्यापैकीं एका टोळींत सूर्य नांवाचा सुप्रसिद्ध राजा झाला. तेव्हांपासून त्याच्या वंश-

जांना सूर्यवंश हे नांव पडले. दुसऱ्या टोळीत चंद्र उर्फ सोम नांवाचा सुप्रसिद्ध राजा झाला तेव्हांपासून त्या टोळीच्या वंशजांना चंद्रवंश हें नांव पडलें. याची जास्त तपशीलवार माहिती **वंश** या प्रकरणांत दिली आहे. या वंशवेलींत जे विद्वान ऋषींनी वेद-मंत्र रचले त्यांना मंत्रद्रष्टेऋषी उर्फ प्रवर ऋषी म्हणण्याची रूढी पडली. अशा प्रवर ऋषींच्या वंशांत ज सुप्रसिद्ध राजे व ऋषी होऊन गेले त्यांच्यापासून पुढें वाढलेल्या वंशजांनीं आपापले वंश त्याच मुळ ऋषींच्या नांवानें उपनांवा प्रमाणें चालविले. त्याला गोत्र म्हणतात. कालांतरानें ह्या गोत्रशाखा फार वाढल्या. त्यामुळें त्यांत निरनिराळीं कुळें निर्माण झालीं. दहीं मराठ्यांचीं ९६ मुख्य कुळें, रजपुतांचीं २६ कुळें, कायस्थांचीं ४२ कुळें व भावसार, माळी, बंजारी, लेवे, मंडारी, इत्यादि क्षत्रियांचीं कुळें हे गोत्रांचे पोटभेद आहेत अशा मुख्य कुळांपासून फार विस्तार झाला सबब त्यांत आडनांवें उर्फ उपनांवे [illegible] भेद पडले. यापेक्षां सहा हजार वर्षांपुर्वीच्या अती प्राचीन व त्यामुळें स्वभावतच चूकभूल झालेल्या वंश किंवा गोत्राच्या ऐवजी हल्लीं क्षत्रियांत बेटी-व्यवहाराकरितां मुख्य कुळांचा व उपनांवांचाच उपयोग करतात. गोत्रांस फारसें महत्व देत नाहींत. हें त्यांचे कारणें कालाच्या, स्मृतीच्या आणि व्यवहाराच्या दृष्टीनें अगदी वास्तव आणि फारच फार व्यवहार्य व उत्तम आहे, हें कोणीही कबूल करील. गोत्रें, प्रवरें आणि कुळें या प्रकरणांत याचा जास्त खुलासेवार माहिती दिली आहे.

५ आपण सर्व एकाच परमेश्वराचीं लेकरें आहोत, सर्वांचा आदिबाप एकच आहे सबब

सर्वंब्रह्ममयंजगत्

या वैदिकधर्म तत्वाप्रमाणें आपण सर्वांनीं भेदभाव सोडून एकमय व एकजीव होणें हेंच रास्त आणि एकराष्ट्रीय तत्वास पोषक असून हिंदुचा राष्ट्र घातकी जातीभेद मोडण्यास व जातीभेदामुळें हिंदुच्या गळ्यांत पडलेली गुलामगिरीची बेडी तोडण्यास हाच मुख्य उपाय आहे.

६ मराठा क्षत्रियांशिवाय, राजपुत, कायस्थ, भावसार, माळी, बंजारी, मंडारी, लेवे इत्यादी पुष्कळ शाखांच्या क्षत्रियांचे इतिहास आणि वंश, गोत्र, कुळें, उपनांवें वगैरे माहिती याच ग्रंथात पुढें स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे. त्यांतील बहुतेक वंश, गोत्र, कुळें व उपनावें याचा मेळ इतर क्षत्रियांच्या कुळ गोत्रांशीं परस्पर मिळतो. या सर्वांचे मूळचे एकच असावे. पण दळणवळणाच्या अभावामुळें व देशकाल परिस्थितीमुळें हल्लीं मुळ ते अजीबात झांकले गेलेले असतात एकाच वटवृक्षाच्या अनेक पारंब्या जमीनीला टेकून एकाच वटवृक्षाचे निरनिराळे अनेक वटवृक्ष बनतात किंवा एकाच वृक्षाच्या बीजापासून एकाच जातीचे पण निरनिराळ्या गुणाचे व रुपाचे हजारो वृक्ष तयार होतात. पण ते सर्व मूळचे एकच असतात. हाच न्याय मानव कोटीसही लागू आहे. सबब आपल्या पूर्वजांचे-आर्यांचें स्वातंत्र्य तेज पुनः मिळविण्याकरितां व हल्लींची आपली गुलामगिरी घालविण्याकरितां आर्य हें एकच मूळचें नांव व आर्य ही एकच जात सर्वांनीं धारण करून एकजीव व्हावें याच हेतूनें हे वंश, गोत्र, कुळें उपनावें यांचीं वटवृक्ष अथवा बीजवृक्ष न्यायानें मांडलेलीं चित्र वाचकापुढें मांडलीं आहेत.

पंचकुळी आणि सप्तकुळी.

श्रीशिवाजी महाराजांनीं हिंदुपदपादशाहीची स्थापना करून इ. स. १६६४ साली स्वतःस राजा हा किताब घेतला आणि मोरोपंत पिंगळे यास पेशवा अथवा मुख्य प्रधान नेमले. चित्पावन हे हाडामांसानें व रक्तानें मूळचे खर हिंदु नसून ते मूळचे यवन ह्मणजे मुसलमान असल्यामुळें शिवाजीची हिंदुपदपादशाही त्यांच्या डोळ्यात खड्यासारखी सलूं लागली. पण इलाज चालेना. पुढें इ. स. १६७४ सालीं जेव्हां शिवाजी महाराजांनीं राज्याभिषेक करवून घेतला तेव्हां मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे यांचा मस्तकशूळ फार जोरानें उठला. त्यांच्या राज्यभिषेकास हाणून पाडण्यासाठीं पिंगळ्यानें अनेक खोटीं कारस्थानें रचलीं. स्वतः बेगळेंच राहून मराठा सरदार मंडळींत क्षत्रियत्वाचा उच्चनीचपणाचे भेदभाव निर्माण केले. त्याचवेळीं पंचकुळी ह्मणजे पांच श्रेष्ठ कुळांची यादी पिंगळ्यानें स्वकपोल कल्पित निर्माण केली. त्यांची नांवें:- १ (चावन) मोहिते २ (हांडे) महाडिक, ३ शिर्के, (तुवर) ४ गुजर (पवार) व ५ भोंसले (सिसोदे) हीं पांचच कुळें क्षत्रियांचीं आहेत व त्यांत मोहिते महाडिक वगैरे अस्सल क्षत्रिय असून भोसले हे हलक्या-खालच्या दर्जाचे आहेत. सबब वरील उच्चकुळांचे क्षत्रिय सोडून शिवाजीला राज्याभिषेक होऊं देऊं नये. असें वरील चार कुळांच्या सरदारांना शासावलें. पण तितक्यानें पिंगळ्याचें इच्छित कार्य साधलें नाहीं; ह्मणून त्या पांच कुळांचे आप्त सोयरे ह्मणजे १ पालकर (पलक) २ आहेराव (अहिर) ३ घोरपडे ४ जाधव, ५ फाळके ६ निंबाळकर ७ काटे उर्फ राठोड ही नवीन सप्तकुळी निर्माण केली आणि या १२ कुळांत श्रेष्ठत्वाची चांगली जोराची भांडणें लावून दिली. त्यांत मुद्दा असा होता कीं, भोसले हें कुळ हलकें आहे सबब श्रीशिवाजीस राज्याभिषेक होऊं देऊं नये. त्यांत कांहीं शास्त्री, उपाध्याय व भट्ट मंडळांनीं शास्त्रार्थ दाखवून हा कलहाग्नि पेटविला. पण शिवरायांनी तो कलह मात्र चातुर्यानें व कुशलतेनें मिटविला आणि गागा भट्ट बडून राज्याभिषेक करून घेऊन मराठा तितका सर्व एकच आहे असें ठरविलें. पण तेव्हां पासून ही खोटी पंचकुळी व सप्तकुळी निर्माण झाली. सातारचे गादीवरील शेवटले राजे प्रतापसिंह महाराज यांना राज्यभ्रष्ट होण्यास हाच उच्चनीचपणाचा आपसातील कलहाग्निच कारण झाला. याच उच्च नीचपणाच्या भावनेमुळें कांहीं मराठे सरदार मत्सर बुद्धीनें भिक्षुकांच्या कटांत शिरले. नातु प्रभृतीचित्पावन ब्राह्मणांनीं याच पंचकुळी व सप्तकुळींतील लोकांना आपल्या कटांत घेऊन महाराजांचे सख्खे बंधु आपासाहेब उर्फ शहाजी यास प्रतापसिंहाचे विरुद्ध उठवून राज्यपदाचें आमिष दाखवून व इंग्रजाविरुद्ध खोट्या शिक्या मोर्तबाचे खोटे कागदपत्र तयार करून व तो आरोप महाराजाकडे लागू करून त्यांना पदच्युत करविलें. मराठ्यांच्या ९६ कुळापैकीं पिंगळे—पेशव्यांनीं निर्माण केलेले हें पंचकुळी व सप्तकुळीचें भूत मराठा मंडळी पैकीं अशिक्षित

व मूर्ख लोकांना अद्यापि वारंवार पछाडते व त्याच्यात श्रेष्ठत्वाची दुही माजविण्यास कारणीभुत होत असते. १६ कुळांचा तपशीलवार तक्ता पुढें दिला आहे.

या ९६ कुळांपैकीच ही पंचकुळी व सप्तकुळांत मोडणारी कुळें असून त्यांत उच्चनीचपणाचा भेदभेद मुळींच नव्हता व हल्लींही खरोखर नाहींच. भविष्योत्तर पुराणांत आणि स्कंदपुराणांत, सह्याद्रि खंडांत मूळस्तंभ अध्याय १७ यांत आणि क्षत्रियांची उत्पत्ति व वंशावळी या सर्वसान्य प्राचीनग्रंथांत आणि शहाण्णवकुळी वंशावळी नांवाच्या ग्रंथांत देखील हीच शहाण्णवकुळें असून त्यांत उच्च नीचपणाचे भेदभाव मुळींच दर्शविले नाहींत. शिवरायाच्या पुर्वी या पंचकुळींचा व सप्तकुळींचा पत्ता कोठेंच सांपडत नाहीं या विश्वसनीय पुराव्या वरून पाहतां हें पंचकुळी व सप्तकुळींचें भूत निमकहराम मोरोपंत पिंगळ्या पासून जन्मास आलें व तेंही स्वराज्य संस्थापनेच्या प्राणप्रतिष्ठेस अपशकून करण्याच्या दुष्ट हेतूनें निर्माण झालें असें दिसतें. लोक अद्यापि पिंगळ्याचा शब्द दुर्धर अपशकुनी मानतात. तसाच अपशकुनी मोरोपंत पिंगळ्यानें खुद्द आपल्या अन्नदात्या मालकालाच केला. त्यावेळी तो पिंगळ्याच अपशकुनी हात जरी शिवरायाच्या कर्तबगारीमुळें फसला तरी त्याचा कोंब काहीं कालांतराने त्याचा वृक्ष बनला. आणि त्या वृक्षाच्या छायेंत बसणाऱ्या अशिक्षित व वृक्षाभिमानी मराठ्यांना त्यांची निशा चहून श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या खोट्या भावनेनें आपसात वाटी घेटी पडूं लागले व त्यामुळें त्यांच्यात फूट पडली. त्यामुळे पेशवे पदाचा व त्यांच्याच शाहाच्या अगदीच्या निमकहरामाना फार संतोष वाटून त्यांच दुहेरी देशाभिमान स्वतःची स्वार्थांची पोळी भाजून घेण्यास त्यांना चांगली संधी सांपडली.

साताऱ्याच्या प्रतापसिंह महाराजांना याच आपसांतील श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या कलहाग्नीनें राज्यभ्रष्ट करून इंग्रजांच्या फितुरानें व पुणेरी भिक्षुकी टोळीच्या खोट्या कारस्थानामुळें कायमचे कैदेत मरावें लागलें. याच भिक्षुकी अग्निस्फुल्लिंगाच्या कलहाग्निनें नागपूरचे भोसले, तंजावरचे राजकुल, फलटणचे निंबाळकर, इत्यादि अनेक राजघराणें जळून खाक झालीं. हाच भिक्षुकी घातमंदपणा आपसातील श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या दुहीमुळें क्षत्रियांचें क्षात्रतेज नष्टकरून त्यांना शूरत्वाच्या पंक्तींत बसण्यास कारणीभुत झाला आहे. व होत आहे. याच श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या मृगजळवत खोट्या भावनेमुळें मराठा क्षत्रिय आपसांत भांडून भिकारी झाले. त्यांच्या अंगातील क्षत्रियत्वाचा रगडा रपीळ या दुहीच्या अग्नींत जळून खाक झाला आणि आतां सहज धक्क्यानें मातीमोल होऊन हवेंत उडून जाणारी त्याची पोळदार राख मात्र कायम राहिली आहे.

माझे प्रिय मराठा बांधवांनों आता तरी या कलहाग्नीचें रहस्य ओळखा हा नकली श्रेष्ठकनिष्ठत्वाचा भेदभाव सोडा, शहाण्णवकुळांचा सर्व मराठा भेदभावरहित एकजीव करा. म्हणजे एकीच्या बळावर अद्यापि आपणाला पूर्व वैभव सहज प्राप्त करून घेतां येईल. पंचकुळी व सप्तकुळींचीं आणि उच्च नीचपणाची ही भावना मृगजळवत

खोटी आहे दीपवतंग न्याया प्रमाणें तुमच्या गैरसमजामुळें ती तुमचाच वळी घेणारी व तुमच्याच हातानें तुमचा नाश करणारी आहे. या करितां ही उच्चनीचपणाची खोटी भावना सोडा आणि एकजीव होऊन आत्मबलानें पूर्वैश्वर्य मिळवा.

मराठा क्षात्रियांची शहाणव कुळी परिशिष्ट नं. ४ (अ)

श्री व्यास ऋषीनीं लिहिलेल्या स्कंध पुराणांतील सह्याद्रिखंड या ग्रंथांत षण्णवती-कुल नामक प्रकरणांत, त्याच प्रमाणें स्वामी नरोत्तमानंद सरस्वती कृत मराठा क्षत्रियांची शहाणवकुळी आणि बाळाजी नथुजी गावंडे यांनीं केलेली वंशावळी व शहाणवकुळी, मूळस्तंभ अध्याय १७ आणि क्षत्रियांची उत्पत्ति व वंशावळी या ग्रंथांत क्षत्रिय मराठा जातीचीं ९६ कुळें पुढें दिलेल्या अनुक्रमानें लिहिलेलीं आहेत :- वरील ग्रंथातील ९६ कुळांचा परस्पराशीं मेळ आहे. सबब ही ९६ कुळें विश्वसनीय आहे. असें आढळून वाटतें.

क्षत्रिय शाहाणव कुळी.

१ भोसले	२ गायकवाड	३ पवार	४ शिंदे
५ सावंत	६ मोहिते	७ चव्हाण	८ इंगळे
९ महाडिक	१० कदम-कर्दम	११ माने	१२ काळे
१३ आग्रे	१४ जाधव	१५ शालुंखे	१६ हंडे
१७ कांकडे	१८ राणे	१९ घाटगे	२० जगताप
२१ चालुक्य	२२ प्रतिहार परिहार	२३ ढमढेरे	२४ लाड
२५ जगदळे	२६ ढवळे	२७ दाभाडे	२८ धुमाळ
२९ थोरात	३० दळवी	३१ नलावडे	३२ पानसरे
३३ पिसाळ	३४ मालप	३५ फाळके	३६ आंगणें
३७ सिसोदें	३८ विचारे	३९ मंजुसरे	४० तावडे
४१ मोरे	४२ खैर	४३ वागवे	४४ राऊत
४५ रेणुसे	४६ वाघ	४७ पांढरे	४८ भोगले
४९ बागराव	५० भागवत	५१ मुळीक	५२ सुर्वे
५३ क्षीरसागर	५४ शितोळे	५५ ठाकुर	५६ शंखपाळ
५७ शिरके	५८ तोंवर	५९ मधुर	६० लांबर
६१ बांडे	६२ तेजे	६३ देवकांते	६४ शलारे
६५ सांवारे	६६ फाकडे	६७ हरफळे	६८ निकम
६९ दरबारे	७० कोंकाटे	७१ ढेंकले	७२ थोटे
७३ अहीरराव	७४ राठोड	७५ साळव	७६ पालांडे
७७ फाटक	७८ जगधनें	७९ घायबर	८० पिंगळे
८१ फडतरे	८२ भोंवारे	८३ राष्ट्रकूट	८४ खडतरे
८५ दाहे	८६ ढोणे	८७ निकाळ	८८ पाठारे
८९ बायर	९० भोइटे	९१ गव्हाणे	९२ गुजर
९३ नाळिंधरे	९४ डमाले	९५ पाळवे	९६ खंडागळे.

वरील ९६ कुळापैकीं प्रत्येक कुलांत अनेक उपनांवांचीं पोटकुळें आहेत. त्यामुळें आपापलें कूळ शोधून काढण्यास फार त्रास पडतो. तसेंच कांहीं कुळांची व पोट कुळाची द्विरुक्तीही होण्याचा संभव आहे. ही गैरसोय टाळावी आणि सर्व मुख्य कुळाची व पोटकुळांची उपनांवांची यादी विनचुक तयार होऊन प्रत्येकास आपलें उपनांवावरून स्वतःचें कुळगोत्र कुळाचार सहज पाहतां यावें या हेतूनें वरील कुळांची यादी मराठा वर्णानुक्रमानें पुढें दिली आहे. वर्णानुक्रमाच्या पुढील यादीस दिलेल्या अनुक्रम नंबर प्रमाणेंच त्या पुढील कुळगोत्रांचा तक्ता तयार करून त्यांत प्रत्येक कुळाची शक्य ती उपलब्ध माहिती दिली आहे. तसेंच प्रत्येक मुख्य कुळांत समाविष्ट होणाऱ्या पोट कुळांची (उपनांवांचा) यादीसुद्धां वर्णानुक्रमानेंच प्रत्येक मुख्य कुळांचे समोर कोष्टक नं. ३ मध्यें दिली आहे त्यामुळें द्विरुक्तीचा दोष टळून प्रत्येकास आपलें कुळगोत्र शिक्षणरीति शुद्ध पाहण्याच्या पद्धतीनें सुलभ रीतीनें सहज शोधून काढतां येतें.

परिशिष्ट नं. ४ (ब)

क्षत्रिय मराठा जातीची ९६ कुळांची वर्णानुक्रमवार यादी.

१	अहीरराव	२५	ढवळे	४९	पालवे	७३	मोरे
२	आंग्रे	२६	ढेकले	५०	पालांडे	७४	मोहिते
३	आंगणे	२७	ढोणे	५१	पिंगळे	७५	राठोड
४	इंगळे	२८	तावडे-तायडे	५२	पिसाळ	७६	राष्ट्रकूट
५	कदम-कर्दम	२९	तोंवर-तुंवर (तुर्वसु)	५३	फडतरे	७७	राणे
६	काळे	३०	तेजे	५४	फांळके	७८	राऊत
७	काकडे	३१	थोरात	५५	फाकडे	७९	रेणुसे
८	कोकाटे	३२	थोटे	५६	फटक	८०	लाड
९	खंडागळे	३३	दरवारे	५७	बागडे	८१	वाघ
१०	खडतरे	३४	दळवी	५८	बागराव	८२	विचारे
११	खर	३५	दाभाडे	५९	बांडे	८३	शंलोरे शिलहार
१२	गव्हाणे	३६	दाडे	६०	बाबर	८४	शंखपाळ
१३	गुजर	३७	देवकांते	६१	भागवत	८५	शिंदे
१४	गायकवाड	३८	धायबर	६२	भोंसले-सिसोदे	८६	शितोळे
१५	घटगे	३९	धुमाळ	६३	भोंदारे	८७	शिरके
१६	चव्हाण	४०	नलावडे	६४	भोंगळे	८८	सालवे
१७	चालुक्य	४१	नाळिधरे	६५	मोहिते	८९	सावंत
१८	जगताप	४२	निंबम	६६	मधुरे	९०	साळुंखे
१९	जगदळे	४३	निसाळ	६७	मालप	९१	सांवारें
२०	जगधन	४४	पौरव पवार प्रमार	६८	माने	९२	सिसोदे
२१	जाधव	४५	प्रतिहार-परिहार	६९	मालुसरे	९३	सुर्वे-सुर्य
२२	ठाकूर	४६	पानसेर	७०	महाडिक	९४	हंडे
२३	दमाले	४७	पाढरे	७१	झांबर	९५	हरफळे
२४	ढमेढरे	४८	पाठारे	७२	मुळीक	९६	क्षीरसागर

परिशिष्ट नं. ४

क्षत्रिय मराठा जातीची १८ कुलाकुलें

पोटकुळें, वंश, गोत्र, कुलाचार,

वतनाचें नांव इत्यादि

माहितीचा

तक्ता.

सूचना

पृष्ठ नं २६३ ३६४ वरील

सूचना अनोदर

वाचा

अ. नं.	मुख्य कुळाचें नांव	उपनांवें—आडनांवें ह्मणजे पोटकुळें उर्फ पर्याय.	वंश
१	२	३	४
१	अहीरराव	अहीर, आमले, आरज आटोळे, अकाते, अडाऊ, अवघड, आरमाळे, आखरे, आयन, इघाते, इक्षे, एकरे, एखाडे, एढे, ऐगव, कथळे, करनाळे, गंगाळ, गुवरे, घीमे घोडचंद, घोकले, चव्हाटे, चरंग जुनघरे, जुमडे, झाडोबा, टाले, टोळे, डवर, डवरे, डोमणे, ढाकणे, पडोळे, पवासे, प्रोक्कट, वळें, बळिये, भिलकर, मुदगले, मुलमुळे, शिमरे, शिरे, हाईपकर, हासे.	सूर्य
२	आंग्रे	अमनकार, अवकाळे, आतकड, आरमूड, आसूड, आखाडे, अंधारे, आंधक, इखडे, इसनकार, इटकरे, इथाळे, कंकराळे, करांडे, कोलाळ, कडाळे, गदगर्व. घोडतले, चटप, जंजाळ, जवंजाळ, टिपरे, लढे, वटाणे, सवकाळ, सवाई, सदार, सरदार,	सूर्य
३	आंगणे	आंगन, अळसपुरे, अघोळे, अस्वलूक, अस्वले, आघटे, आगरकार, आगराखे, उगल, उपरे, उरमाले, उनोग, कदाण, उधवे, कराळे, कलाने, किनगे, गटरखेड, गुलाब, घालप, चडे, चुधे, चुध, मेडकर, रणधीर, रणजिड, लहाने, वळे, साऊरकार, सालव.	चंद्र
४	इंगळे.	अरडक, आरवट, अतकरे, आळक. आळसुळे, इमलकार. इंपळे इलमकार, इने, इटखेडे, मोरसकार, ओंधंगे, कसुरकार, कनोजे, कांवडी, खडके, गदफणे, चिकटे, चिमेटे, चौधरी, जगदळ, जंगले, टोपल, दुधखळे, दुधाळे. ढेपे, त्र्यंबके, पोरे, पोटे, मंडलीक, मते, मातिखाये, रेचे, रेपे, रेखे, सणगे, हिंगरे.	चंद्र

गोत्र	कुळदेवत व त्यांतील देवक.	राजा चा नांव किंवा घराणे	मूळचा मानलेला स्थान	शेरा.
५	६	७	८	९
भारद्वाज	उमामहेश्वर विजयशस्त्र खांडा लग्नकार्यांत पंचपल्लव	भास्करवर्मा	अहिरदेश	अहिर देशांत राज्य करणारे ते अहीरराव. आर्यलोक प्रारंभा पासून अग्नि आणि शक्तिचे ह्यागले माता व ब्रह्माचे उपासक आहेत. इतर दैवते, त्यांच्यांत आधुनिक काळांत अज्ञाना-मुळे शिरलीं आहेत.
कौशिक	उमामहेश्वर, विजय शस्त्र तलवार लग्नांत पंचपल्लव.	रवीवर्मा	कोंकण १७ वें शतक	ह्यांतील सर्वकाळ वरिष्ठ गोत्री म्हणवितात.
कुत्स	भवानी विजय शस्त्र तलवार. सोनें, हळद, केतक, कळंब, हें लग्नकार्यांतील देवक. लाल:-सिंहासन, छत्र, निशाण, वारू, ध्वजस्तंभी चंद्र.	इंदुवर्मा	केदार उर्फ केदाहार वनवासा-गोवें. पलाशिका उर्फ हलशी	आंगणें हें कुळ कश्यप कुळाचा कोणी पोटभेद मानतात.
लौगाक्षि	कुळदैवत ब्रह्मनाथ देवक-कमळ पिवळे:-सिंहासन, छत्र, निशाण, वारू. ध्वजस्तंभी हनुमान.	इंदुवर्मा	महीनगर अयोध्या	दक्षिणेचे कांहीं इंगळे भारद्वाज गोत्री आहेत.

अ. नं.	मुख्य कुळाचें नांव.	उतारवें—आडनांवें अगर्जे पोटकुळें उर्फ पर्याय.	वंश
१	२	३	४
५	कईम-कदम कदंब.	अंबड, अखडे, अवटे, अवाडे, काजडे, कावळे. कटंब, कालंगे, कालख, कुडळे, कुवल, कुन्ह, खडपे, गाते, गागुळे, गातांडे, घाडे, घोडे, घोरडे, जायजुगे डोईजड तकटे, तागडेवडे, देवर, धडशिरके, धूळ, धूमाड, नाबरे, वडके, वाघे, वरसे, वालेकर, वारबुद्धे, बिरथ, बोवाटे, बाटे, वोठर, भासे, भालेकर, भिसे, मिरासलमडे, मुंगे, महिपाळ, रायगडे, वाडे, वनवे, सोडगे, हिरे.	सूर्य चंद्र
६	काळे	अवसरे. अपसे, अमलदार, आटमांडे, आठवले, आंबोले, काळाकुगळी, काळामारे, काळ, कांबळे, काजळकार, कावडे. कुरुप, कुचमकार, कोतवाल, काळमेघ, काल-भोज, काळके, खंडेराव, डापरे, तायाडे, तेल्हारकार, दाणे, बारसाकड, वाकडे, वाबडे भांबेरे, रोडे, वडसकार, शिंत्रे,	सूर्य (रघुवंश)
७	कांकडे	अमलपुरे, आवतकार, एरडकार, ओंगळ, ओंगले, कर-जभोजण, कडमर, कहूळकर, कातुरे, कारेकार, कावियें कन्हेरकार, कंठार, गोर, गौड, डिक्कार, डमरे, डाहणे डाहुले, घावणेर, वंडलकार, सायंदे,	सूर्य
८	कोकटे	आंबोने, आंबटे, आंबटकार, कर्कोटे, कडसकार, कर-नाटक, कानफाडे, कोंड, कैकाडी, कांचसे, कोळेण, जेठराव डोळे, डवे, बाछल, बोंडे, मानतकर, मेंढे, वरणे.	सूर्य

गोत्र	कुलदैवत व लग्नांतीं देवक	राजाचें नांव किंवा पदवी.	मुळच्या गादीचें स्थान	शेरा.
५	६	७	८	९
भारद्वाज	तुळजापुरची भवानी देवी विजयशस्त्र तलवार लग्नांत देवक-सापें, हळद. केतक, कळंब लाल:-सिंहासन, छत्र निशाण. वारू, ध्वजस्तंभी सूर्य.	प्रभाकर वर्मा उपपद.	केदार उर्फ कंदहार वनवासी, गोवें सातवे शतकांत, तेरावें शतकांत. कर्नाटकांत चवथे. शतकांत. मुंगीपैठण.	वऱ्हाडातील कदम आपणास सूर्यवंशी भारद्वाज गोत्री मानतात. व दक्षिणचे चंद्रवंशी दुर्वास गोत्री मानतात कांही कदमांचें गोत्र कौलखेंक्षात मानग्रही आहे. याचें कारण बौद्धधर्मीचे वेळी सर्वांचें गोत्र बुडलें होते व नंतर स्मरणें लावण्यात आले.
काळे	नं. ५ प्रमाणें	प्रभाकर वर्मा		काळीचा म्हणजे शेतजमिनीचा बंदोबस्त करणारा अधिकारी ते काळाये उर्फ काळे. धागा-दोरा विणे, पैमाष करणे इतर्फे कामे करणें वगैरे कामावरील सरकारी अधिकारी ते काळांये उर्फ काळे. ह्या अर्थ ग्रांडड-फचे इतिहासात देखील आहे.
कौंडिण्य	शिवपार्वती विजयशस्त्र तलवार लग्नांत कळंब. ईड किंवा मेखलाचे देवक.	दिवाकर वर्मा		उत्तरहिंदुस्थानांत गांवाच्या शिवेस काकड म्हणतात. प्रत्येक गांवचा शीव ठरवून देणार अधिकारी ते काकडे
काश्यप	नं १६ प्रमाणें	भास्कर वर्मा जयापीड राजा. ७११ नंदीगुप्त १००३	काश्मीर	हा वंश पुढें लोहरवंश या नांवानें चालू लागला.

अ. नं.	मुख्य कुळाचें नांव.	उपनांवें-आडनांवें म्हणजे पोटकुळें उर्फ पर्याय.	वंश.
१	२	३	४
९	खंडागळे	अवधीय, आवटरे. कोठीवान, कळसांडे, खांडे, खेडकर, खुपसे, चांपेहे, जगदाळ, ठोंबरे, डाहाके, डिके, ढोळपे, डिवरे. ढोमसेहे, पतंगराव, पुजारी, पाथरकार, पाथाळे, पाटकर, पिपळे, पाचकोर, बाबने, बोदडे, मुकुंद, रायपुरे, वखारे, वत्सराज, तोनोने, हांग.	सूर्यवंश (रघु)
१०	खडतरे.	आडकिमें, कळमकार, कोदळे—कोसारकार-खिलोरे-खरडे—खरार, ढाके, नखाते. नमाळे, नकातकार, नारतर, निस्ताने. निळखन, पव्हरे, परवान, पिंपळशेंडे, पुरळकर, पायघन, पांचपोहर, पारसकार, पळापळ पत्रे, पांचभाई, पारधी.	चंद्र
११	खैर	औरंगपुरे, काकुडे, कटिंग काठोळे, कारू, खेडूले, खैरनार, डिकले, डव्हळे डाखोरे—डाखरे, दिघोळ, डाकूळे डिक्कर डामरे—डरगे—डक्स, ढंढारे, नाफडे, नाल, नेहते, पारखी, पिंगारे, बागवीर, वरकड-	चंद्र
१२	गव्हाणे.	आळे, आडे, कसार, कामोले, कोंगरे, खंदोले, खडककार, गलाढा—गरमल-गवळे, टडहा—टकाडे, डांगे—डीकर डवंगे, ढाकूळकार, नमाडे, पाकळे, पानकोटे, पाळलघुडे पिरे, बामर, वंशवार.	चंद्र
१३	गुजर.	आगलावे, काळोकार. कांडेकार, किटे, केदारकार, खाकरे, गगथडे, गुजराथी, गुर्जर, डगरे, डाफ, डाखोडे. डांगरे, नायकवाड, बथरावार, बढोरे, बाबीसकार,बुलके बोलके, मगर्मक.	सूर्य

गोत्र	कुलदैवत व लग्नांतील देवक.	राजाचें नांव किंवा पदवी	मूळच्या गादीचें स्थान	शेरा.
५	६	७	८	९
वसिष्ठ	नं. १५ प्रमाणें.	प्रभाकर वर्मा.		खंड = भाग-आगळे = वेगळे स्वत: चया फौजांनिशीं स्वतंत्रपणें वावरणारे ते खंडागळे.
सोमश	उमामहेश्वर दैवत. विजय शस्त्र खांडा लग्नांत पंचपल्लव.	इंदु वर्मा.		खडतर. तापट स्वभावाचा तेज मिजाजीचा.
मार्कंडेय	नं. १० प्रमाणें.	इंदु वर्मा.		खेरपूरचे वतनदार ते खैर ऊर्फ खेरे.
कौशिक	कुलदैवत उमामहेश्वर विजय शस्त्र खांडा लग्नांत देवक पंच पल्लव भगवे सिंव्हासन भगवें छत्र भगवे निशाण भगवा वारू ध्वजस्तंभी चंद्र.	इंदु वर्मा.		सर्वांशीं मेळकरू त्यांना आपल्या गव्हाणींत म्हणजे मेळांत ठेवणारे ते गव्हाणे.
शौनक	प्रभावती कुल देवी. खांडा हें विजय शस्त्र लग्नकार्यांत पंच पल्लव	भानुवर्मा उपपद	अयोध्या	नागपूरचे गुजर अत्रिगोत्र मानतात. व इचर कांहीं शौनक मानतात.

अ. नं.	मुख्यकुळ.	उपनांवें उर्फ पर्याय.	वंश.
१	२	३	४
१४	गायकवाड	अचुरे, अडपेर, आखळे, करमट, करळे, कवडे कर्‍हाडा खाजन, कासरे, कारका कोहार, कानडे, कोने कानले, किरकिरे, कुंड, कोडे, खानवाडे, खरे, गराडे, गडूर, गन्ढवे, गायक्र गायकी, गावळ, चंद्रे. जाचक, जिरे जुन, झिळे, टिवटे, डिंगे, ढुकरे, डोंबर, देरे, तळवळे, ताकटे, तानाळे, दातार, दातीर, दुंगा, देवळे, धगडे धंग, धामळे, धारे, धुधुपळ नखरे, नवले, नायर, नागटे, पवडे, पडवार, पावडे, पाध्ये, पालकर, पुरे, पेंढारे, फडे, फाळे, बडवे, बामा, बागासूर, बेंद्र, बेलदडे बोडक, भडकंवे, भाते, भामते, मडका, मढळे, मढके मराठे, मरमठ, महाळुंगे, मुसिक, मारळ, मामळे, मोरकर, मोरे, माणसे, मारे, म्हातारे, मुरकर, मुळके मेणे, मेनगुगे, मोर्डे, रांगे, रानडे, रोडके, लंगर, लोकरे, वैद्य, शंख, शिवने, शेवडे, समळे, सवळे, सरद, सरोट, सातगे, सापळे, सुरखे, सोनवडे, हजारे, हेमे हाडगे, हाके.

कंटे, कपाळे, कापसे, खराटे गाढेळ, गावंडे, गाड, गोंडे, घान, जोगळे, जानोरकर, तिडके, दिघेकर, धरपाळ, नारोडे, पत्तरे, पाट, बेडे, भोदुरे, मरकाळे, मळोदे, माहुरकर, मुसगे, मानकर, पडीर, शेळे, शेरोड, सांगवी, सागने, सावळे.

आतळे, इसापुने, कनोजिया, करळे, किरम, कसपटे, खळभार, कापडे, कदम, खरपरे कोडेकर, खोपकर, खळेळे, गुंड, घारध, चांदवड डफळे, ढवाळे, ढाकळे, तांबळकर, थोरात, दरे, दहिवे, दलपते, दुधिंग, देशमे, धडम, धोबटे, पारटे, पाखरकर, फाळके, फाळक, फुगे बचे, बारंगे, भंडारे, भायकर, भालेराव, भैरव, भोंसर भोईर, रणदिवे, लागथे, लोटणकर, वडोरे, विनाव, हावळे.

अ. नं.	मुख्यकुळ.	उपनांवें उर्फ पर्याय.	वंश.
१५	घाटगे.		सूर्य.
१६	चव्हाण.		सूर्य चंद्र.

गोत्र.	देवक.	राजा किंवा उपइ.	गादी.	शेरा.
५	६	७	८	९
